| (१) | श्री. विक्रम वसंतराव काळे | २७ फेब्रुवारी,२०२३ |
| (२) | श्री. सुधाकर गोविंदराव अडबाले | -"- |
| (३) | श्री. सत्यजीत सुधीर तांबे | -"- |
| (४) | श्री. ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे | -"- |
| (५) | श्री. धीरज रामभाऊ लिंगाडे | -"- |

### (ड) मंत्री / राज्यमंत्री यांचा परिचय

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | परिचयाचा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **मंत्री** | |
| | निरंक | |
| | **राज्यमंत्री** | |
| | निरंक | |

## विवरण क्रमांक ३

## दिनांक २७ फेब्रुवारी ते २५ मार्च, २०२३

## महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी

(मा.उप सभापती, विरोधी पक्षनेता व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या - १८

| अ.क्र | वार व दिनांक | एकूण सदस्य संख्या | उपस्थिती संख्या | अनुपस्थितीची संख्या | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| (१) | सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ | २६३ | १९६ | ६७ | ७४.५२ |
| (२) | मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ | २६३ | २२८ | ३५ | ८६.६९ |
| (३) | बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ | २६३ | २२६ | ३७ | ८५.९३ |
| (४) | गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ | २६३ | २३१ | ३२ | ८७.८३ |
| (५) | शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ | २६३ | २०८ | ५५ | ७९.०८ |
| (६) | बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३ | २६३ | २०१ | ६२ | ७६.४२ |
| (७) | गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ | २६५ | २५१ | १४ | ९४.७१ |
| (८) | शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ | २६५ | २१४ | ५१ | ८०.७५ |
| (९) | सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ | २६५ | १९१ | ७४ | ७२.०७ |
| (१०) | मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ | २६५ | २२९ | ३६ | ८६.४१ |
| (११) | बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ | २६५ | २३५ | ३० | ८८.६७ |
| (१२) | गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ | २६५ | २३१ | ३४ | ८७.१६ |
| (१३) | शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ | २६५ | २०० | ६५ | ७५.४७ |
| (१४) | सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ | २६५ | २१० | ५५ | ७९.२४ |
| (१५) | मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ | २६५ | २१८ | ४७ | ८२.२६ |
| (१६) | गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ | २६५ | २१५ | ५० | ८१.१३ |
| (१७) | शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ | २६५ | २२४ | ४१ | ८४.५२ |
| (१८) | शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ | २६५ | १४१ | १२४ | ५३.२० |

## विवरण क्रमांक - ४
## दिनांक २७ फेब्रुवारी ते २५ मार्च, २०२३
## महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी

(मा.उप सभापती, विरोधी पक्षनेता व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या - १८

| अ.क्र | सदस्याचे नाव | उपस्थिती | अनुपस्थितीची | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| (१) | असगावकर, श्री. जयंत दिनकर | १२ | ०६ | ६६.६६% |
| (२) | अडबाले, श्री. सुधाकर गोविंदराव | १८ | ०० | १००% |
| (३) | अहिर, श्री. सचिन मोहन | १६ | ०२ | ८८.८८% |
| (४) | आंबटकर, डॉ. रामदास भगवानजी | १६ | ०२ | ८८.८८% |
| (५) | कराड, श्री. रमेश काशिराम | १२ | ०६ | ६६.६६% |
| (६) | कायंदे, डॉ. मनीषा शामसुंदर | १८ | ०० | १००% |
| (७) | काळे, श्री. विक्रम वसंतराव | १४ | ०४ | ७७.७७% |
| (८) | खडसे, श्री. एकनाथराव गणपतराव | १६ | ०२ | ८८.८८% |
| (९) | खापरे, श्रीमती उमा गिरीष | १५ | ०३ | ८३.३३% |
| (१०) | खंडेलवाल, श्री. वसंत मदनलाल | ११ | ०७ | ६१.११% |
| (११) | गिरकर, श्री. विजय ऊर्फ भाई विठ्ठल | ०९ | ०९ | ५०% |
| (१२) | गोऱ्हे, डॉ.नीलम दिवाकर | | मा.उप सभापती | |
| (१३) | चव्हाण, श्री. सतीश भानुदासराव | १७ | ०१ | ९४.४४% |
| (१४) | जगताप, श्री. अशोक अर्जुनराव ऊर्फ भाई | १४ | ०४ | ७७.७७% |
| (१५) | जानकर, श्री. महादेव जगन्नाथ | १८ | ०० | १००% |
| (१६) | ठाकरे, श्री. उद्धव बाळासाहेब | ०४ | १४ | २२.२२% |
| (१७) | डावखरे, श्री. निरंजन वसंत | १८ | ०० | १००% |
| (१८) | तटकरे, श्री. अनिकेत सुनिल | १८ | ०० | १००% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (१९) | तांबे, श्री. सत्यजीत सुधीर | १२ | ०६ | ६६.६६% |
| (२०) | दटके, श्री. प्रविण प्रभाकरराव | ०८ | १० | ४४.४४% |
| (२१) | दराडे, श्री. किशोर भिकाजी | १४ | ०४ | ७७.७७% |
| (२२) | दराडे, श्री. नरेंद्र भिकाजी | १६ | ०२ | ८८.८८% |
| (२३) | दरेकर, श्री. प्रविण यशवंत | १५ | ०३ | ८३.३३% |
| (२४) | दानवे, श्री. अंबादास एकनाथराव | | मा.विरोधी पक्षनेता | |
| (२५) | दुर्राणी, श्री. अब्दुल्ला खान ए.लतिफ खान | ०९ | ०९ | ५०% |
| (२६) | धस, श्री. सुरेश रामचंद्र | १६ | ०२ | ८८.८८% |
| (२७) | नाईक, श्री. नीलय मधुकर | १७ | ०१ | ९४.४४% |
| (२८) | नाईक-निंबाळकर, श्री. रामराजे प्रतापसिंह | १० | ०८ | ५५.५५% |
| (२९) | पटेल, श्री. अमरिशभाई रसिकलाल | ०६ | १२ | ३३.३३% |
| (३०) | पडळकर, श्री. गोपीचंद कुंडलिक | १८ | ०० | १००% |
| (३१) | परब, ॲड.अनिल दत्तात्रय | १४ | ०४ | ७७.७७% |
| (३२) | पाडवी, श्री. आमश्या फुलजी | ११ | ०७ | ६१.११% |
| (३३) | पाटील, श्री. कपिल हरिश्चंद्र | १५ | ०३ | ८३.३३% |
| (३४) | पाटील, श्री. जयंत प्रभाकर | १४ | ०४ | ७७.७७% |
| (३५) | पाटील, श्री. रमेशदादा | १७ | ०१ | ९४.४४% |
| (३६) | पाटील, श्री. रामराव बालाजीराव | १६ | ०२ | ८८.७७% |
| (३७) | पाटील, श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. | १३ | ०५ | ७२.२२% |
| (३८) | पोटे-पाटील, श्री. प्रविण रामचंद्रजी | १७ | ०१ | ९४.४४% |
| (३९) | पोतनिस, श्री. विलास विनायक | १६ | ०२ | ८८.८८% |
| (४०) | बाजोरीया, श्री. विप्लव गोपीकिसन | ११ | ०७ | ६१.११% |
| (४१) | बावनकुळे, श्री. चंद्रशेखर कृष्णरावजी | ०९ | ०९ | ५०% |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (४२) | भारतीय, श्री. श्रीकांत पंडीतराव | १८ | ०० | १००% |
| (४३) | मिर्झा, डॉ.वजाहत मिर्झा अथर | १८ | ०० | १००% |
| (४४) | मिटकरी, श्री. अमोल रामकृष्ण | १७ | ०१ | ९४.४४% |
| (४५) | मोहिते-पाटील, श्री. रणजितसिंह विजयसिंह | १७ | ०१ | ९४.४४% |
| (४६) | राठोड, श्री. राजेश धोंडीराम | १७ | ०१ | ९४.४४% |
| (४७) | लाड, श्री. अरुण गणपती | १६ | ०२ | ८८.८८% |
| (४८) | लाड, श्री. प्रसाद मिनेश | १७ | ०१ | ९४.४४% |
| (४९) | लिंगाडे, श्री. धिरज रामभाऊ | १७ | ०१ | ९४.४४% |
| (५०) | वंजारी, श्री. अभिजीत गोविंदराव | १७ | ०१ | ९४.४४% |
| (५१) | शिंदे, प्रा. राम शंकर | १७ | ०१ | ९४.४४% |
| (५२) | शिंदे, श्री. शशिकांत जयवंतराव | १६ | ०२ | ८८.८८% |
| (५३) | शिंदे, श्री. सुनिल गोविंद | १७ | ०१ | ९४.४४% |
| (५४) | सरनाईक, श्री. किरण रामराव | १८ | ०० | १००% |
| (५५) | सातव, डॉ. प्रज्ञा राजीव | १७ | ०१ | ९४.४४% |
| (५६) | सिंह, श्री. राजहंस | १६ | ०२ | ८८.८८% |
| (५७) | रिक्त | | | |
| (५८) | रिक्त | | | |
| (५९) | रिक्त | | | |
| (६०) | रिक्त | | | |
| (६१) | रिक्त | | | |
| (६२) | रिक्त | | | |
| (६३) | रिक्त | | | |
| (६४) | रिक्त | | | |
| (६५) | रिक्त | | | |
| (६६) | रिक्त | | | |
| (६७) | रिक्त | | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| (६८) | रिक्त | | | |
| (६९) | रिक्त | | | |
| (७०) | रिक्त | | | |
| (७१) | रिक्त | | | |
| (७२) | रिक्त | | | |
| (७३) | रिक्त | | | |
| (७४) | रिक्त | | | |
| (७५) | रिक्त | | | |
| (७६) | रिक्त | | | |
| (७७) | रिक्त | | | |

## विवरण क्रमांक - ५

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या फेब्रुवारी-मार्च मध्ये झालेल्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनातील दैनंदिन कार्यवाहीचा

## संक्षिप्त अहवाल

## सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३

सकाळी ११-०० वाजता दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर झालेल्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणानंतर ३० मिनिटांच्या विश्रांतीनंतर विधानपरिषदेची बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात दुपारी १२ वाजता माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

अधिवेशनाचा शुभारंभ वंदे मातरम् या गीताच्या समूह गायनाने झाला.

यानंतर राज्यगीताचे समूह गायन झाले.

**१.** संसदीय कार्यमंत्र्यांनी, संभाजीनगर विभाग शिक्षक मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. विक्रम वसंतराव काळे, नागपूर विभाग शिक्षक मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. सुधाकर गोविंदराव अडबाले, नाशिक विभाग पदवीधर मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. सत्यजित सुधीर तांबे, कोकण विभाग शिक्षक मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. ज्ञानेश्वर बारकू म्हात्रे आणि अमरावती पदवीधर मतदारसंघातर्फे निर्वाचित झालेले श्री. धीरज रामभाऊ लिंगाडे यांचा सभागृहाला परिचय करून दिला.

**२.** उप सचिवांनी, विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त सभेत सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाची प्रत सभागृहासमोर ठेवली.

**३.** श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला -

“ माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषदेचे सदस्य, त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. ”

प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी उपरोक्त आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला अनुमोदन दिले.

मंगळवार दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ आणि बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजी या प्रस्तावावर चर्चा होईल. या प्रस्तावास ज्या सन्माननीय सदस्यांना सुधारणा सुचवायच्या असतील त्यांनी त्या आज सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत तळमजला, आवक कक्ष, विधान भवन, मुंबई तसेच e2@council.mls@gmail.com या email  वर द्याव्यात, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, “ अधिवेशनपूर्वी आयोजित चहापानाच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी विरोधी पक्षाबाबत केलेले विधान ” इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

संसदीय कार्यमंत्र्यांनी, याबाबत माननीय मुख्यमंत्री सदनात आल्यावर म्हणणे मांडतील, असे सांगितले.

याबाबत माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये आल्यानंतर मनोगत व्यक्त करतील, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**४.** संसदीय कार्यमंत्र्यांनी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ आणि २०३ (३) मधील तरतुदीस अनुलक्षून मिळालेल्या अधिकारानुसार राज्यपाल यांनी सन २०२२-२०२३ च्या खर्चाच्या पुरवणी विवरणपत्रावर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली असल्याचे सांगितले.

**५.** उप सचिवांनी, दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या आठ विधानसभा विधेयकांना राज्यपालाची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी वाचून दाखवली.

उप सभापतींनी मराठी भाषा गौरव दिनासंबंधी पुढील घोषणा केली -

“ दिनांक २७ फेब्रुवारी हा दिवस “ मराठी भाषा गौरव दिन ” म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र विधिमंडळ सचिवालयातर्फे “ मराठी भाषा गौरव दिन ” आज सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी सभागृहाचे कामकाज संपल्यानंतर दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मध्यवर्ती सभागृहात साजरा करण्यात येणार आहे. माननीय पीठासीन अधिकारी, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय मराठी भाषा मंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री तसेच दोन्ही सभागृहातील माननीय विरोधी पक्षनेते यांच्या सन्मान्य उपस्थितीत कार्यक्रम आयोजित केला आहे. त्याचप्रमाणे “ साहित्याची ज्ञानयात्रा ” या कार्यक्रमामध्ये मराठी साहित्यातील ज्ञानपीठपुरस्कार विजेत्या लेखकांच्या साहित्यावर अभिवाचन आणि सादरीकरण यांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित रहावे. ”

**६.** माननीय उप सभापतींनी, महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम ८(१) अन्वये खालील सन्माननीय सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केले :—

(१) ॲड. निरंजन डावखरे

(२) श्री. नरेंद्र दराडे

(३) श्री. अनिकेत तटकरे

(४) श्री. जयंत आसगांवकर

**७.** उप सभापतींनी, श्री. लक्ष्मण पांडुरंग जगताप, विद्यमान वि.स.स. व माजी वि.प.स., सर्वश्री जयप्रकाश जितमल छाजेड व सुमंत सिताराम गायकवाड, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली व शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकूल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २५ मिनिटांनी मंगळवार दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित झाली.

## मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३

विधानपरिषदेची बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) (एक) तारांकित प्रश्न क्रमांक १७२०८ उत्तरित झाला. (उप प्रश्न विचारण्यात आले नाहीत)

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अनुक्रमांक एकेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, कांदा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात नियम २८९ अन्वये प्रस्तावाची सूचना दिली असल्याचे सांगितले.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी दिलेली नियम २८९ अन्वयेची सूचना मला प्राप्त झाली असून त्यावर त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

श्री. एकनाथराव खडसे वि.प.स. यांनी देखील उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

( विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**म.वि.प. नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेबाबत- (चर्चा पुढे सुरू..)**

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

गोंधळसदृश परिस्थितीमध्ये सभागृहाचे कामकाज चालविणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक २५ मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३१ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५६ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी उपरोक्त नियम २८९ अन्वये दिलेली सूचना अतिशय महत्त्वाची असून सदरहू सूचनेच्या संदर्भात सभागृहात चर्चा व्हावी, अशी विनंती केली.

संसदीय कार्यमंत्र्यांनी यासंदर्भातील भूमिका स्पष्ट करावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

संसदीय कार्यमंत्र्यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, कांदा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या संदर्भात नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेतील विषय स्थगन प्रस्तावाच्या निकषात बसत नसल्याचे सांगून माननीय उप सभापतींनी सदरहू सूचनेस अनुमती नाकारली.

**२.** (१) संसदीय कार्य मंत्र्यांनी, कोंकण विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नवा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) कृषी मंत्र्यांनी, (अ) महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल, (ब) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये घोषणा देतच असतात.)

**३.** आज मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील माझे निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**४.** आज मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३ मिनिटांनी, बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३**

विधान परिषदेची बैठक मुंबई येथील विधान परिषदेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता माननीय तालिका सभापती ॲड.निरंजन डावखरे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

आजच्या सकाळच्या सत्रात तीन लक्षवेधी सूचना दर्शविण्यात आलेल्या आहेत. परंतु सदरहू लक्षवेधी सूचना उपस्थित करणारे तिन्ही सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाचे कामकाज ५ मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ०३ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक ११ वाजून ०८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेतील पहिल्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना श्री. भाई जगताप यांची असून त्यांनी ती लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत विनंती केलेली आहे. तसेच, दुसऱ्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांची असून माननीय उपमुख्यमंत्र्यांनी ती लक्षवेधी सूचना दुपारच्या सत्रात चर्चेला घेण्याबाबत विनंती केलेली आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक ३ चर्चेला घेण्यात येईल असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

**१. (३)** सर्वश्री विक्रम काळे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

"दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी नाशिक येथील गोंदे औद्योगिक वसाहतीतील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीत बॉयलरजवळ स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत दोन महिला कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचे तसेच अन्य १७ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे आढळून येणे, त्यानंतर सदर दुर्घटनेच्या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांनी भेट देऊन पाहणी केल्यानंतर, त्याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देऊन त्याचवेळी मृतांच्या वारसास पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे मुख्यमंत्री महोदयांनी घोषित करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, शासनाने आदेशित केल्यानुसार, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालात काय नमूद करण्यात आले आहे व त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली याबाबतची अद्यापही अनभिज्ञता असणे, तसेच कामगार आयुक्तांच्या पथकाने या कंपनीस दर महिन्यास भेट देऊन पाहणी करणे बंधनकारक असताना कामगार आयुक्त पथकाने सदर कंपनीस केव्हा भेट दिली होती व त्या

पाहणीमध्ये काय आढळून आले याबाबत अद्याप खुलासा झालेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ अखेरीस निदर्शनास येणे, त्यामुळे या दोन्ही बाबींसंबंधात अद्यापही कार्यवाही न झाल्याने जनतेमध्ये व कामगार वर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व त्याप्रकरणी शासनाने तातडीने मृतांच्या वारसांना आर्थिक मदतीच्या वितरणासह पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय तालिका सभापतींनी, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चा आज बुधवार, दिनांक १ मार्च, २०२२ रोजी घेण्यात येणार असल्याचे सांगितले व त्यासंदर्भातील कार्यपद्धती विशद करून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला सुरूवात करावी असे सांगितले.

उपरोक्त विषयावर ॲड. अनिल परब, श्री. शशिकांत शिंदे, जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

यासंदर्भात पुन्हा गट नेत्यांची बैठक घेऊन याबाबतचा निर्णय घेण्यात येईल आता चर्चेला सुरुवात होईल असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले –

"राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल आम्ही या अधिवेशनाकरिता जमलेले विधानपरिषद सदस्य, त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) प्रा.राम शिंदे (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, "श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य यांनी केलेले वक्तव्य" या विषयी तत्काळ विशेषाधिकारभंगाचे प्रकरण दाखल करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई तसेच विशेषाधिकारभंग प्रकरणी कारवाई करण्यात यावी असे सांगितले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. राम शिंदे, वि.प.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात.)

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

हा विषय गंभीर असल्यामुळे सभागृहाचे कामकाज १० मिनिटे स्थगित करीत आहे असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ०५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करीत आहे असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, "श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य यांनी केलेले वक्तव्य" या विषयी तत्काळ विशेषाधिकारभंगाचे प्रकरण दाखल करून त्यांच्यावर कायदेशीर तसेच विशेषाधिकारभंग प्रकरणी कारवाई करणे यासंदर्भात उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी आपले मत व्यक्त केले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. एकनाथराव खडसे, ॲड. अनिल परब व श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

उपरोक्त मुद्यासंदर्भात उप मुख्यमंत्र्यांनी आपले मत मांडले.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्याने माननीय उप सभापतींनी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी स्थगित केली.

सभागृहाची विशेष बैठक उद्या गुरुवार दिनांक २ मार्च, २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता पुन्हा भरेल. उक्त बैठकीत आजच्या राहिलेल्या लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक भरेल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ५१ मिनिटांनी, गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधान परिषदेच्या सभागृहात सकाळी १०.३० वाजता माननीय तालिका सभापती ॲड.निरंजन डावखरे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव पुनःप्रस्तुत झाला.**

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) प्रा.राम शिंदे (२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता

(३) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील छत्तीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**माननीय उप सभापतींनी पुढील घोषणा केली—**

सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेतील विधिमंडळ काँग्रेस पक्षाच्या गटनेते पदावर श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांची तसेच मुख्य प्रतोद पदावर श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. आणि प्रतोद पदावर श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेतील विधिमंडळ भारतीय जनता पार्टीच्या गटनेते पदावर श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांची तसेच मुख्य प्रतोद पदावर श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स. आणि प्रतोद पदावर श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेतील विधिमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रतोद पदावर श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

**३.** श्री. विलास पोतनीस, समिती सदस्य यांनी, शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास वेळ नेमून देण्यासंबंधीचे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत सभागृहाला सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**४.** बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ व आज गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या नियम ९३ अन्वये सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**५.** बुधवार, दिनांक १ मार्च, २०२३ व आज गुरुवार, दिनांक २ मार्च, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य केलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, " कै.काशिनाथ घाणेकर यांनी मराठी चित्रपट सृष्टीला चांगला आयाम दिला आहे आज त्यांची पुण्यतिथी असल्यामुळे राज्य सरकारकडून त्यांचा सन्मान करण्यात यावा " इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

आज म.वि.प. नियम २८९ अन्वये तीन सूचना प्राप्त झाल्या असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) श्री. अंबादास दानवे यांनी, विरोधी पक्ष नेते यांनी, " मराठा समाजाला आरक्षण देण्याकरीता भारताच्या संविधानामध्ये सुधारणा करणे " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून श्री. अंबादास दानवे, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी त्यांची सूचना थोडक्यात मांडावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

माननीय विरोधी पक्ष नेते यांनी उपस्थित केलेला विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे ही सूचना अमान्य करीत आहे तथापि याबाबत शासनाने योग्य ती दखल घेऊन निवेदन करावे असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

याबाबत सभागृहात निवेदन करण्यात येईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(२) सर्वश्री शशिकांत शिंदे व अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " राज्यातील कांदा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला हमी भाव मिळत नसणे " इ. बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी त्यांची सूचना थोडक्यात मांडावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

नियम २८९ अन्वये सूचनेवरील चर्चा नियम ९७ मध्ये किंवा नियम २६० मध्ये एकत्रित करून त्यावर लवकरात लवकर किंवा पुढील आठवड्यात चर्चा घेण्यासाठी सभागृहाने मान्य केले तर त्यात सर्व मुद्दे विभागीय पद्धतीने मांडता येतील व सरकारलाही उत्तर देता येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या हिताचा हा विषय असल्याने या विषयावरील चर्चेस योग्य ते उत्तर देण्याचा प्रयत्न करण्यात येईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री. भाई जगताप व इतर वि.प.स. यांनी, " मुंबई महानगरपालिकेत होत असलेला मनमानी कारभार " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी त्यांची सूचना थोडक्यात मांडावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले..

यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी चर्चा करून सर्व वस्तुस्थिती तपासून त्यासंदर्भात नियमाने कारवाई करण्यात येईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. अनिल परब, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी, " छत्रपती संभाजी महाराज समाधीस्थळ विकास आराखड्याच्या नावात अंशतः बदल करणे " इ. बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

उप मुख्यमंत्र्यांनी, " महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या संदर्भात, विधानपरिषद नियमांतील नियम २३० (२) मधील तीन दिवसांच्या कालावधीची जी तरतूद आहे ती स्थगित करण्यात यावी " असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य यांच्या विरोधात दिलेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनेसंदर्भात माननीय उप सभापती यांनी सविस्तर माहिती दिली व सदर विशेषाधिकारभंगाच्या सूचनेसंदर्भात निर्णय देण्यात येणार असल्याचे सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. अनिल परब, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

माननीय उप सभापती सदरहू विशेषाधिकारभंगाच्या सूचनेसंदर्भात उचित आणि नियमानुसार कार्यवाही करतील असे उप मुख्यमंत्री यांनी सांगितले.

सदरहू हक्कभंगाच्या सूचनेसंदर्भात मुख्यमंत्री यांनी सविस्तर खुलासा केला.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. शशिकांत शिंदे, ॲड. अनिल परब, वि.प.स. व श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपापले म्हणणे मांडले.

अतः या प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेता श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य व दैनिक सामनाचे कार्यकारी संपादक यांच्यासंदर्भातील विशेषाधिकारभंगाचा खुलासा ७ दिवसांत प्राप्त करून घेऊन त्या पुढील निर्णय सभागृहास अवगत करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २.३० वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी २ वाजून २ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी २.३० वाजता पुन्हा सुरू झाली.

लक्षवेधी सूचना क्र. ४ उपस्थित करणारे संबंधित सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करीत आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३१ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ४६ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**६. (१)** श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" महामुंबई सेझसाठी रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, पनवेल तालुक्यामधील एकूण ४५ गावांच्या जमिनी सेझसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाकडून सन २००५ पासून राबविण्यास सुरूवात करण्यात येणे, महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतकरी अधिनियम, १९४८ चे कलम ६३ (१) अ मधील तरतूदीनुसार ज्या औद्योगिक कारणासाठी भूसंपादन केलेल्या जमिनींचा वापर जमीन खरेदी केलेल्या तारखेपासून पंधरा वर्षाचे आत विकासक कंपनीने सुरू केला नाही तर अशा सर्व जमिनी मूळ किंमतीस मूळ शेतकऱ्यांना परत करण्याचा कायदा या सेझमध्ये विक्री झालेल्या जमिनींनाही लागू असणे, त्यानुसार महामुंबई सेझसाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना परत करण्याची आवश्यकता असणे, महामुंबई सेझसाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना तीन महिन्यांच्या आत परत करण्यात येणार असल्याचे दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी तत्कालीन उद्योग मंत्री यांनी विधिमंडळात या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आश्वासन दिलेले असणे, मात्र अद्यापपर्यंत सदर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी परत करण्यात आलेल्या नसणे, त्या परत करण्याची आवश्यकता असणे, विधिमंडळात घेतलेल्या निर्णयामुळे तसेच दिलेल्या आश्वासनामुळे पेण तालुक्यातील २४ गावांसह उरण, पनवेल तालुक्यामधील सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतजमिनी परत मिळण्याच्या आशा त्यावेळी पल्लवित झाल्या असणे, राज्याच्या विधिमंडळाचा शब्द पडू न देता विधिमंडळाचे पावित्र्य राखण्याकरता सेझसाठी पंधरा वर्षांपूर्वी शासनामार्फत संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकऱ्यांना पूर्ववत परत केल्या जातील असा विश्वास शेतकऱ्यांना त्यावेळी झालेला असणे, मुळातच पेण तालुक्यातील संपादित झालेल्या २४ गावांच्या जमिनीपैकी २२

गावच्या जमिनी हटवणे, धरणाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट असलेल्या जमिनी ह्या सुपीक जमिनी असणे, या सुपीक व लाभक्षेत्रात समाविष्ट असलेल्या शेतजमिनी भूसंपादनात आणून अक्षम्य अशी चूक त्यावेळी प्रशासनाची झालेली असणे, सन २०१२-१३ मध्ये पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर शेतकऱ्याचे नाव कमी करून महामुंबई सेझ कंपनीचे भोगवटदार सदरी नाव दाखल करण्यात आले त्या फेरफारला जवळ-जवळ सर्वच शेतकऱ्यांनी विरोध दर्शविणे व त्या विरोधात पेण तहसीलदारांकडे अपील दाखल करणे, सदर अपिलांपैकी अनेक अपील फेटाळणे तर सुमारे १५० शेतकऱ्यांचे अपील मान्य करून शेतकऱ्यांचे नाव कमी न होता ७/१२ वर इतर अधिकारात महामुंबई सेझचा घेतलेल्या रकमेचा बोजा ठेवण्याचा निर्णय झाला त्याप्रमाणे सुमारे १५० शेतकऱ्यांचे तसे ७/१२ तयार करण्यात येणे, त्या प्रमाणेच उर्वरित सर्व शेतकऱ्यांच्या ७/१२ वरून भोगवटदार सदरील महामुंबई सेझ कंपनीचे नाव कमी करून महामुंबई सेझ कंपनीचा बोजा इतर अधिकारात ७/१२ ला ठेवण्यात येणे, दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी तत्कालीन उद्योग मंत्री यांनी शेतकऱ्यांच्या शेत जमिनी तीन महिन्यात परत करणार असल्याचे आश्वासन देऊन सुद्धा अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळालेल्या नसणे, त्यामुळे सद्यःपरिस्थितीत काही शेतकरी महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतकरी अधिनियम, १९८४ चे कलम ६३ (१-अ) या कायद्याचा आधार घेऊन कायदेशीर मार्गाने जमिनी मिळवण्याचा प्रयत्न करत असणे, या सर्व घडामोडी प्रकरणात या संपादन प्रक्रियेमुळे मागील पंधरा वर्षात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असणे व जमिनी परत मिळविण्यासाठी आजही मोठा मनस्ताप व आर्थिक नुकसान शेतकऱ्यांचे होत असणे, सदर सेझसाठी भूसंपादित झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी पूर्ववत परत करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सबब सदर प्रकरणी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही. ”

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री विलास पोतनीस व इतर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले—

“ मुंबईतील दहिसरमध्ये सुरू असलेल्या अग्निशमन दलातील अग्निशामकांच्या भरती प्रक्रियेदरम्यान महिला अग्निशामक पदासाठी १६२ इंच उंचीच्या निकषात बसत असतानाही अनेक महिलांना डावलण्यात आल्यामुळे संतप्त झालेल्या आणि आंदोलनाचा पवित्रा घेतलेल्या महिला उमेदवारांवर बंदोबस्तासाठी ठेवण्यात आलेल्या पोलिसांनी सौम्य लाठीमार केला असल्याची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असणे, मुंबईतील अग्निशमन दलात ९०० जागांची भरती प्रक्रिया सुरू झाली असणे, दहिसर येथे भरतीसाठीच केंद्र उभारण्यात येणे, या ठिकाणी भरतीसाठी महिला उमेदवारांची मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळलेली असणे, अयोग्य नियोजनाचा फटका महिला उमेदवारांना बसणे, सदरहू भरती

प्रक्रियेकरिता मुलींसाठी १६२ सेमी उंचीची अट असणे, तरीदेखील १६२ सेंमी उंचीपेक्षा जास्त उंची असलेल्या मुलींनासुद्धा भरती प्रक्रीयेतून बाहेर काढण्यात येणे, परंतु १६२ सेमीपेक्षा कमी उंचीच्या मुलींना पात्र ठरवण्यात येणे, तसेच उशिरा आलेल्या काही मुलींना टोकन देऊन दुसऱ्या दिवशी बोलावण्यात येणे, परंतु दिलेल्या वेळेवर पोहोचून सुद्धा त्यांना भरती प्रक्रियेत प्रवेश न देण्यात येणे, त्यामुळे नाराज झालेल्या महिला उमेदवारांनी घेतलेला आंदोलनाचा आक्रमक पवित्रा आणि आंदोलनकर्त्या असहाय्य महिला उमेदवारांवर पोलिसांनी केलेला सौम्य लाठीमार, परिणामी सदरहू ठिकाणी अग्निशमन भरती प्रक्रियेसाठी जमलेल्या सर्व महिला उमेदवारांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू भरती प्रक्रियेस तात्काळ स्थगिती देऊन झालेल्या अनियमिततेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३)** डॉ. प्रज्ञा सातव व इतर वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधले –

“ हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध देशी-विदेशी दारुच्या व्यवसाय फोफावला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, येथील अवैध दारुविक्रीमुळे ग्रामीण भागात तंटे वाढत असणे, परिणामी गावस्तरावरील वातावरण दूषित बनत असणे, यातून गुन्हेगारी वाढत असणे, परंतु बीटस्तरावरील काही कर्मचारी वरिष्ठांच्या डोळ्यात धूळफेक करुन अवैध दारुविक्रीला संमती देत असल्याचे येथे चित्र असणे, ग्रामीण भागात विना नंबर दुचाकीवर देशी-विदेशी दारुचा थेट द्वारपोच पुरवठा केला जाणे, परंतु प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे येथील चिंचोली महादेवसह अनेक गावांतील महिला गावांत दारुबंदी करावी अशी आग्रही मागणी करीत असणे, मात्र त्यांच्यावरच प्रशासन खोटे गुन्हे दाखल करीत असणे, त्यामुळे शासनाने माहिती घेऊन येथील अवैध देशी-विदेशी दारुविक्रीला रोखून संबंधित विक्रेते व प्रशासनातील जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी सर्वच स्तरावरुन मागणी होत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४)** श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ जळगांव येथील एम.आय.डी.सी. मधील रेमंड लिमिटेड जळगांव या कंपनीमधील कामगारांचा वेतनवाढीचा करारनामा करण्यास मागील दोन वर्षांपासून कंपनीचे व्यवस्थापन टाळाटाळ करीत असल्याने कामगारांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी काम बंद आंदोलन करणे, वेतनवाढीसाठी शांततामय मार्गाने कंपनीच्या आवारात ठिय्या आंदोलन करणाऱ्या कामगारांवर दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री ११.३० चे सुमारास २०० ते २५० पोलिसांनी बेकायदेशीरपणे कंपनीमध्ये घुसून पूर्वसूचना न देता केलेला लाठीचार्ज व मारहाण, कंपनीमध्ये एकही महिला कामगार नसताना ५० महिला पोलिसांना कंपनीमध्ये आणून कामबंद आंदोलन पोलिसांनी बंद पाडणे, त्याच्या निषेधार्थ कामगारांनी कामबंद आंदोलन करणे, ३,००० कामगारांचा निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, परिणामी कामगारांत पसरलेला तीव्र असंतोष व भीतीचे वातावरण, या संपूर्ण घटनेची चौकशी होऊन दोषी पोलीस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करुन कंपनी पूर्ववत सुरू करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५)** ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले :-

“ मौजे वांद्रे, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथील खार-सांताक्रुज येथील केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागेवर ५० वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टीधारकांचा पुनर्विकास रखडलेला असणे, याबाबत विविध आयुधांद्वारे लक्ष वेधून देखील कार्यवाही होत नसणे, सदर जागेबाबत संरक्षण मंत्री, भारत सरकार व मा. मुख्यमंत्री यांच्यात २०१७ साली झालेल्या बैठकीत ५०% जागा केंद्र सरकारच्या संरक्षण विभागास तर ५०% जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजनेअंतर्गत तेथील झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास करण्याचे प्राथमिक धोरण निश्चित झालेले असणे, तसेच सदर पुनर्विकासाठी केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाची बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यास हरकत नसणे, तत्कालीन सरकारने याबाबत त्रिसदस्यीय समिती गठीत न करणे परंतु सदर झोपडपट्टीच्या लगत असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील तसेच खाजगी मालकीच्या जागेवर पुनर्विकास करण्यास मंजुरी देणे, परंतु संरक्षण विभागाच्या मालकीवरील पुनर्विकासाबाबत आजतागायत अतिशय संथगतीने सुरू असलेल्या कार्यवाहीमुळे तेथील नागरिकांमध्ये असलेल्या असंतोषाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची भूमिका. ”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६)** श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले :—

" राज्यभरातील कोणत्याही खातेदार शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास स्व. गोपीनाथ मुंडे अपघाती विमा योजनेतून दोन लाख रुपयांची मदत देणे अपेक्षित असणे, असे असतानाही विमा कंपन्यांकडून अनेक प्रस्ताव नाकारले जात असल्याची बाब उस्मानाबाद जिल्ह्यात माहे जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, या योजनेसाठी शासनाने ९५ कोटीहून अधिक खर्च विमा कंपनी व सल्लागारावर करीत असताना ही कंपनी शेतकऱ्यांचे प्रस्ताव नाकारत असणे, शेतकऱ्यांचे सर्व प्रस्ताव मान्य करून त्यांना न्याय देण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, " श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी महाराष्ट्र द्रोह्यांच्या चहापानाला जाणार नाही अशा प्रकारचे केलेल्या अवमानकारक वक्तव्य " इ.बाबत विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. अंबादास दानवे यांच्याविरूद्ध विशेषाधिकारभंगाची सूचना दिली असल्याचे सांगून त्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेबाबत आपले म्हणणे मांडले.

सन्माननीय सदस्यांनी दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना मला प्राप्त झाली आहे. सदरहू हक्कभंगाचा प्रस्ताव तपासून त्यावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (भाषण पूर्ण)

(४) श्री. शशिकांत शिंदे
(५) श्री. जयंत प्र. पाटील
(६) श्री. भाई जगताप
(७) श्री. श्रीकांत भारतीय
(८) श्री. सत्यजीत तांबे
(९) श्री. एकनाथराव खडसे
(१०) श्री. सुनील शिंदे (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक सायंकाळी ७.०० वाजता शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## शुक्रवार, दिनांक ३ मार्च, २०२३

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १०.०० वाजता माननीय तालिका सभापती श्री. अनिकेत तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.—

१) श्री. सुनील शिंदे
२) ॲड. निलय नाईक
३) श्री. अभिजित वंजारी
४) श्री. अरुण लाड
५) श्री. रमेश पाटील
६) श्री. जयंत आसगावकर
७) श्री. नरेंद्र दराडे
८) श्री. सुधाकर अडबाले
९) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे
१०) डॉ. मनिषा कायंदे
११) श्री. अनिकेत तटकरे (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२ वाजता सुरू झाली.

उपमुख्यमंत्र्यांनी, " मागील अधिवेशनात विचारण्यात आलेला तारांकित प्रश्न क्र. १७७१२ पुन्हा विचारण्यात येणे, " इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सर्वश्री. भाई जगताप व जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्यावर आपले मत मांडले.

एखाद्या प्रश्नावर उत्तर मिळाले असले तरी काही महिन्यांमध्ये त्या प्रश्नाचा संदर्भ बदलू शकतो. अशा वेळी तो प्रश्न महत्त्वाचा असू शकतो. प्रश्नाच्या संदर्भानुसार उत्तर सुद्धा बदलू शकते, अशी आशा सन्माननीय सदस्यांना असू शकते, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**१.** (अ) (१) सात तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील छत्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(३) सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

**२.** उच्च व तंत्र शिक्षण आणि वस्त्रोद्योग मंत्र्यांनी, पुढील अहवाल व वार्षिक लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवले —

(१) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर फंड ट्रस्टी कंपनी लिमिटेड यांचा सन २०१९-२०२० व सन २०२० २०२१ या वर्षाचे वार्षिक अहवाल,

(२) महाराष्ट्र अर्बन इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कंपनी लिमिटेड यांचा सन २०१९- २०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल,

(३) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ, नागपूर यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे (अंकेक्षण अहवालासह),

(४) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे,

(५) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, यांचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे आणि संविधानिक लेखापरीक्षण अहवाल,

(६) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे आणि अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल, तसेच

(७) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके.

**३.** माननीय उपसभापतींनी, श्री. दिवाकर बळवंत पांडे, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केला.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण केली व शोक प्रस्ताव संमत करण्यात आला.

दिवंगत सदस्यांच्या शोकाकुल कुटुंबीयांकडे शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**४.** आज शुक्रवार दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याची घोषणा माननीय उप सभापतींनी केली.

**५.** आज शुक्रवार दिनांक ३ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याची घोषणा माननीय उप सभापतींनी केली.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, “ कांदा खरेदी, ” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत हस्तक्षेप करायचा असल्यास जरूर करण्यात येईल, असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी, “ शोक प्रस्ताव संमत केल्यानंतर सभागृहाचे कामकाज १० मिनिटे स्थगित करण्याची या सभागृहाची प्रथा, परंपरा आहे. सभागृहाचे कामकाज स्थगित करण्यासंदर्भातील प्रथा, परंपरा, नियम बदलण्यात येत आहेत,” इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

विद्यमान सन्माननीय सदस्यांचे दुःखद निधन झाले असेल तरच सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येते. परंतु तरीसुद्धा या विषयी माननीय गट नेत्यांच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २५ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २५ पुन्हा सुरू झाली.

सभागृहात माननीय मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २५ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३५ पुन्हा सुरू झाली.

सदनामध्ये मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे सदनाचा २० मिनिटांचा कालावधी वाया गेला असल्याबद्दल माननीय उपसभापतींनी नाराजी व्यक्त केली.

महसूल मंत्र्यांनी, याबाबत दिलगिरी व्यक्त केली आणि पुन्हा असे घडणार नाही, असे आश्वासन दिले.

श्री. विरोधी पक्षनेते यांनी, “ महाराष्ट्र शासनाचे बोधचिन्ह बदलणे,” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

महसूल मंत्र्यांनी, याबाबत माहिती घेऊन सभागृहाला अवगत करण्यात येईल, असे सांगितले.

या बाबत १० मार्च, २०२३ पर्यंत खुलासा करण्याचे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

११) श्री. अनिकेत तटकरे (भाषण पूर्ण)
१२) श्री. गोपिचंद पडळकर
१३) श्री. अमोल मिटकरी
१४) श्री. प्रवीण पोटे-पाटील
१५) श्री. राजेश राठोड
१६) श्री. प्रसाद लाड

(चर्चा अपूर्ण)

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१७) श्री. आमश्या पाडवी
१८) श्री. धीरज लिंगाडे
१९) श्री. किशोर दराडे
२०) श्रीमती उमा खापरे

उद्योगमंत्र्यांनी, " ७५ हजार पदांच्या भरती प्रक्रियेत वयोमर्यादा ओलांडणाऱ्या उमेदवारांना दोन वर्षांची शिथिलता देणे," इ.बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

मंगळवार दि. २८ फेब्रुवारी, बुधवार, दि. १ मार्च, गुरुवार, दि.२ मार्च व शुक्रवार, दि. ३ मार्च, २०२३ रोजी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले. तसेच आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील अशासकीय कामकाज देखील पुढे ढकलण्यात येत असल्याचे सांगितले.

**६.** माननीय उपसभापतींनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व खालील मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्यांवर चर्चा होईल, असे सांगितले.

१. मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- बी-३, बी-७, बी-१०, एफ-२, एफ-७, एच-७, एन-३, व्ही-२, झेड एच-५, झेड आय-१, झेड आय-२, झेड आय-३, झेड आय-४, झेड आय-५.

२. उपमुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- बी-१, बी-५, बी-१०, जी-१, जी-५, जी-६, जी-८, आय-३, आय-५, जे-१, जे-२, के-१, ओ-८, ओ-१०.

३. महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकासमंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- सी-१, सी-२, डी-४.

४. वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- सी-७, डी-६, डी-९.

५. उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- डब्लू-३, डब्लू-४, व्ही-२.

६. आदिवासी विकास मंत्र्यांच्या विभागाच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- टी-५, टी-६.

७. ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक :- एल-३, एल-५, एस-३.

८. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक :- वाय-२.

९. कामगार मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक :- के-४.

१०. उद्योग मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक :- के-७.

११.सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक : - आर-१.

१२. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांच्या विभागांची पुरवणी मागण्या क्रमांक : - एच-३, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९.

१३. कृषी मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक :- डी-३.

१४. शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक :- ई-२.

१५. सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक : - व्ही-२, व्ही-३, झेडजी-३.

१६. राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांच्या विभागाची पुरवणी मागणी क्रमांक :- बी-२.

१७. पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक : - एक्स-१, झेडए- , झेडए-२, झेडडी-४.

उपरोक्त मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते  २) श्री. गोपिचंद पडळकर

३) श्री. एकनाथराव खडसे (भाषण अपूर्ण)

**७. (२) विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे -**

वित्त मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

याबाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

सभागृहाची बैठक सायं. ५ वाजून ४५ मिनिटांनी, बुधवार, दिनांक ८ मार्च २०२३ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**बुधवार, दिनांक ८ मार्च, २०२३**

**विधानपरिषदेची बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.**

माननीय उप सभापतींनी, आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिलांना सभागृहाच्या वतीने शुभेच्छा दिल्या.

(१) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्षनेते) यांनी, राज्यात झालेल्या अवकाळी पावसाच्या संदर्भात म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे सांगितले.

सदर सूचना अमान्य करीत आहे. मात्र त्यावर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्षनेते) यांनी उपरोक्त म.वि.प. नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

सर्वश्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, शशिकांत शिंदे, जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत व्यक्त केले.

उद्योग मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

सन्माननीय सदस्य सर्वश्री सतेज पाटील, एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, अंबादास दानवे, डॉ. मनिषा कायंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, वजाहत मिर्झा, अमोल मिटकरी व इतर वि.प.स. यांनी, राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेले नुकसान, याबाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली होती, परंतु आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये हा विषय समाविष्ट नसल्यामुळे मी ही सूचना अमान्य करीत आहे. परंतु शासनाने याबाबत आपली भूमिका स्पष्ट करावी.

तसेच सत्ताधारी पक्षाचा व विरोधी पक्षाचा देखील प्रस्ताव असून त्यामध्ये सर्व विषय एकत्रित आहेत, त्या प्रस्तावांवरील चर्चेच्या वेळी या विषयावर बोलता येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, औरंगाबाद शहराचे छत्रपती संभाजीनगर असे नामकरण झाल्याने तेथे सुरू असलेले आंदोलन, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

याबाबत नोंद घेतली असल्याचे संसदीय कार्यमत्र्यांनी सांगितले.

शासनाने याबाबत गांभीर्याने लक्ष घालावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**१. (क)** (१) सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सेहेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**१. (ख)** उप सचिवांनी, दिनांक १ मार्च, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवली.

**२.** (१) उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन २०२२-२०२३ हे प्रकाशन सभागृहासमोर ठेवले.

(२) कृषी मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा सत्तावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** आज बुधवार, दिनांक ८ मार्च २०२३ रोजी म.वि.प. ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**४.** आज बुधवार दि. ८ मार्च २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**५. मा. उप सभापती महोदयांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.**

“ महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व महिलांना सर्व क्षेत्रात समान तसेच सन्मानाचे स्थान मिळावे याअनुषंगाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघ पुरस्कृत जागतिक महिला आयोगाचे ६७ वे सत्र दिनांक ६ मार्च ते १७ मार्च, २०२३ या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे. या जागतिक महिला आयोगाच्या सत्रामधील निर्धारित निर्णयात भारत सरकारचाही कायम सहभाग असतो. आम्ही आरोग्य विषयक सुविधा, सुरक्षितता, आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरण यासाठी महिलांच्या हितासाठीचे कायदे व त्याची अंमलबजावणीची यंत्रणा उभारण्यासाठी वचनबद्ध आहोत हे अधोरेखित करत आहोत. “ महिला धोरण ” सन १९९४, २००२, २०१४ तसेच २०१९ चे प्रस्तावित महिला धोरण व सन २००१ चे राष्ट्रीय महिला धोरण याचे एकत्रीकरण करून महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक महिला धोरण तयार करणेबाबत, शासनाने करावयाची उपाययोजना.”

उपरोक्त प्रस्तावाच्या चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) डॉ. मनिषा कायंदे
(२) श्रीमती उमा खापरे
(३) डॉ. प्रज्ञा सातव
(४) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्षनेता )
(५) श्री. अमोल मिटकरी
(६) श्री. श्रीकांत भारतीय
(७) श्री. अभिजीत वंजारी
(८) श्री. शशिकांत शिंदे
(९) श्री. कपिल पाटील

उप मुख्यमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी ०३ वाजून ३० मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी, कृषी अभियांत्रिकी शाखेचे विद्यार्थी गेल्या ३४ दिवसांपासून विविध मागण्यांसाठी चारही कृषी विद्यापीठात धरणे आंदोलन व उपोषण करीत असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

**६. (ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ५– महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सजेत ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांचा असून, त्यांच्यापैकी एकाने तो प्रस्ताव मांडावा असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

श्री. शशिकांत शिंदे वि.प.स. यांनी, सन २०२३ चे वि. स. वि. क्रमांक ५ – महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण विधेयक, २०२३विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न आणि विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| (१) श्री. शशिकांत शिंदे | (२) श्री. जयंत प्र.पाटील |
| (३) श्री. अभिजीत वंजारी | (४) श्री. सुरेश धस |
| (५) श्री. एकनाथराव खडसे | (६) श्री. प्रसाद लाड |
| (७) श्री. सचिन अहिर | (८) ॲड. निलय नाईक |
| (९) श्री. अनिकेत तटकरे | (१०) श्री. सतीश चव्हाण |
| (११) श्री. अमोल मिटकरी | (१२) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेते) |

वैद्यकीय शिक्षण मंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

श्री. अंबादास दानवे ( विरोधी पक्षनेता ) यांनी, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे यांच्यावतीने विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहाच्या अनुमतीने मागे घेण्यात आला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते ३८ (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांनी सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक-२ हे सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी चर्चेला घेण्यात यावे अशी विनंती केलेली असल्यामुळे, सदरहू विधेयक सोमवारी चर्चेला घेतले जाईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांनी, पंढरपुर येथील संत चोखा मेळा यांचे मंदिर पूर्णपणे कोसळले असणे, अशी विविध वाहिन्यांवर बातमी प्रसारित होणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

माननीय उप सभापतींनी, सभागृहाच्या कार्यवाहितून काढून टाकण्यात आलेले वक्तव्य वाहिन्यांनी तसेच वृत्तप्रतिनिधींनी प्रसिद्ध करु नयेत, अशा सूचना केल्या.

सभागृहाची बैठक सायंकाळी ७ वाजून २७ मिनिटांनी गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १०-०० वाजता माननीय तालिका सभापती श्री. नरेंद्र दराडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सभागृहात मंत्री महोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ०१ मिनिटांनी १५ मिनिटांसाठी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी १०-१६ वाजता पुन्हा सुरु झाली.

**(१) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधले :-

" राज्यात मागील १० वर्षांमध्ये बाहेरच्या राज्यांमधून अथवा परदेशातून अनेक नवनवीन उद्योग व गुंतवणूक येणे, परंतु वारंवार हे उद्योग काही ठरावीक औद्योगिक वसाहतींमध्ये आल्यामुळे त्याच औद्योगिक वसाहतींचा किंवा त्याच्या आजूबाजूच्या ठरावीक शहरांचाच विकास होणे, (उदाहरणार्थ मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर) परिणामी राज्यातील इतर शहरांमध्ये व तालुका पातळीवरील औद्योगिक वसाहतीमध्ये विकासाचा समतोल न साधल्यामुळे या औद्योगिक वसाहतीतील परिसरातील उद्योजकांना कुठल्याही सोई सुविधा उपलब्ध न होणे, परिणामी तेथील उद्योजक, सुशिक्षित बेरोजगार व युवक-युवती यांच्यामध्ये उदासीनता पसरणे, त्यामुळे राज्याच्या सर्व भागामधून बेरोजगार तरुण युवक युवतींना राज्यातील ठरावीक भागामध्येच स्थलांतर होऊन त्या स्थलांतरामुळे नागरी विकासावर देखील ताण पडणे, त्यासाठी शासनाने राज्यातील मागील १० वर्षात औद्योगिक वसाहतीनुसार आकडेवारीची माहिती घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही, तसेच विकासाचा समतोल साधला जावा, राज्यात येणारे नवे उद्योग व गुंतवणूक सर्वत्र जाण्याच्या दृष्टीने शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही करून धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया. "

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्री सतिश चव्हाण व इतर वि.प.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले :-

" वाळुंज (छत्रपती संभाजीनगर) सिडको महानगर – ३ करिता सिडको प्रशासनाने वाळुंज, जोगेश्वरी व रामराई येथील ४०० शेतकऱ्यांच्या १२५० एकर जमिनीवर सन १९८९ मध्ये आरक्षण टाकले असणे, सिडको प्रशासनाने शेतकऱ्यांना सन १९९२ मध्ये नोटीसा देऊन सदर जमिनीवर विकास कामे करु

नये शिवाय इतर शासकीय कार्यालयांनीही सदर जमिनीवर विकास करण्यास कोणत्याही परवानग्या देऊ नये असे कळविले असणे, मागील ३० वर्षात सिडको प्रशासनाने या नियोजित प्रकल्पाचा विकास करण्यासाठी काहीही कार्यवाही केली नसणे, व स्थानिक शेतकऱ्यांनाही विकास करु दिला नसणे, मागील ३० वर्षापासून शेतकऱ्यांच्या जमिनी पडीत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याच प्रकारचे उत्पन्न मिळत नसणे, वाळुंज एमआयडीसीची झपाट्याने वाढ होत असणे, वाळुज परिसरात कामगारांची संख्या मोठया प्रमाणावर असणे, हा प्रकल्प प्रलंबित राहिल्याने रहिवाशी क्षेत्रात वाढ होऊ न शकणे, सदर परिसरात जमिनीचे दर रु.२५००/- प्रति चौरस मीटर असणे, सदर प्रकल्प ३० वर्षापासून रेंगाळल्यामुळे किंमती वाढत गेल्या असल्याने शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांनी दिनांक १८.०२.२०१९ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत विषय घेवून वाळुंज महानगर प्रकल्प -३ हे सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यासाठी ठराव केला असून शासनाची मान्यता प्रलंबित असणे, स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिडकोने सदर जमिनीचे संपादन करून शेतकऱ्यांना तात्काळ मावेजा द्यावा किंवा शेतकऱ्यांच्या जमिनीवरील आरक्षण उठवण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनी, “ मागील चार दिवसांपासून नाशिक जिल्ह्यात अवकाळी पाऊस सुरु असून यामुळे शेतकऱ्यांचे झालेले नुकसान. ” इ.बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने दखल घ्यावी असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**(३) श्री. सचिन अहिर, वि.प.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले :—

“ मुंबई महापालिकेतून ४०० कि.मी रस्त्यांसाठी सुमारे ६ हजार कोटींचा झालेला घोटाळा, नव्या आर्थिक वर्षात विशेष निधी, राखीव निधी आणि अंतर्गत निधीतून २५ हजार कोटीहून अधिक निधी खर्च केला जाणे, जुन्या निविदा रद्द करून पुन्हा नव्याने प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा काढण्यात आल्याने पुन्हा खर्च वाढणे, भायखळा येथील राणीबागेच्या विस्तारित जागेचे आरक्षण बदलणार असून त्यामुळे राणी बागेचा विस्तार रखडणार असणे, मुंबई सिमेंट कॉंक्रीटचे जंगल वेगाने वाढत असून त्या बांधकामासाठी लागणारे पाणी सहजासहजी मिळत नसल्याने टँकर माफिया मुंबईतील विहिरीमधून पाणी उपसा करणे, विशेष म्हणजे १९,००० विहिरींपैकी अनेक विहिरी नामशेष झाल्या असणे, काही वेळेस खडक फोडण्यासाठी पोकलेन व इतर यंत्रांनी फोडले जात असणे, अशा वेळेस पाण्याचे प्रवाह बदलतात व विहिरी कोरड्या पडण्याची असलेली शक्यता, भविष्यात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई होण्याची शक्यता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधले :—

" राज्यातील विशेषतः छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काम करणारे अभियंते आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून शासनाच्या कामांमध्ये अनियमितता करण्याचा प्रयत्न करत असणे, काही ठिकाणी कामासंदर्भात निधी प्राप्त होऊनही कामे सुरु करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, शरणापूर ते साजापूर-करोडीपर्यंत असलेल्या ६ कि.मी. रस्त्याची दयनीय अवस्था झालेली असून गेल्या आठवर्षामध्ये तीन वेळा निधी उपलब्ध करूनही रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास येणे, रस्त्यासाठी २८ कोटीच्या कामासाठी दिनांक ७ डिसेंबर, २०२२ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या असून चार कंत्राटदारांकडून निविदा प्राप्त झालेल्या असूनही सदर निविदा उघडण्यात आलेली नसणे, छत्रपती संभाजीनगर शहरातील राज्य उत्पादन विभागाच्या इमारत व विश्रामगृहासाठी सुमारे १० कोटीची निविदा मागविण्यात आली असतानाही दहा महिन्यांपासून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नसणे, याउलट पैठण येथील आरोग्य केंद्रासाठी दीड कोटींचा निधी मंजूर असतानाही ९९ लाखांच्या मर्यादेत कामे ही विनानिविदा करण्यात आलेली असणे, सदर कामे ही विहित मुदतीत पूर्ण न केल्याने प्रलंबित असलेल्या कामांच्या खर्चाच्या रक्कमेमध्ये वाढ होत असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे, सदर कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येणे, सदर मागणींबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असल्याने सदर कामे पूर्ण करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) प्रा.राम शिंदे, वि.प.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधले :—

" राज्यातील साखर कारखान्यांनी दिनांक १५.१०.२०२२ पूर्वी ऊस गाळप हंगाम सुरू केल्यास संबंधित कारखान्यांच्या कार्यकारी संचालकांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश साखर आयुक्तालयाने जारी करणे, सदर आदेशानुसार सन २०२२-२३ या चालू वर्षाचा गाळप हंगाम दिनांक १५.१०.२०२२ रोजी पासून सुरू करावा असा निर्णय मंत्री समितीच्या बैठकीत झालेला असणे, पुणे जिल्ह्यातील बारामती अग्रो लि. शेटफळ, ता. इंदापूर या साखर कारखान्याने यावर्षीचा गाळप हंगाम दिनांक १५.१०.२०२२ पूर्वी सुरू

करून कायद्याचा भंग केलेला असणे, त्यामुळे बारामती अग्रो लि. शेटफळ, ता. इंदापूर, जि.पुणे यांच्या कार्यकारी संचालकांवर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधितांवर गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री, सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून उपमुख्यमंत्री यांनी कारवाई करण्याचे आदेश सहकार आयुक्त, पुणे यांना देणे, आदेश देऊनही अद्यापपर्यंत कारवाई झालेला नसणे, त्यामुळे शासनाने याची तातडीने दखल घेऊन कारखान्यातील संबंधित दोषी संचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ३६ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (अ) पाच तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(ब) एक तारांकित प्रश्न राखून ठेवण्यात आला.

(क) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकतीस वरील प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** श्री. विलास पोतनीस, समिती सदस्य यांनी शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय विधेयकांना वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

प्रतिवृत्त संमत झाले.

आज सदनात अर्थसंकल्प मांडण्यात येणार असल्यामुळे म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदने सोमवारी चर्चेला घेण्यात येतील असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**३.** आज गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

प्रा. राम शिंदे, वि.प.स. यांनी श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य व संपादक दैनिक सामना यांच्याविरुद्ध उपस्थित केलेल्या विशेषाधिकार भंग व अवमान प्रकरणी श्री. संजय राऊत यांचा खुलासा ७ दिवसांत प्राप्त करून घेऊन पुढील निर्णय सभागृहास अवगत करण्यात येईल असे सांगितले होते. त्यानुषंगाने श्री. संजय राऊत यांना दिनांक ३ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा लेखी खुलासा दिनांक ९ मार्च , २०२३ रोजी सायंकाळी ६-३० वाजेपर्यंत सादर करण्यास सूचित करण्यात आले होते. तथापि, दिनांक ८ मार्च, २०२३ रोजीच्या पत्रान्वये त्यांनी या प्रकरणी सविस्तर खुलासा सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची केलेली विनंती मान्य करून त्यांना या प्रकरणी सविस्तर खुलासा सादर करण्यासाठी मुदत वाढवून देण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सामाजिक न्याय मंत्र्यांनी, 'शिक्षण, नोकरी यासह सर्व शासकीय योजनांमध्ये स्त्री, पुरुष या पर्यायासोबत तृतीयपंथी हा पर्याय उपलब्ध करून देणे.' यासंबंधी म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, 'माननीय मुख्यमंत्र्यांच्या विरोधात दिलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेबाबत' खुलासा करण्यात यावा अशी विनंती केली.

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

विशेषाधिकार भंग समिती घटित करावयाची असून समितीची रचना कशा पद्धतीची असावी याबाबत गट नेत्यांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल व विशेषाधिकार भंग समिती घटित झाल्यानंतर विरोधी पक्षाने दिलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेवर निर्णय देण्यात येईल असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून १६ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २-०० वाजता सुरु झाली.

**४.** उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी, सन २०२३-२०२४ चा अर्थसंकल्प सादर केला व भाषण केले.

सन २०२३ - २०२४ चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर झाला आहे. अर्थसंकल्पीय प्रकाशने असलेली पेन ड्राईव्ह सुटकेससह सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे विधान भवनकरिता आरक्षित असणाऱ्या वाहनतळाच्या मोकळ्या जागेवर उभारण्यात आलेल्या मंडपामधील वितरण केंद्रावर करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशने घ्यावीत असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ३० मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०-३० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधान परिषदेच्या सभागृहात सकाळी १०.३० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सर्वश्री अंबादास दानवे, किरण सरनाईक, सत्यजित तांबे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, अभिजीत वंजारी, जयंत आसगावकर, विक्रम काळे, सतीश चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अब्दुलाखान दुर्राणी, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, किशोर दराडे, सुधाकर अडबाले, डॉ.वजाहत मिर्झा, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा -

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी नियम ९७ अन्वये पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले -

" जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी राज्यसरकारी, निमसरकारी कर्मचारी आणि शिक्षक यांच्या समन्वय समितीने १४ मार्च पासून दिलेला बेमुदत संपाचा इशारा, मागील १५ वर्षाच्या काळात कोणतीही पेन्शन योजना सुरू नसल्यामुळे त्याकाळातील शासनाचा १४ टक्का हिस्सा आणि कर्मचाऱ्यांचा १० टक्के हिस्सा असा शासन आणि कर्मचारी यांना द्यावा लागणारा मोठा भूर्दंड, कोणत्याही योजनेत नसलेल्या हजारो शिक्षकांना जीपीएफ खाते नसल्यामुळे सातव्या वेतन आयोगाचे न मिळालेले थकीत नगदी हप्ते, १ नोव्हेंबर, २००५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना जीपीएफ कपात सुरू असताना त्यांना नव्या योजनेत ढकलून बंद केलेली कपात, १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी नियुक्त झालेले शासकीय कर्मचारी नंतर कायम होऊन त्यांना आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांना पेन्शन चालू ठेवण्याचा निर्णय, शिक्षकांच्या बाबतीत मात्र लागू करण्यास दिलेला नकार, वस्तीशाळा शिक्षकांनाही त्यांची नेमणूक २००५ पूर्वीची असूनही त्यांना जुनी पेन्शन योजना अद्यापि लागू झालेली नसणे, संविधानातील समतेच्या तत्त्वाशी विसंगत असे हे शासनाचे धोरण असणे, दिल्ली, राजस्थान आणि छत्तीसगड राज्याप्रमाणे नोव्हेंबर, २००५ ची विभाजन रेषा रद्द करून आधीच्या व नंतरच्या सरसकट सर्व कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र शासन याबाबत कोणती भूमिका घेत नसल्यामुळे शासकीय व निमशासकीय कर्मचारी व शिक्षक यांच्यामध्ये वाढलेला प्रचंड असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. "

उपरोक्त अल्पकालीन चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे
(२) श्री. किशोर दराडे
(३) श्री. अभिजीत वंजारी
(४) श्री. किरण सरनाईक
(५) श्री. जयंत आसगावकर
(६) श्री. विक्रम काळे
(७) श्री. सत्यजीत तांबे
(८) श्री. सुधाकर अडबाले (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सदर अल्पकालीन चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. सुधाकर आडबाले हे ऑन लेग राहतील. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा भरेल असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बत्तीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

महाराष्ट्र विधानपरिषदेतील विधानमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या गटनेते पदावर श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. तसेच, प्रतोद पदावर श्री. अनिकेत सुनील तटकरे, वि.प.स. यांची नियुक्ती करण्यात आली आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**२.** (१) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " नंदेश्वर (ता.मंगळवेढा, जि.सोलापूर) येथे दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी महादेव माळी आणि त्यांच्या घरातील तीन महिलांच्या डोक्यात दगड घालून हत्याराने वार करून खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना " इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) सर्वश्री. शशिकांत शिंदे व इतर वि.प.स. यांनी, " बरगेवाडी, ता.कोरेगाव, जि.सातारा येथील धोम डावा कालवा फुटून लाखो लिटर पाणी वाया जाणे " इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, “ पैठण येथील जायकवाडी धरणाची दुरुस्ती करणे ” इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स. यांनी, “ महावितरण कंपनीने कृषी पंपांच्या वीज दरवाढीचा प्रस्तावित केलेला निर्णय ” इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते, यांनी, “ माहिती व जनसंपर्क विभागाकडून ५०० कोटी रुपयाच्या जाहिराती मुख्यमंत्र्यांना न अवगत करता डीजीआयपीआरच्या माध्यमातून देण्यात येणे ” इ.बाबत नियम २८९ अन्वये सूचना उपस्थित केली असून त्याच स्वरुपाचा मजकूर असलेली सूचना सन्माननीय सदस्या डॉ.मनिषा कायंदे, सन्माननीय सदस्य श्री. शशिकांत शिंदे व श्री. एकनाथराव खडसे यांची आहे. अशा चौघांच्या मिळून म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना आहेत. श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी त्यांनी उपस्थित केलेल्या सूचनेसंदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

माननीय विरोधी पक्ष नेते श्री. अंबादास दानवे आणि डॉ. मनिषा कायंदे, श्री. शशिकांत शिंदे, श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी दिलेल्या म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचनेस अनुमती नाकारीत आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची, “ राज्यात डिसेंबर, २००१ पासून राज्य शासनाने वरिष्ठ महाविद्यालयांना परवानगी देताना ‘ कायम ’ विनाअनुदान तत्त्वावर परवानगी दिली असून वरिष्ठ महाविद्यालयाचा ‘ कायम ’ शब्द काढण्याची आवश्यकता ” इ.बाबत नियम २८९ अन्वये उपस्थित केलेला विषय धोरणात्मक बाबीसंबंधी आहे, तथापि, सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी त्यांच्या सूचनेसंदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी मांडलेली २८९ अन्वये सूचना लक्षवेधी सूचनेत बदल करून घेऊ व त्यावर शासनाकडून उत्तर अपेक्षित राहील असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांनी, " मुंबईतील वडाळा येथील गणेश नगर झोपडपट्टी सेवा संघ संचलित श्री. गणेश विद्यालयात दहावीचे केंद्र क्रमांक ८३०१ अपुऱ्या सोयीसुविधांमुळे त्रस्त झालेल्या इयत्ता दहावीचे परीक्षार्थींना तातडीने न्याय मिळणे " इ.बाबत देण्यात आलेली नियम २८९ अन्वयेस अनुमती नाकारीत पण यामध्ये विद्यार्थ्यांशी संबंधित अतिगंभीर असा प्रश्न असल्यामुळे त्यांना औचित्याचा मुद्दा म्हणून बोलण्याची संधी देत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, " मुंबईतील वडाळा येथील गणेश नगर झोपडपट्टी सेवा संघ संचलित श्री. गणेश विद्यालयात दहावीचे केंद्र क्रमांक ८३०१ अपुऱ्या सोयी-सुविधांमुळे त्रस्त झालेल्या इयत्ता दहावीचे परीक्षार्थींना तातडीने न्याय मिळणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात माननीय शिक्षण मंत्र्यांशी चर्चा करून विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाही, याबाबतीत आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील असे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी सांगितले.

आज सायंकाळी पाच वाजेपर्यंत सदर व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून पुढील पेपरकरिता विद्यार्थ्यांना याचा उपयोग होईल असे माननीय उप सभापतींनी निदेश दिले.

(२) श्रीमती. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, " महिलेचे मासिक पाळीचे रक्त तांत्रिक-मांत्रिक, जादूटोणा करणाऱ्या माणसाच्या सांगण्यावरुन ५०,००० रुपयांना विकण्यात येणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

सदर प्रकाराची नोंद घेतलेली असून यावर उचित कारवाई केली जाईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

सर्वश्री अंबादास दानवे इतर वि.प.स. यांनी, " जुन्या पेन्शन मागणीसाठी राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या समितीने बेमुदत संपाचा इशारा देणे " इ.बाबत म.वि.प. नियम ९७ अन्वये उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा - **चर्चा पुढे सुरू**

उपरोक्त अल्पकालीन चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

श्री. सुभाष अडबाले, वि.प.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले.

(९) डॉ.मनिषा कायंदे
(१०) श्री. अमोल मिटकरी
(११) श्री. शशिकांत शिंदे
(१२) श्री. अरूण लाड
(१३) श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील
(१४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता

उपरोक्त अल्पकालीन चर्चेस उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

श्री. कपील पाटील, वि.प.स. यांनी उत्तरादाखल भाषण केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या असल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

शुक्रवार, दिनांक १० मार्च, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्या असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत असून दुपारी ३.१५ वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल. त्यात राज्यपालांच्या अभिभाषणावरील माननीय उप मुख्यमंत्री यांचे उत्तर होईल व त्यानंतर पुढील कामकाज होईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी २ वाजून ३३ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

आता पुरवणी मागण्यांवरील चर्चा सुरू होईल परंतु सभागृहात मंत्रिमहोदय उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांकरिता स्थगित करीत आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १७ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**३. खालील विभागाच्या मागण्यांवरील एकत्रित चर्चा पुढे सुरू झाली —**

मुख्यमंत्री.

उप मुख्यमंत्री.

महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री.

वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय मंत्री.

उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री.

आदिवासी विकास मंत्री.

ग्रामविकास व पंचायत राज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण मंत्री.

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री.

कामगार मंत्री.

उद्योग मंत्री.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री.

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री.

कृषी मंत्री.

शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री.

सहकार, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री.

राज्य उत्पादन शुल्क मंत्री.

पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता, महिला व बालविकास मंत्री.

पुरवणी मागण्यांवरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला–

श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले -

(१) श्री. अभिजीत वंजारी
(२) श्री. अमोल मिटकरी
(३) श्री. जयंत आसगावकर
(४) श्री. किरण सरनाईक
(५) श्री. शशिकांत शिंदे

पुरवणी मागण्यांवरील चर्चेस सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी उत्तर दिले.

सन २०२२-२०२३ च्या पुरवणी मागण्यांवर सभागृहाने विचार केला असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी, “ गांधीनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथील इमारत क्रमांक ५७ व ५८ मधील मोकळी जागा अनधिकृतपणे बळकाविल्यासंदर्भात केलेला आरोप ” इ.बाबत श्री. मिलींद बोरीकर, मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई व माजी खासदार श्री. किरीट सोमय्या यांच्याविरुद्ध विशेषाधिकारभंगाची सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त विशेषाधिकारभंगाची सूचनेसंदर्भात ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

सदरहू हक्कभंगाची सूचना तपासून योग्य तो निर्णय देण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, “ कोरेगाव शहराच्या विकास आराखड्याच्या संदर्भात अडचणी निर्माण झाल्यामुळे बोलावलेल्या बैठकीस एकही अधिकारी उपस्थित न राहणे ” इ.बाबत संबंधित १७

अधिकाऱ्यांविरुद्ध विशेषाधिकारभंगाची सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त विशेषाधिकारभंगाची सूचनेसंदर्भात श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीस अनुपस्थितीचे कारण विचारावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, " मुंबईतील वडाळा येथील गणेश नगर झोपडपट्टी सेवा संघ संचलित श्री. गणेश विद्यालयात दहावीचे केंद्र क्रमांक ८३०१ अपुऱ्या सोयीसुविधांमुळे त्रस्त झालेल्या इयत्ता दहावीचे परीक्षार्थींना तातडीने न्याय मिळणे " इ.बाबत दिलेल्या नियम २८९ अन्वयेच्या सूचनेस माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने सदरहू इयत्ता दहावीच्या परीक्षार्थींची पर्यायी व्यवस्था डी.पी. वाये व डॉन बॉस्को या दोन शाळांमध्ये केली असल्याचे शालेय शिक्षण मंत्र्यांनी सांगितले.

ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, ठाणे येथील इंटरनल मेट्रोच्या संदर्भातील विषय विनंती अर्ज समितीकडे घ्यावा याबाबत मुद्दा उपस्थित केला.

सदरहू विषयाचा सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी दिवसाच्या कामकाजामध्ये उल्लेख करण्यात यावा म्हणजे सन्माननीय सदस्यांचा अर्ज, विनंती अर्ज समितीकडे वर्ग करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, " शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे शासनाने केलेल्या तोडकामामुळे त्या ठिकाणचे लोखंडी स्टील व अन्य साहित्य काही लोकांकडून इतरत्र नेण्यात येणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " माजी सैनिक यांना पोलीस व सरकारी खात्यात नोकरी मिळण्याच्या दृष्टीने शासनाने तत्काळ निर्णय घेण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " रायगडावर खाजगी सुरक्षा रक्षक न ठेवता शासकीय सुरक्षा रक्षक ठेवण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " मुंबईत शिक्षणाच्या नावाखाली कमाईकरिता काही शैक्षणिक संस्थांनी मुंबईत मोठ्या प्रमाणात अनधिकृत शाळा सुरू करण्यात आल्या असणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी, " लोणार (सरोवर) (जि.बुलढाणा) तालुक्यांतील पलसिद्ध कन्स्ट्रक्शन व साई कृपा कन्स्ट्रक्शन दोन्ही गिट्टी खदान बंद करण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " एमपीएससीमार्फत गट 'ब ' व गट 'क ' वर्गाच्या ८१७५ पदांकरिता भरती होत असून या संदर्भात शासन निर्णयातील तांत्रिक चुकीमुळे दिनांक १७ डिसेंबर, २०२१ नंतर वय ओलांडणारे परीक्षार्थी वय कमी असूनही अपात्र उमेदवारांवर अन्याय न होता त्यांना देखील पुन्हा २ दिवसासाठी लिंक खुली करून वाढीव वय सवलतीमध्ये संधी देऊन त्यांना फॉर्म भरण्याची संधी देण्यात यावी " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, " मराठा आरमाराचे मुख्यालय व अलिबाग समुद्रात अष्टकरांचा राजा म्हणून ओळख असलेल्या कुलाबा किल्ल्याची झालेली दुरवस्था " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१) आदिवासी विकास मंत्र्यांनी, " राज्यातील आदिवासी विभागाच्या आश्रमशाळेत विद्यार्थ्यांचे होत असलेले मृत्यू " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(२) आदिवासी विकास मंत्र्यांनी, " आदिवासी बालकांची वेठबिगारी व कातकरी समाजातील मुलांची बालविक्री " इ.बाबत सभागृहाच्या अनुमतीने म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

**राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला**

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावरील चर्चेस उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून २८ मिनिटांनी, सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०.३० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**सोमवार, दिनांक १३ मार्च, २०२३**

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी माननीय सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१) डॉ. मनिषा कायंदे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले पंढरपूर येथे चालू आर्थिक वर्षात कॉरिडॉर तयार करण्याचे प्रस्तावित असणे, पंढरपूर देवस्थान परिसरातील या कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्यासाठी ३०० कोटींचा निधी खर्च करण्याचे नियोजित असणे, उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ कॉरिडॉर, तसेच मध्य प्रदेशातील उज्जैन येथील महाकाल कॉरिडॉर प्रकल्पाच्या धर्तीवर विकास करण्याचे नियोजन असणे, केंद्र आणि राज्य सरकार संयुक्तपणे खर्चाचा हिस्सा उचलून पंढरपूर शहरातील गल्ल्या, रस्ते, घाट, मठ, लहान-मोठी मंदिरे, चंद्रभागा तीराचा विकास, विठ्ठल मंदिर ते पालखी मार्ग, यावरील विकासाकडे कॉरिडॉर निर्माण करताना खास लक्ष देण्यात येणार असल्याचे पर्यटन मंत्र्यांनी जाहीर करणे, आषाढी एकादशी सह इतर सणांच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वारकरी पंढरपूरात येत असून त्यांना विविध सोयी-सुविधांची कमतरता भासत असल्याने कॉरिडॉर विकासानंतर पंढरपूरचा चेहरा मोहरा बदलण्याचे भाकीत करणे, याबाबत ऑक्टोबर महिन्यामध्ये पर्यटन मंत्री यांच्याकडून घोषणा झाल्यानंतर पंढरपूरसह राज्यभरातील वारकऱ्यांचा या विकासाकरिता विरोध असणे, सदर कॉरिडॉर विकासामुळे शहरातील नागरिकांसह मोठ्या प्रमाणावर जुनी मंदिरे व मठांचे पुनर्वसन करावे लागत असल्यामुळे स्थानिकांचा कॉरिडॉर करिता प्रचंड विरोध असणे, याबाबत काही लोकप्रतिनिधींनी हायकोर्टात याचिका दाखल करून कॉरिडॉर करिता विरोध दर्शविणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे स्थानिकांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी, (मुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, “ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे जाहीर करण्यात आलेल्या गटनेते आणि प्रतोद यांच्या नियुक्तीसंदर्भात प्रसिद्ध झालेल्या परिपत्रकात सदर पक्षाच्या गटनेतेपदी श्री. एकनाथ शिंदे यांचे नाव प्रसिद्ध होणे, ” इ.बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सदर परिपत्रक ताबडतोब रद्द करून यामध्ये दुरुस्ती करू, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

आजच्या कार्यक्रमपत्रिकेत लक्षवेधी सूचनांमध्ये चौथ्या क्रमांकावर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी पत्र दिले असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

२) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पायाभूत सुविधा कक्ष मुंबई येथे कार्यरत अधीक्षक अभियंता यांनी बांधकामाच्या निविदेमध्ये ठरावीक कंत्राटदाराला निविदा बहाल करून सदर कामे वेळेत पार न

पाडणे व राज्याचा बांधकामाचा खर्च कमी होणे, यामध्ये आर्थिक भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले असणे, तसेच उपरोक्त अधिकारी यांनी फिल्ड हॉस्पिटलची निविदा अटी व शर्ती पूर्ण न करता ठरावीक कंत्राटदाराला दिल्यामुळे तीन महिन्याची मुदत असतानाही वर्षभर काम पूर्ण न होणे व निकृष्ट दर्जाचे काम होणे, MCH WING ची निविदा प्रक्रिया उशिरा करणे, ठरावीक कंत्राटदाराला काम देण्याकरता अटी व शर्ती बदलणे, निविदा प्रक्रिया पूर्ण होऊनही वर्क ऑर्डर न देणे यामध्ये मोठ्या प्रमाणात निविदाधारकाकडून टक्केवारी घेणे, एकंदरीत राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत पायाभूत सुविधा कक्षामार्फत होत असलेल्या कामांमध्ये तांत्रिक मान्यतेसाठी टक्केवारी घेणे, ठरावीक निविदाधारकाला निविदा देणे त्यामध्ये आर्थिक फायदा झाल्याशिवाय पुढची कारवाई न करणे हे करतांना उपसंचालक स्तरावरील कार्यकारी अभियंता यांना हाताशी धरुन निविदा प्रक्रिया पूर्णपणे मॅनेज करून ठराविक ठेकेदाराला देणे, सदर निविदा प्रक्रियेमध्ये फक्त कंत्राटी अधिकारी असल्यामुळे मोठया प्रमाणात अनियमितता असणे, त्यामुळे एक वर्षाचे काम चार-पाच वर्ष होत आले तरी पूर्ण न होणे असे असून निविदाधारकावर जिल्हा स्तरावरुन ब्लॅकलिस्टिंग कारवाई प्रस्तावित केली तरी आर्थिक फायद्यापोटी त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करणे, त्यामुळे खर्च न होणे, केंद्र शासनाने याबाबत नाराजी व्यक्त केली असणे, राज्याचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, त्यामुळे जनसामान्यांमध्ये आरोग्य यंत्रणेचा बोजवारा उडाला असल्याचे आढळून येत असणे, तसेच वरील प्रकरणी चौकशी केली नसल्याने व या भ्रष्टाचार करणाऱ्या अधीक्षक अभियंता यांच्यावर कोणतीही कारवाई किंवा चौकशी न केल्यामुळे जनतेत शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची लाट उसळली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ”

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था इगतपुरी/निकाह (जि.नाशिक) यांनी त्यांच्या कार्यकाळात घाटनदेवी औद्योगिक सहकारी वसाहत मर्या, इगतपुरी या संस्थेचे बेकायदेशीररित्या घाटनदेवी गृहनिर्माण सहकारी संस्थेत रूपांतर करणे, मंजूर सहकार संस्थेच्या पोटनियम दुरुस्ती प्रस्तावास मंजुरी देतांना वैधानिक कार्यकक्षा ओलांडून संस्थेच्या कार्यक्षेत्रात बदल करणे, उक्त सहाय्यक निबंधक इगतपुरी येथे कार्यरत असतांना मुख्यालयी वास्तव्यास न रहाणे, तसेच ते नियमितपणे कार्यालयात उपस्थित न राहणे, मासिक दैनंदिनी सादर न करणे त्याचप्रमाणे त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कायदा कलम ८८ चौकशी न करणे, कामकाज विहित मुदतीत पूर्ण न करणे, या सर्व प्रकरणी त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित असणे, त्यांनी शासकीय कामकाजात हलगर्जीपणा करून, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक)

नियम १९७९ मधील नियम (एक) (तीन) चा भंग केल्याप्रकरणी जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी सविस्तर प्रस्ताव दिनांक ०४/०५/२०२२ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करणे, त्यानंतर दिनांक ३१/१०/२०२२ रोजी विद्यमान सहायक तसेच दिनांक २८/१२/२०२२ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, निफाड यांनी उक्त गैरव्यवहार प्रकरणीचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना सादर करणे, तथापि अद्याप याप्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात न येणे, उक्त तत्कालीन सहायक निबंधक हे सध्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे येथे कार्यरत असून त्यांच्या कामकाजाबाबत धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धुळेच्या अध्यक्षांनी दिनांक २२/०९/२०२२ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार दाखल करणे, शासनाने या सर्व प्रकरणी तातडीने चौकशी करून कामकाजात हलगर्जीपणा व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया. ”

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहात गोंधळसदृश वातावरण निर्माण झाल्यामुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३३ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ३७ मिनिटांनी १० मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४७ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, “ घाटनदेवी औद्योगिक सहकारी वसाहत मर्या., इगतपुरी या संस्थेचे बेकायदेशीररित्या घाटनदेवी गृहनिर्माण सहकारी संस्थेत रूपांतर करणारे सहायक निबंधक, सहकारी संस्था इगतपुरी/निकाह (जि.नाशिक) यांना आरे सरिता प्रकल्पामध्ये निलंबित करण्यात असून या प्रकरणी शासनाने कारवाई करणे, ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

सहकार मंत्र्यांनी, सदर अधिकाऱ्यांना सक्तीच्या रजेवर पाठवून पुढील एक आठवड्यात शासन याबाबत कार्यवाही करेल, असे सांगितले.

विरोधी पक्षाच्या सदस्यांचे समाधान होईल, अशी कारवाई करा, असे निदेश माननीय उप सभापतींनी सांगितले.

४) श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राज्यामध्ये विमुक्त जाती, भटक्या जमाती, उच्च माध्यमिक आश्रमशाळा, ज्युनिअर कॉलेज १४७ असणे, त्यामध्ये उच्च माध्यमिक शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू असणे, परंतु उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठव निवड श्रेणीचा वेतन बँड लागू असणे, शालेय शिक्षण विभाग व आदिवासी विभाग यामध्ये कार्यरत उच्च माध्यमिक शिक्षकांना हा लाभ मिळत असणे, परंतु बहुजन कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या आश्रमशाळेतील जवळपास ११२९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठव निवड श्रेणीचा लाभ मिळत नसणे, हे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शिक्षण विभागाचा भाग असणे, त्यांनाही निवड श्रेणी व वरिष्ठश्रेणीचा लाभ सातवा वेतन आयोगानुसार देण्याची मागणी सातत्याने या शिक्षकांकडून करण्यात येत असणे, त्यांना हा लाभ मिळत नसल्याने या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मनात शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण झालेली असणे, बहुजन कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या आश्रमशाळेतील जवळपास ११२९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठव निवड श्रेणीचा लाभ मिळण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली. (चर्चा अपूर्ण)

सकाळच्या सत्रातील कामकाजाची वेळ संपलेली आहे. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुन्हा सुरु होईल. दुपारच्या सत्रात या लक्षवेधी सूचनेवर पुढील चर्चा सुरु होईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५५ मिनिटांनी दुपारी १२ वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२ वाजता माननीय उप सभापती
डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

संसदीय कार्यमंत्र्यांनी, लक्षवेधी सूचना क्रमांक ७ मधील उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांच्यासोबत बैठक झाली असून याबाबत सरकार सकारात्मक आहे, असे सांगितले.

अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत काही समजले नाही तर पुन्हा विषय उपस्थित करण्याची संधी देण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**१.** (अ) (१) सहा तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी व पाचवी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

**२.** उद्योग मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य माहिती आयोग यांचा दिनांक १ जानेवारी, २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या कालावधीतील पंधरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** आज सोमवार दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याची घोषणा माननीय उप सभापतींनी केली.

**४.** आज सोमवार दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याची घोषणा माननीय उप सभापतींनी केली.

१) डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांनी, “ दिनांक ७ मार्च, २०२३ रोजी श्री. आमरान अब्दुल कादर तांबोली याला जमावाकडून मारहाण करण्यात येणे, ” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.
२) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, “ शेतकऱ्यांच्या आत्महत्या याबाबत कृषी मंत्र्यांनी केलेले असंवेदनशील वक्तव्य, ” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने दखल घेणे आवश्यक आहे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, “ सदनातील कामकाजाची माहिती विषय पत्रिकेद्वारे मिळून देखील लक्षवेधी सूचनेच्या वेळी मंत्रिमहोदय उपस्थित नसणे, ” इ.बाबत हरकतीचा मुद्दा उपस्थित केला.

१) सर्वश्री किरण सरनाईक, राजेश राठोड, सत्यजित तांबे, डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांनी, “ सन २०२२-२०२३ ची संच मान्यता स्टुडंट पोर्टलमध्ये अपलोड केलेले आधारकार्ड गृहीत धरुन करण्यात यावी व इनव्हॅलीड दाखवत असलेल्या आधारकार्ड संदर्भात निर्णय घेणे, ” इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उपसभापतींच्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री सत्यजित तांबे, वि.प.स. यांनी, “ नाशिक जिल्ह्यातील आदिवासी आश्रमशाळेतील मुख्याध्यापिकेने विद्यार्थिनींशी अयोग्य वर्तन करणे, ” इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उप सभापतींच्या निदेशानुसार आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री सचिन अहिर, वि.प.स. यांनी, “ मुंबई, भिवंडी, ठाणे शहर परिसरात बोगस डॉक्टरांचे दवाखाने आणि खाजगी पॅथॅलॉजिक लॅब (प्रयोगशाळा) मोठ्या प्रमाणात सुरू असणे, ” इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उप सभापतींच्या निदेशानुसार वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" रायगड जिल्ह्यातील मौजे चोची व मौजे कोंढाणे ता.कर्जत येथे शासनामार्फत धरण बांधण्याचे काम प्रस्तावित असणे, या ठिकाणच्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करण्यात येणार असणे, मौजे चोची व कोंढाणे येथील मिळकती अस्तित्वात असल्यापासून आदिवासी शेतकरी सदर मिळकतीचे कूळ म्हणून कायम असणे, या जमिनीवर सर्व आदिवासी शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह असणे, सर्व आदिवासी शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयात सुनावणीसाठी हजर राहण्याचे कळविण्यात आलेले असणे, या संदर्भात सर्व आदिवासी शेतकऱ्यांनी लेखी अर्जाद्वारे जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे लेखी खुलासा कळविलेला असणे, या मिळकती भूसंपादित होणार असल्याची माहिती मिळाल्यावर महसूल विभागाचे अधिकारी याचेकडून कुळाचे खाजगी सावकारांशी संधान साधणे, शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटिसा आल्यावर कूळ बदलण्याचा प्रयत्न करणे, सावकारांना कायदा कुळाच्या जमिनीवर हक्क सांगण्यासाठी प्रवृत्त करणे, या जमिनी शासकीय अधिकाऱ्यांचे नातेवाईक यांच्या नावावर करण्याचा प्रयत्न करणे, शासकीय नियमाची पायमल्ली व आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून आदिवासी शेतकऱ्यांवरच दबाव टाकणे, त्यांची फसवणूक करणे, एकूणच या जमीन भूसंपादनामध्ये आदिवासी बांधवांची फसवणूक करून शासकीय अधिकारी जमिनीचा गैरव्यवहार करीत असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी व याबाबत शासनाची भूमिका. "

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६) सर्वश्री भाई गिरकर, प्रवीण दरेकर, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. भाई गिरकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्या (महानंद) या शासकीय संस्थेत झालेल्या आर्थिक गैरप्रकाराबाबत पावसाळी अधिवेशन २०२२ दरम्यान लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात येणे, सदर लक्षवेधी सूचनेवर विधानपरिषद सभागृहात झालेल्या चर्चेमध्ये मंत्री महोदयांनी सदर झालेल्या गैरप्रकाराबाबत चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल असे आश्वासन दिले असणे, यानुसार दिनांक २२ ऑगस्ट २०२२ च्या शासन निर्णयानुसार आयुक्त दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, सदर चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात

आला असून अद्यापपर्यंत तो प्रसिद्ध करण्यात न आल्याचे समोर येणे, महासंघाने संचालक मंडळाच्या मान्यतेने पिशवीबंद दुधाला रु. २८ कोटी अनुदान वाटप केल्याने महासंघाच्या अर्थव्यवस्थेवर अनावश्यक भार पडून महासंघाची आर्थिक स्थिती ढासळली असल्याची बाब उघडकीस होणे, याबाबत संचालक मंडळाने चुकीचा ठराव मंजूर केल्याने सदर स्थिती उद्‌भवली असून रु.२८ कोटी रकमेची वसुली संबंधित संचालकांकडून करण्याची कार्यवाही करावी असे आदेश शासनाने दिले असल्याची बाब समोर येणे, महासंघाच्या गलथान कारभारामुळे येथील कामगार व कर्मचारी यांना अनेक समस्या भेडसावत असणे, कामगारांच्या प्रश्नांबाबत दिनांक २२.११.२०२२ रोजी मुख्यमंत्री व दुग्धविकास मंत्री यांच्या समवेत कामगारांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी राज्य शासन व दूध महासंघाच्या व्यवस्थापनाकडून योग्य रीतीने झालेली नसल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी कामगारांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, कामगारांचे होत असलेले हाल लक्षात घेता सदर आदेशाची अंमलबजावणी तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. ”

दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७) सर्वश्री अभिजित वंजारी व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ पुणे शहराला स्मार्ट सिटीचा दर्जा असून याच स्मार्ट पुण्यातील ससून रुग्णालयासारख्या नामांकित रुग्णालयात सुपरस्पेशालिटी सुविधांची वानवा असणे, तसेच राज्यातील अनेक सुपर स्पेशलिटी रूग्णालयांना सुविधा उपलब्ध होत नसणे तसेच अनेक पदे रिक्त असल्याची बाब समोर येणे, ससून रुग्णालयात मेडिकल विभागाच्या कार्डिओलॉजी, जठरांत्रमार्ग रोग विभाग (गॅस्ट्रॉइटेरॉलॉजी), मेंदूविकार (न्यूरोलॉजी) व नेफ्रॉलॉजी विभाग तर शल्यचिकित्सामध्ये असलेल्या हृदयशल्यचिकित्सा विभाग (सीव्हीटीएस), प्लास्टीक सर्जरी, मेंदुशल्यचिकित्सा (न्युरोसर्जरी), मूत्रविकार (युरोलॉजी) व बालशल्यचिकित्सा (पेडियाट्रिक सर्जरी) या विभागात स्पेशालिस्ट, सुपरस्पेशालिस्ट मनुष्यबळाची पदेच मंजूर नसल्याने शल्यसुविधा पुरविण्यास अत्यंत अडचणी येणे, या विभागाचे श्रेणीवर्धन किंवा विस्तार अनेक वर्षांपासून रखडले असून हे विभाग पूर्ण ताकदीने सुरू होण्यासाठी प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक अशी पदे भरणे आवश्यक असताना याकडे रुग्णालय प्रशासनाचे व शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या विभागांत गोरगरीब रुग्णांना तसेच उच्च स्वरूपाच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना यापासून वंचित राहवे लागत असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी

करून ससून रुग्णालय, तसेच अशीच परिस्थिती असलेल्या राज्यातील अनेक सुपर स्पेशलिटी रुग्णालयातील रिक्त असलेली अनेक पदे त्वरीत भरण्याची व या रूग्णालयात सुपर स्पेशालिटी साठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८) सर्वश्री. सुनील शिंदे, विलास पोतनीस, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ वरळी, मुंबई येथील गांधीनगर परिसरात निर्माणाधीन असलेल्या इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट पडल्याने रस्त्याने जाणाऱ्या दोघा पादचाऱ्यांचा नाहक मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी घडली असणे, या दुर्घटनेत मृत झालेल्या व्यक्ती एका एक्स्पोर्ट कंपनीत कामाला असणे, वरळीच्या गांधीनगर परिसरात ‘फोर सीझन’ हॉटेलच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू असणे, या निर्माणाधीन इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट खाली कोसळलेली असणे, या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या दोनही पादचाऱ्यांना तब्बल अर्धा तास रस्त्यावर उपचाराविना पडून राहावे लागणे, ‘गोल्डन अवर’ मध्ये त्यांना वैद्यकीय मदत सहाय्यता देण्यात संबंधित विकासकाच्या व्यवस्थापनाने अक्षम्य हलगर्जीपणा केलेला असणे, अखेर त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असणे, या दुर्घटनेत काही वाहनांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठी वीट पडल्याने विकासकाकडून करण्यात आलेल्या सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, तसेच निर्माणाधीन इमारतीतील अनेक अनियमिततेकडे शासकीय यंत्रणेने हेतुपुरस्सर केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू दुर्घटनेत विकासक आणि त्याच्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दोघांना नाहक प्राण गमवावे लागले असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, भविष्यात संबधित विकासकाच्या बेपर्वा वर्तणूकीमुळे अशाच प्रकारची दुर्घटना घडून अन्य नागरिकांना देखील जीव गमवावा लागण्याची असलेली दाट शक्यता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष आणि संबधित विकासकाच्या अनधिकृत कृत्यास शासनाकडून देण्यात येत असलेले अभय, परिणामी, सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी २ वाजून ५३ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ४० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " विधिमंडळ परिसरामध्ये येण्यासाठीची पासेसची सेवा बंद असणे तसेच अज्ञात व्यक्तीने सभागृहात बसणे, " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात माननीय विधानसभा अध्यक्षांसोबत चर्चा करण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले. तसेच सभागृहात आलेली व्यक्ती अज्ञात नसून सभागृहाचे सदस्य श्री. रमेश कराड होते. त्यामुळे सदर सन्माननीय सदस्यांबाबत सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांच्याकडून अनवधानाने उल्लेख झाला असे सांगितले.

९) सर्वश्री शशिकांत शिंदे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" सातारा जिल्ह्यातील कोरेगांव तालुक्यातील मौजे तडवळे स. वाघोली येथील गट क्र. ६४/१ या ठिकाणी अवैध पद्धतीने स्टोन क्रशर सुरू असून मंडळाची संमती न घेता हे स्टोन क्रशर चालविले जात असणे, हे क्रशर चालू करतांना पुढील निकष आवश्यक असतांना १) सदर स्टोन क्रशर निरा-सातारा राज्य महामार्गापासून सुमारे २२० मीटर अंतरावर असून बोर्डाचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० च्या परिपत्रकानुसार अंतराचे निकष पूर्ण करू शकत नाही. २) कन्व्हेअर बेल्ट शीटने झाकलेले नाही त्यावर पाणी शिंपडण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. ३) क्रशरच्या परिघाभोवती वारा तोडणारी भिंत करण्यात आलेली नाही. ४) वाहनांच्या हालचालीतून निर्माण होणाऱ्या धुळीच्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणेसाठी कोणतीही सुविधा करण्यात आलेली नाही. ५) सदर क्रशरच्या ठिकाणी पुरेसे वृक्षारोपण करण्यात आलेले नाही. ६) सदरच्या स्टोन क्रशरकडून (मालकाकडून) जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, १९७४, वायू प्रतिबंध नियंत्रण अधिनियम, १९८१ च्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले असणे, अशा प्रकारे अवैध स्टोन क्रशर चालवून क्रशरच्या मालकाने शासनाचे नुकसान केलेले असणे, यासंदर्भात चौकशी करून संबंधित स्टोन क्रशर मालकाविरुद्ध कारवाई करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कार्यक्रमपत्रिकेत लक्षवेधी सूचनांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला घेण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

१) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, “ पोलीस भरतीदरम्यान उमेदवारांना येणाऱ्या अडचणी दूर करणे, ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

२) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, “ मंत्रिमहोदयांकडून आश्वासन दिल्यावर संबंधित बैठकांना उपस्थित राहण्यासाठी सदस्यांना निमंत्रण न मिळणे, ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने दखल घ्यावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी, दखल घेतल्याचे सांगितले.

३) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, “ महिलांचा अवमान करणाऱ्या घडलेल्या दोन घटना, ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

माननीय उप मुख्यमंत्री सदनात असतील तेव्हा या दोन्ही विषयांसंबंधी निर्देश देण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

१०) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची चांगली व्यवस्था होण्यासाठी शासनाने शासकीय वसतीगृह उभारले असून मुंबईतील चेंबूर नाका परिसरात १ हजार विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याचा निर्णय सन २००७ मध्ये घेणे, परंतु वसतीगृहाचे बांधकाम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, खाजगी विकासकाने सदर वसतीगृहाचे काम अर्धवट सोडल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना भाड्याने शिक्षणासाठी राहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, शासकीय वसतीगृहाचे काम गेल्या १६ वर्षांपासून रखडले असल्यामुळे राज्य शासनाने लक्ष घालून सदर प्रकरणी तात्काळ वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी चेंबूर येथे शेकडो विद्यार्थ्यांनी माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आंदोलन सुरू करणे, त्यामुळे शासनाने याची सखोल चौकशी करून तातडीने शासकीय वसतीगृह उभारण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. ”

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

११) सर्वश्री अमोल मिटकरी, व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ भारत सरकारच्या मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्यशासनाकडून संयुक्तपणे दरवर्षी भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती प्रदान

करण्यात येत असणे, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करूनही राज्यातील १ लाख २३ हजार विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्ज महाविद्यालयांनी प्रलंबित ठेवले असल्याचे निदर्शनास येणे, सदर १ लाख २३ हजार अर्ज महाविद्यालयांकडेच प्रलंबित असल्याने त्यावर समाजकल्याण विभागाला कार्यवाही करता आलेली नसणे, तसेच त्याखेरीज २० हजार अर्ज हे विद्यार्थी स्तरावर प्रलंबित असल्याचेही निदर्शनास आलेले असणे, शासनाच्या सामाजिक न्याय विभागाने अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास, संबंधित महाविद्यालयावर जबाबदारी निश्चित करण्यात येऊन यासंदर्भात कठोर कारवाई करण्याचे शासनाकडून सांगण्यात येणे, परंतु त्याबाबत काही हालचाल झाली नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गामध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, परिणामी त्यासंदर्भात शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका. ”

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कार्यक्रमपत्रिकेत लक्षवेधी सूचनांमध्ये नवव्या क्रमांकावर दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना श्री. अभिजित वंजारी यांची असून ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे त्यांची लक्षवेधी सूचना उद्या सकाळी चर्चेला घेण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

१२) श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यात ग्रामीण भागात असलेल्या आरोग्य संस्थांची पुनर्बांधणी होणे आवश्यक असणे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यांचे दर्जा वाढ होणे तसेच नवीन केंद्रास मंजुरी मिळण्याकरिता जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी बृहत आराखडा तयार करणे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी याप्रकरणी नियमान्वये सविस्तर प्रस्ताव आरोग्य विभागास सादर केलेला असणे, सदर आराखड्यास गेल्या अनेक वर्षांपासून मंजुरी प्रलंबित असल्याने जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर विपरीत परिणाम होत असणे, नंदुरबार हा एक आदिवासी व अतिदुर्गम जिल्हा असल्याने शासकीय आरोग्य सेवेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या लक्षणीय असणे, त्यामुळे नंदुरबार जिल्ह्यातील आरोग्य सेवेस बळकटी देण्याच्या हेतूने जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी सादर केलेल्या बृहत आराखड्यास तात्काळ मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया ”

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**५.** शालेय शिक्षण मंत्र्यांनी पुढील प्रस्ताव मांडला.

" महाराष्ट्र विधानपरिषद नियमांतील नियम २८९ अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानपरिषद नियमांतील नियम २२८ (१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे, ती स्थगित करण्यात यावी. "

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**६.** (क) उद्योग मंत्री यांचा प्रस्ताव (म.वि.प. नियम १४९ अन्वये) -

उद्योग मंत्र्यांनी, " महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४– महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा विधेयक, २०२३ मागे घेण्यास अनुमती द्यावी. " असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ४ सभागृहाच्या अनुमतीने मागे घेण्यात आले.

१३) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारित पूर्व प्राथमिक ते इयत्ता दुसरीसाठी दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा प्रकाशित झाला असणे, त्या पार्श्वभूमीवर एनसीआरटी पाठ्यपुस्तके तयार करीत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यात इयत्ता पहिली व दुसरीसाठी नवीन पाठ्यपुस्तके येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यासाठी शासनाने कार्यवाही करणे, सदर अभ्यासक्रम आराखडा आहे तसाच लागू करणार किंवा कसे, एनसीआरटी आणि बालभारती मिळून शैक्षणिकदृष्ट्या दर्जेदार पुस्तकासाठी एक अभ्यास समिती असावी असा निर्णय झाला असणे, असे असताना सुद्धा एनसीआरटी व बालभारती पेक्षा एक वेगळी समिती शासनाने नेमण्याची योजना असल्याचे निदर्शनास येणे, यामुळे शासनाची नेमकी भूमिका व केंद्र सरकारप्रमाणे शिक्षक हस्तपुस्तिका तयार केली त्याच धर्तीवर शिक्षक हस्तपुस्तिका तयार करून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. "

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे-

१) उद्योग मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १ - मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

उपरोक्त विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीतील श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांचा पहिला प्रस्ताव आणि सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज पाटील, वि.प.स. यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. एकनाथराव खडसे
२) श्री. प्रवीण दरेकर
३) डॉ. मनिषा कायंदे
४) श्री. अभिजीत वंजारी
५) श्री. सुरेश धस
६) श्री. महादेव जानकर

उद्योग मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १ संमत झाले.

२) ग्राम विकास व पंचायत राज मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ विधेयक मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

उपरोक्त विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधीतील श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांचा पहिला प्रस्ताव आणि सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजित वंजारी, वि.प.स. यांचे प्रस्ताव मांडण्यात आले नाहीत.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. सुरेश धस २) श्री. एकनाथराव खडसे

ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेला उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्याचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक २ संमत झाले.

**७.** माननीय उप सभापतींनी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेची कार्यपद्धती विषद केली. अर्थसंकल्पावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, “ ओशिवरा, मुंबई येथे लागलेली आग व त्यात ७००-८०० दुकाने आगीच्या भक्ष्यस्थानी पडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणे,” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून १२ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३**

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात **सकाळी १०.००** वाजता **माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे** यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेता) (२) श्री. प्रवीण दरेकर (भाषण अपूर्ण..

( चर्चा अपूर्ण )

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सर्वश्री कपिल पाटील, अभिजीत वंजारी व विक्रम काळे वि.प.स. यांनी, " जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी व शिक्षक यांच्या समन्वय समितीने पुकारलेला बेमुदत संप " इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम २८९ अन्वयेच्या सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. परंतु उक्त सूचना नियम २८९ ची कशी होऊ शकते यावर थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सर्वश्री कपिल पाटील, अभिजीत वंजारी व विक्रम काळे, वि.प.स. आणि अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेते) यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले मत मांडले.

सूचनेतील विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे ही सूचना अमान्य करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**१. (क)** (१) (एक) तारांकित प्रश्न (चर्चा अपूर्ण)

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय एकाच वेळी बोलत असतात.)

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून २५ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**१. (क)** (१) (दोन) तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली. (चर्चा अपूर्ण)

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " जुन्या पेन्शनकरिता कर्मचाऱ्यांनी पुकारलेला राज्यव्यापी संप " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

संसदीय कार्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**१. (क)** (१) (पाच) तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणतीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

ग्राम विकास मंत्र्यांनी, न्हावे ग्रुप ग्रामपंचायत (ता.रोहा, जि.रायगड) हद्दीतील न्हावे-गडबल रस्त्यावरील पूलाची दुरुस्ती करण्याबाबत" या विषयावरील श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १२२१२ ला दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) संसदीय कार्ये मंत्र्यांनी, (क) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा चौपन्नावा वार्षिक अहवाल, (ख) महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ मर्यादित, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) महिला व बालविकास मंत्र्यांनी, महिला आर्थिक विकास महामंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सत्तेचाळीसावा वार्षिक अहवाल अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** आज मंगळवार, दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**४.** आज मंगळवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविलेली सर्व नियम ९३ अन्वये सूचनेची निवेदने उद्या घेण्यात येतील तसेच आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत व आज माननीय विरोधी पक्ष नेते श्री. अंबादास दानवे यांनी नियम २८९ अन्वयेच्या सूचना दिली असून सदर सूचना उद्या देण्याबाबत त्यांना सांगण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(२) श्री. प्रवीण दरेकर (भाषण पूर्ण) (चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी १ वाजून ५९ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ४५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३) श्री. जयंत प्र. पाटील (४) श्री. प्रसाद लाड

(५) श्री. महादेव जानकर (६) श्रीमती उमा खापरे

(७) ॲड. निरंजन डावखरे (८) श्री. गोपिचंद पडळकर (भाषण अपूर्ण.)

( चर्चा अपूर्ण)

**५. पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी,** सन २०२३ चे वि.स. वि. क्रमांक ८– अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. अंबादास दानवे आणि डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री. अभिजित वंजारी, राजेश राठोड सतेज ऊर्फ बंटी डी पाटील यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते १३ (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(८) श्री. गोपिचंद पडळकर (भाषण पूर्ण) (९) श्री. सुरेश धस

(१०) ॲड. निलय नाईक (भाषण अपूर्ण)

( चर्चा अपूर्ण )

सभागृहाची बैठक संध्याकाळी ६ वाजून १ मिनिटांनी, बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## बुधवार, दिनांक १५ मार्च, २०२३

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १०.०० वाजता माननीय तालिका सभापती श्री. नरेंद्र दराडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

ॲड. निलय नाईक, वि.प.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले.

१) श्री. एकनाथराव खडसे २) श्री. भाई जगताप (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी दुपारी १२ .०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पंचावन्न प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, (क) महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाचे सन २०२१-२०२२ या वर्षाचे वार्षिक लेखे सभागृहासमोर आणि (ख) महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग यांचा सन २०१८-२०१९, २०१९-२०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अठरावा, एकोणीसावा व वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) खनिकर्म मंत्र्यांनी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान वर्धा, अकोला, सातारा, चंद्रपूर, अमरावती, ठाणे, यवतमाळ, मुंबई उपनगर, रत्नागिरी, कोल्हापूर तसेच प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना जिल्हा खनिज प्रतिष्ठान, सांगली या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) खनिकर्म मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०१९-२०२० या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी, महाराष्ट्र एचआयव्ही व एड्स (लोकपाल व कायदेशीर कार्यवाही) नियम, २०२२ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एनिका-२०१८ /प्र.क्र.१३३ / कु.क., दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ सभागृहासमोर ठेवली.

**३.** माननीय उपसभापतींनी, आज दिनांक १५ मार्च, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य केलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येत असल्याचे सांगितले.

माननीय उप सभापतींनी, सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांची आजच्या कामकाज पत्रिकेतील तीन (ख) वरील अनुक्रमांक १ व ६ वर नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे अनुक्रमांक २ वर नियम ९३ अन्वये सूचनेचे निवेदन आहे. त्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्री सदनामध्ये निवेदन करणार आहेत. परंतु आज त्यांना सदनामध्ये उपस्थित राहणे शक्य नाही. त्यामुळे सदर नियम ९३ अन्वयेच्या सूचनांवरील निवेदने पुढे ढकलण्यात येत आहे असे सांगितले.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " गोरेगाव (मुंबई) येथील एम.ए.इंग्लिश स्कूल या शाळेच्या व्यवस्थापनाने पालक व विद्यार्थ्यांची केलेली फसवणूक " इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी, " राजुरा व कोरपना (जि.चंद्रपूर) तालुक्यातील आदिवासी व इतर शेतकऱ्यांच्या शेतजमिनींच्या भूसंपादनावेळी शासन व अंबुजा सिमेंट कंपनी याच्यात झालेल्या करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन होत नसणे " इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, " खोडाळा तळयाची वाडी, ता.मोखाडा येथील गर्भवती महिलेस प्रसुतीसाठी वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे तिच्या नवजात बालकाचा झालेला मृत्यू " इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " राज्याच्या कृषीमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांबाबत केलेले वादग्रस्त विधान " या विषयाच्या संदर्भात नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून त्याबाबत संबंधितांनी स्पष्टीकरण द्यावे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(२) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " सांगली जिल्हयातील कृष्णा आणि वारणा नद्यांमध्ये नदीकाठावरील अनेक उद्योग-कारखान्यातून घातक रसायनयुक्त सांडपाणी सोडल्यामुळे झालेले परिणाम " इ.बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून यावर शासनाने निवेदन करावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री. सुनील शिंदे, वि.प.स.यांनी, " मालाडच्या आप्पा पाडा परिसरात लागलेल्या आगीत शैक्षणिक साहित्याची राख-रांगोळी झालेल्या दहावी-बारावीच्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळावा. " इ. बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असल्याचे सांगून सन्माननीय सदस्यांनी याबाबतच्या लेखी सूचना शासनाकडे द्याव्यात तसेच आपण देखील शासनाकडे एक लेखी निवेदन देणार आहोत, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(४) श्री. कपिल पाटील, वि.प.स. आणि श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " राज्यातील शासकीय नोकऱ्यांचे खाजगीकरण करण्याबाबतचा निर्णय मागे घेण्यात यावा " या विषयासंदर्भात नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी थोडक्यात त्यांचे म्हणणे मांडावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(५) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " मुंबई प्रभादेवीमध्ये सन २०२२ रोजी गणेश विसर्जनाच्या वेळी घटनास्थळावरून लोकप्रतिनिधीची बंदूक जप्त केल्याबाबत " म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून, त्यावर त्यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

यासंबंधी शासनाने निवेदन करावे, असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स.यांनी, वनक्षेत्रातील हजारो शेतकरी, आदिवासी वनपट्टा या मागणीसाठी काढण्यात आलेल्या मोर्चात गेल्या दोन दिवसांपासून नाशिक पासून मुंबई येथे पायी येत असणे.' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला व आपले म्हणणे मांडले.

सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून ४८ मिनिटांनी दुपारी ०२ वाजून ४५ मिनिटांपर्यंत मध्यांतरासाठी स्थगित झाली.

मध्यांतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ४५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**४.** (१) सर्वश्री रमेशदादा पाटील आणि इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" राज्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप देऊन संशोधनास चालना देते परंतु संपूर्ण महाराष्ट्रातून केवळ दोनशे विद्यार्थ्यांची निवड करण्यात येत असणे, सारथी व महाज्योती या संस्थांनी येथील अर्जदारांना सरसकट फेलोशिप मंजूर केल्या जातात त्याप्रमाणे बार्टी संस्थांमध्येही सरसकट फेलोशिप सुरू करण्याची

मागणी विद्यार्थी करीत असणे, त्यासाठी बार्टीतील विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊन मागणी करणे, या मागण्यांवर तात्काळ कारवाई करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संविधानिक हक्काचे रक्षण करावे अशी मागणी सर्वत्र होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

सामाजिक न्याय मंत्र्यांनी निवेदन केले

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ देशामध्ये मागील ५ ते ६ वर्षात बेरोजगारीचे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, तसेच महाराष्ट्र राज्यातसुध्दा हे प्रमाण मोठया प्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, यामुळे राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसें-दिवस मोठया प्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, नोकरी नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, यामुळे अनेक तरुण गुन्हेगारीकडे वळले जात असल्याचे आढळून येणे, यामुळे तरुण पिढी उदध्वस्त होत असल्याचे आढळून येणे, यामुळे पालकांमध्ये चिंतेचे व भितीचे वातावरण निर्माण होणे, राज्यातील पदवीधर बेरोजगारांना इतर कोणतीही नोकरी मिळत नाही तोपर्यंत या पदवीधर बेरोजगारांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दरमहा ५ हजार रुपये मानधन म्हणून देण्यात यावे अशी लोकप्रतिनिधी यांनी वारंवार संबंधितांकडे मागणी करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

लक्षवेधी सूचना अनुक्रमांक ५ संबंधीचे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

(३) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मदत व पुनर्वसन मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ खुलताबाद तालुक्यातील वेरुळ परिसरातील तलाववाडी शिवारात १३३ एकर क्षेत्रात शिवकालीन (पुरातन) तलाव असणे, सदर तलाव मागील अनेक वर्षापासून तुडुंब भरत असून तलावाचा सांडावा/चारी बुजल्यामुळे सदर तलाव भरल्यानंतर बॅक वॉटरमुळे मोठया प्रमाणावर पाणी साचत असून शेतकऱ्यांचे नुकसान होत असणे, बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पसरत असून किमान ५० शेतकऱ्यांचे २०० एकर क्षेत्र बाधित होत असणे, बाधित जमिनीचे भूसंपादन करण्यासाठी शेतकरी मागील १०

वर्षापासून शासन दरबारी प्रयत्न करीत असणे, उप विभागीय अधिकारी महसूल, तहसिलदार खुलताबाद व उप विभागीय जलसंधारण अधिकारी (ल.पा.) जिल्हा परिषद उप पविभाग, कन्नड यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी स्थळ पाहणी करून तलावाचे एफटीएल (पूर्ण पाणी पातळी) निश्चित करून बाधित क्षेत्राचे भूसंपादन प्रस्तावित करण्यासाठी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना त्याच दिवशी अहवाल सादर केलेला असणे, परंतु त्यावर अद्याप काहीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, डमडम तलावाची एफटीएल (पूर्ण पाणी पातळी) निश्चित करून बाधित क्षेत्राचे भूसंपादन करण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. अरूण लाड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संयुक्त गट-ब व गट-क संवर्गातील ८१६९ विविध पदांसाठी जानेवारी, २०२३ मध्ये जाहिरात प्रसिध्द करणे, लिपिक-टंकलेखक संवर्गातील सुमारे ७०३४ पदांसाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्ज करतांना एका विभागाची किंवा सर्व विभागांची उमेदवार निवड करू शकतील असा नियम घेण्यात येणे, त्यामुळे उमेदवार नोकरी मिळविण्यासाठी अधिकाधिक विभागाची निवड करणार असणे, पूर्वपरीक्षा जरी एक होणार असली तरी विभागानुसार गुणवत्ता यादीत जाहीर करण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतल्यामुळे मुख्य परीक्षेला अनेक विद्यार्थी अपात्र ठरण्याची भीती व्यक्त करण्यात येत असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विभागवार गुणवत्ता यादीच्या अटीत बदल करण्याची उमेदवारांकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. ”

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. शंभुराज देसाई , वि.प.स. व ॲड. अनिल परब, वि.प.स. हे सभागृहात उपस्थित नसल्यामुळे संबंधितांच्या लक्षवेधी सूचना क्रमांक ८ व ५ पुढे ढकलण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**५.** (१) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.यांनी, “ महाराष्ट्र राज्य अनुसूचित-जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची पदे दोन महिन्यांपासून रिक्त असल्यामुळे एक हजार प्रकरणे सुनावणीसाठीची प्रलंबित असणे ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(२) श्री. सुनील शिंदे, वि.प.स.यांनी, " वसई – विरार महानगरपालिकेकडे एकही नेत्र रुग्णालय नसणे " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(३) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.यांनी, " अकोला जिल्ह्यात महानगरपालिका क्षेत्रात इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या सर्व शाळांमध्ये गेल्या १५ ते २० वर्षांपासून शालेय पोषण आहार अंतर्गत दुपारचे सकस भोजन तयार करून मुलांना खाऊ घालण्याचे काम नियमितपणे स्थानिक विधवा, गरीब, निराधार, गरजू व घटस्फोटीत महिलांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण होणे " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(४) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स.यांनी, " नागपूर येथील शासकीय वैदयकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या मेडिकल बालरोग विभागातील नवजात शिशु अतिदक्षता विभागात उपचारांसाठी अद्यावत उपकरणे उपलब्ध करणे " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(५) श्रीमती उमा खापरे, वि.प.स.यांनी, " राज्यात बारावीच्या पहिल्याच इंग्रजीच्या पेपरमध्ये राज्य शिक्षण मंडळाकडून झालेल्या चुकांच्या पार्श्वभूमीवररपरीक्षा देणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मंडळाच्या झालेल्या चुकीची सरसकट ६ गुण देण्याची मागणी शिक्षक आणि पालकांकडून होत असणे " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.यांनी, " रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात २२ जुलै, २०२१ रोजी अतिवृष्टी व नैसर्गिक प्रकोपात महाडमधील दुर्गम भागात असलेल्या तळीये गावावर दरड कोसळल्यामुळे सदरहू गावातील ग्रामस्थांना हक्काचे घर तात्काळ देणे, " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(७) श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.यांनी, " बुलढाणा जिल्ह्यातील ताराखेड येथील रमेश आंबेकर यांचे मासरुळ शिवारामधील घर व गोठा रात्रीच्या वेळी मासरुळ येथील ९ लोकांनी दि.१२ जून, २०१९ रोजी जाळून टाकल्याने रमेश आंबेकर यांचे लाखो रूपयांचे नुकसान होणे. " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

माननीय उप सभापतींनी पुढील अभिनंदनपर प्रस्ताव मांडला.

" नुकताच जागतिक स्तरावरील सुविख्यात ऑस्कर पारितोषिक सोहळा संपन्न झाला आणि " RRR " या चित्रपटातील " नाटू नाटू " या नेपथ्य गीताचे गीतकार श्री. चंद्रा बोस असून श्री. एम. एम. किरवाणी यांनी संगीत दिले आहे. तसेच श्री. राहुल सिपलीगंज व श्री. कालभैरव यांनी हे गीत गायले आहे. या गाण्याची आवृत्ती १० नोव्हेंबर, २०२१ रोजी प्रदर्शित झाली होती. लॉस एंजिलिस अमेरिका येथे हा ऑस्कर पुरस्कार त्यांना दि. १२ मार्च, २०२३ रोजी जाहीर करण्यात आलेला आहे.मी सभागृहाच्या वतीने या चित्रपटाचे लेखक, गीतकार, चित्रपटातील दिग्दर्शक यांचे अभिनंदन करते. हे तेलगू भाषिक पहिले गीत आहे की, ज्याला ऑस्कर पुरस्कार मिळाला आहे.

तसेच दुसरी बाब अशी की, " The Elephant Whisperers " या लघु माहितीपटासाठी सुद्धा ऑस्करपुरस्कार जाहीर झाला आहे. त्यामध्ये Netflix वरील या डॉक्युमेंटरीची निर्मिती अचित जैन यांनी केली आहे, तर दिग्दर्शन कार्तिकी गोन्सालवीस व गुनीत मोंगा यांनी केले आहे. तामिळनाडूच्या मुदुमिलिया टायगर रिझर्व्हमधील हत्तींच्या निरीक्षणातील ही जन्मकथा आहे. महिला दिग्दर्शिका कार्तिकी गोन्सालवीस यांनी भारतमातेस हा पुरस्कार अर्पण केला आहे.

प्रस्ताव एकमताने संमत झाला.

(५) ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत सॅनिटरी नॅपकिन मशीन बसविण्यासाठी काढलेल्या निविदेमध्ये ४२ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ च्या अंतिम आठवड्यात उघडकीस येणे, मुंबई महापालिका हद्दीत ५००० सार्वजनिक स्वच्छतागृहे व एकूण टॉयलेट्स ब्लॉकची संख्या देखील ५००० नसताना एकूण ५००० मशिन्स बसविण्यासाठी निविदा काढणे, सदर निविदेसाठी रियलझेस्ट वेंडकॉन, किरवॉन वेंडसोल व पीआर एंटरप्राईजेस या कंपन्यांनी माहे डिसेंबर २०२२ मध्ये निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होणे व त्याच महिन्यात सदर तिन्ही कंपन्यांना मुंबई महापालिकेकडून वेंडर आयडी उपलब्ध होणे, सदर निविदा प्रक्रियेत केवळ नमूद तीनच कंपन्यांनी सहभागी होणे, ४०००० रुपये बाजारमूल्य असताना महापालिका सदर मशीन्स ७०००० रुपयांना खरेदी करीत असणे, निविदेमध्ये सॅनिटरी नॅपकिन मशीन बसविण्यासाठी जागा निश्चिती बाबत कोणतीही स्पष्टता नसणे, वापरलेल्या सॅनिटरी नॅपकिनची विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनरेटरस पुरविण्याबाबत अस्पष्टता असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये व विशेषकरून महिला वर्गामध्ये असंतोष निर्माण होणे, त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती निर्माण झाल्याने माननीय उप सभापतींनी सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी स्थगित केली.

सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून ४३ मिनिटांनी ५ मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून ४८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात गोंधळसदृश परिस्थिती कायम असल्याने माननीय तालिका सभापतींनी सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित केली.

सभागृहाची  बैठक सायंकाळी ०४  वाजून ४९ मिनिटांनी १० मिनिटांकरिता स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ०४ वाजून ५९ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**६.** (१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.विधेयक क्रमांक -३ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आणि महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ (सुधारणा) विधेयक,२०२३ यावा  असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील यांचा प्रस्ताव  मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक ३  संमत झाले.

**७.** सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी भाषण पूर्ण केले.

३) श्री. सचिन अहिर

४) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील

५) डॉ. प्रज्ञा सातव

६) श्री. अमोल मिटकरी

७) श्री. सुधाकर अडबाले

८)श्री. नरेंद्र दराडे

९) श्री. रामदास आंबटकर

१०) श्री. अभिजीत वंजारी (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक रात्रौ ८.०० वाजता गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## गुरुवार, दिनांक १६ मार्च, २०२३

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधान परिषदेच्या सभागृहात सकाळी १०.०० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा पुढे सुरू झाली.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले –

(२) डॉ. मनिषा कायंदे (३) श्री. अनिकेत तटकरे

(४) श्री. प्रवीण दटके (५) श्री. किरण सरनाईक (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

(१) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, " विधिमंडळ आणि विधिमंडळाच्या परिसरात आयोजित केले जाणारे कार्यक्रम किंवा निर्णय हे माननीय सभापती आणि माननीय अध्यक्षांनी संयुक्तरित्या घेण्याची तसेच माननीय उप सभापतींना माननीय सभापतींचे अधिकार देण्याची आवश्यकता " इ.बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री. जयंत प्र.पाटील, श्री. कपिल पाटील, श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. तसेच श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले मत व्यक्त केले.

संसदीय कार्य मंत्र्यांनी यासंदर्भात खुलासा केला.

माननीय उप सभापतींनी उपरोक्त मुद्यासंदर्भात आपले मत व्यक्त केले.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी याबाबत आपले मत व्यक्त केले.

**१. (१)** आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

**(२)** आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील एकोणतीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२. पाणी पुरवठा व स्वच्छता (मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी, (१)** महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्यादित, पुणे यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा सोळावा वार्षिक अहवाल तसेच **(२)** महाराष्ट्र

राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा सतरावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

माननीय उप सभापतींनी, गुरूवार, दिनांक १६ मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले असल्याचे घोषित केले.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना क्रमांक १ ते लक्षवेधी सूचना ७ नंतर घेण्यात येतील असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**३. (१) श्री. सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, वि.प.स.** यांची लक्षवेधी सूचना –

श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधले -

“ केंद्र शासनाचा २००९-१० पासून सुरू असलेला राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम ” जलजीवन मिशनमध्ये समाविष्ट केला असणे, हे मिशन राज्यात राबविण्यासाठी राज्य शासनाने दिनांक ४ सप्टेंबर, २०२० रोजी मार्गदर्शक सूचना जारी करणे, या मार्गदर्शक सूचनामध्ये ही योजना राबविण्यासाठी या योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या १० टक्के व डोंगराळ/वन भागामध्ये किमान ५ टक्के अशी लोकवर्गणी गोळा करणे अनिवार्य केले असणे, परंतु ही अट जाचक असणे, काही ग्रामपंचायतींचे उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित असल्याने ही योजना राबविणे शक्य नसणे, तसेच या क्षेत्रातील लोकांची ऐपत नसल्याने लोकवर्गणी गोळा करणे शक्य होत नसणे, व सदरील योजना अपूर्ण अवस्थेत राहण्याचा धोका असणे, त्यामुळे ही योजना यशस्वी करावयाची झाल्यास सदरील १० टक्के व ५ टक्के लोकवर्गणी करावयाची जाचक अट शासनाने रद्द करून ही योजना १०० टक्के राज्य शासन पुरस्कृत करावी, अशी मागणी राज्यातून होत असणे, परंतु त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया.”

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधले -

“ तारापूर औद्योगिक क्षेत्रातील अनेक कारखान्यांकडून रासायनिक पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता नाल्यामध्ये, जमिनीमध्ये बोअरवेल खोदून तसेच टँकरद्वारे इतर ठिकाणी सोडण्यात येणारे प्रदूषित

पाणी, त्यामुळे नाल्याचे व विहिरींचे पाणी प्रदूषित होऊन पर्यावरणास पोहोचलेली हानी, नाल्याचे पाणी पिऊन गत तीन महिन्यांत अनेक जनावरांचा झालेला मृत्यू, नाल्याचे पाणी प्रदूषित असल्यामुळे व जमिनीमध्ये बोअरवेल खोदून रासायनिक द्रव्य त्यामध्ये सोडल्याने त्याचे पाझर होऊन विहिरींचे प्रदूषित झालेले पाणी त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, यासंदर्भात बजाज हेल्थ केअर कंपनीने मागील दोन वर्षांपासून गुप्तपणे चार इंचाची पाईप लाईन टाकून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ड्रेनेजच्या बाजूला खड्डा खोदून त्यामध्ये प्रती दिन २० ते ३० हजार लिटर सोडत असलेले रासायनिक द्रव्य, तसेच याच कंपनीच्या इतर कारखान्यात देखील उक्त औद्योगिक परिसरात पर्यावरणाच्या नियमांचे होत असलेले उल्लंघन, या संदर्भात उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ, तारापूर यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही जाणीवपूर्वक करीत असलेले दुर्लक्ष, पर्यावरण विभाग व कारखान्याचे अधिकारी यांच्यात होत असलेले संगनमत, उक्त प्रकरणी पर्यावरण कायद्याअंतर्गत कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

शालेय शिक्षण (मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(३) श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांचे** लक्ष वेधले -

“राज्यातील सरपंच/उप सरपंच यांच्या मानधन वाढीची घोषणा माहे जुलै, २०१९ रोजीच्या आसपास होऊनही त्यांना ते वाढीव मानधन न मिळणे, सद्यःस्थितीला मिळणारे मानधन वेळेवर न मिळता मानधन मिळण्याची प्रक्रिया किचकट असणे, मानधन मिळवण्यासाठी दर महिन्याला ऑपरेटरद्वारे पंचायत समितीनंतर जिल्हा परिषदेद्वारे राज्य सरकारकडे माहिती आल्यानंतर बँकेत यादी सादर होणे, त्यापेक्षा गट विकास अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करून सरपंच/उप सरपंच यांच्या मानधन वाटपाची कारवाई करणे, नवी मुंबई येथे सरपंच भवनाची निर्मिती करणे, सरपंचांना ओळखपत्र आधारे शासकीय कार्यालयांमध्ये प्रवेश देणे, ग्रामपंचायतीचे खाते ICICI बँके पेक्षा IPPB (Indian Postal Payment Bank) मध्ये असणे व त्याद्वारे मानधन मिळणे, पंधराव्या वित्त आयोगातून पथ दिवे अथवा कोणत्याही वीज बिलाची रक्कम अदा केली जाऊ नये, पंतप्रधान आवास योजनेद्वारे शहरी भागात मिळणारी रक्कम ग्रामीण भागातही सारखीच असावी, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.”

ग्राम विकास व पंचायत राज मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(४)** श्री. प्रवीण दटके, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील ४ एकर क्षेत्रात राज्य सरकारने कॅन्सर हॉस्पिटल व रिसर्च सेंटरकरिता १०० बेडचे हॉस्पिटल मंजूर होऊन देखील अद्याप काम सुरू झालेले नसणे, सदर कॅन्सर हॉस्पिटलचे काम सुरू होण्यासंदर्भात दिनांक ११/४/२०१८ चे पूरक विवरण क्रमांक १९६ नुसार लोकप्रतिनिधींनी दिनांक २१/१२/२०२२ रोजी पाठपुरावा केलेला असणे, या संदर्भात तत्कालीन वित्तमंत्री यांनी मशीन खरेदी करिता रुपये २० कोटी पुरवणी मागणीतून मंजूर केलेले असणे, कॅन्सर हॉस्पिटलसाठी आर्किटेक्ट नेमला असणे, सदर कामाचे ड्रॉईंग व इतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झालेली असणे, कोरोना कालावधीत काम थांबल्याने हाफकीनने पैसे परत पाठवले असणे, तसेच एनआयटी मार्फतही प्रक्रिया पूर्ण न झाल्याने सदर काम प्रलंबित असणे, तरी रुग्णांच्या सोयीने अत्यंत महत्त्वाचे असणारे कॅन्सर हॉस्पिटल व रिसर्च सेंटर तातडीने पूर्ण होण्यासाठी तातडीने आदेश देऊन काम सुरू करण्याचे आदेश देण्यात यावेत याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(५) श्री. कपिल पाटील, वि.प.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधले -

"राज्यभरातील शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांना ३१ मार्चपूर्वी मूल्यांकन करून घेणे किंवा त्या संदर्भातील प्रारंभिक नोंदणी करणे संचालनालयाने बंधनकारक केले असणे, संस्था व महाविद्यालयांनी ही प्रक्रिया मुदतीत पूर्ण करणार नाहीत, त्या संस्था आणि महाविद्यालयावर संलग्नीकरण रद्द करण्याची कारवाई करून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश थांबविण्यात येणे, त्यांना नो ॲडमिशन संवर्गात वर्ग करण्यात येईल असा प्रस्ताव सादर करण्यात येईल असा सूचना वजा इशारा संचालनालयाने दिला असणे, कोविड काळात केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या निर्देशानुसार पालक आणि विद्यार्थ्यांना फी मधील सवलत, मुदतवाढ आणि टप्या-टप्याने पैसे भरण्याच्या सूचना सर्व शैक्षणिक संस्थांना देण्यात आल्या असणे, त्यामुळे शैक्षणिक संस्थांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असणे, फीची थकबाकी असताना विद्यापीठांनी सर्व महाविद्यालयांकडून १०० टक्के विद्यापीठाचा भाग आणि परीक्षा फी वसूल केली असणे, NAAC ला सुमारे २,७५,०००/- अधिक जीएसटी भरावे लागणार असणे, शासनाने पगारा व्यतिरिक्त वेतनेतर अनुदान दिलेले नसणे, सन २००८ पासून आकारण्यात येणारी फी बदलेली नसून तीच ठेवली असणे, सरकारने सर्वांना NAAC मान्यता आवश्यक करून संस्था आणि महाविद्यालयांची आर्थिक कोंडी केली असणे, मात्र NAAC मूल्यांकनाच्या कारभारात अनेक त्रुटी असून या कारभाराची

उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, तेथील कारभारात अनागोंदी, गैरप्रकार लक्षात असल्यामुळे युजीसीचे उपाध्यक्ष यांनी NAAC चे कार्यकारी अध्यक्षपदाचा राजीनामा देऊन NAAC समितीच्या राष्ट्रीय स्तरावरील चौकशीची मागणी केली असणे, शासकीय महाविद्यालये किंवा संस्थांच्या बाबतीत त्यांना मिळणारे अनुदान रद्द करण्याचा प्रस्तावामुळे राज्यातील संस्था आणि महाविद्यालयातील संचालकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोषष आणि संताप, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही."

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**(६) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक भागात आरक्षण समर्थनार्थ दीर्घ काळापासून सुरू झालेली तीव्र स्वरुपाची आंदोलने, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरू असणे, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती स्फोटक होण्याचा निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरू रहावी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाप्रमाणे मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी ३ वाजून ३५ मिनिटांनी स्थगित झाली.
मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून ३० मिनिटांनी, ५ मिनिटांकरीता स्थगित झाली.
स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून ३५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

(२) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी, "जळगाव शहरात बीजे मार्केटसमोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भगवान गौतम बुध्दांची प्रतिमा व मुर्ती समाजकंटकांकडून काढण्यात येणे " इ.बाबत माहिती विषयक मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने दखल घ्यावी असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

याबाबत माहिती घेऊन निवेदन केले जाईल व निवेदनातील वस्तुस्थितीवर आधारित त्यासंबंधीचे निर्णय केला जाईल असे सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी सांगितले.

श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, " जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे यांच्यावर कारवाई करणे " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात शासनाने नोंद घेतली असल्याचे सांस्कृतिक मंत्र्यांनी सांगितले.

श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, " सुरक्षा रक्षक मंडळावरील नियुक्त्या " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

सदर तत्सम बाबी तपासून शासनामार्फत निर्णय घेण्यात येईल असे कामगार मंत्र्यांनी सांगितले.

(१) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, " प्रिस्क्रीप्शन आवश्यक असलेल्या औषधांची ऑनलाईन विक्री " इ.बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भातील माहिती घेऊन काही चुकीचे आढळल्यास शासन यावर कडक निर्बंध आणेल असे सांस्कृतिक मंत्र्यांनी सांगितले.

**४. श्री. अंबादास दानवे, ॲड. अनिल परब, डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी पुढील विषयावर म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले -

" मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतलेला असणे, उक्त कार्यक्रमाअंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी ७५ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देऊनही सदरहू निधी विनावापर पडून असणे, तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन/रुपरेषा निश्चित करण्यासाठी महाविकास आघाडीच्या सरकारने घटित केलेली मंत्रिमंडळ उपसमिती बरखास्त करून नवीन मंत्रिमंडळ उपसमिती पुनर्घटित करण्यात आली असणे, परंतु उक्त समितीचे काम अद्याप सुरू नसणे, त्यामुळे मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याबाबत शासनाची उदासिनता दिसून येणे, परिणामी मराठवाड्यातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करून मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरा करून त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. एकनाथराव खडसे (२) श्री. विक्रम काळे

(३) श्री. गोपिचंद पडळकर

उपरोक्त अल्पकालीन चर्चेस सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी उत्तर दिले.

अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले-

(६) श्री. श्रीकांत भारतीय (७) श्री. सुनील शिंदे

(८) श्री. अरूण लाड (९) श्री. राजहंस सिंह

(९) श्री. सत्यजित तांबे (१०) श्री. रमेशदादा पाटील

(११) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक रात्री ८ वाजून २८ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३**

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १०-०० वाजता माननीय तालिका सभापती श्री. नरेंद्र दराडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

लक्षवेधी सूचना (म.वि.स. १०१ अन्वये) -

१) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ महाराष्ट्र व मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार, नगरपालिका कार्यपध्दती नियमांद्वारे परिषद व समितीच्या बैठकीत रचनात्मक चर्चा व विचारविनिमय सुनिश्चित करण्यासाठी सभा घेण्याबाबतचे तपशील व कार्यपध्दती नमूद केल्या असणे, एमसीजीएमच्या सर्वपरिषद व समितीच्या बैठकीत एमसीजीएमचा सविस्तर महानगरपालिका कार्यपध्दतीविषयक नियम व विनियम (Bye-Laws) अनुसरण होत असणे,

राज्यातील अन्य २६ नगरपालिकांमध्ये नगरपालिकांची कार्यपध्दती केली जाणे व त्याआधारे मनपा कार्यपध्दती नियम तयार व मंजूर केले जाणे, परंतु त्यामध्येच अनेक त्रुटी असणे, त्यामुळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यपद्धती नियमांना मान्यता न मिळाल्यास अन्य २६ नगरपालिकांमध्ये योग्य चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी राज्य शासन महानगरपालिका कार्यपध्दती नियमावलीचा मसुदा तयार करण्यास मान्यता द्यावी, अशी मागणी जनतेतून होत असणे, परंतु त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ अलिबाग शहरातील (जि. रायगड) गोविंद बंदर येथील डंपिंग ग्राऊंडवर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री ११ च्या सुमारास लागलेल्या आगीमुळे शहरामधील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरणे, डंपिंग ग्राऊंडमधील कचऱ्याला वारंवार आग लावली जात असल्याने या परिसरामध्ये धुराचे साम्राज्य पसरून प्रचंड प्रदूषण होत असणे, वयोवृद्ध आणि बालकांचे आरोग्य धोक्यात येत असणे, धुरामुळे नागरिकांना खोकल्याचा त्रास होऊन नागरिकांना भररात्री घराबाहेर यावे लागणे, प्रदूषणामुळे जेष्ठ नागरीकांनीसुध्दा तात्पुरते शहराबाहेर जाण्याचा निर्णय घेणे, डंपिंग ग्राऊंडवर दर १५ ते ३० दिवसांनी अशाचप्रकारे जाणूनबुजून आग लावली जात असल्याने स्थानिक नागरीकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, अलिबाग नगरपालिकेकडून रस्ते सफाई करणे , घरोघरी घंटागाडीद्वारे कचरा संकलन करणे, कचरा डंपिंग ग्राऊंडवर नेऊन टाकणे व मृत जनावरांची विल्हेवाट लावणे, बेणणी काढणे, माती उचलणे इत्यादी कामासाठी रु. ६ कोटी ७३ लाख २४ हजार ७२० इतकी रक्कम कंत्राटदारांना अदा करूनही कचऱ्याची योग्य रितीने विल्हेवाट न लावता आग लावून स्थानिक नागरीकांचे आरोग्य धोक्यात आणले जात असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेली चिडीची भावना, डंपिंग ग्राऊंडवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याचा ठेका घेणाऱ्या ठेकेदारांना कचऱ्याला आग न लावता तो इतर योग्य मार्गाने नष्ट करण्याची तसेच या आगीबाबत सखोल चौकशी करून आग लावणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" परभणी जिल्ह्यातील पाथरी नगर परिषद अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत करून (संस्था क्र.पी.बी.एन.एच.एस.जी/१०४) यांनी सर्वे नं ९/१ आणि ८ गैरमार्गाने ताब्यात घेणे, सदर जागेवर कोणत्याही प्रकारच्या नगर प्रशासनाच्या परवानग्या न घेता अनधिकृत पध्दतीने त्या जागेवर सर्व्हीस रोड व ओपन स्पेसवर व्यापारी संकुल बांधकाम करणे, ले आउट करणे, परवानगी नसणे, सदर इमारतीस बाबा टॉवर नाव देऊन अनधिकृत बांधकाम करून संकुलाचे भाडे व्यापाऱ्याकडून घेणे, सर्व्हीस रोड वर गाळे बांधणे, त्यातील गाळे भाड्याने देणे, गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर वाणिज्य इमारत बांधकाम झाल्यामुळे गृहनिर्माण कायद्याचा भंग होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. सुधाकर अडबाले, वि.प.स. यांनी, " सीटीपीएस चंद्रपूर येथे सुपरवायझरने सफाई कामगार महिलांना जातीवाचक शिवीगाळ करणे, त्यासंदर्भात पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदविल्यानंतर कोणतीही कारवाई न होणे, " इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

सदर घटना गंभीर असून आज सभागृह सुरू असेपर्यंत तपास करून योग्य ती कारवाई करावी, असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

महसूल मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

पुढील लक्षवेधी सूचनेसंदर्भातील मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरिता स्थगित करत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ४० मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सकाळी १० वाजून ५५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

४) श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे पशुसंवर्धन मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" नागपूर जिल्हा परिषदेतील प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत कौशल्य विकास या शीर्षकाखाली रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यात दुग्धविकास व शेळीपालन लाभार्थ्यांकरिता गट वाटप योजना राबविलेली असणे, या योजनेत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतर योजना राबवून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले असणे, याबाबत विभागीय

आयुक्त, नागपूर यांनी १७ नोव्हेंबर, २०२२ ला ग्रामविकास विभागाला आपला स्पष्ट अहवाल सादर केलेला असणे, शासन निर्णय दि. १२ डिसेंबर, २०१७ च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ यांना गायगट व शेळीगट उपलब्ध करून देणेसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण योजनेमधून वगळण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, जिल्हा परिषद द्वारा याबाबत मागणी केली असता महामंडळाने दिनांक २५/५/२०२१ च्या पत्रानुसार रोठा करण्यास असमर्थता दर्शविल्याचे दिसून येत असणे, जिल्हा परिषद नागपूरने थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) करून योजना राबविणेबाबत शासनाचे मार्गदर्शन घेणे स्पष्ट केलेले असतानाही जि.प. नागपूर पशुसंवर्धन विभाग यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही न करता योजना राबवून लाभार्थ्यांची योग्य निवड न करता मर्जीतील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे दिसून येत असणे, तसेच लाभार्थ्याला देय केलेल्या गाय गट व शेळी गट अनेक लाभार्थ्यांना पुरवठा कागदोपत्री दाखवून व जिल्ह्याच्या काही तालुक्यातच वाटप केल्याचे निदर्शनास आले असणे, त्याबाबत जि.प. सदस्य तथा लोकप्रतिनिधी यांनी वारंवार तक्रार करूनही कोणतीही दखल जि.प. प्रशासनाने घेतलेली नसणे, तसेच कोणतीही कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांवर केलेली दिसून येत नसणे, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र अंतर्गत निधीचा गैरवापर करून योग्य लाभार्थ्यांची निवड व योजनेचे निकष न पाळता तथा जि.प. पदाधिकाऱ्याच्या पदाचा गैरवापर करून शासनाच्या निधीचा अपव्यय व भ्रष्टाचार केल्याने तथा यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने शासनाप्रती रोष निर्माण होऊन असंतोषाची भावना तयार होत असणे, तातडीने याबाबत भ्रष्टाचाराची संपूर्ण चौकशी योग्य यंत्रणेमार्फत करून दोषी अधिकारी व जि.प. पदाधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबत शासनाची आवश्यक कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

पशुसंवर्धन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५) श्रीमती उमा खापरे व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ राज्यात सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांनी जीवन संपवले असल्याने अनेक कुटुंबे रस्त्यावर येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, तत्कालीन गृहमंत्री यांनी राज्यातील सावकारी मोडीत काढण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली होती, मात्र आता पुन्हा एकदा सावकारांविरुद्ध पलूस तालुक्यात आणि राज्यात विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना पायबंद घालण्यासाठी आवश्यकता नागरिक व्यक्त करीत असणे, दुधोंडी येथील खाजगी सावकारांवर

कुंडल पोलीस ठाण्यात सावकारीचा गुन्हा दाखल असतानाही पिडीताना धमकावले जात असतानाही शासनाचे दुर्लक्ष होणे, खाजगी सावकारांच्या अत्याचारातून शेतकऱ्याला न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही. ”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ यवतमाळ जिल्हयातील उमरखेड तालुक्यातील टाकळी गावात राहणाऱ्या नागरीकांना जाण्या-येण्यासाठी रस्ता नसल्यामुळे गावातील नागरीकांनी २६ जानेवारी, २०२३ रोजी शांततेने आंदोलन केले असता पोलिसांनी सुमारे ५९ गावकरी महिला व पुरुषांवर गुन्हे दाखल केल्याची बाब उघडकीस येणे, टाकळी येथे राहणाऱ्या ग्रामस्थांनी २३ जानेवारी, २०२३ पासून तहसील कार्यालयासमोर शांततेने उपोषण सुरू करणे, परंतु संबंधित पोलिसांनी ग्रामस्थांशी चर्चा न करता आंदोलन करणाऱ्या पुरुष व महिला ग्रामस्थांवर गुन्हे दाखल केल्यामुळे त्यांच्यात पसरलेले भीतीचे वातावरण, आंदोलकांनी संबंधित एसडीओ, एसडीपीओ या अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता त्यांनी कोणावरही गुन्हे दाखल करण्यात येणार नाही असे आश्वासन देऊन सुध्दा नागरीकांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असणे, शांततेने आंदोलन करणाऱ्या नागरीकांविरुध्द गुन्हे दाखल न करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. ”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण हे पाणी साठवण्याच्या क्षमतेनुसार राज्यातील सर्वात मोठे धरण असून त्याचे क्षेत्रफळ १४८५८ चौ.किमी असणे, धरणाची पाणी साठवण क्षमता ११७ टिएमसी असणे, परंतु उजनी धरणाच्या प्रचंड विस्तारामुळे उजनी धरणात पाण्याबरोबर वाहून येणाऱ्या गाळाचे प्रमाण वाढत असणे, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) सन २००७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार उजनी धरणात १२.७७ टक्के इतका गाळ असणे, सन २०११ साली केंद्रीय जल आयोगाने दिलेल्या आदेशानुसार दिल्लीच्या तेजो विकास इंटरनॅशनल संस्थेने डीजीपीस तंत्रज्ञानानुसार केलेल्या सर्वेक्षणानुसार हे प्रमाण १२.७७ टक्केवरून २७.९४ टक्के पर्यंत गेलेले आढळून येणे, त्यामुळे उजनी धरणाची पाणी

साठवण क्षमता ३२ टिएमसीनी कमी झाल्याचे समोर येणे, दरवर्षी उजनी धरणात ०.४३ टिएमसी गाळ साचत असल्याचे अभ्यासातून समोर येणे, परिणामी गेल्या ११ वर्षात पुन्हा उजनी धरणात आलेला वाळूमिश्रित गाळ लक्षात घेता सद्यःस्थितीत उजनी धरणात सुमारे ३६ टक्के वाळूमिश्रित गाळ असणे, त्यामुळे पाणी साठवण क्षमता ४३ टिएमसीनी कमी झालेली असण्याचा तज्ज्ञांचा अंदाज असणे, दर १० वर्षांनी धरणातील गाळाचा आढावा घेऊन अतिरीक्त गाळ काढणे अपेक्षित असताना गेल्या ४२ वर्षात उजनी धरणातील गाळ काढण्यात आलेला नसणे, राज्य सरकारने २०१७ साली उजनी धरणातील गाळ काढण्यासाठी निविदा प्रसिद्ध करणे, परंतु गाळ काढण्याच्या कामाला अजूनही परवानगी मिळालेली नसणे, परिणामी पाणी साठवण क्षमता कमी झाल्याने सिंचनक्षमता कमी होऊन पाणी वाटपाच्या नियोजनात विस्कळीतपणा येणे, वर्षभरात शेतीसाठीच्या पाण्याची आवर्तने कमी होणे, तसेच पाणीपुरवठा योजनांना उन्हाळ्यात अपुरा पाणीपुरवठा होणे, अलीकडच्या काही वर्षांत धरण परिसर आणि सोलापूर जिल्ह्यात निर्माण होणारी तीव्र अवर्षणस्थिती आणि पाण्याची वाढती मागणी पाहता उजनी धरणाच्या पाणीवाटपावर मर्यादा येत असणे, परिणामी भविष्यात सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची गंभीर स्थिती निर्माण होण्याची शक्यता असणे, यामुळे लाभक्षेत्रातील शेतकरी व नागरीकांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे शासनाने उजनी धरणातील गाळ काढून पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

८) सर्वश्री. सुधाकर अडबाले व इतर वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सुधाकर अडबाले, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ राज्य शासनाने माहे जून, २०२२ मध्ये अधिकारी/कर्मचारी यांचे नियतकालिक बदलीस विनाकारण स्थगिती देणे, त्यानंतरही ही स्थगिती न उठविली जाणे, मागील दोन वर्षापासून बदली प्रक्रिया बंद असणे, विशेषतः जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी नवीन सरकार आल्यानंतर बदली न करणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांत तीव्र असंतोष पसरला असणे, जलसंपदा विभागाच्या नाकर्तेपणामुळे कर्मचाऱ्यांना बदलीस पात्र असूनही एकाच ठिकाणी चार-पाच वर्षे काम करावे लागणे, जलसंपदा विभागातील पदोन्नती प्रक्रियाही रखडलेली असणे, क्षेत्रीय कार्यालयातील महत्वाची पदे रिक्त असणे, तरीही त्याकडे जलसंपदा विभाग दुर्लक्ष करीत असणे, याकरीता तातडीने नियतकालिक बदली प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

९) श्री. राजहंस सिंह, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" मुंबईतील म्हाडा कोंकण गृहनिर्माण मंडळ व मुंबई मंडळ यांच्याकडून शहर आणि ग्रामीण भागासाठी घरांची लॉटरी काढली जाणे, लॉटरी विजेता ठरणाऱ्या प्रत्येक अर्जदारांकडून दक्षिण मुंबईसह महाराष्ट्रातील पंधरा वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला घेण्यात येणे, त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या मराठी माणसांकडून म्हाडाने १५ वर्षाचा (अधिवास) वास्तव्याचा दाखला मागू नये, मराठी माणसांना सदर अटीतून वगळण्यात यावे, अशी मागणी काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून म्हाडाचे उपाध्यक्षांकडे लेखी निवेदनाद्वारे नुकतीच करण्यात येणे, परंतु अद्यापपर्यंत निर्णय न होणे त्यामुळे शासनाने यांची तातडीने दखल घेऊन मराठी माणसांना न्याय देऊन सदर अटीतून वगळण्याची गरज, शासनाने करावयाची कार्यवाही व आवश्यकता. "

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२ वाजता सुरू झाली.

**१.** (१) नऊ तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठरा प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** कृषि मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग यांचे सन २०१८-२०१९ व २०१९-२०२० या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

१) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, " मुंबईतील गिरणी कामगारांचे घर आणि इतर अनेक प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे, त्याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, त्याबाबत त्यांचे आझाद मैदानावर सुरू असलेले आंदोलन, " इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी, नोंद घेतली असल्याचे सांगितले.

२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, वि.प.स. यांनी, " माजी मंत्री श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या मुलीला ठाणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने दिलेली धमकी, " इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी, या प्रकरणाची चौकशी सीआयडीच्या मार्फत करण्याची घोषणा केली.

चौकशी पूर्ण होईपर्यंत प्रतिबंधात्मक कारवाई व्हावी, अशी सूचना माननीय उप सभापतींनी केली.

३) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, “ अलिबाग तालुका व रायगड जिल्ह्यात शंभर परिचारिकांकडून ११ महिन्यांमध्ये तीन कोटी रुपये जमा होणे, ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

मंत्री महोदयांनी याची गंभीर दखल घ्यावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उप मुख्यमंत्र्यांनी, याबाबत तात्काळ चौकशी करून पैसे परत देण्याची व्यवस्था केली जाईल, असे सांगितले.

४) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, “ मुंबई सायन महामार्गावर अनधिकृतपणे आरामदायी गाड्या उभ्या असणे, ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी, याबाबत तात्काळ आदेश दिले जातील, असे सांगितले.

**३.** १) सर्वश्री अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, विक्रम काळे, वि.प.स. यांनी, “ अकोला जिल्ह्यातील पातूर तालुक्यातील अंबाशी येथे राहणाऱ्या टायपिंग इन्स्टीट्यूटच्या विद्यार्थ्यांवर झालेला हल्ला, ” इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उपसभापतींच्या निदेशानुसार उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) सर्वश्री अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे, विक्रम काळे, वि.प.स. यांनी, “ कोल्हापूर जिल्ह्यातील कणेरी मठातील ५२ गायींचा संशयास्पदरित्या झालेला मृत्यू, ” इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उप सभापतींच्या निदेशानुसार उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, “ डोंगारी, तलासरी, जि. पालघर येथे एका दहा वर्षीय. अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिचा गळा दाबून केलेली हत्या, ” इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उप सभापतींच्या निदेशानुसार उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, “ कोरेगाव (जि. सातारा) तालुक्यातील वर्धनगड बोगद्याच्या येथून दाभहरण कुंडाच्या स्कोअर वॉल्वमधून गावांना करण्यात येणारा पाणीपुरवठा पूर्ववत सुरू करणे, ” इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उप सभापतींच्या निदेशानुसार उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, " महागाव तालुक्यातील कलगाव येथील सहायक पोलीस निरीक्षक यांनी तक्रारदारास केलेली मारहाण, " इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उप सभापतींच्या निदेशानुसार उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनी, " नाशिक जिल्ह्यातून शेतकऱ्यांचा आपल्या मागण्यांसाठी निघालेल्या मोर्चाबाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घेण्याची आवश्यकता, " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत नोंद घेतली असल्याचे उद्योग मंत्र्यांनी सांगितले.

५) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, " पुणे-मेट्रोच्या बांधकामातील त्रुटी, " इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उप सभापतींच्या निदेशानुसार उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

६) श्री. आमश्या पाडवी, (सन्माननीय सदस्य श्री. सचिन अहिर यांनी उपस्थित केली) वि.प.स. यांनी, " जुगनी हिरीचापाडा तालुका धडगाव, जिल्हा नंदूरबार येथील महिलेने केलेली आत्महत्या, " इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. उपसभापतींच्या निदेशानुसार महिला व बालविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

१) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" मुंबई महानगरपालिकेने शहरातील विशेष मुलांना आजारात दर्जात्मक सेवा मिळावी, त्यांच्या पालकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर व्हाव्यात तसेच खाजगी आरोग्यसेवेप्रमाणे परवडणाऱ्या दरात सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेकडून अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरू करण्याबाबत सन २०१८ मध्ये घोषणा करण्यात येणे, त्यानुसार सन २०१८ च्या अर्थसंकल्पापासून दरवर्षी १ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद देखील करण्यात येणे, तथापि चार वर्षे उलटून देखील सदर सेंटर अद्याप रुग्णसेवेसाठी कार्यान्वित झालेले नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महापालिकेने विशेष मुलांसाठी एकाच छताखाली सोयीसुविधा मिळण्याचे दृष्टीकोनातून एकूण ३६,००० चौ. फूट क्षेत्रफळाच्या जागेत अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर, नागपाडा बेलासिस रोड या मार्गावर सेंटर उभारण्यात येणे व त्यासाठी भांडवली खर्च ४ कोटी तर महसुली खर्च १० कोटी इतक्या रक्कमेची आर्थिक तरतूद देखील करण्यात

आलेली असणे असे असताना देखील अद्याप अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरू करण्यात न आल्याने ही योजना फक्त कागदावरच आहे की काय असे जनतेमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, त्याप्रकरणी शासनाने चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, परिणामी मुंबईतील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून सदर केंद्र सुरू करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. ”

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी सर्वश्री एकनाथराव खडसे, शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, ‘चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत नोकर भरती करण्यासाठी सहकार मंत्री यांनी दिलेले आदेश‘ या विषयाबाबत मविप नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. वरील विषय आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे ही सूचना अमान्य करीत आहे. तथापि, विषय महत्त्वाचा असल्याने सन्माननीय सदस्यांना दोन मिनिटे बोलण्याची अनुमती देत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, सर्वश्री. एकनाथराव खडसे, जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले मत मांडले.

**४.** १) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, “ गेल्या वर्षी झालेल्या टीईटीच्या परीक्षेचा निकाल अद्याप न लागणे, तसेच विशेष उललेखाच्या सूचना, औचित्याचे मुद्दे यांवर विलंबाने उत्तरे मिळणे, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

२) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, “ महानिर्मितीच्या प्रकल्पांसाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना प्रकल्पामध्ये केवळ प्रशिक्षणार्थी म्हणून ठेवणे, त्यातही प्रशिक्षणार्थीचे लाभही त्यांना न मिळणे, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

३) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, “ मुरुड तालुक्यातील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळाकडून मंजूर कामांऐवजी दुसरीच कामे केली जाणे, या प्रकरणी सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणे, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. जयंत प्र. पाटील. वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

४) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, “ दिनांक १५-१२-२०२२ रोजी खोपटे येथे खाडीमध्ये मोठ्या प्रमाणावर मृत मासे आढळून येणे, सदर घटनेचा मच्छीमारीवर झालेला विपरित परिणाम, शासनाने या मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

५) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, “ पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड मनपा क्षेत्रातील रेड झोनबाबत नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

६) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, ” पदवी परीक्षेच्या शेवटच्या वर्षाच्या पाचव्या सत्राला उपस्थित असलेल्या विद्यार्थ्याची अनुपस्थिती दाखवून विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करणे आवश्यक आहे. त्याची दखल घेण्याचे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

७) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, “ मौजे कुनाडा, ता. भद्रावती, जि. चंद्रपूर या पुनर्वसित गावात महाराष्ट्र विद्युत मंडळाचा ढिसाळ कारभार आणि ऐन परीक्षेच्या वेळी विद्युत पुरवठा खंडीत झाल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होणे, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

८) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, “ एमएमआरडीएद्वारे मुंबईत विकास कामे सुरू असतानाच वाहनधारकांकडून जादा टोल वसुली करण्याचे प्रस्तावीत असणे, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

९) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, “ मुंबई महानगरपालिका ही ज्येष्ठ नागरिकांकरिता धोरण संमत करणारी देशातील पहिली महानगरपालिका असणे, मात्र मागील १० वर्षांपासून राज्य सरकारचे या धोरणाकडे झालेले दुर्लक्ष, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

१०) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, " नागपूर शहरातील गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये काही घरे गरीबांसाठी सवलतीच्या दरात राखीव ठेवणे, " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

११) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " लोकसंख्येच्या तुलनेत ठाणे शहरात केवळ १२ मैदाने उपलब्ध असणे, अपुऱ्या मैदानांमुळे खेळाडूंना सर्व सुविधा मिळत नसल्याने खेळाडू इतरत्र स्थालांतरित होणे, " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

१२) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, " राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी जात प्रमाणपत्र सादर न करणाऱ्या लोकप्रतिनिधींना बजावलेल्या नोटीस, हजारो लोकप्रतिनिधींचे सदस्यत्व रद्द होण्याची निर्माण झालेली शक्यता, जात वैधता पडताळणी समितीला तातडीने निर्देश देऊन प्रलंबित जात वैधता प्रमाणपत्रे निकाल काढण्याची आवश्यकता, " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

१३) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, " येत्या शैक्षणिक वर्षापासून वैद्यकीय अभ्यासक्रम मराठीमध्ये शिकविण्याची झालेली घोषणा, मात्र दिल्लीच्या राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून त्याला अद्याप मान्यता न मिळाल्यामुळे विद्यार्थी - पालकांमध्ये पसरलेली नाराजी, " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

१४) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई म्हणजे महानंदची आर्थिक स्थिती चिंताजनक असून तिला आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्यासाठीची उपाययोजना करण्याची आवश्यकता, " इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

१५) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " अलिबाग तालुक्यातील शेतकऱ्यांनी ७/१२ ची नोंदणी ऑनलाईन पोर्टलवर केल्यावरही भात खरेदी केंद्रांवर त्यांना येणाऱ्या अडचणी, शासनाने भात खरेदी करण्याच्या इष्टांकाची मर्यादा वाढवून देण्याची आवश्यकता तसेच वंचित शेतकऱ्यांना आधारभूत

भात खरेदी योजनेला लाभ मिळण्याची आवश्यकता, ” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांनी, “ आझाद मैदानावर गेल्या ५५ दिवसांपासून १६५ आश्रमशाळेच्या शिक्षकांचे सुरू असलेले आंदोलन, ” इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत दखल घ्यावी, असे माननीय उप सभापतीनी सांगितले.

याबाबत नोंद घेतली असल्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी सांगितले.

मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १७ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजता पुन्हा सुरू झाली.

सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्याने सभागृहाचे कामकाज १० मिनिटांकरिता स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३-०० वाजता स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**५.** सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील चर्चा सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

अर्थसंकल्पावरील चर्चेला शालेय शिक्षण मंत्री यांनी उत्तर दिले. (भाषण अपूर्ण)

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी, “ बोरिवली न्यायालयात एका पोलिसाने वकिलाला केलेल्या मारहाणीमुळे न्यायालयातील कामकाज बंद असणे, ” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सदर बाब उपमुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून सदनामध्ये आवश्यक ते निवेदन केले जाईल, असे सांगितले.

सन २०२३-२०२४ च्या अर्थसंकल्पावरील चर्चेला शालेय शिक्षण मंत्री यांनी उत्तर दिले.

**६.** १) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, “ नागपूर शहरातील उत्तर नागपूर येथील जरिपटका येथील इटारसी पुलाचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे,” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, “ केंद्र शासनाकडून देण्यात येणारे शिष्यवृत्ती परताव्यासह विविध आर्थिक तरतुदी विलंबाने मिळत असल्यामुळे अनेक शैक्षणिक संस्था डबघाईस येणे, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

३) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, “ परिवहन विभागात मागील २-३ वर्षांपासून सहायक मोटार वाहन निरीक्षक या अधिकाऱ्यांची पदोन्नतीची प्रक्रिया स्थगित असणे, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, “ शासकीय महाविद्यालय, अकोला यांच्या बेजबाबदारपणामुळे एका महिलेने केलेली आत्महत्या, संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तत्काळ गुन्हे दाखल करण्याची आवश्कता,” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

४) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, “ वीज देयक न भरल्यामुळे राज्यातील ९२६२ सरकारी शाळांमधील वीज मीटर काढून घेणे, शासनाने थकीत वीज देयकावरील कारवाई तातडीने थांबवून थांबवत सर्व शाळांची वीज जोडणी पूर्ववत करण्याची आवश्यकता, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

५) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, “ अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सेवा विषयक / सेवा निवृत्ती विषयक लाभ मंजूर करण्याबाबत सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची आवश्यकता, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

६) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, “ नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील आदिवासी पाड्यांना मूलभूत सुविधा तत्काळ उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

७) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, “ जळगाव जिल्ह्यातील अंमळनेर तालुक्यातील राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या २१६ ग्रामपंचायत सदस्यांवर दोन वर्षांनंतरही जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने बजावण्यात आलेली अपात्रतेची नोटीस, जात पडताळणी समितीने पावती दिल्यानंतर निश्चित कालावधीत प्रमाणपत्र न दिल्यास त्यांनाही वेळेचे बंधन घालणे, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

८) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, “ बोरिवली पश्चिम येथील एल.टी. मार्ग ते गोराई स्मशानभूमीपर्यंत आरएससी ५० रस्त्यालगत संरक्षण भिंत उभारण्याबाबत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

९) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, “ सेतु सुविधा केंद्र परिसरात दलालांचा मोठ्या प्रमाणात असलेला सुळसुळाट, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

१०) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, “ गेल्या काही वर्षांपासून बंद असलेले अंधेरी पूर्व येथील चिनॉय महाविद्यालय सुरू करण्यासाठी महाविद्यालयावर प्रशासक नियुक्त करण्याची आवश्यकता,” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

११) श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी, " मौजे कोहोज खुंटवली, (ता.अंबरनाथ, जि.ठाणे) येथील न.पु.क्र. ५८५७ या शासकीय जागेवरील २०० चौ.मी. जागेचा वापर अधिकृत करून महसूल दप्तरी नोंद होण्याची आवश्यकता," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, " रत्नागिरी जिल्ह्यातील महसूल विभागातील मंजूर १ हजार १५२ पदांपैकी रिक्त असलेली २५ टक्के पदे तातडीने भरण्याची आवश्यकता," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचना मांडली व आपले म्हणणे मांडले.

१२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, वि.प.स. यांनी, " ग्रामीण भागामध्ये सिंचन विहिरी व गायगोठा लाभार्थ्यांचे वाटप किंवा प्रस्ताव पाठविण्याचे अधिकार ग्रामपंचायतींना देण्याची आवश्यकता, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

आज शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी मान्य केलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय तालिका सभापतींनी घोषित केले.

७. सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

" राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (पाणलोट विकास) टप्पा-२ मध्ये केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेल्या निधीमधून १ टक्काही रक्कम राज्याने खर्च केली नसल्यामुळे संपूर्ण रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, शासकीय सेवकांच्या बदल्यांबाबतचा सुस्पष्ट कायदा असताना कृषि मंत्री यांनी वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या बदल्या संदर्भात स्वतंत्र आदेश काढणे, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा तुघलकी आदेश काढला असणे, राष्ट्रीय कृषि विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजना निधीसारख्या योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्याच्या उत्पन्नात लक्षणीय घट होऊन त्याचा कृषि उत्पादनावरही विपरीत परिणाम होत असणे, पंतप्रधान कृषि सिंचन योजनेतून शेतकऱ्यांना तुषार आणि ठिबक सिंचनासाठी असलेले अनुदान वाटप अनेक शेतकऱ्यांना झालेले नसणे, 'ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क' या संस्थेने हवामान बदलाचा धोका असलेल्या देशातील प्रसिध्द केलेल्या १०० राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचाही समावेश असणे, सदरहू धोका लक्षात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती घटित करण्याची आवश्यकता, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, खते, कीटकनाशके, तणनाशके, बियाणे यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला असणे, ज्वारीवर मावा तसेच तुडतुडे (डेल्फसीड) रोगाचा प्रादुर्भाव झाला असणे, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी

धडक कार्यक्रम राबवून ठोस तरतूद करण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, सदरहू शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी सरकारकडून शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, सरकारच्या निष्क्रियतेमुळे पीक कर्ज देण्यासाठी बँक जाणीवपूर्वक विलंब करीत असून सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थाच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांपुढे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदी अभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, नाफेड मार्फत कांदा खरेदी निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता तसेच राज्य सरकारने स्वतःच्या तिजोरीतून भावांतर योजना सुरू करण्याची आवश्यकता, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याच्या हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणा पूर्णपणे अपयशी ठरणे, महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाकडून सातत्याने शेतकऱ्यांची वीज तोडली जात असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तसेच ज्या गावांतून थकीत बिलाची रक्कम वसूल केली जाते त्या गावाच्या विकासकामांसाठी एकूण वसूल केलेल्या रकमेच्या ३० टक्के रक्कम विद्युत महामंडळाकडून देणे आवश्यक असताना त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच साहित्यांचा होत असलेल्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वीज जोडणी साठी होत असलेला विलंब, सिंगल फेजची नागरीकांकडून मोठ्याप्रमाणात मागणी होत असून त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच जुन्या डी.पी मुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, तसेच अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांचे नुकसान झालेले असणे, तसेच जनावरांचा देखील मृत्यू झाला असणे, उक्त नुकसानीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून नागरीकांना अजून कोणतीही मदत मिळाली नसणे, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून रोजगार हमी योजना राबविण्यासाठी कडक निर्णय घेण्यात आल्यामुळे रस्ते दुरुस्ती करण्याच्या कामामध्ये अडचणी येत असणे, त्यामुळे उक्त योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांवर ग्रामसेवकांनी बहिष्कार घातला असणे, तसेच मनरेगा योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य पिछाडीवर गेला असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ”

१) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, “ जानूपाडा, पांडे कंपाऊंड, चिखलवाडी, मागाठाणे, कांदिवली येथे झोपडपट्टीचा बायोमेट्रिक पद्धतीने सर्वे सुरू असताना संबंधित कर्मचाऱ्याने लाच मागणे, ” इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, संबंधित यंत्रणेला तात्काळ चौकशीचे आदेश दिले जातील आणि संबंधितांवर कारवाई केली जाईल, असे सांगितले.

२) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी, " मनरेगामध्ये काम करणाऱ्या अभियंत्यांचे मागण्यांसाठी सुरू असलेले आंदोलन, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

म.वि.स. नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चेत सन्माननीय सदस्य श्री. सुरेश धस यांनी भाग घेतला. (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक सायंकाळी ०५ वाजून ३१ मिनिटांनी, सोमवार दिनांक २० मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी ११ वाजेपर्यंत स्थगित झाली.

**सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३**

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १०-३० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, " राज्यातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष " इ. बाबतचा म.वि.प. नियम २६० अन्वयेचा प्रस्ताव पुनःप्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. सुरेश धस
(२) श्री. एकनाथराव खडसे
(३) श्री. श्रीकांत भारतीय
(४) श्री. अभिजीत वंजारी
(५) श्री. महादेव जानकर
(६) श्री. शशिकांत शिंदे (भाषण अपूर्ण.)

(चर्चा अपूर्ण )

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५१ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, अवकाळी पाऊस व गारपीट याविषयी नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय महत्त्वाचा व तातडीचा असल्यामुळे यावर आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

कृषी मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**१.** (क) (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चव्वेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, विधानपरिषदेच्या सन २०२२ च्या तिसऱ्या (हिवाळी) अधिवेशनात दिनांक १९ डिसेंबर,२०२२ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण १४३ आश्वासनांची यादी तसेच, सन२०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पुर्तता करण्यात आलेल्या एकूण ३१ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह सभागृहाच्या पटलावर ठेवले.

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, तासिका तत्वावरील अध्यापकांच्या मानधनात वाढ करणे, इ. बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, अकृषि विद्यापीठाशी संलग्नित एकूण ११७७ अशासकीय अनुदानित महाविद्यालांमध्ये मोठया प्रमाणावर रिक्त असलेल्या शिक्षक व शिक्षकेतर पदे भरणे, इ. बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

श्री. विक्रम काळे वि.प.स. यांनी, " तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन मिळणे आवश्यक, " इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

(२) उद्योग मंत्र्यांनी, राज्यातील विशेषतः छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजूर कामांसाठी निधी वितरीत करूनही कामे रखडल्याने सदर कामांची चौकशी करण्याबाबत' या विषयावरील श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ३४७ ला दिनांक ०९ मार्च, २०२३ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, राज्य शासकीय कर्मचारी आणि निमशाकीय कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, यासंदर्भात दिलेल्या नियम २८९ अन्वयेच्या सूचनेवर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे अधिक विस्ताराने बोलणार असल्यामुळ त्यांना बोलण्याची संधी द्यावी, अशी विनंती केली.

सर्वश्री. विक्रम काळे, अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३७ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४२ वाजता पुन्हा सुरू झाली.

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात. )

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक १० मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४२ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५२ वाजता पुन्हा सुरू झाली.

( विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात. )

सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य होत नसल्यामुळे सभागृहाची बैठक ५ मिनिटांसाठी स्थगित करीत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५२ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५७ वाजता पुन्हा सुरू झाली.

राज्य शासकीय कर्मचारी आणि निमशाकीय कर्मचारी यांच्या संपाबाबत दिलेल्या सूचनेच्या संदर्भात सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी खुलासा केला.

कर्मचाऱ्यांच्या संपासंदर्भात लवकरात लवकर योग्य तोडगा निघून, न्याय्य पध्दतीने कर्मचाऱ्यांना दिलासा मिळावा असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) सर्वश्री विलास पोतनीस व विक्रम काळे वि.प.स. यांनी, " शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (टीईटी) परीक्षेचा निकाल व विविध पदांची भरती करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने नियुक्तीचा शासन

निर्णय रद्द करणे ” इ. बाबत दोन्ही सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या दोन्ही सूचनेचा विषय एकच असून सदरहू सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र सरकारने यावर निवेदन करावे असे निर्देश माननीय उप सभापतींनी दिले.

(३) श्री. सुनील शिंदे व इतर वि.प.स. यांनी, “ वरळी सी फेस येथे पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजनांसह, बेदरकार वाहनचालकांना आवर घालण्यासाठी ठोस उपाययोजना हाती घेणे ” या विषयावरील नियम २८९ अन्वयेची सूचना दिली असून हा विषय गंभीर आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर गुन्ह्यांची दखल घेऊन कार्यवाही करावी असे निर्देश माननीय उप सभापतींनी दिले.

**४.** (१) सर्वश्री सुनील शिंदे, विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, “ मुंबईतील वाढते प्रदूषण रोखण्यासाठी शासनाने व मुंबई महानगरपालिकेने उपाययोजना करणे ” इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्री, ((मुख्यमंत्री) यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी, “ खरे अँड तारकुंडे इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीच्या मूळ रकमेवर ३०० कोटी रुपयांच्या व्याजाची रक्कम शासनाला द्यावी लागत असणे ” इ. बाबत दिलेल्या म.वि.प.नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. अंबादास दानवे,विरोधी पक्ष नेते यांनी, ‘धामोळे गावातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे’ इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार उद्योग मंत्री, (मुख्यमंत्री) यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी, “ आर.सी.एफ कंपनी थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) मधील कामगारांचे बॅज नियमित करून त्यांना माथाडी कामगारांचा दर्जा देणे ” इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, “ सन २००१ नंतर शासनाने विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या शाळा व संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देऊन वेतन सुरु करणे ” इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, " प्रत्येक जिल्हयात कृषी अभियंता अधिकाऱ्याचे पद निर्माण करणे " इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी, " समृध्दी महामार्गावर उलटून ६ भाविक ठार व ७ जण गंभीर जखमी होणे " इ. बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, " राज्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणे " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले मत मांडले.

(२) सर्वश्री. प्रवीण दरेकर वि.प.स. यांनी, " मागाठाणे विधानसभा क्षेत्रातील  बिभिषण वारे नावाचा भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्याला मारहाण झाल्याची घटना घडणे, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले मत मांडले.

(३) ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी, " सन्माननीय सदस्यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्य, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले मत मांडले.

यासंदर्भात उद्या निवेदन करण्याची परवानगी देण्यात यावी असे सांस्कृतिक कार्यमंत्र्यांनी विनंती केली.

(४) श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी, " अलिबाग तालुक्यात शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०२३ रोजी चिंचोटी गावातील रस्त्यालगत रात्रीच्या वेळी कामावरुन घरी परतणाऱ्या एका मुलीवर तीन ते चार लोकांनी बलात्कार करून खून केलेला असणे, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले मत मांडले.

माननीय मंत्री महोदयांनी या घटनेची गांभीर्याने दखल घेऊन उद्या गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ पर्यंत निवेदन करावे असे निर्देश माननीय उप सभापतींनी दिले.

(५) डॉ. मनिषा कायंदे वि.प.स. यांनी, " अर्थसंकल्पात सीमा भागातील गावांकरीता मंजूर केलेला निधी विनाअडथळा मिळावा, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला व आपले मत मांडले.

सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

मध्यंतरासाठी सभागृहची बैठक दुपारी ३ वाजून ४ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभगृहाची बैठक दुपारी ४ वाजता पुन्हा सुरू झाली.

श्री. शशिकांत शिंदे वि.प.स. यांनी, " सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यात माजी नगरसेवकाने केलेला गोळीबार, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. सचिन अहिर वि.प.स. यांनी, " पुणे शहरातील ऐतिहासिक जुन्या वाड्यांच्या पुर्नविकासाच्या संदर्भात घोषणा होऊनही त्यांची दखल घेण्यात आलेली नसणे तसेच गिरणी कामगारांच्या चाळी, कोळीवाडे या जुन्या इमारतींसाठी अर्थसंकल्पात कोणताही निधी न दिल्यामुळे लोक आंदोलनाच्या पवित्र्यात असणे, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. महादेव जानकर वि.प.स. यांनी, " सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात भारतीय जनता पक्षाच्या नगरसेवकाचा व इतर दोन व्यक्तींचा झालेला खून, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी, " धुळे जिल्ह्याचे सहकारी संस्थचे जिल्हा उप निबंधक अभिजीत देशपांडे यांच्यावर अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आली नसणे, " इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

माननीय सहकार मंत्र्यांना या बाबत अवगत करण्यात यावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, " राज्यातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष " इ. बाबतचा म.वि.प. नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(६) श्री. शशिकांत शिंदे (७) श्री. नरेंद्र दराडे

(चर्चा अपूर्ण )

**५.** आज सोमवार, दिनांक २० मार्च, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, " राज्यातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष " इ. बाबतचा म.वि.प. नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(८) श्री. प्रवीण दरेकर (९) डॉ.मनिषा कायंदे

(१०) श्री. अमोल मिटकरी

कृषी मंत्र्यांनी प्रस्तावावरील चर्चेस उत्तर दिले.

मुख्यमंत्र्यांनी, “ राज्य सररकारी कर्मचाऱ्यांच्या संपाबाबत ” नियम ४६ अन्वये निवेदन केले.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा, “ राज्यातील अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत शासनाकडून होत असलेले दुर्लक्ष ” इ. बाबतचा म.वि.प. नियम २६० अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

श्री अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उत्तरादाखल भाषण  केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**६.** विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार पुढे सुरु, खंडशः विचार व संमत करणे.

(१)  सन २०२२ चे विधानसभा विधेयक क्रमांक ३३ - महाराष्ट्र कामगार कायदे (सुधारणा) विधेयक, २०२२.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन्हा प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. शशिकांत शिंदे
(२) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्षनेता)
(३) श्री. प्रवीण दरेकर
(४) श्री. अभिजीत वंजारी
(५) श्री. सचिन अहिर
(६) श्री. सुरेश धस
(७) श्री. राजेश राठोड
(८) श्री. महादेव जानकर

कामगार मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते १२ (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३३ बाबत विधेयकाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांवर सरकारने काय विचार केलेला आहे, याबाबतचा अहवाल पटलावर ठेवणे आवश्यक आहे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक रात्री ८ वाजून ५९ मिनिटांनी, मंगळवार, दिनांक २१ मार्च,२०२३ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३**

**विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १०.०० वाजता माननीय  तालिका सभापती श्री. नरेंद्र दराडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.**

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, ' छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथील हज हाऊस येथे मोठा तिरंगा ध्वज लावलेला असून तो तिरंगा ध्वज सद्यःस्थितीत पाऊस सुरु असल्यामुळे फाटलेला असणे ' इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

' मुंबईला आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा प्राप्त करून देणे '  या विषयावर सर्वश्री प्रवीण दरेकर,रविजय ऊर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील,  श्रीकांत भारतीय, राजहंस सिंह, विप्लव बाजोरीया,  प्रा.राम शिंदे, सर्वश्री महादेव जानकर, प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव-

तसेच

' पुणे-नाशिक शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकाससकरण्याकरिता तयार करण्यात आलेल्या विकास आरखड्यास गतिमान करण्याची आवश्यकता' या विषयावर प्रा. राम शिंदे, सर्वश्री प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, डविजय उर्फ भाई गिरकर,  ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री सुरेश धस, सनिलय नाईक, चंद्रशेखर बावनकुळे, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीकांत भारतीय, विप्लव बाजोरीया, ज्ञानेश्वर म्हात्रे, राजहंस सिंह,  प्रवीण दटके, गोपिचंद पडळकर, प्रविण पोटे-पाटील, रमेशदादा पाटील,लरामराव पाटील, रमेश कराड, वसंत खंडेलवाल, रामदास आंबटकर, महादेव जानकर, वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव-

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले -

" माहे जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबद्ध कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकिकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदयांच्या नावीन्यमय कल्पकतेतून सुरु असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भूमिपूजन होऊन काम सुरु झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरीकरणाकरिता मागील २५ वर्षात २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची

६ हजार कोटींपेक्षा जास्त रक्कमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्डर्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भूमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी.च्या मेट्रोचे काम सुरु होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्यामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटी पेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरु झाल्याने पश्चिम द्रुतगती मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतूक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरु केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील व रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबद्ध स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकर प्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुर्नविकास करण्याचे, तसेच एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या संदर्भातील शासनाचे धोरण,णमुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता जेणेकरून,नपदपथ मोकळे होऊन वाहतूक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयांच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प,प९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांचे पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदूषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकीय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर,रदेवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना

मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखापरीक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महानगरपालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ”

तसेच

“ राज्यातील पुणे व नाशिक ही शहरे व्यापारी केंद्र असल्याने मुंबई, नागपूर, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राशी जोडलेली असणे, या शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता स्वतंत्र विकास आराखडा तयार असणे मात्र, त्यादृष्टीने शासनाकडून विकासात्मक कार्यवाही गतिमान करण्याची आवश्यकता असणे, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता असणे, पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे महानगरपालिकेतील ३४ गावांचा सीटी सर्व्हे करून विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध व कालबद्ध आराखडा तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर तातडीने विचार करण्याची आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज,जखडकवासला ते डेक्कन आणि हिंजवडी ते कात्रज मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी मुंबई-बेंगलोर महामार्गावरील स्वामी नारायण मंदिर ते नरे जंक्शन उड्डाणपूल करण्याची आवश्यकता, हवेली तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची आवश्यकता, जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुर्नविकास करण्याची आवश्यकता असणे, सन २०२७ मध्ये नाशिक शहरात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी आतापासून करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतिमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी घरे विकसित करण्याची व नाशिक मधील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, परराज्यातून येणारे उद्योग नाशिक

शहरात आणण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता, पुणे व नाशिक येथील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून पुनर्विकास करण्याची आवश्यकता असून सहकार अधिनियमातील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता असणे, पुणे व नाशिक येथील वाहतूक समस्या दिवसें-दिवस वाढत असल्याने व प्रवाशांना तासनतास रस्त्यावर खोळंबून रहावे लागत असल्याने यावर तोडगा काढण्याकरिता वाहतूक समस्येचा अभ्यास करून वाहतूक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहराचे डीपी प्लॅन नव्याने तयार करण्याची आवश्यकता, व कँन्टोनमेन्ट एरिया पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने सुरु असलेली कार्यवाही अधिक गतिमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्टीची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली करण्याची आवश्यकता, पुणे-नाशिक रेल्वेची सुविधा करण्याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे मागणी करून पाठपुरावा करण्याची आवश्यकता, राज्यात दारु व दूध भेसळीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने अन्य भेसळ अधिनियमातील शिक्षेची तरतूद कठोर करण्याची आवश्यकता, केंद्राने सहकाराला बळकटी देण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नाला राज्य व केंद्र शासनाने परस्पर सामंजस्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता, राज्यातील बंद पडत असलेल्या सहकारी बँका, कृषी सहकारी संस्था यांना बळकटी देऊन उर्जितावस्थेत आणण्याची आवश्यकता, प्रायमरी अँग्री क्रेडीट सोसायट्या गावपातळीवर काढण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात जलदगतीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना पाठबळ देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण संस्थांच्या स्वयंपुनर्विकासासंबंधात स्वतंत्र धोरण आणण्याची आवश्यकता, राज्यातील सहकारी चळवळ बळकट करण्याची व पतपेढ्यांमधील ५ लाखापर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याची आवश्यकता, राज्यातील प्रगत शिक्षण संस्थापैंकी काही संस्था राजकीय अड्डे बनले असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा विपरीत परिणाम,मयाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

प्रस्ताव प्रस्तुत झाले.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

१)डॉ. मनिषा कायंदे

२) श्री. अनिल तटकरे

३) श्री. महादेव जानकर

४) श्री. अभिजीत वंजारी (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली.

**१.** (क) (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सहा प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पंच्चावन्न प्रश्न हे वेळेअभावी झाले.

(ख) उपसचिवांनी, अतारांकित प्रश्नोत्तरांची सहावी ते अकरावी यादी सभागृहासमोर ठेवली.

**२.** (१) बंदरे आणि खनिकर्म मंत्र्यांनी, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) बंदरे आणि खनिकर्म मंत्र्यांनी, जिल्हा खनिज प्रतिष्ठान, पुणे, नांदेड, जळगांव, नंदुरबार, जालना, पालघर, गडचिरोली, हिंगोली, परभणी, वाशिम, औरंगाबाद या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ व जिल्हा खनिज प्रतिष्ठान, नागपूर यांचे सन २०१६-२०१७ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) कामगार मंत्र्यांनी, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांचे सन २०१४-२०१५ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** श्री. श्रीकांत भारतीय, समिती सदस्य यांनी, विधाननपरिषद आश्वासन समितीचा अहवाल सभागृहाला सादर केला.

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते व इतर वि.प.स. यांनी, " राज्य सरकारने जाहीर केलेला महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमावर्ती भागातील गावांचा निधी रोखण्याबाबत कर्नाटक सरकारने केलेली घोषणा " या विषयाच्या संदर्भात नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून २७ मिनिटांनी दुपारी ०१ वाजून ३७ वाजेपर्यंत स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक ०१ वाजून ३७ वाजता पुन्हा सुरु झाली.

पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले.

(२) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी " डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तथा भगवान बुद्ध यांची मूर्ती समाजकंटकांनी बेकायदेशीररित्या हलविणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

शासनाने या विषयी निवेदन करावे, असे निदेश माननीय उपसभापतींनी दिले.

माननीय उपसभापतींनी, सदनामध्ये उपस्थित नसलेल्या सन्माननीय सदस्यांची नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनांची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याचे घोषीत केले.

(१) सर्वश्री विक्रम काळे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " पारगाव (ता.दौंड, जि.बीड) येथील एकाच कुटुंबातील ७ व्यक्तींचा मृतदेह आढळून येणे " इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार उपमुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. सतेज डी. पाटील, वि.प.स. यांनी, “ राज्यात इन्फ्ल्युएन्झा ए (एच-३,एन-२) व्हायरस या गंभीर विषाणूचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होत असणे ” इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. अनिल तटकरे, वि.प.स. यांनी, “ सिंधुदुर्ग जिल्हयात कोविड १९ च्या दरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारी, सिंधुदुर्ग यांचे खरेदी करण्यात आलेले औषध व वैद्यकीय साहित्य, उपकरणे यांची चौकशी होण्याची आवश्यकता ” इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, “ मुंबईतील मालाड येथील आप्पापाडा येथील झोपडपट्टीला लागलेल्या भीषण आगीत सुमारे दीड हजार झोपडयांना आग लागून त्यामध्ये एका व्यक्तीचा मृत्यू होणे” इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) डॉ. मनिषा कायंदे, श्री. सचिन अहिर ,वि.प.स. यांनी, “ मुंबईतील माझगाव, चेंबूर, अंधेरी, वांद्रे कुर्ला संकुल, कुलाब्यासह नवी मुंबईतील हवेची गुणवत्ता खालवणे ” इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी, “ मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाच्या कामास सुरुवात करून योजनांना निधी उपलब्ध करून देणे ” इ. बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ०९ मिनिटांनी मध्यंतरासाठी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक ०३.०० वाजता पुन्हा सुरु झाली.

(१) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, “ धुळे जिल्ह्यातील डि.डि.आर. श्री. अभिजीत देशपांडे यांच्याशी संबंधित प्रकरणाच्या संदर्भात ७ दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करून कारवाई होण्याची आवश्यकता ” इ.बाबत माहिती विषयक मुद्दा उपस्थित केला.

सदरहू मुद्याची नोंद घेण्यात आली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(२) श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी, “ वाशिम जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील शिरपूर जैन मंदिरातील अंतरिक्ष पार्श्वनाथ भगवंताचे मंदिर दर्शन भाविकांना सुरळीतपणे घेता यावे यासाठी व्यवस्था करण्याची आवश्यकता ” इ.बाबत माहिती विषयक मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, “ नेटवर्क अभावी ई-पॉस मशीन बंद असल्याने रायगड जिल्ह्यातील सर्वत्र रास्त भाव दुकानदारांकडून वाय-फाय सेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात येणे ” इ.बाबत माहिती विषयक मुद्दा उपस्थित केला.

माननीय उप सभापतींनी सभागृहात पुढील घोषणा केली-

“ आज आपल्या सभागृहाचे कामकाज पाहण्यासाठी मॉरिशस देशाचे मंत्री श्री. दर्शनानंद बालगोबिन व त्यांच्या समवेत अन्य उच्चाधिकारी यांचे शिष्टमंडळ विशेष अभ्यागत कक्षामध्ये उपस्थित आहेत. आपण सर्व जण त्यांचे टाळ्यांच्या गजरात हार्दिक स्वागत करु या. ”

**४.** (१) श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ आशिया खंडातील एक मोठे मासेमारी बंदर म्हणून ओळख असलेल्या मुंबईतील कुलाबा विभागात ससून डॉक नावाजलेले असणे, या ठिकाणी मासळीचा मोठा व्यापार चालत असून, सर्वदूर भारतातून आलेला बंजारा समाज येथे आपली रोजी रोटी कमावण्यासाठी आलेला असणे, या ससून डॉकमधून दरवर्षी हजारो कोटी रुपयांची मासळी परदेशी निर्यात होत असणे, निर्यात होण्यापूर्वी या मासळीचे काम हा आदिवासी समाज कित्येक वर्षापासून करत असणे, उदाहरणार्थ बोटीतून मासळी उपसणे, हाताच्या नखाने मासळी सोलणे, बोटीची निगा राखणे अशी अंगमेहनतीची अनेक कामे बंजारा समाजातील जवळपास २० हजार कामगार अहोरात्र मेहनत करत असणे, परंतु महत्त्वाच्या व्यापारपेठेतील हे कामगार अनेक मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहत असणे, स्वातंत्र्योत्तर काळापासून वंचित राहिलेल्या व दुर्लक्षित असलेल्या या आदिवासी बंजारा समाजाला बोटीवरील हजारो टन निर्यातक्षम मासळी सोलणाऱ्या मुख्यतः महिला व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती घेण्यासाठी व भोजन करण्यासाठी स्वतंत्र विश्रामगृहाची आवश्यकता, महिलांसाठी सुलभ शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था, नवजात बालके आणि लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणाघर,रस्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वस्त दरातील शिवभोजन उपहारगृह व प्राथमिक शिक्षणासाठी बालवाडीची गरज तसेच माफक दरात प्राथमिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यासाठी ” स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना “ घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था इत्यादी त्यांच्या मूलभूत मागण्या असून, त्या मागण्या मंजूर झाल्यास त्यांना दिलासा मिळेल, याकरिता शासनाने लक्ष घालून मासळी व्यवसायातील बंजारा कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया.”

मत्स्यव्यवसाय मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर केंद्रीय निवासी २८८ आश्रमशाळांना राज्य सरकारने मान्यता देणे, या सर्व शाळा नियमित सुरु असून त्यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या सर्व शाळांना शासनाने अनुदान द्यावे, ही सातत्याने मागणी होत असणे, मराठवाड्याच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी यापूर्वी प्रत्येक अधिवेशनामध्ये याविषयी शासनाचे लक्ष वेधणे, तत्कालीन मंत्रीमहोदयांनी या सर्व शाळांची तपासणी करून अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित करणे, त्यानुसार वारंवार तपासणी करून अ, ब, क, ड अशी श्रेणी करणे, या श्रेणीनुसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेणे, अनेक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या शाळांमधील शिक्षक-कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीनुसार वेतन अनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना "

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सहकार मंत्र्यांनी, " श्री. अभिजीत देशपांडे, तत्कालीन सहायक निबंधक, इगतपुरी यांचे निलंबन " इ. बाबत म.वि.प.नियम ४६ अन्वये निवेदन केले.

(३) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

" सोलापूर जिल्हयातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्या सुरू होत्या, सदर चारा छावण्यामध्ये दाखल जनावरांची गुरे छावणी व्यवस्थापन यंत्रणेमध्ये नोंदणी करून आठवडयातून एकदा बारकोडद्वारे स्कॅनिंग केल्यानंतर ऑनलाईन हजेरीद्वारे अनुदान वितरित करण्याबाबत निर्देश देण्यात आले असणे, सदर ऑनलाईन हजेरीप्रमाणे ऑनलाईन हजेरी न लागलेल्या पशु संख्येचे २२,५४,२७,२९९/- इतके अनुदान शासनास समर्पित करण्यात आले असणे, सदर समर्पित झालेले अनुदान मिळण्याच्यादृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दिनांक २८.४.२००६ व दिनांक १०.७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव,वमहाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती गठीत करून सदर समितीने सुधारीत प्रस्ताव सादर केल्याचे कळविले असणे, त्या अनुषंगाने समितीच्या निर्णयामध्ये असे म्हणण्यात आले आहे की ज्या पशुधनाच्या यंत्रणेमध्ये कधीतरी स्कॅनिंगनुसार

उपस्थितीची नोंद झाली आहे, त्याची इतर नोंदीच्या आधारे पडताळणी उपस्थितीची संख्या ग्राहय धरण्यात यावी व त्यानुसार किती निधी देणे आवश्यक आहे हे प्रमाणित करून सुधारित प्रस्ताव राज्य शासनास तात्काळ सादर करण्यात यावा असे निर्णय घेण्यात येऊनही अद्याप जिल्हाधिकारी, सोलापूर, विभागीय आयुक्त,तपुणे यांनी यासंदर्भात कोणताही प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात न येणे, त्यामुळे सांगोला तालुक्यातील १४६ चारा छावण्यांची २१,४७,१४,९२२/- रूपये तर मंगळवेढा तालुक्यातील चारा छावण्यांची सुमारे १२,२०,९६,२५१/- रूपये इतक्या अनुदानाची रक्कम चारा छावण्यांना देण्याचे प्रलंबित असल्याने, चारा छावणी चालकांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, सबब माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील अनुदानाची रक्कम राज्य शासनाकडून तात्काळ वितरीत करण्याबाबत शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही. ”

बंदरे व खनिकर्म मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ राज्यात कोचिंग क्लास फक्त शाळा-कॉलेजपुरते मर्यादित नसून त्यांचे अनेक प्रकार असणे, दहावी, बारावी, विद्यापीठांचे अभ्यासक्रम, बँकिंगच्या परीक्षा, स्पर्धा परीक्षा, एमपीएससी/यूपीएससी यांचे कोचिंग क्लास यांचे पेव फुटले असणे, इंग्रजी स्पिकिंग क्लास, विविध परदेशी भाषा शिकण्याचे वर्ग, संगीत, नृत्याचे क्लास, अगदी शेअरमार्केटचे शिक्षण देणारेही क्लास असणे, पोलिस भरती, तलाठी, ग्रामसेवकपासून ते स्टाफ सिलेक्शन कमिशन आणि यूपीएससी अंतर्गत सगळे शिकवणी क्लास सर्वत्र उपलब्ध होऊ लागले असणे, या क्लासच्या स्वतःच्या नोट्स, सराव परीक्षा, त्यांचे वेगळे पैसे, उन्हाळी वर्ग, शॉर्ट टर्म कोर्सेस, अकरावीनंतर बारावीचे फक्त व्हेकेशन, सीईटी प्रवेश परीक्षा क्लास असे अनेक प्रकारचे खाजगी क्लासेस राज्यात सुरु असणे व यातून हे क्लास चालवणारे कोट्यवधी - अब्जावधी रुपये कमावत असणे, राज्यात दहावी, बारावी राज्य मंडळाची आणि पुढे सर्व प्रवेश परीक्षेला सीबीएसई, ईआयसीएसई, ईआयबी, बोर्डाचा अभ्यासक्रम असा विरोधाभास चालू असताना शहरी व ग्रामीण शाळा, कॉलेजातील प्रचंड तफावत जाणवू लागणे, साधा किराणा दुकानदार शॉप ॲक्ट लायसन्स काढत असणे, पुढे त्याच्या दुकानात वजनकाटा तपासणारे, अन्न-औषधीवाले, बालकामगार तपासणारे अधिकारी तपासण्या करत असणे, प्रत्येक व्यवसायासाठी तपासणी करणाऱ्या स्वतंत्र यंत्रणा असणे, मग कोट्यवधी- अब्जावधी रुपयांची उलाढाल असणाऱ्या कोचिंग क्लासची सरकारदरबारी नोंद करणे सुद्धा अत्यंत आवश्यक असणे, त्यांच्या जाहिरातीतील दाव्याची सत्यता तपासून पाहणारी यंत्रणा, तेथे मुलींच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र व्यवस्था, अपघात, अग्निशमन यंत्रणा, ऑक्सिजन सिलेंडर , वैद्यकीय प्राथमिक उपचार यांचीही व्यवस्था

आवश्यक असणे, राज्यभर अशा क्लासची संख्या लाखोंनी असून अशा कोचिंग क्लासमध्ये शिकवणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्या वेतनाबाबत नियम करणे, त्यांच्यासाठी या क्लास संचालकांनी आपला नफा खर्च करणे, अशा शिकवणी वर्गाला सर्व्हिस इंडस्ट्रीचा दर्जा असेल तर त्यांना सर्व इंडस्ट्रीचे कायदे लागू करणे, कोचिंग क्लास व्यापार असेल तर त्यांना कोणते कायदे लागू पडतात या सर्व प्रश्नांसाठी राज्यातील खासगी क्लासेसचे नियमन करण्याची व राज्य सरकारने यावर देखरेख ठेवण्यासाठी नियम व कायदे करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ राज्यातील ऑटोरिक्षा चालक व मालक यांचा सर्वांगीण विकास, उन्नती आणि कुटुंब कल्याणासाठी परिवहन खात्यांतर्गत ऑटोरिक्षा व्यवसाय कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याची होत असलेली मागणी, रिक्षा चालक- मालक यांची नोंदणी करून संबंधितांना निवृत्ती वेतन, उपदान, भविष्य निर्वाह निधी, अपघात विमा योजना आणि दहा लाख रूपयांचे विमा संरक्षण असलेली वैद्यकीय कुटुंब आरोग्य योजनेचे लाभ मिळण्याची आवश्यकता, रिक्षांची वाढती संख्या पाहता ऑटोरिक्षाचे मुक्त परवाना वाटप धोरण बंद करण्याची गरज, सरकारी, निमसरकारी, खाजगी नोकरी करणाऱ्या चालक-मालकांचे परवाने रद्द करण्याची मागणी, अवैध सार्वजनिक प्रवासी वाहतुकी विरोधात कायमस्वरूपी भरारी पथकाद्वारे आवश्यक सक्तीची कारवाई, मॅक्सि कॅब तसेच अनधिकृतरित्या चालणाऱ्या अँपबेस्ड दुचाकी प्रवासी वाहतुकीवर बंदी आणण्याची गरज, मुक्त परवाना वाटप धोरणाचा फायदा घेऊन असंख्य बेरोजगार तरूणांनी ऑटोरिक्षा घेतल्या असून दोन वर्षाच्या कोरोना महामारीच्या रिक्षा व्यवसायावर परिणाम झाल्याने सदर कर्जाची परतफेड न झाल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केल्यामुळे रिक्षा जप्त करण्यात येणे, सदर कर्ज व त्यावरील व्याज माफ करण्याची आवश्यकता, ऑटोरिक्षाचा वाहन विमा हप्त्याची रक्कम कमी करण्याची गरज, राज्यातील रिक्षाचालक - मालक यांच्यावरील उपासमारीची वेळ, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची दुर्दशा, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

बंदरे विकास व खनिकर्म मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

तालिका सभापतींनी, आजच्या कामकाजपत्रिकेत अनुक्रमांक-६ वर दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेचे निवेदन न आल्यामुळे ही लक्षवेधी सूचना गुरुवारी घेण्यात येणार असून लक्षवेधी सूचना क्रमांक-७ चर्चेला घेण्यात येत असल्याचे सांगितले.

(६) सर्वश्री. सुनील शिंदे, विलास पोतनीस वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले-

" पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गोरगरीब आदिवासी कुटुंबांकडे आधारकार्ड, घरकुल, जॉबकार्ड, मतदान ओळखपत्र, अंत्योदय योजनेचा लाभ, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ, पाणी व वीज यासारख्या विविध समस्यांना सामोरे जावे लागणे, मूलभूत सुविधा मिळत नसल्याने प्रशासनाच्या दिरंगाईचा भुर्दंड आदिवासी कुटुंबांना सोसावा लागत असल्यामुळे दिनांक १ ऑगस्ट, २०२२ ते १० ऑगस्ट, २०२२ दरम्यान श्रमजीवी संघटनेने प्रत्येक आदिवासी पाड्यावर जाऊन आदिवासी कुटुंबांचे सर्वेक्षण केलेले असणे, आदिवासी लाभार्थ्यांना वाडा तहसिलदार कार्यालयाअंतर्गत अंत्योदय योजनेचा लाभ मिळण्यासाठी रेशन कार्ड त्वरित मिळावित, २५० प्राधान्य रेशनकार्डवर अजूनही धान्य सुरू न झाल्याने रेशनकार्ड तात्काळ ऑनलाईन करून धान्य पुरवठा सुरू करावा, पंतप्रधान आवास योजनांची " ड " यादी पक्की करण्यात आलेली असून पात्र कुटुंबांना घरे नाकारण्यात आली आहे, अशा अपात्र कुटुंबांचा सर्वे करून योजनेचा लाभ द्यावा, जातीचे दाखले मिळण्याबाबत ६२० अर्ज प्राप्त झालेले असून आदिवासींना जातीचे दाखले त्वरित देण्यात यावेत, आदिवासींची घराखालची जागा नावे करण्यासाठी ९४०आदिवासी कुटुंबाचे दावे दाखल केलेले असून याबाबत सुनावणी सुरू करावी, रोजगारासाठी स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबांचा नव्याने सर्वे करून पात्र कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा, मंजूर वनपट्टे असलेल्या वनहक्क दावेदारांचे भूमी-अभिलेख कार्यालयांतर्गत त्वरित गटबुक नकाशे देण्यात यावेत आदी मागण्यांसाठी श्रमजीवी संघटनेने दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वाडा तहसिलदार कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा काढून निवेदन सादर करण्यात येऊनही आजमितीस ३ महिने लोटले तरी सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून ठोस कार्यवाही करण्यात होत असलेला विलंब, परिणामी आदिवासी जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

" आयटी कामगारांची व्यवस्थापनाकडून होणारी पिळवणूक, कामगारांना कुठलीही पूर्व सूचना न देता कामावरुन काढून टाकणे, अशा प्रकारे अन्याय झालेल्या कामगारांना न्याय्य मागण्यासाठी योग्य

व्यासपीठ उपलब्ध नसणे, या निमित्ताने कामगार या व्याख्येची व्यापकता वाढवणे, तक्रार निवारणासाठी शासन स्तरावरुन समिती गठीत करण्याची आवश्यकता असणे, Campus Hiring च्या माध्यमातून ऑफर लेटर, लेटर ऑफ इंटेन्ट मिळणे, मात्र प्रत्यक्षात कामावर रुजू करून न घेणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

कामगार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, “ नवीन शुद्धीपत्रकानुसार  शिवछत्रपती पुरस्कारा ’ करिता खेळाडूंना अर्ज सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणे ” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उपमुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ राज्यात १९/११/१९९४ च्या शासन निर्णयानुसार सहकारी पाणीपुरवठा संस्थांना २५ टक्के शासकीय अनुदान दिले जाणे, परंतु सदर शासन निर्णय होण्याआधी स्थापन झाल्या आहेततअशा संस्थांना या योजनांचा लाभ मिळत नसणे, या संस्था जवळपास ४० ते ५० वर्षापूर्वी स्थापन झाल्या असल्याने या पाणीपुरवठा संस्थांची पाईपलाईन,नविद्युत मोटारी आदी खराब झालेल्या असणे, त्यांच्या दुरुस्तीसाठी येणारा खर्च हा खूप मोठा असून या संस्थांचे सभासद अल्पभूधारक असल्याने त्यांना तो परवडणारा नसणे, त्यामुळे अशा पाणीपुरवठा संस्थांमधील शेतकरी सभासदांकडून संदर्भिय शासन आदेशानुसार सदर शासन आदेशापूर्वी स्थापन झालेल्या संस्थांनाही शासनाने अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी आग्रही मागणी होत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सहकार क्षेत्रात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया. ”

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण, स्थावर व जंगम मालमत्ता कार्यभार सांभाळणाऱ्या सहाय्यक आयुक्तांची दादागिरी, मनमानीपणे गैरकारभार सुरु असणे, वास्तविक पाहता त्यांचा मूळ पदभार उप कार्यालयीन अधीक्षक या पदावरचा असतांना वरिष्ठांशी संगनमत करून सन २०१८ पासून बेकायदेशीररित्या प्रभारी सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत असणे, त्यांचेकडून अनधिकृत बांधकाम करणारे व फेरीवाल्यांकडून

दैनंदिन लाखो रुपयांची आर्थिक वसुली करत असल्याची दिनांक १५ मार्च, २०२३ दरम्यान गंभीर तथा धक्कादायक माहिती उघडकीस येणे, सहाय्यक आयुक्तांच्या उपस्थितीत त्यांचा शिपाई ठाणे महापालिकेतील कार्यालयात त्यांच्या उपस्थितीत लाखो रुपये मोजत असून दिवसाला चाळीस लाख रुपये कमाई असल्याची सहाय्यक आयुक्त संवाद करत असल्याची चित्रफीत प्रसारित झालेली असणे, ठाणे महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात अनधिकृत बांधकामे सुरु असून प्रत्येक बांधकामामागे सहा लाख रुपयांची वसुली दलालामार्फत केली जात असणे, प्रकल्पग्रस्तांना द्यावयाची घरे कोणत्याही प्रकारचे पुरावे नसतांना बेकायदेशीरपणे जवळच्या व्यक्तींना देण्यात आलेली असणे, एमएमआरडीए, म्हाडा कडून उभारण्यात आलेल्या व महापालिकेकडे वर्ग करण्यात आलेल्या इमारतीतील घरे खोटे पुरावे दाखवून जवळच्या परिचितांना देण्यात आली असणे, यामध्ये रॅकेटच कार्यरत असूननकोट्यवधी रुपये वसूल केले जात असणे, सन २०२१ मध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल होणे, मात्र पुढे कोणतीही कारवाई झालेली नसणे, खोट्या कागदपत्रांच्या आधारे सुमारे हजार पेक्षा जास्त घरे या सहाय्यक आयुक्तांनी आपल्या अधिकारात वाटलेली असणे, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने सुरु असलेला प्रचंड आर्थिक तथा अनागोंदी गैरकारभार, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, पर्यायाने महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरु असून निकृष्ट दर्जाच्या बांधकामांमुळे सदरच्या इमारती कोसळून पुढील काळात गंभीर अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जीवित तथा वित्त हानी होण्याची परिस्थिती निर्माण झालेली असणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगरविकास, आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही सदर बाबत कोणतीही कारवाई केली जात नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सहायक आयुक्तांच्या मनमानी व दहशतीच्या कारभारामुळे ठाणे महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेबरोबरच महापालिका क्षेत्रातील नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण पसरलेले असणे, सदर गंभीर प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय सखोल चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले-

" केंद्र सरकारच्या शिक्षण हक्क कायदा २०१३ नुसार देशातील गोरगरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या पालकांच्या मुलांना सीबीएससी शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक केले असून, त्यानुसार सन २०१४ पासून राज्यात त्या कायद्यानुसार राज्यातील सीबीएससीच्या विविध शाळांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असणे, आणि केंद्र शासनाच्या वतीने या २५ टक्के

प्रवेशात विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्कांची रक्कम प्रती विद्यार्थी २८ हजार रुपये ठरली असून राज्यात प्रत्यक्षात ही रक्कम प्रती विद्यार्थी सीबीएससी शाळांना १७ हजार ५०० च्या दराप्रमाणे दिली जात असणे, त्यामुळे सीबीएससी शाळांवर अन्याय होत असणे, तसेच मागील ५ वर्षापासून राज्य शासनाने अनेक सीबीएससी शाळा आर्थिक डबघाईला आल्यापासून त्या शाळांमधील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांचे पगार देणे दुरापास्त झाले असणे त्यामुळे त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून सीबीएससी शाळांतील आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांचा शिक्षण शुल्काचा परतावा देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. ”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“ राज्यातील शिक्षकांची भरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून होत असणे, नुकतीच अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा जाहीर झालेली असणे, परंतु यामध्ये कला व क्रीडा शिक्षकांचा समावेश नसणे, क्रीडा शिक्षकांकरिता बी. पी. एड. किंवा बी. एड. ( फिजी.) पदवी आवश्यक असणे, बी. पी. एड. पदवी बी.एड. अर्हतेशी समकक्ष असणे, तसेच पवित्र पोर्टल मध्ये कला व क्रीडा या जागांचा उल्लेख नसणे, यास्तव या शिक्षकांना शाळांमध्ये नोकरीची संधी नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे खेळ व कला विषयाचे अतोनात नुकसान होणे, भविष्यात चांगले खेळाडू तयार न होणे, परिणामी विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान व शिक्षकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय उपसभापतींनी, सोमवार, दिनांक २० व मंगळवार, दिनांक २१ मार्च, २०२३ रोजी म.वि.प.नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ६ वाजून २० मिनिटांनी गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजीच्या दुपारी १२.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

## गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३

विधान परिषदेची बैठक मुंबई येथील विधान परिषदेच्या सभागृहात दुपारी १२.०० वाजता माननीय तालिका सभापती ॲड.निरंजन डावखरे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (क) गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचा, “ राज्यात जातनिहाय जनगणना करण्याबाबत ” या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १७३०९ च्या संदर्भात मंत्रिमहोदयांनी विनंती केल्यामुळे सदरहू तारांकित प्रश्न हा पुढे ढकलण्यात येत असून सदर तारांकित प्रश्न हा शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजीच्या कार्यक्रमपत्रिकेत दर्शविण्यात येईल असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

(ख) तारांकित प्रश्न -

(१) चार तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पंचवीस प्रश्न अतारांकित झाले.

**२.** (१) वने मंत्र्यांनी, (क) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ या कायद्याच्या अंमलबजावणी विषयक सन २०१६-२०१७ ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल तसेच, (ख) महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित यांचे सन २०१९- २०२० व २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(२) वने मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन २०१९-२०२० या वर्षाचा वार्षिक अहवाल व लेखा सभागृहासमोर ठेवला.

(३) महसूल मंत्र्यांनी, (क) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे-रायगड यांचे सन २०१२-२०१३ ते २०१५-२०१६ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल तसेच, (ख) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक यांचे सन २०१९-२०२० ते २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(४) महसूल मंत्र्यांनी, (क) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन २०१६-२०१७ व सन २०१७-२०१८ या वर्षांचे वार्षिक अहवाल तसेच, (ख) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचा सन २०१७-२०१८ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** (ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विधेयक विचारात घेणे.

(१) शालेय शिक्षण (उप मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १२ – महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत विधेयक, २०२३ मांडले व उपरोक्त विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः सभागृहाला सादर करण्यात आले.

खंड २ ते २०, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) शालेय शिक्षण (उप मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३ – महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व उपरोक्त विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः सभागृहाला सादर करण्यात आले.

खंड २ व ३, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**नियम २८९ अन्वये सूचनांसंबंधी** –

(१) सर्वश्री श्री. सुनील शिंदे, श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, " वरळी येथील ३०५. मीटर रुंदीच्या गणपतराव कदम मार्ग रुंदीकरणात बाधित होणाऱ्या खाजगी उपकर प्राप्त चाळींतील सर्व अनिवासी गाळेधारकांचे पुनर्वसन करणे " इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून उक्त विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. तथापि, शासनाने या विषयी निवेदन करावे असे सांगून माननीय उप सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(२) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, “ शाळा अनुदान वितरण करण्यासाठी सन २०२३ च्या संचमान्यतेची घातलेली अट रद्द करणे ” इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून उक्त विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. तथापि, शासनाने या विषयी निवेदन करावे असे सांगून माननीय उप सभापतींनी सदर सूचनेस अनुमती नाकारली.

(३) सर्वश्री शशिकांत शिंदे, विक्रम काळे, वि.प.स. यांनी, “ डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन आधी छात्रवृत्ती (BANRF-२०२१) अंतर्गत सर्व पात्र ८६१ विद्यार्थ्यांना तत्काळ सरसकट फेलोशीप मंजूर करण्याच्या तसेच निवड झालेल्या सर्व संशोधक विद्यार्थ्यांना तत्काळ ॲवॉर्ड लेटर देण्याच्या मागणीसाठी आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन सुरू करणे ” इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून उक्त विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. तथापि, सर्व विद्यार्थी आझाद मैदानावर बसलेले आहेत. दोन दिवसांनंतर अधिवेशन संपणार आहे. गावा-गावांतून आलेल्या लोकांची शासनाने कशाप्रकारे दखल घेतली आहे, ही बाब आपल्यावर बंधनकारक आहे. माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री सदनामध्ये नाहीत. तथापि, सदनामध्ये उपस्थित असलेल्या सर्व मंत्री महोदयांनी याबाबत गंभीर दखल घ्यावी. शासनाने उद्यापर्यंत सदनामध्ये निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते व डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, “ राज्यातील उद्योग व महत्त्वाचे कार्यालय इतर राज्यात जाणे ” इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून उक्त विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नाही. तथापि, सदर विषय महत्त्वाचा असल्यामुळे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी थोडक्यात याबाबत आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

यासंदर्भात शासनाने सदनामध्ये निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(५) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, “ मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालयांतील शिक्षकांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वरुन ६४ करण्याचा निर्णय घेण्यात येणे ” इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून उक्त विषय आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात येत आहे. सन्माननीय सदस्यांना याबाबत आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास त्यांनी थोडक्यात त्यावर आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री. कपील पाटील, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

म.वि.प. नियम ९३ च्या सूचनेस अनुलक्षून निवेदने -

(१) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, " गायरान जमिनीवरील अतिक्रमण काढण्यासंदर्भात शासनाने बजावलेल्या नोटीस " इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

(२) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " खाद्यपदार्थांची विक्री व कॉफी वेंडींग मशीनचा विनापरवाना वापर करण्यास अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून बंदी असताना मे.वि.वर्क इंडिया मॅनेजमेंट प्रा.लि. सी २० ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स येथे इमारतीच्या काही मजल्यावर कॉफी वेंडींग मशीन खाद्यपदार्थ साठवलेले फ्रिज आढळून येणे " इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " सांगली जिल्ह्यातील कृष्णा व वारणा नद्यांमध्ये उद्योग, कारखान्यातून घातक रसायनयुक्त सांडपाणी सोडल्यामुळे होत असलेले जलप्रदूषण " इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांच्या निवेदनाबाबत -

आजच्या कामकाजपत्रिकेतील अनुक्रमांक १, २, ६, ७, ८, ९ व १० वरील नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने ही माननीय उप मुख्यमंत्री यांचेशी संबंधित असून ही सर्व निवेदने प्रलंबित ठेवण्यात येत आहेत. सन्माननीय सदस्य सर्वश्री शशिकांत शिंदे व जयंत प्र.पाटील यांनी उपस्थित केलेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनांवरील निवेदनेही प्रलंबित ठेवण्यात येत आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**४.** (१) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

" गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात तेलंगणा सीमावर्ती भागात गोदावरी नदीवर मेडीगड्डा प्रकल्प तेलंगणा शासनाने उभारला जाणे, परंतु सदर प्रकल्पामुळे सिरोंचा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होणे, त्यांच्या भूसंपादन, पुनर्वसन बाबी प्रलंबित असून शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका बसणे, सदर प्रकल्पातून तेलंगणाच्या अनेक भागातील १८ लाख ५० हजार एकर शेतीला सिंचनाची सोय करण्याची क्षमता असणाऱ्या प्रकल्पाचे पाणी हैद्राबादपर्यंत नेले जात असणे, परंतु पावसाळ्यात गोदावरी नदी भरल्यानंतर नदीचे बॅकवॉटर पाणी गोदावरीला येऊन प्राणहिता नदीच्या बॅकवॉटरमुळे सिरोंचा तालुक्यातील अनेक गावात व शेतात पसरले जाणे, त्यामुळे शेतकऱ्यांची शेती खरडून जाणे, त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, परिणामी सदर प्रकल्पाचा महाराष्ट्राला सिंचनाचा फायदा न होता उलट नुकसान सहन करावे लागणे, त्यामुळे सिरोंचा तालुक्यातील शेतकऱ्यांचे पुनर्वसन, भूसंपादनाचे प्रश्न व

शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईचा योग्य मोबदला मिळण्याची अत्यंत आवश्यकता, शासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष, शेतकरी हिताच्या निर्णयासाठी योग्य निर्णय घेऊन न्याय देण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.”

बंदरे व खनिकर्म (मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**लक्षवेधी सूचना क्रमांक २ बाबत -**

श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी, “ लक्षवेधी सूचना क्रमांक २ संदर्भात धोरणात्मक निर्णय होण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असणे गरजेचे असणे ” इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी खुलासा केला.

**लक्षवेधी सूचना - पुढे सुरू**

(४) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

“ नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने विकास आराखडा प्रसिद्ध करतेवेळी विकासकांच्या फायद्यासाठी नागरी सोयी सुविधांकरिता आरक्षित असलेल्या भूखंडाच्या झोनमध्ये परस्पर बदल करून विकास आराखडा प्रकाशित करणे व सोईस्कररित्या अपूर्ण माहिती प्रकाशित करणे, नवी मुंबई मनपाचा विकास आराखडा प्रकाशित करताना महासभेने मान्यता दिलेल्या २२६ सूचनांचा समावेश विकास आराखड्यामध्ये केलेला नसणे, सदर विकास आराखड्यामध्ये शासनाच्या नगर विकास विभागाचे दिनांक १४/०६/२०१९ आणि दिनांक ०६/०९/२०२१ चे भूखंडावरील आरक्षणाबाबत शासनाने कलम १५४ (१) अन्वये निर्देश दिलेले असल्याने ते नवी मुंबई मनपावर बंधनकारक असणे, असे असताना देखील दिनांक ०३/०१/२०२२ रोजीच्या नगरविकास विभागाच्या आदेशात देण्यात आलेल्या स्थगितीचा कुठेही उल्लेख नसणे, दिनांक ०३/०१/२०२२ रोजीच्या नगर विकास विभागाच्या आदेशाची विकास आराखड्यामध्ये कुठेही माहिती नमूद केलेली नसून जनतेची दिशाभूल करून ही गंभीर बाब जनतेपासून लपवून ठेवल्यामुळे, जनतेला विकास आराखड्यावर आक्षेप नोंदवणे अशक्य होणे, नवी मुंबई मनपा क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने दिनांक १४/०६/२०१९ रोजीच्या शासन आदेशान्वये १४/०६/२०१९ रोजीपर्यंतच्या भूखंडाचे लिलाव सिडकोच्या माध्यमातून अभिप्रेत असताना व दिनांक ०३/०१/२०२२ रोजी भूखंड विक्रीस स्थगिती दिलेली असताना सुद्धा नवी मुंबई मनपा नगररचना विभाग आणि सिडको यांनी संगनमताने दिनांक १४/०६/२०१९ नंतर आरक्षित भूखंडाची लिलावाद्वारे अनधिकृत विक्री करणे, सदर विकास आराखड्यामध्ये प्रकरण ९.२.६ मध्ये रेल्वे स्टेशन परिसरात उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सार्वजनिक वाहन

तळाबाबत आयआयटी, मुंबई यांनी केलेल्या सर्वेक्षण अहवालात सार्वजनिक वाहनतळ/ पार्किंग व्यवस्था वाढवण्याचे नमूद केलेले असताना देखील नेरूळ रेल्वे स्टेशन येथे तत्कालिन महासभेने मंजूर केलेल्या विकास आराखड्यामध्ये सदर भूखंड क्रमांक ३२ से. १०A हा ट्रान्सपोर्टेशन झोन असून देखील नवी मुंबई मनपाच्या नगररचना विभागाने सिडको प्राधिकरणासोबत संगनमताने सोईस्कररित्या झोन बदल करूनन रहिवास आणि वाणिज्य वापराकरिता करणे, सदर नेरूळ स्टेशन परिसरात पार्किंगची गंभीर समस्या असताना देखील नवी मुंबई मनपाच्या नगररचना विभागाने सदर भूखंडाकरिता ट्रान्सपोर्ट झोन मध्ये बदल करून रहिवास आणि वाणिज्य असा करणे, नेरूळ स्टेशन परिसरातील नागरिकांचा सदर झोन बदलास विरोध असून सदर भूखंड सार्वजनिक वाहनतळांकरिता आरक्षित ठेवण्यात यावा व या गंभीर प्रकरणात दोषी असलेले नवी मुंबई मनपाचे तत्कालिन आयुक्त व नगररचना विभागाचे अधिकारी यांच्यावर करावयाची कारवाई व उपाययोजना तसेच शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग (मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**म.वि.प. नियम ९३ च्या सूचनेस अनुलक्षून निवेदने -**

(४) सर्वश्री. विक्रम काळे व इतर वि.प.स. यांनी, “ पारगांव (ता.दौंड, जि.बीड) येथील एकाच कुटुंबातील ७ व्यक्तींचा मृतदेह आढळून येणे ” इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

(५) सर्वश्री. विक्रम काळे व इतर वि.प.स. यांनी, “ उद्योगपती, चित्रपट अभिनेते यांची घरे बॉम्बने उडविण्याच्या धमकीचा फोन नागपूर पोलिसांना येणे ” इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

(६) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, “ गोंदेगाव (जि.जळगाव) येथील कु. गौरव बोरसे याच्या मृत्यूची चौकशी करणे ” इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उप-मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

(७) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, “ अंबरनाथ (जि.ठाणे) येथील नववी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने केलेली आत्महत्या ” इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उप–मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(८) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, " मुंबई-गोवा महामार्गावर पेण येथील गोविरले फाटा येथून दापोलीहून मुंबईकडे येत असलेल्या एका कुटुंबीयांची गाडी अडवून टाकण्यात आलेल्या दरोडा " इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, " नवी मुंबईतील बेलापूर येथील विकासकाची गोळ्या झाडून केलेली हत्या " इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी, " गंगापूर तालुक्यातील कोंडापूर ते भिवधानोरा या रस्त्याचे बांधकाम " इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, " रायगड जिल्हा रुग्णालयाच्या दुरुस्तीचे काम मागील १० वर्षांपासून रखडले असणे " इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेचे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**लक्षवेधी सूचना - पुढे सुरू**

(३) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

" मौजे सेलू, ता.वाशी, जि. धाराशिव येथे गट नंबर ४४५, ४४६, ४४७ व ४६४ मध्ये मे. इंडीग्रीड कंपनी यांचा कळंब ट्रान्समिशन लि. या नावाने ४००/२०० के. व्ही. चा प्रकल्प प्रस्तावित असणे, या प्रकल्पाकरिता कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांकडून जागा खरेदी केलेली असणे, शासनाकडून जागेचा NA व लेआउट न करता कंपनीने प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरु करणे, खरेदी करण्यात आलेल्या जमिनीभोवती जबरदस्तीने वॉल कंपाउंड बांधणे, खरेदी करण्यात आलेल्या शेत जमिनीतून पिंपळगाव- सेलू सारोळा कवडेवाडी मार्गे वाशी तालुक्यात जोडणारा ६० फुटी ग्रामीण रस्ता (VR-५०) असणे, सदर रस्ता कळंब ट्रान्समिशन कंपनीने परस्पर बंद करून त्यावर खोदकाम व बांधकाम करणे, कंपनीच्या प्रस्तावित कामास ग्रामपंचायत व नागरिकांचा विरोध असणे, अनधिकृत बांधकामाबाबत जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करून देखील प्रशासनाने नागरिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे, तालुक्याला जोडणारा (VR-५०) रस्ता कंपनीने अनधिकृतपणे बंद केल्याने स्थानिक नागरिकांची प्रचंड गैरसोय होणे,

जिल्हा परिषद बांधकाम विभागाने काम बंद करण्याची नोटीस देऊन देखील कंपनीने काम बंद न करणे, कंपनीने भाडोत्री गुंडांमार्फत स्थानिकांना दमबाजी करणे, मे. इंडीग्रीड कंपनीच्या कळंब ट्रान्समिशन लि. ने बीज प्रकल्पाकरिता प्रस्तावित जमिनीचा **NA** व लेआउट न करता शासनाचा महसूल बुडवून प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरु करणे, तालुक्याला जोडणारा ग्रामीण रस्ता बंद करून स्थानिक नागरिकांना दमबाजी करणे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाने दिलेल्या नोटिशीकडे दुर्लक्ष करणे, यामुळे स्थानिक लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असंतोष व प्रकल्पास विरोध, यावर शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

" राज्यात आदिवासी बहुल भागातील आदिवासींचे ख्रिस्ती धर्मात आणि राज्यातील मुली अणि महिला यांना फसवून त्यांचे इस्लाम मध्ये धर्मांतर करण्याचे षडयंत्र गेली अनेक दशके प्रचंड मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे निदर्शनास येणे, नुकतेच लव्ह जिहाद मधून घडलेल्या आफताबच्या केसमध्ये भयावह गोष्टी देशासमोर येणे, अशा घटनांचे तक्रार, निवेदनांवर पोलीस प्रशासनाकडून जलदगतीने कारवाई होत नसणे, मात्र धर्मांतराच्या प्रकरणी तत्परतेने अटक होऊन संबंधितांवर कारवाई होण्याच्या घटना अत्यल्प असणे, नुकतेच पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील एका आदिवासी महिलेने धर्मांतराच्या उद्देशाने आलेल्या चार ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, पोलीस प्रशासनाची निष्क्रियता, भ्रष्टाचार, पीडितांनी पुढे येणे, लढयासाठी लागणारे मनोधैर्य, पैसा आणि पुढाकार आदी अनेक गोष्टी आरोपींना शिक्षा होणे किंवा न होणे यासाठी कारणीभूत असल्या तरी कायदा झाल्यामुळे पीडितांना आपल्या पाठीशी कायदा आहे असे नैतिक पाठबळ असणे हे पाठबळ त्यांना अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यास आणि धर्मांतर करणाऱ्यावर वचक बसवण्यास निश्चितपणे उपयोगी ठरण्याची आशा असणे, हिंदू व आदिवासी बांधवांच्या दृष्टीने धर्मांतराचा कायदा हा अनन्यसाधारण महत्त्वाचा असणे, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडीसा, गुजरात आणि हिमाचल प्रदेश या राज्यात धर्मांतर विरोधी कायदा अस्तित्वात असणे, त्यामुळे याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील वाढत्या धर्मांतर व लव्ह जिहादच्या घटनांना आळा घालण्यासाठी धर्मांतर विरोधी कायदा लागू करून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, अशी मागणी देखील राज्यात विविध ठिकाणी निघालेल्या मोर्चे, आंदोलनातून केली जात असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(९) श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

" पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात नीरा देवघर प्रकल्पामधील शिल्लक राहणाऱ्या किंवा बचत झालेल्या पाणी साठयामधून कायमस्वरुपी दुष्काळी असलेल्या सांगोला, खंडाळा, पंढरपूर, फलटण आणि माळशिरस तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना प्रत्येकी ०१ टी.एम.सी. असे एकूण ०३ टी.एम.सी. पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे नातेपुते येथून नीरा उपसा कालव्यात सोडण्यात यावे अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधी व जनतेने केलेले असून ही मागणी वाढत असणे, त्याचप्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून नीरा देवघर प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रकल्पास मिळालेली मान्यता, नीरा देवघर प्रकल्पातून धोम बलकवडी प्रकल्प चारमाही ऐवजी आठमाही करण्याकरिता लागणारे ०.९३ टी.एम.सी. पाणी उपसा सिंचन योजनेतून देणे गरजेचे असणे, सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षाचे निधी नियोजन पूर्ण झालेले असून रु.३,९७६.८३ कोटी इतक्या रकमेची सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक ३१ जानेवारी, २०२३ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळालेली असणे, निधी उपलब्धतेनुसार रु.१००० हजार कोटींच्या कामांच्या तात्काळ निविदा काढण्यास मान्यता मिळणे आवश्यक असणे, तरच प्रकल्पाचे उर्वरित ३५ टक्के काम जलद गतीने पूर्ण होण्यास मदत होणार असून फलटण, खंडाळा, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यातील दुष्काळी भागातील गावांना न्याय मिळावा यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

उप मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१०) सर्वश्री. सतिश चव्हाण व विक्रम काळे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना –

श्री. सतिश चव्हाण, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले -

" वाळुंज महानगर (छत्रपती संभाजीनगर) परिसरात औद्योगिक वसाहतीमुळे परिसराचा झपाट्याने विकास होऊन देशभरातून नोकरी व व्यवसायासाठी लाखो नागरिक स्थायिक झाले असणे, त्यामुळे परिसरातील शेतकरी व खाजगी विकासकांनी स्वतःच्या जमिनीवर प्लॉटींग करून जमिनी विकसित केल्या असणे, वाळुंज परिसरातील स्थायिक झालेल्या नोकरी/व्यवसाय निमित्त आलेल्यांनी जागा घेऊन घरे बांधली परंतु नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी दिनांक १२ जुलै २०२१ अन्वये तुकडा बंदीचा आदेश पारित केला असणे, सर्वसामान्य कामगार, मजूर इत्यादींना घर घेण्याचे व शेतकऱ्यांच्या जमिनी

विकसीत करण्याचे स्वप्न भंगले असणे, सदर तुकडा बंदी विरोधात शेतकरी व विकासकांनी उच्च न्यायालय, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आव्हान दिले असणे व न्यायालयाने दिनांक ५ मे, २०२२ रोजी नोंदणी महानिरीक्षक यांचा तुकडा बंदीचा आदेश रद्द ठरवून दस्तनोंदणी करण्याचे आदेश दिले असणे, उच्च न्यायालयाचा आदेश शासनाने अद्याप मान्य न केल्याने व त्यावर कोणतीही सकारात्मक कार्यवाही न झाल्याने दस्तऐवज नोंदण्या रखडल्या असणे, ज्या नागरिकांनी भूखंड घेतला तो त्यांच्या नावावर होत नसणे, तर सर्वसामान्य नागरिकांस भूखंड घेता येत नसणे, उच्च न्यायालयाच्या दिनांक ०५ मे २०२२ च्या आदेशानुसार शासनाने तात्काळ कार्यवाही करून दस्तऐवज नोंदण्या करण्यासाठी मान्यता देण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(११) श्री. सुरेश धस, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधले –

“ राज्यात दूध व दारुमध्ये भेसळ करण्याचे सातत्याने आढळून येत असलेले प्रकार, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामध्ये दूध उत्पादन हा शेतकऱ्यांचा जोडधंदा असून सुमारे सव्वादोन लाख लिटर दूध उत्पादन होत असणे, आष्टी शहरातील संभाजीनगर भागात जगदंबा मिल्क ॲण्ड प्रॉडक्टस् यांच्या मालकीचे घर मागील एक महिन्यापासून भाडे तत्वावर दिले असल्याचे निदर्शनास येणे, या घरात १३२ गोण्या पावडर, रसायन आणि २२० पाम तेलाचे डबे जप्त करण्यात येणे, या प्रकरणी जगदंबा मिल्क दुकानाचे मालक यांच्यावर गुन्हा दाखल झाला असणे, तसेच अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे एका घरात बनावट दूध तयार करण्याचे साहित्य ठेवत असल्याचे निदर्शनास येणे, दररोज सुमारे ३० हजार लिटर बनावट दूध तयार होत असल्याची बाब निदर्शनास येणे, दिनांक १६/३/२०२३ रोजी २५ किलो क्षमतेच्या एका उघडलेल्या बॅगमध्ये २१ किलो व्हेपरमिटे पावडरचा साठा व ४० लिटर क्षमतेच्या प्लॅस्टिक व कॅनमध्ये ३५ लिटर लाईट लिक्विड पॅराफिनचा साठा आढळल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात एफआयआर नोंद असणे, परिणामी आष्टी तालुक्यात सर्वसाधारण नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र भीती व संतापाची लाट, अशाप्रकारे राज्यात दारु व दुधामध्ये भेसळीचे प्रकार मागील काही वर्षांपासून सातत्याने सर्रास सुरु असल्याचे निदर्शनास येणे, या प्रकारामुळे राज्यातील अनेकांच्या विशेषतः बालकांच्या जीवितास नाहक धोका निर्माण होणे, काही प्रकरणी निष्पाप व्यक्तींचे बळी जाणे इ.प्रकार आढळून येणे, ही बाब गंभीर असल्याने याबाबत कठोर कारवाई होण्याच्या दृष्टीने अन्न भेसळ अधिनियम महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात या गुन्ह्याबद्दल अधिक कठोर शिक्षेची तरतूद करण्याची आवश्यकता, आष्टी तालुक्यात नुकत्याच घडलेल्या दूध भेसळीच्या वरील प्रकाराची तातडीने चौकशी करण्याची व दोषींना कठोर शिक्षा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.”

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी, " H3N2, H1N1 आणि कोविड-१९ च्या अनुषंगाने करण्यात आलेल्या उपाययोजना " इ.बाबत म.वि.प. नियम ४६ अन्वये निवेदन केले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी ४ वाजून २४ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक सायं. ५.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**लक्षवेधी सूचना– पुढे सुरू**

(६) श्री. आमश्या पाडवी, ॲड.अनिल परब, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना -

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

" मे. मैनदिप एंटरप्रायजेस कंपनीने मेहबूब स्टुडिओ जंक्शन, वांद्रे-प. येथे सन २०१८ साली केलेल्या खराब कामासाठी मुंबई महानगरपालिकेच्या रस्ते विभागाने सदर कंपनीचा ५ वर्षासाठी काळया यादीत समावेश केलेला असणे, परंतु सदर कंपनीचा काळ्या यादीतील समावेश कोणत्याही कारणाशिवाय ५ वर्षे ऐवजी ३ वर्षे इतका कमी केलेला असणे, सदर कंपनी नालेसफाई व मिठी नदी साफसफाईच्या कामासाठी पात्र होणे, सदर कंपनीचा पूर्वेतिहास पाहता सदर कंपनीस मिठी नदीच्या साफसफाईच्या कामासाठी महापालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात येणे, परंतु तरीदेखील सदर कंपनीने मिठी नदी सफाईच्या नुकत्याच जाहीर झालेल्या निविदेसाठी निविदा भरणे, नव्या निविदा भरण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करणे, सदर कंपनीने मूळ उत्पादक कंपनी ही नेदरलँडस्थित मोबॅर्न असतांना क्लिनटेक इन्फ्रा या कंपनीला मूळ उत्पादक कंपनी दाखवून त्यांचे बनावट हमीपत्र सादर करणे, पर्जन्य जलवाहिनी विभागातील अधिकाऱ्यांनी सदर कंपनीला अपात्र करण्यासाठी अहवाल सादर केलेला असतांना त्याच विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कंपनीशी संगनमत करून सदर कंपनीला पात्र करण्यासाठी अपात्र अहवाल दुर्लक्षित करून पात्र करणे, सदर कंपनीबाबत बनावट कागदपत्रांच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असतांनादेखील कोणतीही चौकशी न करता सदर कंपनीचा बचाव करणे, अशा गैरप्रकारामुळे महानगरपालिकेची आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी होण्याची शक्यता असणे, याबाबत शासनाने तातडीने योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**५. (क) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे –**

उप मुख्यमंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १६ द्व महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः सभागृहाला सादर करण्यात आले.

खंड २ व ३, अनुसूची, खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

**म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू**

सर्वश्री प्रविण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, " मुंबईला आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा प्राप्त करून देणे " इ.बाबतचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव, तसेच

प्रा.राम शिंदे व इतर वि.प.स. यांचा, " पुणे-नाशिक शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या विकास आरखड्यास गतिमान करण्याची आवश्यकता " इ.बाबत म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू)

उपरोक्त प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले.

(१) प्रा. राम शिंदे

(२) श्री. अंबादास दानवे

(३) श्री. शशिकांत शिंदे

(४) श्रीमती उमा खापरे

(५) श्री. सुनील शिंदे

(६) श्री. श्रीकांत भारतीय

(७) श्री. प्रसाद लाड (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**शासकीय विधेयके – पुढे सुरू**

(घ) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे.

शालेय शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ – पंढरपूर मंदिरे (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**विशेष उल्लेखाच्या सूचना -**

गुरुवार, दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी मान्य केलेल्या म.वि.प. नियम १०१ (अ) अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

MIT School of Government, Pune या संस्थेतर्फे दिनांक १५ ते १८ जून, २०२३ या कालावधीत मुंबईतील जीओ वर्ल्ड सेंटर येथे पहिल्या राष्ट्रीय विधिमंडळ संम्मेलन उपस्थित राहण्यासंबंधी माननीय उप सभापतींनी खालील घोषणा केली -

“ सदनातील उपस्थित असलेल्या माननीय मंत्री महोदयांना आणि सर्व सन्माननीय सदस्यांना विदितच आहे की, MIT School of Government, Pune या संस्थेतर्फे भारतातील संसदीय लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी भारतीय छात्रिय संसदेसारखे विविध उपक्रम राबविले जातात. सर्व समाज घटकांचा लोकशाही प्रक्रियेत सहभाग वाढावा आणि निर्णय प्रक्रिया सर्व समावेश व्हावी या दृष्टीने अशा उपक्रमांचे महत्त्व आणि योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे. मला आपणास कळविण्यात आनंद होत आहे की, या संस्थेतर्फे दिनांक १५ ते १८ जून, २०२३ या कालावधीत मुंबईतील जीओ वर्ल्ड सेंटर येथे पहिल्या राष्ट्रीय विधिमंडळ संम्मेलनाचे “ First National Legislators Conference. ” आयोजित करण्यात आले आहे. देशातील सर्व राज्य विधिमंडळातील सन्माननीय सदस्य या परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या सम्मेलनामुळे संसदीय लोकशाही बळकट होण्यास मदत होईल. हे संम्मेलन महाराष्ट्र राज्यात होत असल्यामुळे आपण सर्वांनी राष्ट्रीय विधिमंडळ सदस्य (विधायक) संम्मेलनात सहभागी व्हावे ”

**म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू**

सर्वश्री प्रविण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, “ मुंबईला आंतरराष्ट्रीय शहराचा दर्जा प्राप्त करून देणे ” इ.बाबतचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव, तसेच

प्रा.राम शिंदे व इतर वि.प.स. यांचा, “ पुणे-नाशिक शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या विकास आरखड्यास गतिमान करण्याची आवश्यकता ” इ.बाबत म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू)

उपरोक्त प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला–

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी आपले भाषण पूर्ण केले.

(८) श्री. सचिन अहिर (९) श्री. अमोल मिटकरी

(१०) श्री. गोपिचंद पडळकर

या दोन्ही प्रस्तावांवरील चर्चा झाली असून या प्रस्तावांवर माननीय उप मुख्यमंत्री शनिवारी उत्तर देणार आहेत असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक रात्री ९ वाजून २७ मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी १०.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.

**शुक्रवार, दिनांक २४ मार्च, २०२३**

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी १० वाजता माननीय तालिका सभापती श्री. नरेंद्र दराडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

१) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

“ देहू रोड (जि.पुणे) येथील दारुगोळा कारखान्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कारखान्याच्या सीमा भिंतीपासून १.८२ किलोमीटर (२००० यार्डस) अंतरामधील क्षेत्र हे संरक्षित ना-विकास क्षेत्र (रेड झोन) म्हणून कायम करण्याबाबत संरक्षण विभागाच्या बोर्ड ऑफीसरच्या बैठकीत शिफारस करण्यात येणे, त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील भागाचा नव्याने ना-विकास क्षेत्रात (रेड झोन) समावेश होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विकास योजना तयार करतांना रावेत आणि किवळे या गावांचा चिखली तळवडे या समाविष्ट गावांमध्ये संरक्षण खात्याच्या मागणीप्रमाणे संरक्षित क्षेत्र प्रस्तावित केले असणे, मात्र त्यावेळी रावेत आणि किवळे येथील क्षेत्राबाबत देहू रोड दारुगोळा कारखान्याकडून कोणतीही हरकत घेतली नसल्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडून सदर क्षेत्र निवासी प्रयोजनासाठी प्रस्तावित करण्यात आले असणे, तसेच २००० यार्डस पर्यंत हद्द कायम केल्यास निम्म्याहून अधिक पिंपरी-चिंचवड शहर (रेड झोन) बाधित होणार असणे, त्यामुळे भविष्यात सदर भागात कोणताही विकास होणार नसून गत अनेक वर्षांपासून हद्द कमी करण्याची मागणी करणाऱ्यांवर अन्याय होणार असणे, सदर प्रकरणी राज्य शासनाने मा.संरक्षण मंत्री, भारत सरकार महोदयांकडे बैठक घेऊन बाधित क्षेत्रातील नागरिकांना दिलासा देण्याची स्थानिकांकडून मागणी होत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. राजहंस सिंह, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

“ मुंबई शहराच्या १ कोटी ३० लाख लोकसंख्येकरीता ३ हजार ८५० एमएलडी पाणी पूर्तता केली जात असणे, सन २०४१ पर्यंत मुंबई शहराची लोकसंख्या १ कोटी ७० लाखांपर्यंत जाण्याची शक्यता असणे, त्यावेळी मुंबई शहराला प्रतिदिन ६५३५ एमएलडी पाण्याची आवश्यकता राहील याचा अंदाज करून, त्यानुसार मुंबई शहराची पाणी समस्या सोडविण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता असणे, मुंबई शहराकरिता पाणीपुरवठा करणारे तानसा, मोडक सागर, अप्पर वैतरणा, मध्य वैतरणा व भातसा धरण हे १५० कि.मी. दूर अंतरावर असल्यामुळे २० ते २५ टक्के पाणी गळती व पाणी चोरी होत असणे, त्यामुळे मुंबई शहराला अपुरा पाणीपुरवठा होणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील अधिकारी आणि पाणी माफीयांचे संगनमत असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली असणे, सदर प्रकारास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने भविष्यात उद्‌भवणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठ्याच्या समस्यांचे कायमस्वरुपी निवारण करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री. अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, राजेश राठोड, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

“ गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड येथे भारतातील सर्वात चांगल्या प्रतिचे लोह खनिजाचे उत्खनन केले जाणे, परंतु गेल्या १५-१६ वर्षांपासून या प्रकल्पाच्या कार्यपध्दतीवर स्थानिक प्रशासनाच्या भूमिकेनुसार व कराराप्रमाणे कोनसरी येथे भिलाई स्टील प्लॅन्टच्या धर्तीवर त्यापेक्षा जास्त क्षमतेचा पोलाद कारखाना सुरू करण्याच्या शासनाच्या भूमिकेबाबत सर्वसामान्य जनतेमध्ये शंका निर्माण होणे, ठेका दिलेल्या कंपनीने किती उत्खनन केले, कराराप्रमाणे किती स्थानिक युवकांना रोजगार दिला व शासनाला या प्रकल्पामधून नेमका किती महसूल प्राप्त झाला यातत समन्वय नसणे, उलट नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून शासनाच्या वतीने करार केलेल्या कंपनीला व त्यांच्या अधिकाऱ्याला मोठ्या प्रमाणात सुरक्षा देऊन करारापेक्षाही अधिक प्रमाणात, अवैध उत्खनन करण्याचे काम तेथे सुरू असणे, उच्चप्रतीचे लोह खनिज गडचिरोली जिल्ह्यात आढळल्याने तेथील अवैध उत्खननास स्थानिक प्रशासन व शासन मदत करतेय अशी भावना स्थानिक आदिवासींमध्ये निर्माण होणे, त्यासाठी कोनसरीचा प्रकल्प लवकरात लवकर व्हावा व स्थानिक युवकांना

रोजगार मिळावा, सुरजागड प्रकल्पाच्या उत्खननाकरिता करार झालेल्या कंपनींच्या सी.एस.आर. चा निधी हा स्थानिक विकासाकरिता उपयोगी होणे तसेच कंपनीद्वारे अवैध उत्खनन थांबविण्याकरिता जिल्हाधिकारी कार्यालय स्तरावर संगणक व सॉफ्टवेअर प्रणालीद्वारे डॅशबोर्ड तयार करून व जी.पी.एस. आणि सी.सी.टिव्ही कॅमेऱ्याच्या मदतीने उत्खननाचे कार्य वैधरित्या व्हावे, याकरिता शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ”

बंदरे आणि खनिकर्म मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाज पत्रिकेत क्रमांक ०४ वर दर्शविलेली अर्धा तास चर्चेची सूचना सन्माननीय सदस्य श्री. अमोल मिटकरी यांची आहे. परंतु सन्माननीय मंत्री श्री. गुलाबराव पाटील यांनी याबाबत ही अर्धा तास चर्चेची सूचना पुढे घ्यावी, असे पत्र दिलेले आहे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, सदर अर्धा तास चर्चेच्या सूचनेबाबत एक स्वतंत्र बैठक लावावी, अशी विनंती केली.

याबाबत संबंधित मंत्रिमहोदयांना अवगत करण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

४) श्री. सचिन अहिर, सुधाकर अडबाले, राजेश राठोड, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

“ चुनाभट्टी (मुंबई) येथील टाटानगर इमारत वसाहतीमध्ये १२२ कुटुंबे २१ वर्षांपासून वास्तव्यास असणे, सदर ठिकाणची स्वदेशी मिल दिवाळखोरीत गेल्याने मिल बंद असणे, मिल बंद असल्याकारणामुळे टाटानगर इमारत वसाहतीची देखभाल, डागडुजीची कामे बंद असणे, त्यामुळे जीर्ण झालेल्या इमारतींवर मोठ्या प्रमाणावर झाडे-झुडपे वाढून इमारतींची दुरवस्था झाली असणे, इमारतींवर वाढलेल्या झाडा-झुडपांमुळे इमारतींचा भाग वारंवार कोसळत असणे, पावसाळ्यातही पावसाचे पाणी घरात येऊन इमारत परिसरात वारंवार शॉर्टसर्किट चे प्रकार होत असणे, याप्रकरणी तेथील रहिवाशांनी शासनाकडे अनेकदा तक्रारी करूनसुध्दा शासनाकडून दखल घेतली जात नसणे, त्यामुळे दुरवस्थेतील सदर इमारत कोसळण्याची शक्यता निर्माण होऊन रहिवाशांच्या जीवितास धोका निर्माण झाला असणे, याबाबत शासनाने चौकशी करून टाटानगर इमारत वसाहतीची तात्काळ देखभाल, दुरुस्ती अथवा पुनर्बांधणी करण्याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५) सर्व श्री. विलास पोतनीस, सुनिल शिंदे, ॲड. अनिल परब वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

" मुंबई शहरात वाढत्या संसर्गजन्य साथीच्या आजारावरील उपचारासाठी रुग्णांना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १२० वर्षे जुन्या कस्तुरबा रुग्णालयावर अवलंबून राहावे लागत असणे, सन १८९२ मध्ये बांधलेल्या कस्तुरबा रुग्णालयात सर्व प्रकारच्या संसर्गजन्य आजारांवर उपचार देण्यासाठी स्वतंत्र कक्षाची व्यवस्था असणे, संसर्गजन्य आजार इतर रुग्णांना होऊ नये, याकरिता विशेषतः कस्तुरबा रुग्णालयाची निर्मिती करण्यात आलेली असणे, गत वर्षात कोरोना, स्वाईन फ्ल्यू, कावीळ, मलेरिया, कुष्ठरोग, कांजण्या, गोवर, क्षयरोग, अतिसार व इबोला यांसारख्या आजारांनी ग्रस्त रुग्णांवर कस्तुरबा रुग्णालयात प्रभावी उपचार करण्यात आले असणे, तसेच मुंबईसह राज्यात वाढत्या गोवर साथीत बाधित रुग्णांवर कस्तुरबा रुग्णालयाकडून चांगल्याप्रकारे उपचार करण्यात येणे, मुंबई शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबई शहरातील वाढत्या संसर्गजन्य आजारांवर उपचार करण्यासाठी स्वतंत्र रुग्णालय नसल्याने अनेक रुग्णांना कस्तुरबा रुग्णालयातच उपचारासाठी पाठविण्यात येणे, त्यामुळे कस्तुरबा रुग्णालयातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत असणे, त्याकरीता मुंबईत साथीच्या आजारावर उपचार करण्यासाठी आणखी एक स्वतंत्र रुग्णालय उभारण्याची आवश्यकता असणे, तत्कालीन शासनाच्या काळात मुलुंड येथे विशेष रुग्णालय उभारण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, त्यामुळे मुंबई उपनगरात संसर्गजन्य आजारावर उपचार करण्यासाठी कस्तुरबा रुग्णालयाच्या धर्तीवर एक स्वतंत्र रुग्णालय उभारण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

अर्धा-तास चर्चा संपली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेत माननीय उप सभापतींचे नाव न छापणे, " इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्याबाबत सर्वश्री शशिकांत शिंदे, सचिन अहिर, प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी आपले मत मांडले.

उद्योग मंत्र्यांनी, याबाबत स्पष्ट निर्देश असतानाही अशी पत्रिका का छापली याची चौकशी केली जाईल, असे सांगितले.

सभागृहात गोंधळ सदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज १२ वाजेपर्यंत स्थगित करित असल्याचे माननीय उप सभातींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सकाळी ११ वाजून १३ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजता पुन्हा सुरू झाली.

**१.** (अ) अल्पसूचना प्रश्न क्रमांक १८७७६ चे उत्तर देण्यात आले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, " महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्याच्या निमंत्रण पत्रिकेत माननीय उप सभापतींचे नाव न छापणे, " इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्यावर आपले म्हणणे मांडले.

वने मंत्री तसेच उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, " विधान भवन परिसरात राहुल गांधी यांच्या प्रतिमेबाबत घडलेली घटना, " इ. बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला.

डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, " स्थानिक कार्यक्रम पत्रिकांमध्ये विधान परिषद सदस्यांची नावे नसणे, " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला.

(ब) सहा तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(क) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, " लक्षवेधी सूचनेदरम्यान ठाणे महानगरपालिकेच्या उप आयुक्तांना दुपारी १२ वाजेपर्यंत पदभार मुक्त करण्याचे निर्देश असताना त्यावर कोणतीही कारवाई न होणे, " इ. बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

उद्योग मंत्र्यांनी याबाबत योग्य ती कारवाई करावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(ड) " मराठवाड्यातील वृक्ष लागवड योजनेची चौकशी करण्याबाबत " या विषयावरील सर्वश्री अब्दुल्लाखान दुर्राणी, शशिकांत शिंदे व अमोल मिटकरी, वि.प.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १७२०० ला दिनांक २३ मार्च, २०२३ रोजी अनुपूरक प्रश्नोत्तराच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

(इ) अतारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या क्रमांक १२ ते १५ सभागृहाच्या पटलावर ठेवल्या.

**२.** १) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, (मुख्यमंत्र्यांकरिता), राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोग यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, (उपमुख्यमंत्र्यांकरिता), क) लिंगभाव अर्थसंकल्प विवरणपत्र (Gender Budget Statement) व बाल अर्थसंकल्प विवरणपत्र (Child Budget Statement) २०२३-२०२४ हे प्रकाशन, तसेच ख) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवले.

३) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षांचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**३.** १) श्री अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, " शासकीय, निमशासकीय स्तरावर दिव्यांगांना मिळणारे आरक्षण पुरेसे नसणे, " इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. तालिका सभापतींच्या निदेशानुसार अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी, " राज्यातील जिल्हा परिषदेतील शाळांना शिक्षकांच्या पगारासाठी निधी उपलब्ध करून देणे, " इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. तालिका सभापतींच्या निदेशानुसार ग्राम विकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी, " सातारा जिल्ह्यातील खटाव तालुक्यामध्ये पुसेगाव निडळ येथे एसआयडीसीची स्थापना करणे, " इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. तालिका सभापतींच्या निदेशानुसार उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

श्री. सचिन आहिर, वि.प.स. यांची म.वि.प. ९३ अन्वये अल्पसूचना क्रमांक ४५ उद्या चर्चेला घेतली जाईल, असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

४) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " गोवंडी येथील रहिवाशी कामा रुग्णालय, मुंबई येथे उपचाराकरिता दाखल असताना झालेला मृत्यू, " इ.बाबत दिलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून मा. तालिका सभापतींच्या निदेशानुसार ग्रामविकास मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, तसेच श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम ९३ अन्वयेची निवदेने पुढे ढकलण्याची विनंती केली असून ती उद्याच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात येतील, असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

**४.** १) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" मुंबई उपनगरातील कांदिवली, ता.बोरीवली येथील क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेच्या प्रस्तावाबाबत एल्टी गीजे सी.एच.एस कडून दिनांक ०५/१२/२०२२ आणि दिनांक ०१/०२/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार आणि दिनांक ०५/१२/२०२२ रोजी महापालिका आयुक्तांना उद्देशून लिहिलेल्या पत्रानुसार सोसायटी किंवा जि.बी.आर. (जनरल बॉडी रिझोल्यूशन) यांच्या संमती आणि पुष्टीशिवाय सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी क्लस्टर डेव्हलपमेंट स्कीम सादर केली

असणे, ज्यात एल्टी गीजे सी.एच.एस. समाविष्ट असणे, सोसायटीने दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी उपमुख्य अभियंता इमारत प्रस्ताव (आर-सेंट्रल) डब्ल्यू.एस. II कडे चुकीच्या पद्धतीने सादर केल्याबद्दल आक्षेप घेतला असणे, सोसायटीचा लेखी आक्षेप असूनही डीवायसीई डब्ल्यू. एस. II- आर-सेंट्रल ने सीडीएस प्रस्ताव एम.सी.जी.एम. आयुक्तांकडे पाठवला असणे, उच्चाधिकार समितीने आपल्या दिनांक ११/०१/२०२३ च्या बैठकीत हा प्रस्ताव मान्य करून, सोसायटीच्या आक्षेपानंतरही प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला असणे, एल्टी गीजे सी.एच.एस सोसायटीमध्ये १७२ सदस्य असून मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने माहे मे, २०२२ मध्ये लबाडीने आणि चुकीच्या हेतूने ३८ सभासदांकडून परस्पर संमती मिळवून त्यांना कोणत्याही अधिकाराशिवाय आणि सोसायटीच्या जनरल बॉडी ठरावा शिवाय पाठिंबा दिलेला असणे, (३८ सभासदांपैकी ६ सदस्यांनी त्यांची संमती काढून घेतली असणे) संमतीचे उघड निरीक्षण केल्यावर हे स्पष्टपणे उघड होते की एस.जी.एम. किंवा इतिवृत्तांचे तपशील हेतुपुरस्सर रिक्त सोडले गेले असणे, कारण अशी कोणतीही मिनिटे/ठराव मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाजूने वैयक्तिक संमतीच्या अंमलबजावणीसाठी मंजूर केलेला नसणे, सदस्यांची किमान ५१% संमती मिळवल्याशिवाय, डेप्युटी सी.एच.ई. (बी.पी.) डब्ल्यू.एस. II सी.डी.एस. मध्ये असा प्रस्ताव कसा स्वीकारू शकत नाही, तरीही सदरीलल प्रस्ताव उच्चाअधिकार समितीमध्ये मंजूर केला असणे, सदरील इमारत ही जीर्ण अवस्थेत असल्याने या क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्रस्ताव तात्काळ थांबविण्यात येऊन मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने सादर केलेल्या त्यांच्या या प्रस्तावातून एल्टी गीजे सी.एच.एस. ला काढून टाकण्याबाबतत तसेच कांदिवली, ता.बोरिवली येथील सी.टी.एस. क्रमांक ४/१० (पी.टी.) असलेल्या भूखंडाचा समावेश करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

२) श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरच्या धर्तीवर बँगलोर-मुंबई आर्थिक कॉरिडॉर (BMEC) अंतर्गत सातारा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या औद्योगिक वसाहती विकसित करण्याचा राज्य शासनाचा मानस असणे, त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (MIDC) भूसंपादन कार्यवाही सुरु होणे, राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रम (NICDC) अंतर्गत केंद्र शासनाच्या समितीने तांत्रिकदृष्टया सातारा जिल्ह्यातील उत्तर कोरेगाव मधील जागा पात्र ठरलेली असणे, उत्तर कोरेगाव भाग राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ पासून ४ किमी अंतरावर पुणे-कोल्हापूर रेल्वे महामार्गापासून ६ किमी अंतरावर पुरंदरचा प्रस्तावित विमानतळ व लॉजिस्टीक पार्क ५० किमी अंतरावर त्याचप्रमाणे पुणे-बँगलोर ग्रीन-फिल्ड हायवे

पासून ५ ते १० किमी अंतरावर असणे, उत्तर कोरेगाव भागात वीज व पाण्याची सहज असलेली उपलब्धता, त्याचप्रमाणे पुणे-मुंबई या मेट्रोसिटी पासून अगदी जवळ असल्याने ट्रान्सपोर्ट व्यवस्था तसेच कुशल व अकुशल कामगारांची उपलब्धता असणे, उत्तर कोरेगाव मधील शासनाने निवडलेली सोळशी, नायगाव, रणंदुल्लाबाद, नांदवळ, पिंपोडे, भावेनगर व तडवळे या सर्व गावातील ७० टक्के पेक्षा जास्त शेतकरी औद्योगिक वसाहतीसाठी जमीन देण्यासाठी तयार असणे, या प्रकल्पासाठी एकूण १२,२३८ एकर जागा लागणार असणे, त्यापैकी पहिल्या टप्प्यात ८,००० एकर जागा उत्तर कोरेगाव मधील शेतकरी या प्रकल्पासाठी जमीन द्यायची तयारी दर्शविणे, उत्तर कोरेगाव मधील लॉजिस्टीक किंमत देशाच्या सरासरी लॉजिस्टीकच्या किंमतीपेक्षा १३ टक्के पेक्षा कमी असल्याने उत्पादन खर्चात घट होणार असणे, या प्रकल्पामध्ये GDP मध्ये वाढ होण्यास मदत होणार असणे, बँगलोर-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी कोरेगाव येथील जागा निवडीबाबत माहे जुलै, २०२२ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या दिल्ली येथील ऑनलाईन बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी उत्तर कोरेगाव या भागासाठी सहमती दर्शविणे, असे असतांना या प्रकल्पाचे काम पुढे नेण्यास उशीर झालेला असणे, त्यामुळे उत्तर कोरेगाव मधील जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजी आणि संतापाची भावना, हा प्रकल्प सुरु व्हावा यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

३) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ नवी मुंबई प्रकल्पासाठी राज्य शासनाने नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको महामंडळाची स्थापना करणे, नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासाबरोबरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, नवी मुंबई मेट्रो, नैना प्रकल्पांसारख्या महत्वाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी सिडकोवर सोपविण्यात येणे, सद्य:स्थितीत नवी मुंबईच्या कार्यक्षेत्रामध्ये नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकांची स्थापना झाल्यानंतरही काही नोडसाठी सिडको हे नियोजन प्राधिकरण असणे, नवी मुंबईतील जमीन सिडको महामंडळाने भाडेपट्ट्याने वाटप केलेल्या जमिनीच्या विकासकांशी विविध बाबींवर चर्चा करून बांधकाम व्यवसायांशी संबंधित अडचणींबाबत निर्णय घेण्यासाठी शासनाने माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये समिती गठित करणे, उक्त समितीने १२.५ टक्के योजनेंतर्गत वाटप केलेल्या भूखंडावर येणारी मोठ्या प्रमाणातील मावेजा रक्कम व त्यानुषंगाने बांधकाम मुदतवाढीसाठी वाढणारे अतिरिक्त भाडेपट्टा शुल्काबाबत, अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) आकारणीसाठी ११५ टक्के पर्यंतच्या दराबाबत, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला वास्तुविशारद यांनी प्रमाणित केल्यानंतर अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) आकारण्याबाबत निर्णय

घेऊन समितीने तीन महिन्यात शासनास अहवाल करणे शासन निर्णयामध्ये नमूद असतांना देखील अद्याप समितीने अहवाल शासनास सादर न करणे, रेडीरेकनर दरानुसार टेंडर प्लॉटट मूळळ रक्कमेच्या तीन ते चार पट अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आकारण्यात येत असणे, २०१७ पर्यंत सिडको व विकासकांमध्ये होणाऱ्या करारनाम्यानुसार अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क ४० टक्के (ALP) आकारण्यात येत असणे, परंतु सन २०१७ नंतर त्यामध्ये ११५ टक्के पर्यंत वाढ करणे, सद्य:स्थितीत लागू करण्यात आलेल्या धोरणानुसार मूळ भूखंडाच्या किंमतीच्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) १२ वर्षापर्यंतच्या कालावधीपर्यंतचे मूल्य ६२५ टक्के होत असल्याने ही बाब आर्थिकदृष्टीने अव्यवहार्य असणे, त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र (OC) मिळणेस विलंब होत असल्याने विकासक आणि सदनिकाधारकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, सिडको आकारत असलेले अतिरिक्त भाडे शुल्क भूखंडाच्या मूळळ किंमतीपेक्षा जास्त वाजवी दराने न आकारता सवलतीच्या दराने आकारण्यात यावा अशी होत असलेली मागणी, अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) चे धोरण सिडको क्षेत्राव्यतिरिक्त इतर कुठेही नसणे, विकासक व सदनिका धारकांना दिलासा देण्याकरिता वर नमूद बाबींबाबत सर्वसमावेशक धोरण जाहीर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

४) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ मुंबई शहरातील शेकडो कबुतर खाने विना परवानगीने सुरु असल्याची बाब माहे मार्च, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या कबुतरखान्यांची रितसर परवानगी महापालिकेकडून घेणे आवश्यकता असतानाही विना परवाना हे कबुतरखाने सर्रास सुरु असणे, मुंबई शहरातील काही कबुतर खान्याला हेरिटेज दर्जा प्राप्त असून हे कबुतरखाने पाहण्यासाठी देश विदेशातून अनेक पर्यटक येत असतानाही याची नोंद महापालिकेकडे नसणे म्हणजे आश्चर्य व्यक्त होत असणे, कबुतरांना उघडल्यावर खाद्यपदार्थ टाकल्यास राज्यातील इतर महानगरपालिका दंड आकारत असतानाही मुंबई महापालिकेचे याकडे कोणतेही लक्ष नसणे, त्यातच मुंबईतील लाखो नागरिकांना श्वसनाच्या आजाराचा सामना करावा लागतो त्यासाठी कबुतराच्या अतिवावर असलेल्या परिसरातील नागरिकांचा त्यात समावेश असतानाही महापालिका आणि राज्य शासन नागरिकांना श्वसन विकाराचा त्रास होऊ नये यासाठी कोणतीच उपाययोजना करीत नसणे, त्यासाठी राज्य शासन आणि मनपाने संयुक्त मोहीम राबवून या कबुतरखान्यांना रितसर परवानगी द्यावी आणि त्यांच्यापासून श्वसन विकार व इतर आजार होणार नाही याची दखल मुंबईतील नागरिक घेत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

५) श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे इतर मागास व बहुजन कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

" इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या राज्यात ९७६ आश्रमशाळा कार्यान्वित असून वारंवार उच्च न्यायालयाचे आदेश होऊनही व दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ च्या विधि व न्याय विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे एकाला दिलेला न्याय त्याच संवर्गातील इतरांना लागू होतो व राज्य घटनेच्या " समान काम समान वेतन " या राज्यघटनेने दिलेल्या अधिकारावर बाधा येत असून इतर अक्षीकांना लाभ दिला जात असणे, तथापि १५८ वसतिगृह अधीक्षकांना ४२०० ग्रेड पे लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याचे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच आदिवासी विकास व इतर मागास बहुजन कल्याण आश्रमशाळा ध्येय धोरण व अधीक्षकांचे कामाचे स्वरुप एकच असतांना आदिवासी विभागातील अधीक्षकांना सर्व लाभ मिळत असणे, मात्र इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधीक्षकांना ते मिळत नसणे, त्यामुळे संबंधित १५८ वसतिगृह अधीक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, संबंधित अधीक्षकांना ४२०० ग्रेड पे मंजूर करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया. "

इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

१) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, " अधिवेशन काळात वापरल्या जाणाऱ्या कागदाचा पुनर्वापर करणे, " इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

२) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या आश्वासित प्रगती योजनेच्या नस्तीस तात्काळ मान्यता देणे, " इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

६) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

" राज्यातील विविध प्रकल्पांसाठी शासनाने हजारो शेतकऱ्यांच्या लाखो हेक्टर जमिनी संपादित करणे, प्रकल्पासाठी शेतजमीन संपादन झाल्याने शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरभरतीमध्ये दिलेले ५ टक्के आरक्षण, २००९ पूर्वी सदर प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना सरळसेवा भरतीने जेष्ठता क्रमाने व शैक्षणिक पात्रतेनुसार भरती करणे, मात्र दिनांक २७

ऑक्टोबर, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे सदर पदभरती ही जाहिरात देऊन सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परीक्षेद्वारे करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, प्रकल्पासाठी शेती, घरे संपादित झाल्याने बेघर, निर्धन झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, राज्य शासनाकडून अनुकंपा, नोकरभरतीच्या धर्तीवर सरळसेवा पध्दतीने प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या जेष्ठता यादीनुसार स्पर्धात्मक परीक्षेशिवाय प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ”

मुख्यमंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

७) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते, यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले.

“ जयपूर (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहती करिता सन २०१७-२०१८ साली संपादित केल्या असणे, शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला काही ठराविक लोकांना मिळाला असून संपादित जमिनीमधील फळझाडे, विहिरी व घरे यांचे मूल्यमापन करण्याचे कामही अद्याप प्रलंबित असणे, तसेच शेतकऱ्यांना नवीन जमीन खरेदी करण्यासाठी इसार पावती करण्यात आल्या असूनही मोबदल्याची रक्कम मिळाली नसल्याने दुसऱ्या गावात जमीन घेता येत नसणे, उक्त प्रकरणी नागरीकांनी छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, प्रादेशिक अधिकारी व मुख्य अभियंता याकडे पाठपुरावा करूनही अद्याप मोबदला मिळालेला नसल्याने नागरीकांच्या मनात शासनाच्या धोरणाबाबत निर्माण झालेली संभ्रमावस्था, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करून सदरहू शेतकऱ्यांना तात्काळ संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. ”

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

१) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, “ वाहनचालकावर खंडणी जमविण्यासाठी दबाव आणण्यात येत असणे, ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

मुख्यमंत्र्यांनी, सदर बाब तपासून आणि पडताळणी करून संबंधित विभागाला तशा सूचना दिल्या जातील, असे सांगितले.

**५.** सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव–

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले.

" राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, मोठ्या शहरात संघटीत गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली दादागिरी, गॅंगस्टरशी संबंध असलेल्या ठाणे महानगरपालिकेतील सहायक आयुक्तावर पोलीस कारवाई करण्यात अक्षम्य दिरंगाई झाली असणे, खंडणी टोळ्या सक्रीय झाल्याने उद्योजक, व्यावसायिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, छत्रपती संभाजीनगरमध्ये कोयता गॅंगची पसरलेली दहशत, जनतेतून तीव्र विरोध होत असल्याने आंतरधर्मीय समिती बरखास्त करण्याची आवश्यकता, आंतरधर्मीय कुटुंबात घरगुती हिंसाचाराला वेगळे स्वरुप दिले जात असल्याने सामाजिक अशांतता निर्माण झाली असणे, नामांतर वादातून समाज भावना भडकावण्याचा होत असलेला प्रयत्न, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, राज्यात लोकप्रतिनिधी व खाजगी व्यक्तींकडून झालेला गोळीबार, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारे हल्ले व सुडबुध्दीने होणारी कारवाई, राज्यात संचार आणि विचार स्वातंत्र्याचा होत असलेला संकोच, पत्रकारांची झालेली हत्या, लव्हजिहाद, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, शक्ती कायद्याची रखडलेली अंमलबजावणी, हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात आलेले अपयश, बालविवाहाला प्रतिबंध घालण्यात सरकारला येत असलेले अपयश, सरकारने कॉपीमुक्त अभियानाची घोषणा केली असली तरी दहावी व बारावी परीक्षेत मोठ्याप्रमाणावर कॉपी व प्रश्नपत्रिका फोडण्याचे झालेले प्रकार, अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांची प्रकरणे उघडकीस येऊनही सरकार चौकशी करण्याबाबत सकारात्मक नसणे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाच्या कामात हजारो कोटी रुपयांच्या उघडकीस आलेल्या गौण खनिज घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मदत व पुनर्वसन विभागात आपत्कालीन कामाच्या नावाखाली झालेला ७७०० कोटींच्या कामाचा घोटाळा, जळगावातील कुबेर ऑनलाईन, मटका रॅकेट, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचारी उपायुक्त व अतिरिक्त आयुक्तांना सेवेत घेऊन कार्यकारी पदावर केलेली नेमणूक, महाज्योती, बार्टी, सारथी व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या ढिसाळ कारभारामुळे बेरोजगार वर्ग निराश होणे, तसेच सध्या साथीच्या रोगात वाढ झाली असून त्यात अजून नवीन साथीच्या रोगाची भर पडणे, H3 N2 या रोगात वाढ होत असताना करोनानंतर डोसमुळे हृदय विकार, श्वसनाचे विकार व इतर शारिरीक व्याधी मध्ये वाढ होणे, त्याची सरकारने घ्यायची गांभीर्याने दखल, वेगवेगळ्या योजनेतून मोफत आरोग्य सेवा, शस्त्रक्रिया, औषधे याची सरकारने जाहिरात करणे, परंतु प्रत्यक्षात लाभ न मिळणे, मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये निकषात न बसलेले प्रस्ताव मंजूर केल्यामुळे निधीची कमतरता त्यामुळे पात्र गरीब जनतेवर होत असलेला अन्याय, रुग्णालयातून मानवी अवयव तस्करीचे होत असलेले

गुन्ह्या प्रकरणी आवश्यक असलेल्या गरीबांना न्याय न मिळणे, असाध्य रोगासाठी रुग्णांना टाटासारख्या रुग्णालयावर अवलंबून न राहता तशाच प्रकारची विभागीय रुग्णालये सुरू करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. ” (भाषण अपूर्ण) (चर्चा अपूर्ण)

सभागृहात गोंधळ सदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज ५ मिनिटांकरिता स्थगित करित असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ४९ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ५४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहात गोंधळ सदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे सभागृहाचे कामकाज ३० मिनिटांकरिता स्थगित करित असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून ५८ मिनिटांनी स्थगित करण्यात आली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी ४ वाजून २८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू)

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते (भाषण अपूर्ण)

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी, “ ठाणे महानगरपालिकेच्या उपआयुक्तांना दुपारी १२ वाजेपर्यंत पदभार मुक्त करण्याचे निर्देश असताना त्यावर अद्याप कोणतीही कारवाई न होणे, “ ” इ.बाबत माहिताचा मुद्दा उपस्थित केला.

संसदीय कार्यमंत्र्यांनी, सद्यःस्थिती जाणून घेतली जाईल, असे सांगितले.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव - (चर्चा पुढे सुरू)

प्रस्तावावरील चर्चेत पुढील सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते (भाषण पूर्ण)

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

**६. (क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १४.–महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| १) श्री. अभिजीत वंजारी | २) श्री. सतेज पाटील |
| ३) श्री. शशिकांत शिंदे | ४) श्री. एकनाथराव खडसे |

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

२) नगरविकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १०.– महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

| | |
|---|---|
| १) श्री. शशिकांत शिंदे | २) श्री. सचिन अहिर |
| ३) श्री. एकनाथ खडसे | ४) श्री. प्रसाद लाड |
| ५) श्री. अभिजीत वंजारी | ६) डॉ. मनिषा कायंदे |
| ७) श्री. अनिकेत तटकरे | ८) श्री. सुरेश धस |
| ९) श्री. नरेंद्र दराडे | १०) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते |

उद्योग मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

**(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे —**

१) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १५.—महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

१) श्री. अभिजीत वंजारी २) श्री. विक्रम काळे

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, " मौजे तुडाळ येथील अवैध उत्खननाबाबत आयोजित बैठकीत संबंधित सन्माननीय सदस्यांसोबतच श्री. महेंद्र दळवी यांचे नाव असणे, " इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत उद्या दुपारी बैठक होईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**(ख) विधानसभेने संमत केल्यास - विचार, खंडशः विचार व संमत करणे –**

२) महसूल मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १७.—महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला. (चर्चा अपूर्ण)

**७.** १) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, " मुंबई सेंट्रल टर्मिनसचे नाव नाना शंकरशेठ मुंबई टर्मिनस असे नामकरण करणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, " दापोली पोलीस स्टेशनसाठी नवीन सुसज्ज इमारत बांधण्यासाठी मंजुरी मिळण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

३) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, " राज्य पोलीस तक्रार प्राधिकरणातील रिक्त पदे तातडीने भरणे तसेच त्यांच्या भत्ते व वेतनातील तफावत दूर करण्याची आवश्यकता, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

४) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, " राष्ट्रपती पदक विजेत्या पोलीस कर्मचाऱ्यांस अतिरिक्त २ वार्षिक वेतनवाढ तसेच इतर लाभ मिळण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

५) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, " मुंबईत घराच्या प्रतीक्षेतील प्रकल्पबाधितांना न्यायदेणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

६) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, " गोराई चारकोप येथील म्हाडा वसाहतीतील सदनिकाधारकांना दिलासा देणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

७) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, " गोराईतील नागरिकांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

८) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, " विविध योजनांतर्गत लोकांना स्वस्त धान्य वाटप करणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

९) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी, " सांगली जिल्ह्यात एका नगरसेवकाचा झालेला खून, तसेच इतर काही गुन्ह्यांमध्ये मृताच्या कुटुंबियांना न्याय मिळवून देणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

ॲड. अनिल परब, वि.प.स. यांनी, " ठाणे महानगरपालिकेच्या उपआयुक्तांना दुपारी १२ वाजेपर्यंत पदभार मुक्त करण्याचे निर्देश असताना त्यावर अद्याप कोणतीही कारवाई न होणे," इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

याबाबत उद्या नगरविकास विभागाच्या सचिवांशी चर्चा करून आदेश काढेल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

१०) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, " गोंदिया जिल्ह्याच्या गुन्ह्यांचा आलेख बघता या जिल्ह्यात स्वतंत्र कारागृह तयार करणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

११) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, " नागपूर शहरात ओरियंटल कंपनीकडून करारनाम्यात असल्याप्रमाणे संपूर्ण रस्त्यालगतचे फूटपाथ व गावात जाणारे जोडरस्ते यांची देखभाल करण्याची आवश्यकता " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

१२) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, " नागपूर-वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर हिंगणा तालुक्यात बांधण्यात येणाऱ्या धरणाचे काम पूर्ण होण्यास लागणारा कालावधी, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

१३) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " राज्यात रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाला गती देणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी नोंद घेतली असल्याचे सांगितले.

१४) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " भारताचे पहिले वित्त मंत्री सी.डी. देशमुख यांच्या रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील घराची झालेली दुर्दशा, या घराची तातडीने दुरुस्ती करण्याची आवश्यकता," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

१५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " राज्याच्या माध्यमिक शाळांमध्ये रिक्त असलेली पूर्णवेळ ग्रंथपालाची पदे भरणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

१६) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, " सहायक नगर रचनाकार या पदाची मुलाखतीची प्रक्रिया पूर्ण करणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी शासनाने दखल घेतली असल्याचे असांगितले.

१७) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, " ठाणे जिल्ह्यातील नवी मुंबईत ऐरोली येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात बसविण्यात आलेल्या सोनोग्राफीच्या अहवालात त्रुटी आढळून येणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी शासनाने दखल घेतली असल्याचे असांगितले.

श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, " मौजे अकलूज, जि. जळगाव येथे शुभम सपकाळे यांचा गावगुंडांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यू होणे, " इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत शासनाने गंभीर दखल घेऊन त्याबाबत निवेदन द्यावे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

१८) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, " राज्यातील समतादूतांचे १३ मार्चपासून मुंबईत सुरू असलेले आंदोलन, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी शासनाने दखल घेतली असल्याचे असांगितले.

१९) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, " मुंबई विद्यापीठाच्या निधीचा महानगरपालिकेने इतरत्र वापर करणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२०) श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स. यांनी, " सीईटी परीक्षेकरिता ५५ टक्क्यांवरील आर्थिक दुर्बल घटक प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ५ टक्के सूट देणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२१) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " परिवहन विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांची रखडलेली पदोन्नती, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२२) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, " मुंबई महानगरपालिकेतील सफाई कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांच्या प्रतिनिधींसोबत तातडीने बैठक घेणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी शासनाने याची दखल घेतली असल्याचे सांगितले.

२३) श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी, " बंजारा समाज आणि विमुक्त जाती-अ प्रवर्गातील लोकांना शासनाने संरक्षण देण्याची आवश्यकता, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी शासनाने याची दखल घेतली असल्याचे सांगितले.

२४) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, " वर्ग-२ ची मुख्याध्यापकांची पदे आता वर्ग-३ मध्ये रुपांतरित झाली असून त्यांची रिक्त पदे भरणे, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२५) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, " अनुदानित शाळेमधील शिक्षकाचे पद रिक्त झाल्यास त्याच संस्थेच्या विनाअनुदानित संस्थेमध्ये त्याच विषयाच्या शिक्षकाला त्या जागेवर बदली करण्याची अनुमती देणारा निर्णय रद्द करण्याचा शासन निर्णय मागे घेणे " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२६) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, " राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालये, रुग्णालये तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये रिक्त असलेली स्त्री रोग तज्ज्ञांची सर्व पदे भरणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

कामगार मंत्र्यांनी, शासनाने याची नोंद घेतली असल्याचे सांगितले.

२७) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी, " मलकापूर जिल्हा परिषद प्रशासनाने सुरू केलेली अन्यायकारक व्याज वसुली रद्द करणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

२८) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स. यांनी, " लाखोच्या संख्येने असलेल्या टोकरी कोळी समाजाला न्याय मिळण्याची आवश्यकता, " इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

**८.** आज शुक्रवार दिनांक २४ मार्च, २०२३ रोजी मान्य केलेल्या म.वि.प. नियम १०१ (अ) अन्वयेच्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**९.** (अ) १) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक १.-- महाराष्ट्र राज्यात लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती, जाहिरात-फलक लावण्यास, समाज माध्यमांवर व संकेतस्थळांवर प्रसिद्ध करण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुर:स्थापित केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र अल्पभूधारक शेतकरी यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

३) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र राज्यातील युवक-युवतींना बेरोजगारी भत्ता विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

५) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

६) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

७) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, सन २०२३ चे वि.प.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्यातील बेकारीचे निर्मूलन करण्याबाबत विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने पुरःस्थापित केले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक मांडण्यात आले.

अशासकीय विधेयकांवर पुढील अधिवेशनात चर्चा करू अंतिम आठवडा प्रस्ताव व विरोधी पक्षाचा प्रस्ताव जो आहे, त्यावरील उत्तर उद्या मिळणार आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ रोजी सभागृहाची विशेष बैठक ११ ते ११.४५ या वेळात भरेल. या विशेष बैठकीत नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता पुनः भरेल, असे उपसभापतीनी सांगितले.

सभागृहाची बैठक रात्री ८ वाजून १ मिनिटांनी दिनांक २५ मार्च, २०२३ रोजीच्या सकाळी ११.०० वाजता सुरु झाली.

**शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३**

विधानपरिषदेची विशेष बैठक मुंबई येथील विधानपरिषदेच्या सभागृहात सकाळी ११.०० वाजता **माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे** यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव—(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती " इ. बाबतचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. प्रवीण दरेकर (२) श्री. एकनाथराव खडसे

(३) श्री. प्रसाद लाड (भाषण अपूर्ण.)

चर्चा अपूर्ण.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ५२ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता **माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे** यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

श्री. जयंत प्र.पाटील वि.प.स. यांनी, अधिवेशन कालावधीत विधिमंडळ परीसरात असलेला दवाखाना बंद असणे, इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

लवकरच आढावा घेऊन दवाखाना सुरू करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**१.** (१) तीन तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पस्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) उद्योग मंत्र्यांनी, कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) शालेय शिक्षण मंत्र्यांनी, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (अ) महाराष्ट्र शासनाद्वारे लोकसेवांचे वितरण यावरील अहवाल तसेच (ब) Special Audit Report On Brihanmumbai Municipal Corporation व (क) सातारा जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उभारणी करण्यासाठी कृष्णानगर पाटबंधारे वसाहतीमध्ये कृष्णा खोरे विकास महामंडळाची सुमारे ६३ एकर जागेतील भंगार मालाची अनधिकृतपणे विक्री करून कोट्यवधी रुपयांचा केलेला भ्रष्टाचार या विषयावरील श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना क्रमांक ५१८ वरील चर्चेच्यावेळी दिनांक २९ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवली.

(३) इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मर्यादित (मुख्य कंपनी) व शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, मर्या. (उप कंपनी) यांचा एकत्रित वार्षिक अहवाल तसेच मुख्य कंपनी व उपकंपनीचे सन २०१९-२०२० चे वार्षिक अहवाल' सभागृहासमोर ठेवले.

**३.** दोन्ही सभागृहांनी पारित केलेल्या व राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या ४ वि.स. विधेयकांची नावे उप सचिवांनी सभागृहास वाचून दाखविली.

**४.** ॲड. निलय नाईक (समिती सदस्य) यांनी, " अकोला वाशिम, बुलढाणा व यवतमाळ जिल्ह्यातील हायब्रिड ॲन्युईटी मोड योजनेंतर्गत मंजूर कामामध्ये झालेल्या गैरकारभाराबाबत " या विषयावरील श्रीमती मनिषा कायंदे, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा अहवाल सभागृहाला सादर केला.

माननीय उप सभापतींनी, लोक आयुक्त विधेयक क्रमांक – ३६ यासंबंधी दालन क्रमांक १४५ येथे दोन्ही सदनाचे गटनेते, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, तसेच विधानसभेचे विरोधी पक्षनेते श्री. अजित पवार, विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते श्री. अंबादास दानवे, माननीय संसदीय कार्य मंत्री श्री. चंद्रकांत पाटील आणि सर्व मान्यवर याच्या समवेत झालेल्या बैठकीतील निर्णयाची माहिती सभागृहाला दिली.

प्रा.राम शिंदे, वि.प.स. यांनी, श्री. संजय राऊत, राज्यसभा सदस्य व संपादक, दैनिक सामना यांच्याविरुद्ध दिलेल्या विशेषाधिकार भंग व अवमान प्रकरणी माननीय उप सभापतींनी त्यांचा निर्णय सभागृहाला वाचून दाखविला.

प्रा.राम शिंदे वि.प.स. यांनी, " अनुसूचित जाती व जमाती प्रतिबंधक अधिनियम, १९८९, ३ (२), ३ (१), ५०४, ५०६ असा गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल होऊन सुद्धा त्या व्यक्तीला अनेक दिवसांपासून अटक करण्यात आली नसणे " इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

याबाबत सरकारने कारवाई करावी असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

महसूल मंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी, राज्यातील शाळांच्या संचमान्यतेसाठी आधार कार्डाची सक्ती करणे या विषयाबाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यांनी यासंदर्भात आपले म्हणणे दोन मिनिटात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. कपिल पाटील वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

याबाबत माननीय मंत्रीमहोदयांनी निवेदन करावे असे निर्देश देत आहे तसेच सदर नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुमती नाकारण्यात आली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शालेय शिक्षण मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

आजच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक-पाच अंतर्गत दर्शविण्यात आलेली नियम ९३ च्या सूचनांवरील सर्व निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते, डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी " राज्यातील ओबीसी, भटक्या विमुक्त प्रवर्गातील पीएचडी करणारे विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित असणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यावर त्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे विरोधी पक्ष नेते यांनी याबाबत आपले म्हणणे मांडले.

उपरोक्त सूचनेतील विषय आजच्या कामकाज पत्रिकेत समाविष्ट नसल्यामुळे सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात आली आहे. मात्र त्यावर शासनाने निवेदन करावे, असे निर्देश माननीय उप सभापतींनी दिले.

**सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव -(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

" राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती " इ. बाबतच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३) श्री. प्रसाद लाड

चर्चा अपूर्ण

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५९ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

" राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती " इ. बाबतच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(४) श्री. अभिजीत वंजारी (५) श्री. शशिकांत शिंदे

चर्चा अपूर्ण.

**५.    (क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे  विचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३६ – महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १९ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे पुढील अधिवेशनाच्या अखेरपर्यंत त्यावरील प्रतिवृत्त सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठवावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव – (चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

“ राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती ” इ. बाबतच्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरू झाली.

चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(६) ॲड.अनिल परब    (७) डॉ. प्रज्ञा सातव

चर्चा अपूर्ण.

**६.    (क) सर्वश्री प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव –**

“ मुंबईला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करून देण्यासंबंधी ” इ. बाबत दिलेला नियम २६० अन्वयेचा प्रस्ताव.

**तसेच**

**(ग) प्रा.राम शिंदे, व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव–**

“ पुणे-नाशिक या शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता तयार करण्यात आलेल्या विकास आराखडयास गतिमान करण्याची आवश्यकता ” इ. बाबत दिलेला नियम २६० अन्वयेचा प्रस्ताव.

उपरोक्त दोन्ही प्रस्ताव प्रस्तुत झाले.

**तसेच**

**सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये अंतिम आठवडा प्रस्ताव.—(चर्चा पुढे सुरू व मंत्र्यांचे उत्तर)**

“ राज्यात कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली परिस्थिती ” इ. बाबत दिलेला अंतिम आठवडा प्रस्ताव.

उपरोक्त अंतिम आठवडा प्रस्ताव व म.वि.प. नियम २६० अन्वये दिलेल्या दोन प्रस्तावावरील एकत्रित चर्चेस उप मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.

सभागृहाने प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**(ख) : लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवणे.**

उप सचिवांनी, आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील बाब क्रमांक (ख) च्या अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या क्रमांक १ ते १२२ या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**७.** शनिवार दि. २५ मार्च, २०२३ रोजी मान्य केलेल्या म. वि.प. नियम १०१ ( अ ) अन्वयेच्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**औचित्याचे मुद्दे—**

शनिवार, दि. २५ मार्च, २०२३ रोजी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

आजच्या कामकाजपत्रिकेत दर्शविण्यात आलेल्या सर्व लक्षवेधी सूचना पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

(क) गुरुवार, दिनांक ९ मार्च, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील राखून ठेवण्यात आलेला श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचा, “ राज्यात जातनिहाय जनगणना करण्याबाबत ” या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक १७३०९ याचे उत्तर देण्यात आले.

उप मुख्यमंत्र्यांनी, विधानसभा सभागृहाने सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक-१७, महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक एकमताने मंजूर केलेले आहे. या सभागृहाने सुद्धा ते विधेयक मंजूर करावे, अशी विनंती केली.

विधान भवन परिसरामध्ये राहुल गांधी यांच्या प्रतिमेची विटंबना करण्याचा प्रकार घडला असून त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री. प्रसाद लाड यांचा सहभाग होता त्यामुळे त्यांनी याप्रकरणी दिलगिरी व्यक्त करून हा विषय संपवावा असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी दिलगिरी व्यक्त केली.

ॲड.अनिल परब वि.प.स. यांनी, विधानसभा विधेयक क्रमांक-३६, महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयकाच्या बाबतीत घटित करावयाच्या संयुक्त समितीमध्ये सदस्यांची नावे घेण्याच्या संदर्भात आपले मत मांडले.

याविषयावर मार्ग काढण्यासाठी सभागृहाची बैठक १५ मिनिटांकरीता स्थगित करण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून २० मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ५ वाजून ३५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

प्रधान सचिवांनी, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३६, महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे, या विधानसभेने पारित केलेल्या प्रस्तावास विधानपरिषदेने सहमती देण्याची विनंती करणारा विधानसभेचा संदेश व प्रस्तावास सहमती सभागृहास वाचून दाखविली.

**राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी**, सन २०२२ चे वि.स.वि. क्रमांक ३६- विवक्षित प्रकरणांमध्ये, महाराष्ट्र शासनाने अथवा महाराष्ट्र राज्यातील विवक्षित सार्वजनिक प्राधिकरणांनी किंवा त्यांच्या वतीने केलेल्या प्रशासकीय कारवायांची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्या विरुद्धच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी व अन्वेषण करण्याकरिता लोक आयुक्त संस्थेची स्थापना करण्यासाठी आणि तत्संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक, दोन्ही सभागृहांच्या संयुक्त समितीकडे विचारार्थ पाठविण्यात यावे या सभागृहाने संमत केलेल्या प्रस्तावास विधानसभेची सहमती मिळाल्यावरुन हे विधेयक दोन्ही सभागृहाच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त पुढील अधिवेशनाच्या अखेर पर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे आणि या समितीवर या सभागृहाचे पुढील सदस्य नामनिर्देशित करण्यात यावेत अशी विनंती केली.

- १) श्री. प्रवीण दटके, वि.प.स.

२) श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स.

३) श्री. विप्लव बाजोरिया, वि.प.स.

४) श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.

५) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स.

६) श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

७) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स.

८) श्री. कपिल पाटील, वि.प.स.

९) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

१०) ॲड.अनिल परब, वि.प.स.

विधानसभेने या समितीवर पुढील सदस्य नामनिर्दिष्ट केले आहेत.

१) श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, महसूल व पशुसंवर्धन, दुग्ध विकास मंत्री

२) ॲड.आशिष शेलार, वि.स.स.

३) श्री. संजय कुटे, वि.स.स.

४) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

५) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

६) श्री. हरिभाऊ बागडे, वि.स.स.

७) श्री. अनिल बाबर, वि.स.स.

८) श्री. संजय शिरसाट, वि.स.स.

९) प्रा.रमेश बोरनारे, वि.स.स.

१०) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

११) श्री. छगन भुजबळ, वि.स.स.

१२) श्री. अशोकराव चव्हाण, वि.स.स.

१३) श्री. पृथ्वीराज चव्हाण, वि.स.स.

तसेच, आवश्यकतेनुसार निमंत्रित म्हणून आणखी काही सदस्यांची नियुक्ती करण्याचे अधिकार माननीय समिती प्रमुख यांना राहतील.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, महसूल व पशुसंवर्धन, दुग्ध विकास मंत्री यांना संयुक्त समितीचे समिती प्रमुख म्हणून नियुक्त करण्यात येत आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**(२) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे द्वविचार पुढे सुरू, खंडशः विचार व संमत करणे.**

सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १७.– महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२२ (प्रश्न पुन्हा प्रस्तुत झाला.)

(१) पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक १७ - महाराष्ट्र गोसेवा आयोग विधेयक, २०२२ विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते २७ (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(क) विधानसभेने संमत केल्यास– विचार, खंडशः विचार व संमत करणे.**

(१) सहकार मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स. विधेयक क्रमांक ११ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य सर्वश्री अंबादास दानवे, एकनाथराव खडसे, सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, अभिजीत वंजारी, अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.मनिषा कायंदे यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) उप मुख्यमंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६ द्व महाराष्ट्र पोलीस (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, अभिजीत वंजारी यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

श्री. सचिन अहिर वि.प.स. यांनी उपरोक्त विधेयकाच्या संदर्भात आपले मत मांडले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते ६ (दोन्ही सम्मिलीत) विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

माननीय उप सभापतींनी, सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ द्वारे दिनांक ४ सप्टेबर १९९६ पासून ग्रेटर बॉम्बे या नावात बृहन्मुंबई असा बदल केला असल्यामुळे उक्त अधिनियमात ग्रेटर बॉम्बे संज्ञेऐवजी बृहन्मुंबई संज्ञा दाखल करण्यात येत आहे असे विधेयक मंजूर झाल्याने सर्वांचे अभिनंदन केले.

श्री. रमेशदादा पाटील वि.प.स. यांनी, एमआयडीसी महापे येथे अडीच वर्षात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर भूखंड वाटप करण्यात आलेले असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

माननीय उप सभापतींनी, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ ते २५ मार्च, २०२३ या सत्र कालावधीतील कामकाजाचा आढावा सदनासमोर ठेवला.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै,२०२३ पासून मुंबई येथील विधान भवनात बोलवावे, अशी शिफारस माननीय राज्यपालांकडे करण्याचे ठरले आहे, असे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

माननीय उप सभापतींनी, सत्र-समाप्तीसंबंधीचा माननीय राज्यपालांचा पुढील संदेश वाचून दाखविला.

" भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२), उप खंड (क) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी रमेश बैस, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सत्र संस्थगित करीत आहे. "

**यानंतर राष्ट्रगीत म्हणण्यात आले.**

विधानपरिषदेचे अधिवेशन सायंकाळी ६ वाजून ०२ मिनिटांनी संस्थगित झाले.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २५ मार्च, २०२३

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानरिषद.

* * * * * *

## विवरण क्रमांक ६

**महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ८(१) अन्वये, माननीय सभापतींनी नामनिर्देशत केलेली सभापती तालिका-**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
| --- | --- |
| १. | ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. |
| २. | श्री. नरेंद्र दराडे वि.प.स. |
| ३. | श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. |
| ४. | श्री. जयंत आसगांवकर, वि.प.स. |

# विवरण क्रमांक ७

## विविध विद्यापीठांवर सदस्यांची नामनियुक्ती

| अ. क्र. (१) | विद्यापीठाचे नांव (२) | सदस्यांचे नांव (३) | अधिनियमाचे कलम (४) | नियुक्तीचा दिनांक (५) |
|---|---|---|---|---|
| १. | स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड | श्री. विक्रम काळे, वि.प.स. | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम २८ (२) (भ) अन्वये | मंगळवार, दिनांक ९ मार्च, २०२३ |
| ८० | **डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स.**<br>आंबिवली येथील एन.आर.सी कंपनीच्या जागेमध्ये अनधिकृत शेड बांधकामे सुरु असल्याबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८१ | **श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.**<br>राज्यातील वय २१ ते ३५ वयोगटातील बेरोजगारांना दरमहा रु.२५००/- भत्ता देणेबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८२ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>पोलिसांच्या कामाचे तास कमी करून आठ तास करण्याबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८३ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>ग्रामीण पाणी पुरवठा व शिखर समिती / रेवस झोन क्र. २ प्रादेशिक योजनेच्या नवीन पाईप लाईन वरून असलेल्या ग्रामपंचायत रेवसच्या अनधिकृत जोडणी बंद करून चिंचवली ग्रामपंचायत हद्दीतील गावांना कनेक्शन करून मिळणेबाबत. | १४ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ८४ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>मुंबईत दाखल होणाऱ्या वाहनधारकांकडून जादाची टोलवसुली न करण्याबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८५ | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>हवामान बदल प्रदूषण यांचे दुष्परिणाम शहरी, निमशहरी भागात आरोग्यावर विपरित परिणाम होत असल्याने करावयाच्या उपाययोजनेबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८६ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>महाराष्ट्राचे कुलदैवत तुळजापूर येथे तुळजाभवानी पुजेची संधी महिलांना मिळणेबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८७ | **श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.**<br>शासनाकडे थकीत असलेली सदरील रक्कम शिक्षण मंडळांना ३१/०३/२०२३ पूर्वी मिळण्याबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८८ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>कंत्राटी प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याबाबत. | १४ मार्च, २०२३ |
| ८९ | **डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स.**<br>महाराष्ट्र राज्य अनुसूचित-जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांची पदे दोन महिन्यांपासून रिक्त असल्याबाबत. | १५ मार्च, २०२३ |
| ९० | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>खालापूर, माणगाव, तळा, म्हसळा नगरपंचायत हद्दीमधील २२७ अनुसुचित जमातींच्या लाभार्थी घरकुलापासून वंचित राहत असल्याबाबत. | १५ मार्च, २०२३ |
| ९१ | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>शालेय पोषण आहार अंतर्गत केंद्रीय प्रणाली राबवित असतांना स्थानिक महिलांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाल्याबाबत. | १५ मार्च, २०२३ |
| ९२ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>नागपूरमधील एनआयसीयु रुग्णालयात उपचारासाठी आवश्यक अद्यावत उपकरणे उपलब्ध करणेबाबत. | १५ मार्च, २०२३ |
| ९३ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>राज्यात बारावीच्या पहिल्याच इंग्रजीच्या पेपरमध्ये राज्य शिक्षण मंडळाकडून झालेल्या चुकांच्या पार्श्वभूमीवर विषयतज्ञ व सर्व विभागीय मंडळाने प्रमुख नियामकांच्या उपस्थितीत इंग्रजी विषयाची संयुक्त सभा घेणे. | १५ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ९४ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यामधील तळीये गावातील पुनर्वसनाबाबत. | १५ मार्च, २०२३ |
| ९५ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>बुलढाणा जिल्ह्यातील तराडखेड येथील रमेश आंबेकर यांचे मासरूळ शिवारांमधील घर व गोठा रात्रीच्या वेळी मासरूळ येथील ९ लोकांनी १२ जून, २०१९ रोजी जाळून टाकले असल्याबाबत. | १५ मार्च, २०२३ |
| ९६ | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>TET शिक्षक अभियोग्यता आणि बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा २०२२ परीक्षेच्या निकालाबाबत. | १७ मार्च, २०२३ |
| ९७ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>प्रकल्पग्रस्त प्रगत कुशल प्रशिक्षणार्थ्यांना महानिर्मिती कंपनीच्या सेवेत कायमस्वरूपी नोकरी देणेबाबत. | १७ मार्च, २०२३ |
| ९८ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>मुरूड तालुक्यातील (जि. रायगड) मौजे सुरई येथे एल.टी.लाईनचे काम मंजूर नसताना तसेच मौजे भोईघर येथील लाईनचे कामाकरिता दाखल केलेल्या कागदपत्रांमध्ये खाडाखोड करून झालेल्या गैरव्यवहाराबाबत. | १७ मार्च, २०२३ |
| ९९ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>उरण तालुक्यातील (जि. रायगड) आवरे ते खोपटे, दिघोडे खाडीमध्ये केमिकल मिश्रित पाणी सोडल्याबाबत. | १६ मार्च, २०२३ |
| १०० | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>पुणे जिल्हयातील पिंपरी-चिंचवड मनपा क्षेत्रातील रेड झोनची सविस्तर माहिती तसेच रेड झोन चे नकाशे व सर्व्हेची माहिती नागरिकांना देण्याबाबत. | १७ मार्च, २०२३ |
| १०१ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>मुंबई विद्यापीठाकडून प्राप्त निकालात मात्र विद्यार्थ्यांची अनुपस्थिती दाखवून विद्यार्थ्यांना नापास करण्यात आले असल्याबाबत. | १७ मार्च, २०२३ |
| १०२ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>मौजा कुनाडा हे भद्रावती तालुक्यातील पुनर्वसीत गावाचा संपूर्ण विद्युत पुरवठा खंडीत केल्याबाबत. | १७ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १०३ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>एमएमआरडीएच्या विकासकामांसाठी झालेला खर्च वसुलीसाठी जादाची टोल वसुली करण्याबाबतचा प्रस्ताव. | १६ मार्च, २०२३ |
| १०४ | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>ज्येष्ठ नागरिक धोरणाची सक्षमपणे अंमलबजावणी करण्याबाबत. | १६ मार्च, २०२३ |
| १०५ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>गृहनिर्माण प्रकल्पात काही घरे गरीबांसाठी सवलतीच्या दरात राखीव करणेबाबत. | १६ मार्च, २०२३ |
| १०६ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>ठाणे शहरात खेळाडू व नागरिकांकरीता मैदानांचा अभाव असल्याबाबत. | १७ मार्च, २०२३ |
| १०७ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>अर्थतज्ज्ञ डॉक्टर चिंतामणराव देशमुख यांच्या महाड तालुक्यातील नाते येथील जन्मस्थळ असणाऱ्या घराची झालेली दुरावस्था. | १६ मार्च, २०२३ |
| १०८ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>राज्यात नांदेड जिल्ह्यातील २०२१-२२ मध्ये अनुसुचित जमातीमधून निवडून आलेल्या अनुसुचित जमाती प्रवर्गाच्या सर्व ग्रामपंचायत, नगरपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच यांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्याने शेकडो सदस्यांच्या नियुक्त्या रद्द होण्याची शक्यता असल्याबाबत. | १६ मार्च, २०२३ |
| १०९ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>राज्यात शहरांप्रमाणे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वैद्यकीय अभ्यासक्रमाची उकल सहज सोप्या भाषेमध्ये व्हावी यासाठी येत्या शैक्षणिक वर्षापासून वैद्यकीय अभ्यासक्रम मराठीमध्ये शिकवण्यात येईल अशी घोषणा वैद्यकीय शिक्षण मंत्री महोदयांनी केल्याबाबत. | १६ मार्च, २०२३ |
| ११० | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई महानंदाची दैनंदिन दूध संकलन क्षमता सुमारे दहा लाख लिटर आहे त्यापैकी आज घडीला जेमतेम ऐंशी हजार लिटर वर आल्याबाबत. | १७ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १११ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>अलिबाग तालुक्यातील (जि. रायगड) वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना खरीप पणन हंगाम २०२२-२३ च्या आधारभूत भात खरेदी योजनेचा लाभ मिळणेबाबत. | १६ मार्च, २०२३ |
| ११२ | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>रत्नागिरी जिल्ह्यातील महसूल विभागात गेल्या ४ वर्षात पदभरती न झाल्याने एकूण ११५३ पैकी तब्बल २९१ पदे रिक्त असल्याबाबत. | १७ मार्च, २०२३ |
| ११३ | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>राज्यातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याना कॅशलेस वैद्यकीय सुविधा सुरू करणे बाबत. | २० मार्च, २०२३ |
| ११४ | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>सामान्य प्रशासन विभागाच्या सध्याच्या प्रचलित शासन निर्णयानुसार बिंदू नामावलीत अनुसूचित जमातीचा बिंदू हा इतर सर्व संवर्गा नंतर दर्शविण्यात आल्याबाबत. | २० मार्च, २०२३ |
| ११५ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>PSI २०२१ च्या मुलींचे PHYSICAL इव्हेंट २०२० च्या मुलींच्या इव्हेंट प्रमाणे होण्याबाबत. | २० मार्च, २०२३ |
| ११६ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>राज्यात पुणे जिल्ह्यातील मावळ तालुक्यातील एकबैर गावातील ऐतिहासिक तलावाची झालेली दुरावस्थेबाबत. | २० मार्च, २०२३ |
| ११७ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>अलिबाग तालुक्यातील (जि. रायगड) सुडकोली ग्रामपंचायत हद्दीतील मुख्य खारभूमी बंधाऱ्यासह आतील बंधारे बांधण्यासाठी तरतूद करण्याबाबत. | २० मार्च, २०२३ |
| ११८ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>राज्यात अनुसूचित क्षेत्राबाहेरील (otsp) ५.४% आदिवासींना, प्रत्येक जिल्ह्यातील मा. सक्षम प्राधीकाऱ्याकडून अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्रे दिले जात नसल्याबाबत. | २० मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ११९ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>राज्यातील व राष्ट्रीय महामार्गावरील वन्य प्राण्यांकरिता उपशमन योजना दुर्लक्षित होत असल्याबाबत. | २० मार्च, २०२३ |
| १२० | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>दोडामार्ग ( जि. सिंधुदुर्ग) तालुका हत्ती मुक्त करण्याबाबत. | २० मार्च, २०२३ |
| १२१ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>मुंबई शहर/उपनगरातील रिक्षा-टॅक्सी मीटरचे पुनर्प्रमाणीकरण करण्याबाबत. | २० मार्च, २०२३ |
| १२२ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>राज्यातील मान्यताप्राप्त ७८ महाविद्यालयांना शंभर टक्के अनुदान मंजूर करण्याबाबत. | २० मार्च, २०२३ |
| १२३ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>म्हाडाकडून भूखंडासाठी रेडीरेकनरच्या दरावर आधारित करण्यात आलेली भाडेवाढ मागे घेण्याबाबत. | २१ मार्च, २०२३ |
| १२४ | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>राज्यातील धर्मादाय आयुक्ताकडे नोंदणी असलेल्या शैक्षणिक संस्थाना मालमत्ता करातून सूट मिळणेबाबत. | २१ मार्च, २०२३ |
| १२५ | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>गिरण्यांच्या चाळीचा पुनर्वसन बीडीडी चाळीच्या धर्तीवर करीत असतांना मुद्रांक शुल्कात नाममात्र सवलत देऊन पुनर्विकास करण्याबाबत. | २१ मार्च, २०२३ |
| १२६ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>राज्यातील माथाडी कामगारच्या प्रलंबित प्रश्नाबाबत. | २१ मार्च, २०२३ |
| १२७ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>शासकीय नोकरभरतीत सन २०२०-२१ मध्ये कमाल वयोमर्यादा ओलांडलेल्या उमेदवारांना संधी मिळण्याबाबत. | २१ मार्च, २०२३ |
| १२८ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>रोहा तालुक्यातील (जि. रायगड) कुडली ग्रामपंचायत हद्दीतील कोलाड-पुणे रस्त्यालगत एव्हरेस्ट कंपनीकडून उच्च दाबाची (हायटेंशन) विद्युत लाईन टाकण्यात येत असून शेतकऱ्यांच्या होत असलेल्या नुकसानीबाबत. | २१ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १२९ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>राज्यात मराठीला न्यायालयाच्या प्राधीकृत भाषेचा दर्जा देणेबाबत. | २१ मार्च, २०२३ |
| १३० | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्याकरिता येणाऱ्या नागरिकांना पोलिसांच्या नियोजनामुळे झालेली गैरसोय. | २१ मार्च, २०२३ |
| १३१ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>राज्यात श्रम कोड कायदा लागू करण्याचा घेतलेला निर्णय रद्द करण्याबाबत. | २१ मार्च, २०२३ |
| १३२ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>राज्यातील महानगरपालिकांमध्ये विशेषतः पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट केलेल्या लगतच्या ग्रामीण भागातील अंगणवाडी इमारती इत्यादी मालमत्तांचे आणि कर्मचाऱ्यांचे हस्तांतरण महापालिकेकडे होत नसल्याबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १३३ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>राज्यातील सार्वजनिक वैद्यकीय महाविद्यालयांतील निवडणूक मतदार यादीमधून सदस्यांची नावेच गहाळ झाल्याबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १३४ | **डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.**<br>राज्यातील “ आशा ” वर्कर्सना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देऊन त्यांना किमान वेतन देणेबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १३५ | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>गुहागर तालुक्यातील (जि. रत्नागिरी) वरवेली ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रात मागील सुमारे १ वर्षापासून बेकायदेशीररित्या काळा दगड उत्खनन, खडीक्रशर विनाविलंब कायमस्वरूपी बंद करण्याबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १३६ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>जयपूर (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीकरिता संपादित करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १३७ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>मौजे पिंपळगाव काळे येथील स्वातंत्र्यसेनानी देवीलालजी जोशी यांच्या पत्नी नर्मदाबाई जोशी यांचा जिल्हाधिकारी बुलडाणा तसेच तहसीलदार जळगांव-जामोद यांनी “ स्वातंत्र्य सैनिक ” म्हणून सन्मान न केल्याबाबत. | २३ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १३८ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>वर्धा येथील महात्मा गांधीच्या सेवाग्राममधील गोशाळेतील गायींच्या संवर्धनासाठी शासनाकडून आर्थिक मदत देण्याबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १३९ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>राज्य सरकारने एमआयडीसीसाठी ठाणे, बेलापूर पट्ट्यातील सुमारे २ हजार ३३३ हेक्टर जमीन कारखानदारी उभारण्याचे नावावर संपादित केलेल्या जमिनीबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १४० | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने सोडत पद्धतीने वितरित केलेले भूखंड २५ ते ३० वर्षांपासून मोकळे असलेले बंगलो भूखंड ताब्यात घेऊन सध्याच्या दराप्रमाणे पुन्हा सोडत काढावी व नवीन लाभार्थ्यांना सदर भूखंड वितरित करण्याबाबत. | २३ मार्च, २०२३ |
| १४१ | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>शिंगावे, ता.शिरपूर, जि.नंदुरबार येथील भोई समाजातील कु.राहुल राजू भोई या तरुणाची झालेली हत्या. | २३ मार्च, २०२३ |
| १४२ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहरातील वऱ्हाळदेवी तलावाच्या दुरावस्थेबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १४३ | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>डहाणू तालुक्यातील अदानी थर्मल पॉवर प्रकल्पाने राख वितरण बंद केल्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १४४ | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>राज्यातील निवासी अनुदानित आश्रम शाळांना नियमित वेतनश्रेणीचा प्रस्ताव तसेच सदर शाळांना १०० टक्के अनुदान मंजूर करण्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १४५ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>राज्यातील पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या पोलीस निरीक्षक यांना पोलीस उप अधीक्षक किंवा सहायक पोलीस आयुक्त पदावर पदोन्नती देण्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १४६ | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>देवगड- जामसंडे (ता देवगड, जि सिंधुदुर्ग) नगरपंचायत हद्दीतील नागरीकांसाठी नळ पाणीपुरवठा योजना सुरू करण्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६—**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १४७ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>मौजे खानाव, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट स्कीमबाबत शेतकऱ्यांच्या चुकीच्या नोंदीबाबत ७/१२ वरून काढून टाकण्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १४८ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>मुंबई झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण (एस.आर.ए.) कफ परेड कोळीवाड्या ड्रोन द्वारे सर्वेक्षण सुरू केले असल्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १४९ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>राज्यात सांगली जिल्ह्यातील शिराळा तालुक्यातील पाचगणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या एक वर्षापासून बंद असल्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १५० | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>जेट एअर वेज (इ) लि.कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधीची रक्कम मिळवून देण्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १५१ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>राज्यातील एएनएम व जीएनएम या नर्सिंग अभ्यासक्रमासाठी ओबीसी, व्हीजेएनटी, व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती / स्कॉलरशिप मिळण्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १५२ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>सार्वजनिक वाचलनाये अद्यायावत व आधुनिक करण्याबाबत. | २४ मार्च, २०२३ |
| १५३ | **ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्याकरिता पूर्ण वेळ सहायक कामगार आयुक्त अधिकारी मिळणेबाबत. | २५ मार्च, २०२३ |
| १५४ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>मौजे वांद्रे, ता. मुरुड-जंजिरा, रायगड येथील वांद्रे धरण योजना रद्द करून पर्यायी मजगाव खोकरी धरण योजना मंजूर करणेबाबत. | २५ मार्च, २०२३ |
| १५५ | **श्री. सतेज** *ऊर्फ* **बंटी पाटील, वि.प.स.**<br>ग्रामीण भागातील खेळाडुंना प्रोत्साहन मिळावे, ऑलिम्पिक दर्जाचे खेळाडू तयार व्हावे यासाठी गाव तेथे क्रिडांगण हे धोरण राबविण्याबाबत. | २५ मार्च, २०२३ |

**विवरण क्रमांक - १६**—समाप्त

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १५६ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>विदर्भातील विद्यापिठाद्वारे पदवी व पदव्युत्तर शिक्षण केलेल्या उमेदवारांना अपात्र केल्याबाबत. | २५ मार्च, २०२३ |
| १५७ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>श्री मुंबादेवी माता मंदिराला देशातील अन्य धार्मिक स्थळांप्रमाणे तिर्थक्षेत्राचा दर्जा देण्याबाबत. | २५ मार्च, २०२३ |
| १५८ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटकी-विमुक्त जाती, इतर मागासवर्गीय समाजातील नागरिकांना जातीचा दाखला मिळण्यासाठी घालण्यात आलेल्या पुराव्याबाबतच्या अटीमध्ये सवलत देण्याबाबत. | २५ मार्च, २०२३ |
| १५९ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>राज्यातील शाळांमध्ये असलेले रेकॉर्ड अद्ययावत करून ऑनलाईन पद्धतीने जतन करून ठेवण्याबाबत. | २५ मार्च, २०२३ |
| १६० | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>अपंग एकात्मक शिक्षण योजना, प्राथमिक सेवा अंतर्गत सन २००५ पूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांचे वेतन संरक्षण, सेवासातत्य, वेतन फरक इत्यादी लाभ देण्यापासून वंचित असल्याबाबत. | २५ मार्च, २०२३ |

# विवरण क्रमांक १७

## सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानपरिषद नियम २५९ ते २६० अन्वये विचारात घेण्यात आलेले प्रस्ताव

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | म.वि.प. नियम २५९ अन्वये चर्चा झालेला प्रस्ताव | - | १ |
| (२) | म.वि.प. नियम २६० अन्वये प्राप्त झालेले प्रस्ताव | - | ५ |
| (३) | म.वि.प. नियम २६० अन्वये स्वीकृत झालेल्या सचनांची संख्या | - | ५ |
| (४) | म.वि.प. नियम २६० अन्वये चर्चा झालेली सुचनांची संख्या | - | ४ |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | विषय | चर्चेचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **म.वि.प.नियम २५९ अन्वये प्रस्ताव** | | |
| **१** | **श्री. अंबादास दानवे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २५९ अन्वये प्रस्ताव - | "राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, मोठ्या शहरात संघटीत गुन्हेगारीत झालेली वाढ, वाळूमाफिया, मुरुममाफियांची वाढलेली दादागिरी, गँगस्टरशी संबंध असलेल्या ठाणे महानगरपालिकेतील सहाय्यक आयुक्तावर पोलीस कारवाई करण्यात अक्षम्य दिरंगाई झाली असणे, खंडणी टोळ्या सक्रीय झाल्याने उद्योजक, व्यावसायिकांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, छत्रपती संभाजीनगरमध्ये कोयता गँगची पसरलेली दहशत, जनतेतून तीव्र विरोध होत असल्याने आंतरधर्मीय समिती बरखास्त करण्याची आवश्यकता, आंतरधर्मीय कुटुंबात घरगुती हिंसाचाराला वेगळे स्वरुप दिले जात असल्याने सामाजिक अशांतता निर्माण | दिनांक २४ व २५ मार्च, २०२३ | चर्चा झाली |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | झाली असणे, नामांतर वादातून समाज भावना भडकावण्याचा होत असलेला प्रयत्न, पोलिसांवर पडणारा ताण, पोलिसांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, पोलीस दलातील बढत्या, बदल्या रखडल्याने पोलीस दलात पसरलेला असंतोष, राज्यात लोकप्रतिनिधी व खाजगी व्यक्तींकडून झालेला गोळीबार, राजकीय कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींवर होणारे हल्ले व सुडबुध्दीने होणारी कारवाई, राज्यात संचार आणि विचार स्वातंत्र्याचा होत असलेला संकोच, पत्रकारांची झालेली हत्या, लव्हजिहाद, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, शक्ती कायद्याची रखडलेली अंमलबजावणी, हरवलेल्या महिलांचा शोध घेण्यात आलेले अपयश, बालविवाहाला प्रतिबंध घालण्यात सरकारला येत असलेले अपयश, सरकारने कॉपीमुक्त अभियानाची घोषणा केली असली तरी दहावी व बारावी परिक्षेत मोठ्याप्रमाणावर कॉपी व प्रश्नपत्रिका फोडण्याचे झालेले प्रकार, अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्यात सरकारला आलेले अपयश, राज्याच्या विविध विभागात भ्रष्टाचार व अनियमिततांची प्रकरणे उघडकीस येऊनही सरकार चौकशी करण्याबाबत सकारात्मक नसणे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्गाच्या कामात हजारो कोटी रुपयांच्या उघडकीस आलेल्या गौण खनिज घोटाळ्याची चौकशी करण्याची आवश्यकता, मदत व पुनर्वसन विभागात आपत्कालीन कामाच्या नावाखाली झालेला ७७०० कोटींच्या कामाचा घोटाळा, जळगावातील कुबेर ऑनलाईन, मटका रॅकेट, आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचारी उपायुक्त व अतिरिक्त आयुक्तांना सेवेत घेऊन कार्यकारी पदावर केलेली नेमणूक, | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | महाज्योती, बार्टी, सारथी व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या ढिसाळ कारभारामुळे बेरोजगार वर्ग निराश होणे, तसेच सध्या साथीच्या रोगात वाढ झाली असून त्यात अजून नवीन साथीच्या रोगाची भर पडणे, H३ N२ या रोगात वाढ होत असताना करोनानंतर डोसमुळे ह्रदय विकार, श्वसनाचे विकार व इतर शारिरीक व्याधी मध्ये वाढ होणे, त्याची सरकारने घ्यायची गांभीर्याने दखल, वेगवेगळ्या योजनेतून मोफत आरोग्य सेवा, शस्त्रक्रिया, औषधे याची सरकारने जाहिरात करणे, परंतु प्रत्यक्षात लाभ न मिळणे, मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये निकषात न बसलेले प्रस्ताव मंजूर केल्यामुळे निधीची कमतरता त्यामुळे पात्र गरीब जनतेवर होत असलेला अन्याय, रुग्णालयातून मानवी अवयव तस्करीचे होत असलेले गुन्ह्या प्रकरणी आवश्यक असलेल्या गरीबांना न्याय न मिळणे, असाध्य रोगासाठी रुग्णांना टाटासारख्या रुग्णालयावर अवलंबून न राहता तशाच प्रकारची विभागीय रुग्णालय सुरु करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी." | | |
| | | **म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव** | | |
| १. | श्री. प्रविण दरेकर व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - | "मागील सरकारच्या कार्यकाळात, शेतकरी बांधवाच्या समस्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी मागील सरकारने एक वर्षात केवळ रु.६००० कोटी वितरित केलेले असतांना महायुती सरकारने रु. १२००० कोटी केवळ ७ महिन्यांच्या कालावधीत वितरीत करून मागील सरकारच्या कार्यकाळात शेतकरी बांधवांवर झालेला अन्याय दूर करणे, अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदतीचे निकष महायुती सरकारने दिड पटीने वाढवून शेतकऱ्यांना अगोदरच्या मानकांपेक्षा अतिरिक्त मदत मिळेल याची | दिनांक १७ व २० मार्च, २०२३ | एकत्रित चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | काळजी घेणे, सत्तेवर येताच मागील सरकारने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेची अंमलबजावणी थांबविणे व त्याच वेळेस नियमितपणे कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना रु. ५०,०००/- इतके प्रोत्साहन देण्याची घोषणा मागील सरकारने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ या दोन्हीही अर्थसंकल्पीय भाषणात करूनही प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना दिरंगाई करणे, परंतु शेतकरी हित लक्षात घेवून महायुती सरकारने सत्तेवर येताच शेतकरी बांधवाना प्रोत्साहनपर रु. ५०,०००/- देण्याची प्रक्रिया तात्काळ सुरू करून प्रत्यक्ष मात्र शेतकरी बांधवाच्या खात्यात आजपर्यंत रु. ४७०० कोटी जमा करण्यात येणे, विदर्भ, मराठवाडा व खानदेशासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या सिंचनाचा प्रश्न सातत्याने सत्तेवर असूनही मागील सरकारने कायमस्वरूपी सोडविण्याचा कधीही प्रयत्न न करणे परंतू, त्याच वेळेस महायुती सरकारने माहे जून, २०१९ मध्ये वैनगंगा-नळगंगा नदी जोडप्रकल्प, कोकणात वाहून जाणाऱ्या १८७ अब्ज घनफुट पाणी मराठवाडा व खानदेशात वळविण्याची घोषणा करणे परंतू, मागील सरकारने ३२ महिन्याच्या कार्यकाळात या शेतकरी हिताच्या प्रकल्पांकडे दुर्लक्ष करणे, नव्याने सत्तेवर येताच गत अधिवेशनात विदर्भ व मराठवाड्यासह उर्वरीत महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची सिंचनाची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा ते पैनगंगा प्रकल्पास मान्यता देणे, कृष्णा-भिमा-मराठवाडा स्थिरीकरण प्रकल्पासही मान्यता देणे, तसेच समुद्रात वाहून जाणाऱ्या १८७ टीएमसी पाणी मराठवाडा, खानदेशाकडे वळविण्याच्या प्रकल्पास गती देण्यात येणे, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केंद्र शासनाने मंजूर केलेला बळीराजा जलसंजीवनी प्रकल्प मागील सरकारकडून दुर्लक्षित होणे, शेतकऱ्यांसाठी अतिशय | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | महत्वाच्या असणाऱ्या प्रकल्पास महायुती सरकारने सत्तेवर येताच गती देणे, मागील सरकारच्या ३२ महिन्याच्या कार्यकाळात केवळ १४ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे परंतू, महायुती सरकारने केवळ ६ महिन्याच्या कार्यकाळात २३ जलसिंचन प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देणे, या प्रकल्पांच्या माध्यमातून ५,२१,६५१ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येऊन त्याचा फायदा लाखो शेतकऱ्यांना होणे, जलयुक्त शिवार योजनेचा टप्पा २ नव्याने कार्यान्वित करुन शेतकऱ्यांना दिलासा देण्याचे विद्यमान शासनाचे प्रयोजन शेतकरी बांधवांच्या शेतीकरीता दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी आघाडी सरकारकडून सातत्याने दुर्लक्षित होणे परंतु, महायुती सरकारने हा प्रश्न कायमस्वरूपी सोडविण्यासाठी मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेद्वारे शेती पंपाकरीता दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी तातडीने प्रयत्न सुरू करणे, मागील सरकारच्या कार्यकाळात कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकऱ्यांना उभे राहण्याची मुभा नसणे परंतु, महायुती सरकारने शेतकऱ्यांना कृषी उत्पन्न बाजारसमितीमध्ये प्रतिनिधित्व मिळावे या उदात्त हेतूने कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करणे, राज्यात ग्रामीण आरोग्य विभागांतर्गत हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना योजना सुरु करुन जिल्ह्या-जिल्ह्यांत आरोग्य सुविधा सहज उपलब्ध करण्याचे विद्यमान शासनाचे धोरण, कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये व्यापाऱ्यांसाठी मोठे गाळे बांधत असतांना शेतकऱ्यांसाठी साधी राहण्याची सोयही वर्षानुवर्ष उपलब्ध नसणे, ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये एक शेतकरी भवन स्थापन करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २. | श्री. प्रविण दरेकर व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव | "माहे जुलै, २०२२ नंतर मुंबई शहराच्या विकासाची नियोजनात्मक व कालबद्ध कामे हाती घेण्यात आली असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे शहर असून या शहराच्या नावलौकीकाला साजेसे असे ५०० पेक्षा अधिक सुशोभिकरणाचे प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांच्या नावीन्यमय कल्पकतेतून सुरू असणे, गेल्या अनेक वर्षापासून मुंबई शहराला एसटीपी पासून दूर ठेवण्यात आले असताना मागील तीन महिन्यांमध्ये मुंबई शहरात ७ ठिकाणी एसटीपीच्या प्रकल्पांचे भुमिपूजन होऊन काम सुरू झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर रस्त्यात खड्डे की खड्यात रस्ते अशा प्रकारचे चित्र दिसत असून खड्डे बुजविणे व डांबरिकरणाकरिता मागील २५ वर्षांत २१ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कम खर्च करण्यात येऊनही मुंबई शहराच्या रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली असल्याने मुंबईकरांच्या मनामध्ये निर्माण झालेली उद्विग्नता, मागील ६ महिन्यांमध्ये विद्यमान शासनाने महानगरपालिकेला आदेश दिल्यानंतर मुंबई शहराच्या ४५० कि.मी.च्या रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची ६ हजार कोटींपेक्षा जास्त रकमेची निविदा काढण्यात येऊन त्यासंदर्भातील वर्कऑर्ड्स निघाल्यानंतर संबंधित कामांचे भूमिपूजन पंतप्रधानांच्या हस्ते झाले असणे, मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये सुमारे ३०० कि.मी.च्या मेट्रोचे काम सुरू होऊन मध्येच खोळंबल्याची बाब निदर्शनास येणे, आरे कारशेडच्या मुद्यामुळे मुंबईच्या मेट्रोच्या कामात विलंब झाल्याने मेट्रो कारशेडच्या खर्चात १० हजार कोटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचे आढळून येणे व परिणामी मेट्रोचे अपेक्षित ध्येय अद्यापही गाठता न येणे, मेट्रो २-ए आणि २-बी ची सेवा सुरू झाल्याने पश्चिम द्रुतगती | दिनांक २१, २३ व २४ मार्च, २०२३ | एकत्रित चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मार्गावरील अंधेरी आणि दहिसरच्या मध्ये वाहतूक कोंडी कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुकर झाल्याचे निदर्शनास येणे, विद्यमान शासनाने मेट्रो प्रकल्पांचे काम जलद गतीने सुरू केल्याने व सन २०२४ ते २०२६ या कालावधीत मेट्रो तसेच कोस्टल रोड प्रकल्प पूर्ण होण्याचे स्वप्न दृष्टीपथास आल्याने मुंबईकरांचे जीवनमान उंचावले असून मुंबईची तकदीर व तसबीर बदलली असल्याची बाब दिसून येणे, मुंबईतील कोळीवाडा आणि गावठाणाकरिता सीमांकन करून वेगळी विकास नियंत्रण नियमावली तयार करण्याची प्रक्रिया अद्यापही प्रलंबित राहिल्याने मुंबईतील कोळीवाडे व गावठाणांची झालेली दुरवस्था तातडीने विचारात घेण्याची आवश्यकता, मुंबईतील व रेल्वे स्थानकांच्या दोन्ही बाजूकडील झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीसाठी एक खिडकी व कालबद्ध स्थलांतरण योजना तयार करण्याची आवश्यकता, मुंबईतील उपकरप्राप्त जुन्या व मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतींचा पुनर्विकास करण्याचे, तसेच एसआरए प्रकल्पबाधितांच्या न्यायप्रविष्ट प्रकरणांच्या संदर्भातील शासनाचे धोरण, मुंबई शहरात दिड लाख फेरीवाले पात्रताधारक असूनही त्यांना जागेचे वाटप करण्यात न आल्याने पदपथांवर ते व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यांच्याकरिता मार्केट झोन निर्माण करण्याची आवश्यकता, जेणेकरून पदपथ मोकळे होऊन वाहतूक कोंडी होणार नाही, मागील २५ वर्षात मुंबई महानगरपलिकेच्या स्थायी समितीमार्फत किमान ३ लाख कोटींपेक्षा जास्त कामाच्या निविदा मंजूर होऊन त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, कोविडच्या काळात वैद्यकीय साहित्य खरेदी-विक्रीच्या विभागात हजारो कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, टॅब खरेदी, सफाई कामगार वसाहत पुनर्विकासाच्या आश्रय योजनेमध्ये १८०० | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कोटींचा भ्रष्टाचार झाल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मागील शासनाच्या काळात जिजामाता उद्यान प्राणी संग्रहालयाच्या आधुनिकीकरणाचा प्रकल्प, ९०० इलेक्ट्रीक बसेसची खरेदी यामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास येणे, मुंबई व उपनगरात रिक्षा व खाजगी वाहनांचे पार्किंगकरिता बहुमजली वाहनतळे उभी करण्याची आवश्यकता, देशातील प्रदुषणग्रस्त शहरामध्ये मुंबईचा अग्रक्रम असल्याचे निदर्शनास आल्याने शहरातील नालेसफाई करण्याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची व मुंबई आणि उपनगरातील कचऱ्याची वैज्ञानिक पद्धतीने विल्हेवाट लावण्याची योजना कार्यान्वित करण्याची आवश्यकता, मुंबईत गोवंडीतील डंम्पिंग ग्राऊंड आणि जैववैद्यकीय कचऱ्यावरील प्रक्रिया प्रकल्पांमुळे गोवंडी, शिवाजीनगर, देवनार परिसरात मागील १० वर्षांत झालेला अंदाजे १,८७७ जणांचा मृत्यू, प्रदूषणामुळे मुंबईतील नागरिकांना मोठ्या प्रमाणावर होत असलेली क्षयरोगाची बाधा, पर्यावरण संतुलन राखण्यासाठी मोजता येईल अशा पॅरामिटरच्या (कॉन्टीटेटीव्ह गोल्सच्या) आधारावर पर्यावरण धोरण आखून कार्यवाही करण्याची आवश्यकता, मुंबई व उपनगरातील महानगरपालिका, नगरपालिका क्षेत्रात भरावा लागणारा बिनशेतीकर रद्द करण्याची आवश्यकता, विद्यमान शासनाच्या काळात कायदा व सुव्यवस्थेमध्ये झालेली प्रचंड सुधारणा, त्यामुळे मुंबईकर मोकळा श्वास घेत असल्याची बाब निदर्शनास येणे, कॅगच्या लेखा परीक्षण अहवालातील वस्तुस्थितीदर्शक सत्यता मुंबईकरांपुढे येण्याची आवश्यकता, मुंबईमध्ये डबेवाला भवन व मराठी भाषा भवन तातडीने निर्माण करण्याची आवश्यकता, मुंबई महानगरपालिकेची मान्यता न घेता जवळपास १९४ अनधिकृत शाळा सुरू | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई महानगरपालिकेंतर्गत मराठी शाळांची पटसंख्या दिवसेंदिवस कमी झाल्याची बाब निदर्शनास येत असल्याने मराठी शाळांना आधुनिकतेची व कौशल्य विकास अभ्यासक्रमाची जोड देऊन मराठी विद्यार्थी व पालकांना मराठी भाषेच्या शाळांकडे आकर्षित करण्याची आवश्यकता, मुंबईतील रुग्णालयांमध्ये मुंबईबाहेरून येणाऱ्या रुग्णांची संख्या अधिक असल्याने व अनेकांना अतिदक्षता विभागात ठेवून उपचार करण्याची गरज असल्याने तेवढ्या प्रमाणात व्हेंटीलेटर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, मुंबईतील महानगरपालिका व सरकारी रुग्णालयात व्हेंटीलेटरची संख्या वाढविण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना विचारात घेण्यात यावी." | | |
| ३. | प्रा. राम शिंदे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - | "राज्यातील पुणे व नाशिक ही शहरे व्यापारी केंद्र असल्याने मुंबई, नागपूर, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राशी जोडलेली असणे, या शहरांचा मुंबईच्या धर्तीवर विकास करण्याकरिता स्वतंत्र विकास आराखडा तयार असणे मात्र त्यादृष्टीने शासनाकडून विकासात्मक कार्यवाही गतिमान करण्याची आवश्यकता असणे, पुणे शहरात विमानतळाकरिता जागा राखीव असून अन्य पायाभूत सुविधा तातडीने करण्याची आवश्यकता असणे, पीएमआरडीएच्या माध्यमातून रिंगरोड तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे महानगरपालिकेतील ३४ गावांचा सीटीसर्व्हे करून विकास करण्याच्या दृष्टीने नियोजनबद्ध व कालबद्ध आराखडा तयार करण्याची आवश्यकता असणे, पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्याच्या विभाजनाच्या प्रलंबित प्रस्तावावर तातडीने विचार करण्याची | दिनांक २१, २३ व २४ मार्च, २०२३ | एकत्रित चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | आवश्यकता, स्वारगेट ते कात्रज, खडकवासला ते डेक्कन आणि हिंजवडी ते कात्रज मेट्रो रेल्वेच्या कामाला गती देण्याची आवश्यकता, वाढत्या अपघातांना रोखण्यासाठी मुंबई-बेंगलोर महामार्गावरील स्वामी नारायण मंदिर ते नरे जंक्शन उड्डाणपूल करण्याची आवश्यकता, हवेली तालुक्यातील मोठ्या ग्रामपंचायतींचे विभाजन करण्याची आवश्यकता, जुन्या ब्रिटीशकालीन वाड्यांचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता असणे, सन २०२७ मध्ये नाशिक शहरात होणाऱ्या कुंभमेळ्याच्या दृष्टीने आवश्यक तयारी आतापासून करण्याची आवश्यकता, नाशिक शहरात पंतप्रधान आवास योजना गतिमान करण्याची आवश्यकता, नाशिक मधील गावठाण भागात असलेली छोटी घरे विकसित करण्याची व नाशिक मधील घरांचा क्लस्टर विकास करण्याची आवश्यकता, परराज्यातून येणारे उद्योग नाशिक शहरात आणण्याचे प्रयत्न करण्याची आवश्यकता, पुणे व नाशिक येथील सहकारी गृहनिर्माण सोसायट्या व गृहनिर्माण मंडळाच्या वसाहतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून पुनर्विकास करण्याची आवश्यकता असून सहकार अधिनियमातील त्रुटी दूर करण्याची आवश्यकता असणे, पुणे व नाशिक येथील वाहतूक समस्या दिवसें-दिवस वाढत असल्याने व प्रवाशांना तासनतास रस्त्यावर खोळंबून रहावे लागत असल्याने यावर तोडगा काढण्याकरिता वाहतूक समस्येचा अभ्यास करून वाहतूक आराखडा तयार करण्याची आवश्यकता, पीएमआरडीएच्या माध्यमातून पुणे शहराचे डीपी प्लॅन नव्याने तयार करण्याची आवश्यकता, व कँन्टोनमेन्ट एरिया पुणे महानगरपालिकेत समाविष्ट करण्याच्या दृष्टीने सुरू असलेली कार्यवाही अधिक गतिमान करण्याची आवश्यकता, पुण्यातील वाढत्या झोपडपट्टीची समस्या सोडविण्यासाठी झोपडपट्टी धोरण व नियमावली | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करण्याची आवश्यकता, पुणे-नाशिक रेल्वेची सुविधा करण्याकरिता केंद्रीय रेल्वे मंत्रालयाकडे मागणी करून पाठपुरावा करण्याची आवश्यकता, राज्यात दारू व दुध भेसळीचे प्रकार दिवसें-दिवस वाढत असल्याने संबंधितांवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने अन्य भेसळ अधिनियमातील शिक्षेची तरतूद कठोर करण्याची आवश्यकता, केंद्राने सहकाराला बळकटी देण्याच्या दृष्टीने केलेल्या प्रयत्नाला राज्य व केंद्र शासनाने परस्पर सामंजस्याने प्रयत्न करण्याची आवश्यकता, राज्यातील बंद पडत असलेल्या सहकारी बँका, कृषी सहकारी संस्था यांना बळकटी देऊन उर्जितावस्थेत आणण्याची आवश्यकता, प्रायमरी अँग्री क्रेडीट सोसायट्या गावपातळीवर काढण्याबाबत केंद्र शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने राज्यात जलदगतीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, राज्यातील बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना पाठबळ देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण संस्थांच्या स्वयं पुनर्विकासासंबंधात स्वतंत्र धोरण आणण्याची आवश्यकता, राज्यातील सहकारी चळवळ बळकट करण्याची व पतपेढ्यांमधील ५ लाखापर्यंतच्या ठेवींना संरक्षण देण्याची आवश्यकता, राज्यातील प्रगत शिक्षण संस्थांपैकी काही संस्था राजकीय अड्डे बनले असल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणारा विपरीत परिणाम, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४. | श्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव | "राज्यातील शेतकरी प्रचंड अडचणीत आला असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (पाणलोट विकास) टप्पा- २ मध्ये केंद्र शासनाकडून राज्याला मिळालेल्या निधीमधून १ टक्काही रक्कम राज्याने खर्च केली नसल्यामुळे संपूर्ण रक्कम केंद्र सरकारला परत करण्याची नामुष्की राज्यावर आली असणे, शासकीय सेवकांच्या बदल्यांबाबतचा सुस्पष्ट कायदा असताना कृषी मंत्री यांनी वर्ग ३ कर्मचाऱ्यांच्या | दिनांक १७ व २० मार्च, २०२३ | एकत्रित चर्चा झाली. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | बदल्या संदर्भात स्वतंत्र आदेश काढणे, भरती व पदोन्नतीबाबत शासनाची मान्यता घेण्याचा आदेश काढला असणे, राष्ट्रीय कृषी विकास योजना, पीक विमा योजना, बाजार हस्तक्षेप योजना आणि मूल्य समर्थन योजना निधीसारख्या योजनांच्या तरतुदी सातत्याने कमी केल्या जात असल्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात लक्षणीय घट होऊन त्याचा कृषी उत्पादनावरही विपरीत परिणाम होत असणे, पंतप्रधान कृषी सिंचन योजनेतून शेतकऱ्यांना तुषार आणि ठिबक सिंचनासाठी असलेले अनुदान वाटप अनेक शेतकऱ्यांना झालेले नसणे, "ग्रॉस डोमेस्टिक क्लायमेट रिस्क" या संस्थेने हवामान बदलाचा धोका असलेल्या देशातील प्रसिद्ध केलेल्या १०० राज्यांच्या यादीत महाराष्ट्राचाही समावेश असणे, सदरहू धोका लक्षात घेऊन उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहांची एक संयुक्त समिती गठीत करण्याची आवश्यकता, महागाईचा सर्वाधिक फटका शेतकऱ्यांना बसला असून शेतीमालाचे दर घसरले असणे, खते, किटकनाशके, तणनाशके, बियाणे यांच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने शेतकरी मेटाकुटीला आला असणे, ज्वारीवर मावा तसेच तुडतुडे (डेल्फसीड) रोगाचा प्रादुर्भाव झाला असणे, तृणधान्याच्या प्रक्रिया उद्योगांना चालना देण्यासाठी धडक कार्यक्रम राबवून ठोस तरतूद करण्याची आवश्यकता, केंद्र, राज्याकडून सोयाबीन, कापूस, कांदा, द्राक्ष, हरभरा उत्पादकांची फसवणूक झाल्यामुळे शेतकरी रस्त्यावर आला असणे, सदरहू शेतकऱ्यांना दिलासा देण्याऐवजी सरकारकडून शेतकऱ्यांवर लाठीचार्ज करण्यात आला असणे, छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेत पात्र ठरुनही अद्याप हजारो शेतकरी लाभापासून वंचित राहिले असणे, सरकारच्या निष्क्रियतेमुळे पीक कर्ज देण्यासाठी बँक जाणीवपूर्वक विलंब करीत असून | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | सिबील सक्ती अद्याप कायम असणे, प्रोत्साहन अनुदान योजनेचा लाभ हजारो शेतकऱ्यांना मिळाला नसणे, सहकारी संस्थाच्या नोंदणीत सरकारच्या हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांपुढे निर्माण झालेला प्रश्न, राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना केंद्र सरकारच्या एनसीडीसी संस्थेकडून देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये पक्षपातीपणा झाला असणे, सातबारा उताऱ्यावरील पीकपेरा नोंदी अभावी पालघर जिल्ह्यातील विक्रीअभावी पडून राहिलेल्या भात उत्पादकांना दिलासा देण्याची आवश्यकता, कांद्याचे दर सातत्याने घसरत असल्यामुळे कांदा उत्पादक हवालदिल झाला असणे, नाफेड मार्फत कांदा खरेदी निर्णय तातडीने घेण्याची आवश्यकता तसेच राज्यसरकारने स्वतःच्या तिजोरीतून भावांतर योजना सुरू करण्याची आवश्यकता, हमीभाव केंद्रावर धान विकणाऱ्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादित प्रति हेक्टरी १५ हजार रुपये बोनस देण्याच्या हिवाळी अधिवेशनात केलेल्या घोषणा पूर्णपणे अपयशी ठरणे, महाराष्ट्र विद्युत वितरण महामंडळाकडून सातत्याने शेतकऱ्यांची वीज तोडली जात असणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, तसेच ज्या गावांतून थकीत बिलाची रक्कम वसूल केली जाते त्या गावाच्या विकासकामांसाठी एकूण वसूल केलेल्या रकमेच्या ३० टक्के रक्कम विद्युत महामंडळाकडून देणे आवश्यक असताना त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच साहित्यांचा होत असलेल्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे वीज जोडणी साठी होत असलेला विलंब, सिंगल फेजची नागरीकांकडून मोठ्याप्रमाणात मागणी होत असून त्याकडे होत असलेले दुर्लक्ष, तसेच जुन्या डी.पी मुळे वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, अतिवृष्टीची मदतही अद्याप सर्व पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली नसणे, तसेच अतिवृष्टीमुळे रस्ते व पुलांचे नुकसान झालेले असणे, तसेच जनावरांचा देखील | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मृत्यू झाला असणे, उक्त नुकसानीकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून नागरीकांना अजून कोणतीही मदत मिळाली नसणे, केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून रोजगार हमी योजना राबविण्यासाठी कडक निर्णय घेण्यात आल्यामुळे रस्ते दुरुस्ती करण्याच्या कामामध्ये अडचणी येत असणे, त्यामुळे उक्त योजनेंतर्गत करण्यात येणाऱ्या कामांवर ग्रामसेवकांनी बहिष्कार घातला असणे, तसेच मनरेगा योजनेमध्ये महाराष्ट्र राज्य पिछाडीवर गेला असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी." | | |
| ५. | श्री.अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव | "राज्याच्या आरोग्य विभागात सुमारे १७ हजार पदे रिक्त असणे, शासकीय रुग्णालयात औषधांचा असणारा तुटवडा, राज्यात एच३एन२ विषाणूचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता, एकूणच आरोग्य व्यवस्थेकडे सरकारचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, कट प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णांचे होणारे शोषण थांबवण्यासाठी कठोर कायदा करण्याची आवश्यकता, राज्यात अवैधपणे सुरु असलेल्या लॅबवर कारवाई करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, निवासी डॉक्टरांच्या मागण्यांकडे सरकारचे होत असलेले दुर्लक्ष, तसेच राज्यात शासकीय कर्मचाऱ्यांच्या जुनी पेन्शन योजनेच्या मागणीकडे शासनाने जाणीव पुर्वक दुर्लक्ष करणे, राज्यातील नगरपालिका व महानगरपालिकांमधील प्रभाग व सदस्य संख्येची फेररचना, प्रभाग रचनेचे अधिकार स्वतःकडे घेण्याचा शासनाचा निर्णय, ९६ नगरपालिकांमध्ये ओबीसी आरक्षण, यासह न्यायालयात प्रलंबित असलेल्या प्रकरणांमुळे निवडणूका दीर्घकाळ प्रलंबित असणे, प्रशासकीय नेमणूकीमुळे जनतेच्या कामावर होत असलेला परिणाम, महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हापरिषदा यांच्या वर्षानुवर्ष निवडणूका | —— | चर्चा झाली नाही. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | झालेल्या नसल्यामुळे वाढलेला भ्रष्टाचार, एम.एस.आर.डी.सी व एम.एम.आर.डी.ए मध्ये अवास्तव कामाच्या निविदा मंजूर करून सुरू असलेला भ्रष्टाचार, राज्यातील महानगरपालिकांमध्ये, विशेषतः मुंबई महानगरपालिकेत प्रशासकांकडून प्रकल्प रद्द वा स्थगित केले असणे, दुसऱ्या बाजूला जनप्रतिनिधी नसताना नवीन योजना व प्रकल्पांची घोषणा करून निधीची उधळपट्टी होत असणे, मुंबईतील रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू झाले नसताना कंत्राटदारांना आगाऊ रकमांची वाटण्यात आलेली खिरापत, मुंबई महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पात प्रभागनिहाय निधी वाटपात झालेला भेदभाव, नालेसफाईत होत असलेला विलंब, मेट्रो प्रकल्पग्रस्तांच्या घरवाटपात झालेली अनियमितता, मुंबईतील "बेस्ट" ही सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आर्थिक अडचणीत आली असणे, सौंदर्यीकरणाच्या नावाखाली महानगरपालिकेच्या निधीची होत असलेली उधळपट्टी, फिल्म सिटी, गोरेगाव ते शिडीपाडा, मुलुंड या दुहेरी बोगद्याच्या कामासाठी काढलेल्या निविदेत झालेली अनियमितता, मुंबई शहरातील सी-कोस्टल रोडचे काम संथ गतीने सुरू असणे, केईएम रुग्णालयात रुग्ण सहायता निधीत गैरव्यवहार झाला असणे, आपला दवाखान्यांमध्ये असलेला ओषधांचा तुटवडा, नादुरुस्त उपकरणे, केईएम व इतर रुग्णालयात सीटीस्कॅन, एमआरआयसारख्या मशीन बंद असणे, गिरणी कामगारांच्या घरांचा प्रलंबित प्रश्न, धारावी पुर्नविकास प्रकल्प व अन्य प्रकल्पांसाठी नेमलेल्या कंत्राटदार कंपनीविरोधातील गंभीर आरोपांमुळे प्रकल्प अडचणीत आले असणे. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या प्रधानमंत्री आवास योजनेत झालेला गैरव्यवहार, पनवेल व उरण तालुक्यात नैना प्रकल्पांतर्गत घातलेल्या जाचक | | |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | अटींना होणारा विरोध, भिवंडी शहरात पंतप्रधान आवास योजनेचे थांबलेले काम, म्हाडाकडे देण्यात आलेले अधिकार शासनाने पुन्हा आपल्याकडे घेतल्याने निर्णयांना विलंब होत असणे, म्हाडा वसाहतीतील गृहनिर्माण संस्थांवर वाढीव सेवा शुल्काचा लादलेला बोजा, झोपु योजनेतील विकासकांकडून थकीत घरभाड्याची तातडीने वसुली करण्याची आवश्यकता, मुंबईतील सेस इमारतींचा रखडलेला पुर्नविकास, राज्यात विजेची प्रचंड होत असलेली मागणी, ट्रान्सफॉर्मर नादुरुस्त होण्याच्या घटनेमध्ये झालेली वाढ, वीजे अभावी शेतकऱ्यांच्या पिकांचे होत असलेले नुकसान, शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी." | | |

## विवरण क्रमांक १८

### अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये)(सर्वसाधारण)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर
प्राप्त झालेल्या (सर्वसाधारण) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | एकूण आलेल्या सूचनांची संख्या | — | ३८ |
| (२) | स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | — | २९ |
| (३) | सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या | — | १ |
| (४) | अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | — | ८ |
| (५) | चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | — | ५ |
| (६) | बॅलट मध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या | — | १४ |
| (७) | विभाग/ सदस्य निर्देशित संख्या | — | ० |
| (८) | मा.सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना | — | ० |
| (९) | व्यपगत झालेल्या सूचना | — | ० |

सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण ३८ सर्वसाधारण अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी २९ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या १४ सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी पाच अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली.

## विवरण क्रमांक १९

### अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये)(प्रश्नातून उद्‌भवलेल्या)

### महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (प्रश्नांच्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | एकूण आलेल्या सूचनांची संख्या | — | ०६ |
| (२) | स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | — | ०४ |
| (३) | सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या | — | ० |
| (४) | अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | — | ०२ |
| (५) | चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | — | ० |
| (६) | बॅलटमध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या | — | ०२ |
| (७) | विभाग/ सदस्य निर्देशित संख्या | — | ० |
| (८) | मा.सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना | — | ० |
| (९) | व्यपगत झालेल्या सूचना | — | ० |

सन २०२३ च्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात एकूण ६ अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी ४ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या २ सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी एकाही अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली नाही.

# विवरण क्रमांक २०

## म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चेच्या सूचना

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | आलेल्या सूचनांची संख्या | - | २५ |
| (२) | स्वीकृत सूचनांची संख्या | - | १४ |
| (३) | अस्वीकृत सूचनांची संख्या | - | ७ |
| (४) | सभागृहात चर्चा झालेल्या सूचना | - | २ |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | **सर्वश्री कपिल पाटील, किरण सरनाईक, सत्यजित तांबे, वि.प.स.** “जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी राज्य सरकारी, निम सरकारी कर्मचारी आणि शिक्षक यांच्या समन्वय समितीने १४ मार्चपासून दिलेला बेमुदत संपाचा इशारा, मागील १५ वर्षांच्या काळात कोणतीही पेन्शन योजना सुरू नसल्यामुळे त्याकाळातील शासनाचा १४ टक्का हिस्सा आणि कर्मचाऱ्यांचा १० टक्के हिस्सा असा शासन आणि कर्मचारी यांना द्यावा लागणारा मोठा भूर्दंड, कोणत्याही योजनेत नसलेल्या हजारो शिक्षकांना जीपीएफ खाते नसल्यामुळे सातव्या वेतन आयोगाचे न मिळालेले थकीत नगदी हप्ते, १ नोव्हेंबर २००५ पूर्वीच्या कर्मचाऱ्यांना जीपीएफ कपात सुरू असताना त्यांना नव्या योजनेत ढकलून बंद केलेली कपात, १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त झालेले शासकीय कर्मचारी नंतर कायम होऊन | १० मार्च २०२३ | चर्चा झाली |

त्यांना आणि न्यायालयीन कर्मचाऱ्यांना पेन्शन चालू ठेवण्याचा निर्णय, शिक्षकांच्या बाबतीत मात्र लागू करण्यास दिलेला नकार, विनाअनुदानीत, अशंतः अनुदानीत आणि कायम विनाअनुदानीत काळातील नियुक्त शिक्षकांच्या बाबतीत, २००५ नंतर १०० टक्के अनुदान मंजूर झाल्याचे कारण देत नाकारण्यात येणारे जुने पेन्शन, वस्तीशाळा शिक्षकांनाही त्यांची नेमणूक, २००५ पूर्वीची असूनही त्यांना जुनी पेन्शन योजना अद्यापी लागूझालेली नसणे, संविधानातील समतेच्या तत्त्वाशी विसंगत असे हे शासनाचे धोरण आहे. दिल्ली, राजस्थान आणि छत्तिसगड राज्याप्रमाणे नोव्हेंबर, २००५ ची विभाजन रेषा रद्द करून आधीच्या व नंतरच्या सरसकट सर्व कर्मचाऱ्यांना व शिक्षकांना जुनी पेन्शन योजना तात्काळ लागू करण्याची आवश्यकता, महाराष्ट्र शासन याबाबत कोणती भूमिका घेत नसल्यामुळे शासकीय व निमशासकीय कर्मचारी व शिक्षक यांच्यामधे वाढलेला प्रचंड असंतोष, याबाबत तातडीने दखल घेऊन शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

२. **सर्वश्री अंबादास दानवे, ॲड.अनिल परब, डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** १६ मार्च २०२३ चर्चा झाली 

"मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याचा निर्णय महाविकास आघाडी सरकारने घेतलेला असणे, उक्त कार्यक्रमा अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी ७५ कोटी रुपयांच्या निधीस मान्यता देऊनही सदरहू निधी विनावापर पडून असणे, तसेच मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन/रूपरेषा निश्चित करण्यासाठी महाविकास आघाडीच्या सरकारने गठीत केलेली मंत्रिमंडळ उपसमिती बरखास्त करून नवीन मंत्रिमंडळ उपसमिती पुनर्गठीत करण्यात आली असणे, परंतु उक्त समितीचे काम अद्याप सुरू नसणे, त्यामुळे मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याबाबत शासनाची उदासिनता दिसून येणे, परिणामी मराठवाड्यातील जनतेमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करून मराठवाडा मुक्ती संग्रामाचे अमृत महोत्सवी वर्ष साजरा करून त्याअंतर्गत विविध उपक्रम राबविण्याच्या दृष्टीने शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

# विवरण क्रमांक २१

## म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्राप्त झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ७९५ |
| (२) | स्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | २०६ |
| (३) | सभागृहात चर्चा झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ७३ |
| (४) | सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या एकूण स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र | - | १२२ |
| (६) | अस्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ३६२ |

| अ.क्र. | लक्षवेधी सूचना क्र. | सदस्यांचे नाव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| **१.** | **५४** | **सर्वश्री विक्रम काळे, शशिकांत शिंदे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, अनिकेत तटकरे, नरेंद्र दराडे, सचिन अहिर, वि.प.स.**<br>" दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी नाशिक येथील गोंदे औद्योगिक वसाहतीतील जिंदाल पॉलिफिल्म्स कंपनीत बॉयलरजवळ स्फोट होऊन लागलेल्या भीषण आगीत दोन महिला कामगारांचा दुर्देवी मृत्यू झाल्याचे तसेच अन्य १७ जण गंभीररित्या जखमी झाल्याचे आढळून येणे, त्यानंतर सदर दुर्घटनेच्या ठिकाणी मुख्यमंत्री महोदयांनी भेट देऊन पाहणी केल्यानंतर, त्याबाबत उच्चस्तरीय चौकशी करण्याचे आदेश देऊन त्याचवेळी मृतांच्या वारसास पाच | १ मार्च २०२३ | चर्चा झाली |

लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे मुख्यमंत्री महोदयांनी घोषित करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, शासनाने आदेशित केल्यानुसार, सदर प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येऊन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय व सदर अहवालात काय नमूद करण्यांत आले आहे व त्याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली याबाबतची अद्यापही अनभिज्ञता असणे, तसेच कामगार आयुक्तांच्या पथकाने या कंपनीस दर महिन्यास भेट देऊन पाहणी करणे बंधनकारक असताना कामगार आयुक्त पथकाने सदर कंपनीस केव्हा भेट दिली होती व त्या पाहणीमध्ये काय आढळून आले याबाबत अद्याप खुलासा झालेला नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ अखेरीस निदर्शनास येणे, त्यामुळे या दोन्ही बाबींसंबंधात अद्यापही कार्यवाही न झाल्याने जनतेमध्ये व कामगार वर्गांमध्ये निर्माण द्वझालेले असंतोषाचे वातावरण व त्याप्रकरणी शासनाने तातडीने मृतांच्या वारसांना आर्थिक मदतीच्या वितरणासह पुढील कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

२. ९० **श्री. जयंत पाटील, वि.प.स.** २ मार्च २०२३ चर्चा झाली

" महामुंबई सेझसाठी रायगड जिल्ह्यातील उरण, पेण, पनवेल तालुक्यामधील एकूण ४५ गावांच्या जमिनी सेझसाठी भूसंपादन प्रक्रिया शासनाकडून सन २००५ पासून राबविण्यास सुरूवात करण्यात येणे, महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतकरी अधिनियम, १९४८ चे कलम ६३ (१)अ मधील तरतुदीनुसार ज्या औद्योगिक कारणासाठी भूसंपादन केलेल्या जमिनींचा वापर जमीन खरेदी केलेल्या तारखेपासून पंधरा वर्षांचे आत विकासक कंपनीने सुरू केला नाही तर अशा सर्व जमिनी मूळ किंमतीस मूळ शेतकऱ्यांना परत करण्याचा कायदा या सेझमध्ये विक्री झालेल्या जमिनींनाही लागू असणे, त्यानुसार महामुंबई सेझसाठी संपादीत करण्यात आलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना परत करण्याची आवश्यकता असणे, महामुंबई सेझसाठी संपादित करण्यात आलेल्या शेतजमिनी शेतकऱ्यांना तीन महिन्याच्या आत परत करण्यात येणार

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | असल्याचे दिनांक २१ मार्च, २०२२ रोजी तत्कालीन उद्योग मंत्री यांनी विधीमंडळात या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आश्वासन दिलेले असणे, मात्र अद्यापपर्यंत सदर शेतकऱ्यांच्या शेतजमिनी परत करण्यात आलेल्या नसणे, त्या परत करण्याची आवश्यकता असणे, विधीमंडळात घेतलेल्या निर्णयामुळे तसेच दिलेल्या आश्वासनामुळे पेण तालुक्यातील २४ गावांसह उरण, पनवेल तालुक्यामधील सेझग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतजमिनी परत मिळण्याच्या आशा त्यावेळी पल्लवित झाल्या असणे, राज्याच्या विधीमंडळाचा शब्द पडू न देता विधीमंडळाचे पावित्र्य राखण्याकरता सेझसाठी पंधरा वर्षांपूर्वी शासनामार्फत संपादीत करण्यात आलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी शेतकऱ्यांना पूर्ववत परत केल्या जातील असा विश्वास शेतकऱ्यांना त्यावेळी झालेला असणे, मुळातच पेण तालुक्यातील संपादित झालेल्या २४ गावांच्या जमिनीपैकी २२ गावांच्या जमिनी हटवणे, धरणाच्या लाभक्षेत्रात समाविष्ट असलेल्या जमिनी ह्या सुपिक जमिनी असणे, या सुपिक व लाभक्षेत्रात समाविष्ट असलेल्या शेतजमिनी भूसंपादनात आणून अक्षम्य अशी चूक त्यावेळी प्रशासनाची झालेली असणे, सन २०१२-१३ मध्ये पेण तालुक्यातील शेतकऱ्यांच्या ७/१२ वर शेतकऱ्याचे नाव कमी करून महामुंबई सेझ कंपनीचे भोगवटदार सदरी नाव दाखल करण्यात आले त्या फेरफारला जवळ जवळ सर्वच शेतकऱ्यांनी विरोध दर्शविणे व त्या विरोधात पेण तहसिलदारांकडे अपिल दाखल करणे, सदर अपिलांपैकी अनेक अपील फेटाळणे तर सुमारे १५० शेतकऱ्यांचे अपील मान्य करून शेतकऱ्यांचे नाव कमी न होता ७/१२ वर इतर अधिकारात महामुंबई सेझचा घेतलेल्या रकमेचा बोजा ठेवण्याचा निर्णय झाला त्याप्रमाणे सुमारे १५० शेतकऱ्यांचे तसे ७/१२ तयार करण्यात येणे, | | |

त्या प्रमाणेच उर्वरित सर्व शेतकऱ्यांच्या ७/१२ वरून भोगवटदार सदरील महामुंबई सेझ कंपनीचे नाव कमी करून महामुंबई सेझ कंपनीचा बोजा इतर अधिकारात ७/१२ ला ठेवण्यात येणे, दिनांक २१ मार्च २०२२ रोजी तत्कालीन उद्योग मंत्री यांनी शेतकऱ्यांच्या शेत जमिनी तीन महिन्यात परत करणार असल्याचे आश्वासन देऊनसुद्धा अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळालेल्या नसणे, त्यामुळे सद्यःपरिस्थितीत काही शेतकरी महाराष्ट्र कुळवहीवाट व शेतकरी अधिनियम, १९८४ चे कलम ६३ (१-अ) या कायद्याचा आधार घेऊन कायदेशीर मार्गाने जमिनी मिळवण्याचा प्रयत्न करत असणे, या सर्व घडामोडी प्रकरणात या संपादन प्रक्रियेमुळे मागील पंधरा वर्षात शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झालेले असणे व जमिनी परत मिळविण्यासाठी आजही मोठा मनस्ताप व आर्थिक नुकसान शेतकऱ्यांचे होत असणे, सदर सेझसाठी भूसंपादीत झालेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी पूर्ववत परत करण्याची निर्माण झालेली आवश्यकता, सबब सदरप्रकरणी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

३. ९६ **ॲड. अनिल परब, वि.प.स.** २ मार्च २०२३ चर्चा झाली

" मौजे वांद्रे, ता. अंधेरी, जि. मुंबई उपनगर येथील खार-सांताक्रुज येथील केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या अखत्यारीतील जागेवर ५० वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास असलेल्या झोपडपट्टी धारकांचा पुनर्विकास रखडलेला असणे, याबाबत विविध आयुधांद्वारे लक्ष वेधून देखील कार्यवाही होत नसणे, सदर जागेबाबत संरक्षण मंत्री भारत सरकार व मा. मुख्यमंत्री यांच्यात, २०१७ साली झालेल्या बैठकीत ५०% जागा केंद्र सरकारच्या संरक्षण विभागास तर ५०% जागेवर झोपडपट्टी पुनर्विकास योजने अंतर्गत तेथील झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास करण्याचे प्राथमिक धोरण निश्चित झालेले असणे, तसेच सदर पुनर्विकासाठी केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाची बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्यास हरकत नसणे, तत्कालीन सरकारने याबाबत त्रिसदस्यीय समिती गठीत न करणे परंतु सदर झोपडपट्टीच्या लगत असलेल्या जिल्हाधिकारी

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | यांच्या अखत्यारीतील तसेच खाजगी मालकीच्या जागेवर पुनर्विकास करण्यास मंजुरी देणे, परंतु संरक्षण विभागाच्या मालकीवरील पुनर्विकासाबाबत आजतागायत अतिशय संथगतीने सुरू असलेल्या कार्यवाहीमुळे तेथील नागरिकांमध्ये असलेल्या असंतोषाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना याबाबत शासनाची भूमिका." | | |
| ४. | २ | **सर्वश्री विलास पोतनीस, सुनिल शिंदे, वि.प.स.** | २ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| | | " मुंबईतील दहिसर मध्ये सुरू असलेल्या अग्निशमन दलातील अग्निशामकांच्या भरती प्रक्रियेदरम्यान महिला अग्निशामक पदासाठी १६२ इंच उंचीच्या निकषात बसत असतानाही अनेक महिलांना डावलण्यात आल्यामुळे संतप्त झालेल्या आणि आंदोलनाचा पवित्रा घेतलेल्या महिला उमेदवारांवर बंदोबस्तासाठी ठेवण्यात आलेल्या पोलिसांनी सौम्य लाठीमार केला असल्याची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास घडली असणे, मुंबईतील अग्निशमन दलात ९०० जागांची भरती प्रक्रिया सुरू झाली असणे, दहिसर येथे भरतीसाठीच केंद्र उभारण्यात येणे, या ठिकाणी भरतीसाठी महिला उमेदवारांची मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळलेली असणे, अयोग्य नियोजनाचा फटका महिला उमेदवारांना बसणे, सदरहू भरती प्रक्रियेकरीता मुलींसाठी १६२ सेंमी उंचीची अट असणे, तरीदेखील १६२ सेंमी उंची पेक्षा जास्त उंची असलेल्या मुलींना सुद्धा भरती प्रक्रियेतून बाहेर काढण्यात येणे, परंतु १६२ सेंमी पेक्षा कमी उंचीच्या मुलींना पात्र ठरवण्यात येणे, तसेच उशिरा आलेल्या काही मुलींना टोकन देऊन दुसऱ्या दिवशी बोलावण्यात येणे, परंतु दिलेल्या वेळेवर पोहोचून सुद्धा त्यांना भरती प्रक्रियेत प्रवेश न देण्यात येणे, त्यामुळे नाराज झालेल्या महिला उमेदवारांनी घेतलेला आंदोलनाचा आक्रमक पवित्रा आणि आंदोलनकर्त्या असहाय्य महिला उमेदवारांवर पोलिसांनी | | |

केलेला सौम्य लाठीमार, परिणामी सदरहू ठिकाणी अग्निशमन भरती प्रक्रियेसाठी जमलेल्या सर्व महिला उमेदवारांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू भरती प्रक्रियेस तात्काळ स्थगिती देऊन झालेल्या अनियमिततेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५. | २७९ | **डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री अभिजित वंजारी, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुधाकर अडबाले, वि.प.स.**<br>" हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर अवैध देशी-विदेशी दारुच्या व्यवसाय फोफावला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास येणे, येथील अवैध दारुविक्रीमुळे ग्रामीण भागात तंटे वाढत असणे, परिणामी गावस्तरावरील वातावरण दुषित बनत असणे, यातून गुन्हेगारी वाढत असणे, परंतू बीटस्तरावरील काही कर्मचारी वरिष्ठांच्या डोळयात धुळफेक करून अवैध दारुविक्रीला संमती देत असल्याचे येथे चित्र असणे, ग्रामीण भागात विना नंबर दुचाकीवर देशी-विदेशी दारुचा थेट द्वारपोच पुरवठा केला जाणे, पंरतू प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, त्यामुळे येथील चिंचोली महादेवसह अनेक गावांतील महिला गावांत दारुबंदी करावी अशी आग्रही मागणी करीत असणे, मात्र त्यांच्यावरच प्रशासन खोटे गुन्हे दाखल करीत असणे, त्यामुळे शासनाने माहिती घेऊन येथील अवैध देशी-विदेशी दारुविक्रीला रोखून संबंधित विक्रेते व प्रशासनातील जबाबदार अधिकारी आणि कर्मचारी यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी सर्वच स्तरावरुन मागणी होत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना याबाबत शासनाने केलेली वा करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | २ मार्च २०२३ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **६.** | **४८०** | **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** “ जळगांव येथील एम.आय.डी.सी मधील रेमंड लिमिटेड जळगांव या कंपनीमधील कामगारांचा वेतनवाढीचा करारनामा करण्यास मागील दोन वर्षांपासून कंपनीचे व्यवस्थापन टाळाटाळ करीत असल्याने कामगारांनी दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजी काम बंद आंदोलन करणे, वेतनवाढीसाठी शांततामय मार्गाने कंपनीच्या आवारात ठिय्या आंदोलन करणाऱ्या कामगारांवर दिनांक २४ फेब्रुवारी २०२३ रोजी रात्री ११.३० चे सुमारास २०० ते २५० पोलिसांनी बेकायदेशीरपणे कंपनीमध्ये घुसुन पूर्वसूचना न देता केलेला लाठीचार्ज व मारहाण, कंपनीमध्ये एकही महिला कामगार नसताना ५० महिला पोलिसांना कंपनीमध्ये आणून कामबंद आंदोलन पोलिसांनी बंद पाडणे, त्याच्या निषेधार्थ कामगारांनी कामबंद आंदोलन करणे, ३, ००० कामगारांचा निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, परिणामी कामगारांत पसरलेला तीव्र असंतोष व भितीचे वातावरण, या संपूर्ण घटनेची चौकशी होऊन दोषी पोलिस अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून कंपनी पूर्ववत सुरू करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | २ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| **७.** | **२८७** | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.** “ राज्यभरातील कोणत्याही खातेदार शेतकऱ्यांचा अपघाती मृत्यू झाल्यास त्याच्या वारसास स्व.गोपीनाथ मुंडे अपघाती विमा योजनेतून दोन लाख रुपयांची मदत देणे अपेक्षित असणे, असे असतानाही विमा कंपन्यांकडून अनेक प्रस्ताव नाकारले जात असल्याची बाब उस्मानाबाद जिल्ह्यात माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात व त्या सुमारास निदर्शनास येणे, या योजनेसाठी शासनाने ९५ कोटीहून अधिक खर्च विमा कंपनी व सल्लागारावर करीत | २ मार्च २०२३ | चर्चा झाली |

असताना ही कंपनी शेतकऱ्यांचे प्रस्ताव नाकारत असणे, शेतकऱ्यांचे सर्व प्रस्ताव मान्य करून त्यांना न्याय देण्यासाठी शासनाने उपाययोजना करण्याची आवश्यकता या बाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

८. ४३३ **श्री. सत्यजित तांबे, वि.प.स.** ९ मार्च २०२३ चर्चा झाली

" राज्यात मागील १० वर्षांमध्ये बाहेरच्या राज्यांमधून अथवा परदेशातून अनेक नवनवीन उद्योग व गुंतवणूक येणे, परंतू वारंवार हे उद्योग काही ठराविक औद्योगिक वसाहतींमध्ये आल्यामुळे त्याच औद्योगिक वसाहतींचा किंवा त्याच्या आजूबाजूच्या ठराविक शहरांचाच विकास होणे, (उदाहरणार्थ मुंबई, ठाणे, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर) परिणामी राज्यातील इतर शहरांमध्ये व तालुका पातळीवरील औद्योगिक वसाहतीमध्ये विकासाचा समतोल न साधल्यामुळे या औद्योगिक वसाहतीतील परिसरातील उद्योजकांना कुठल्याही सोई सुविधा उपलब्ध न होणे, परिणामी तेथील उद्योजक सुशिक्षित बेरोजगार व युवक-युवती यांच्यामध्ये उदासीनता पसरणे, त्यामुळे राज्याच्या सर्व भागामधून बेरोजगार तरुण युवक युवतींना राज्यातील ठराविक भागामध्येच स्थलांतर होऊन त्या स्थलांतरामुळे नागरी विकासावर देखील ताण पडणे, त्यासाठी शासनाने राज्यातील मागील १० वर्षात औद्योगिक वसाहतीनुसार आकडेवारीची माहिती घेऊन शासनाने करावयाची कार्यवाही, तसेच विकासाचा समतोल साधला जावा, राज्यात येणारे नवे उद्योग व गुंतवणुक सर्वत्र जाण्याच्या दृष्टीने शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही करून धोरणात्मक निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता व याबाबत राज्य शासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९. | १० | **सर्वश्री सतिश चव्हाण, विक्रम काळे, वि.प.स.**<br>" वाळुंज (छत्रपती संभाजीनगर) सिडको महानगर - ३ करिता सिडको प्रशासनाने वाळुंज, जोगेश्वरी व रामराई येथील ४०० शेतकऱ्यांच्या १२५० एकर जमिनीवर सन १९८९ मध्ये आरक्षण टाकले असणे, सिडको प्रशासनाने शेतकऱ्यांना सन १९९२ मध्ये नोटीसा देऊन सदर जमिनीवर विकास कामे करु नये शिवाय इतर शासकीय कार्यालयांनीही सदर जमिनीवर विकास करण्यास कोणत्याही परवानग्या देऊ नये असे कळविले असणे, मागील ३० वर्षात सिडको प्रशासनाने या नियोजित प्रकल्पाचा विकास करण्यासाठी काहीही कार्यवाही केली नसणे, व स्थानिक शेतकऱ्यांनाही विकास करु दिला नसणे, मागील ३० वर्षापासून शेतकऱ्यांच्या जमिनी पडीत असणे, त्यामुळे शेतकऱ्यांना कोणत्याच प्रकारचे उत्पन्न मिळत नसणे, वाळुंज एमआयडीसीची झपाट्याने वाढ होत असणे, वाळुंज परिसरात कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणावर असणे, हा प्रकल्प प्रलंबित राहिल्याने रहिवाशी क्षेत्रात वाढ होऊ न शकणे, सदर परिसरात जमिनीचे दर रु. २५००/- प्रति चौरस मीटर असणे, सदर प्रकल्प ३० वर्षापासून रेंगाळल्यामुळे किंमती वाढत गेल्या असल्याने शहर व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) यांनी दिनांक १८.०२.२०१९ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत विषय घेवून वाळुंज महानगर प्रकल्प -३ हे सिडको अधिसूचित क्षेत्रातून वगळण्यासाठी ठराव केला असून शासनाची मान्यता प्रलंबित असणे, स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिडकोने सदर जमिनीचे संपादन करून शेतकऱ्यांना तात्काळ मावेजा द्यावा किंवा शेतकऱ्यांच्या जमिनीवरील आरक्षण उठवण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली कार्यवाही व प्रतिक्रिया." | ९ मार्च २०२३ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०. | ५०७ | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>" मुंबई महापालिकेतून ४०० कि.मी रस्त्यांसाठी सुमारे ६ हजार कोटींचा झालेला घोटाळा, नव्या आर्थिक वर्षात विशेष निधी, राखीव निधी आणि अंतर्गत निधीतून २५ हजार कोटीहून अधिक निधी खर्च केला जाणे, जुन्या निविदा रद्द करून पुन्हा नव्याने प्रत्येक कामासाठी स्वतंत्र निविदा काढण्यात आल्याने पुन्हा खर्च वाढणे, भायखळा येथील राणीबागेच्या विस्तारित जागेचे आरक्षण बदलणार असून त्यामुळे राणी बागेचा विस्तार रखडणार असणे, मुंबई सिमेंट काँक्रीटचे जंगल वेगाने वाढत असून त्या बांधकामासाठी लागणारे पाणी सहजासहजी मिळत नसल्याने टँकर माफिया मुंबईतील विहिरीमधून पाणी उपसा करणे, विशेष म्हणजे १९,००० विहिरींपैकी अनेक विहिरी नामशेष झाल्या असणे, काही वेळेस खडक फोडण्यासाठी पोकलेन व इतर यंत्रांनी फोडले जात असणे, अशा वेळेस पाण्याचे प्रवाह बदलतात व विहिरी कोरड्या पडण्याची असलेली शक्यता, भविष्यात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई होण्याची शक्यता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून सखोल चौकशी करण्याची नितांत आवश्कता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | ९ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| ११. | ३४७ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>" राज्यातील विशेषतः छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काम करणारे अभियंते आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून शासनाच्या कामांमध्ये अनियमितता करण्याचा प्रयत्न करत असणे, काही ठिकाणी कामासंदर्भात निधी प्राप्त होऊनही कामे सुरू करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आलेली असणे, शरणापूर ते साजापूर-करोडीपर्यंत असलेल्या ६ कि.मी. रस्त्याची दयनिय अवस्था झालेली असून गेल्या आठ वर्षामध्ये तीन वेळा निधी उपलब्ध करूनही रस्त्याचे काम अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास येणे, रस्त्यासाठी | ९ मार्च २०२३ | चर्चा झाली |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | २८ कोटीच्या कामासाठी दिनांक ७ डिसेंबर, २०२२ पर्यंत निविदा मागविण्यात आल्या असून चार कंत्राटदारांकडून निविदा प्राप्त झालेल्या असूनही सदर निविदा उघडण्यात आलेली नसणे, छत्रपती संभाजीनगर शहरातील राज्य उत्पादन विभागाच्या इमारत व विश्रामगृहासाठी सुमारे १० कोटीची निविदा मागविण्यात आली असतानाही दहा महिन्यांपासून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नसणे, याउलट पैठण येथील आरोग्य केंद्रासाठी दीड कोटींचा निधी मंजूर असतानाही ९९ लाखांच्या मर्यादेत कामे ही विनानिविदा करण्यात आलेली असणे, सदर कामे ही विहीत मुदतीत पूर्ण न केल्याने प्रलंबित असलेल्या कामांच्या खर्चाच्या रक्कमेमध्ये वाढ होत असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान होत असणे, सदर कामांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येणे, सदर मागणींबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात येत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असल्याने सदर कामे पूर्ण करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत शासनाने करावायची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१२.** | **२०२** | **प्रा.राम शिंदे, वि.प.स.**<br>" राज्यातील साखर कारखान्यांनी दिनांक १५.१०.२०२२ पूर्वी ऊस गाळप हंगाम सुरू केल्यास संबंधित कारखान्यांच्या कार्यकारी संचालकांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश साखर आयुक्तालयाने जारी करणे, सदर आदेशानुसार सन २०२२-२३ या चालू वर्षाचा गाळप हंगाम दिनांक १५.१०.२०२२ रोजी पासून सुरू करावा असा निर्णय मंत्री समितीच्या बैठकीत झालेला असणे, पुणे जिल्ह्यातील बारामती अग्रो लि., शेटफळ, ता. इंदापूर या | ९ मार्च २०२३ | चर्चा झाली |

साखर कारखान्याने यावर्षीचा गाळप हंगाम दिनांक १५.१०.२०२२ पूर्वी सुरू करून कायद्याचा भंग केलेला असणे, त्यामुळे बारामती अग्रो लि. शेटफळ, ता. इंदापूर, जि.पुणे यांच्या कार्यकारी संचालकांवर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधितांवर गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, उपमुख्यमंत्री, सहकार आयुक्त, पुणे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असून उपमुख्यमंत्री यांनी कारवाई करण्याचे आदेश सहकार आयुक्त, पुणे यांना देणे, आदेश देऊनही अद्यापपर्यंत कारवाई झालेला नसणे, त्यामुळे शासनाने याची तातडीने दखल घेऊन कारखान्यातील संबंधित दोषी संचालकांविरुद्ध गुन्हे दाखल करून करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३. | ५०९ | **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | १० मार्च २०२३ | चर्चा झाली |

" परभणी येथील लोकप्रतिनिधी यांनी माहे फेब्रुवारी, २०२३ दरम्यान मुख्य सचिव, यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करणे, पाथरी जिल्हा परभणी येथे नव्याने सुरू झालेल्या राजमाता अहिल्याबाई होळकर येथे आठवडी बाजार भरण्याबाबत मुख्य अधिकारी व प्रशासक यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे कर्मचाऱ्यांनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी नवीन आठवडी बाजारात भाजी, फळ, विक्रेते यांना जागेवर बसविण्याची प्रक्रिया सुरू करणे, परंतु, काही भाजीपाला विक्री करणाऱ्यांनी नगर परिषद कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली व धमकावले त्यामुळे नगरपरिषद कर्मचाऱ्यांनी दिलेल्या तक्रारीवरून पाथरी पोलीस स्टेशन येथे भा.द.वी. ३५३, ५०४, ३४ नुसार दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी गु.र.न. ४८९/२०२२ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला असणे, तसेच त्या चारही आरोपींना अटक करण्यात येणे, परंतु नगर परिषदने केलेल्या कारवाईचा राग धरून त्या

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | आरोपीपैकी एकाने दिनांक २८ ऑक्टोबर, २०२२ रोजी शासकीय कर्तव्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध पातरी पोलीस स्टेशन येथे लेखी तक्रार नोंदवल्यावरून पोलिसांनी त्या चार नगर परिषद कर्मचाऱ्याविरुद्ध ३८४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गु.र.न. ४९०/२२ प्रमाणे गुन्हा नोंदविणे, तसेच चारही नगरपरिषद कर्मचाऱ्यांना अटक करण्यात येणे, याप्रकरणी विशेष बाब म्हणजे आरोपी म्हणून अटकेत असलेल्या व्यक्तीने पोलीस ठाण्यातील कोठडीमधून लेखी तक्रार दिली व त्या तक्रारीवरून कर्मचाऱ्यांच्या विरुद्ध तात्काळ गुन्हा नोंद करण्यात आला तसेच, त्यांना अटकही करण्यात येणे, सर्वोच्च न्यायालयाने अर्निषष कुमार विरुद्ध बिहार सरकार या प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार सात वर्षापर्यंत शिक्षा असलेल्या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात येऊ नये असे निर्देश दिलेले असणे परंतु, पाथरी येथील या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या त्या निर्देशांचे उल्लंघन करून पाथरी नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांना अटक करण्यात येणे, या प्रकरणात आरोपी विरुद्ध नोंदविलेल्या गुन्ह्यामध्ये जी कलमे लावण्यात आली आहेत त्यात जास्तीत जास्त तीन वर्षेपर्यंत शिक्षा असतांनासुद्धा सर्वोच्च न्यायालयाच्या वरील निर्देशाचे उल्लंघन करीत पाथरी पोलिसांनी त्या शासकीय कर्मचाऱ्यांना अटक करणे, ज्या गुन्ह्यात तीन वर्षापर्यंत शिक्षा आहे, व तशी कलमे लावली आहेत त्या प्रकरणात फौजदारी संहिता कलम ४१ प्रमाणे पोलीस अधिकाऱ्यांनी त्या आरोपींना लेखी नोटीस देऊन पोलीस अधिकाऱ्यांसमोर हजर राहण्यास कळवणे बंधनकारक असणे परंतु या प्रकरणात तशी लेखी नोटीस न देता थेटपणे कर्मचाऱ्यांना अटक करणे, चारही शासकीय कर्मचारी असून ते शासकीय काम करत होते म्हणजेचच त्या दिवशी ड्युटी | | |

बजावताना त्यांना अटक करण्यात येणे, कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यांला अटक करण्यापूर्वी त्या कर्मचाऱ्यांच्या विभाग प्रमुखांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक असणे, अटक केल्यानंतर विभागाकडून परवानगी मिळवणे हे नियमबाह्य असणे, असे असतानाही पाथरी पोलिसांनी व त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चार शासकीय नगरपरिषद कर्मचाऱ्यांना अटक करण्यापूर्वी त्यांच्या विभाग प्रमुखांची कोणतीही पूर्वपरवानगी घेतलेली नसणे, अधिकारी, कर्मचारी यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यापूर्वी सीआरपीसी १९७ नुसार सक्षम नियुक्ती अधिकारी यांची लेखी परवानगी घेणे बंधनकारक असतानाही या प्रकरणात मनमानीपणे तसेच पदाचा व कायद्याचा दुरुपयोग करून पाथरी पोलीस व त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांनी सर्वोच्च न्यायालय, य सीआरपीसी, फौजदारी संहिता, व शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे उल्लंघन केले असणे, वरील सर्व प्रकरणी झालेल्या नियमभंगाची आपल्या स्तरावरून चौकशी करून दोषी असणारे स्थानिक वरिष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मनमानी कारभाराची व पदाच्या दूर उपयोगाची चौकशी करून त्यांना निलंबित करण्यात यावे, अशी मागणी मुख्य सचिव यांच्याकडे करूनही अद्यापपर्यंत त्याच्या स्तरावरून कोणतीही सक्षम कारवाई करण्यात न येणे, परिणामी कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

१४. २०९ **डॉ. मनिषा कायंदे,** सर्वश्री सचिन अहिर, सुनिल शिंदे, **वि.प.स.** १३ मार्च २०२३ चर्चा झाली

" लाखो वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेले पंढरपूर येथे चालू आर्थिक वर्षात कॉरिडॉर तयार करण्याचे प्रस्तावित असणे, पंढरपूर देवस्थान परिसरातील या कॉरिडॉरच्या पहिल्या टप्प्यासाठी ३०० कोटींचा निधी खर्च करण्याचे नियोजित असणे, उत्तर प्रदेशात काशी विश्वनाथ कॉरिडॉर, तसेच मध्य प्रदेशातील उज्जैन येथील महाकाल कॉरिडॉर प्रकल्पाच्या धरतीवर विकास करण्याचे नियोजन असणे, केंद्र आणि राज्य सरकार संयुक्तपणे खर्चाचा हिस्सा उचलून

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | पंढरपूर शहरातील गल्ल्या, रस्ते, घाट, मठ, लहान-मोठी मंदिरे, चंद्रभागा तीराचा विकास, विठ्ठल मंदिर ते पालखी मार्ग, यावरील विकासाकडे कॉरिडॉर निर्माण करताना खास लक्ष देण्यात येणार असल्याचे पर्यटन मंत्र्यांनी जाहीर करणे, आषाढी एकादशी सह इतर सणांच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वारकरी पंढरपूरात येत असून त्यांना विविध सोयी-सुविधांची कमतरता भासत असल्याने कॉरिडॉर विकासानंतर पंढरपूरचा चेहरा मोहरा बदलण्याचे भाकीत करणे, याबाबत ऑक्टोबर महिन्यामध्ये पर्यटन मंत्री यांच्याकडून घोषणा झाल्यानंतर पंढरपूरसह राज्यभरातील वारकऱ्यांचा या विकासाकरिता विरोध असणे, सदर कॉरिडॉर विकासामुळे शहरातील नागरिकांसह मोठ्या प्रमाणावर जुनी मंदिरे व मठांचे पुनर्वसन करावे लागत असल्यामुळे स्थानिकांचा कॉरिडॉर करिता प्रचंड विरोध असणे, याबाबत काही लोकप्रतिनिधींनी हायकोर्टात याचिका दाखल करून कॉरिडॉर करिता विरोध दर्शविणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे स्थानिकांमध्ये पसरलेला असंतोष याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १५. | ५१० | **श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.** "रायगड जिल्ह्यातील मौजे चोची व मौजे कोंढाणे, ता.कर्जत येथे शासनामार्फत धरण बांधण्याचे काम प्रस्तावित असणे, या ठिकाणच्या आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी भूसंपादित करण्यात येणार असणे, मौजे चोची व कोंढाणे येथील मिळकती अस्तित्वात असल्यापासून आदिवासी शेतकरी सदर मिळकतीचे कुळ म्हणून कायम असणे, या जमिनीवर सर्व आदिवासी शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह असणे, सर्व आदिवासी शेतकऱ्यांना जिल्हाधिकारी कार्यालयात | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

सुनावणीसाठी हजर राहण्याचे कळविण्यात आलेले असणे, या संदर्भात सर्व आदिवासी शेतकऱ्यांनी लेखी अर्जाद्वारे जिल्हाधिकारी, रायगड यांच्याकडे लेखी खुलासा कळविलेला असणे, या मिळकती भूसंपादित होणार असल्याची माहिती मिळाल्यावर महसूल विभागाचे अधिकारी याचेकडून कुळाचे खाजगी सावकारांशी संधान साधणे, शेतकऱ्यांना भूसंपादनाच्या नोटीसा आल्यावर कुळ बदलण्याचा प्रयत्न करणे, सावकारांना कायदा कुळाच्या जमिनीवर हक्क सांगण्यासाठी प्रवृत्त करणे, या जमिनी शासकीय अधिकाऱ्यांचे नातेवाईक यांच्या नावावर करण्याचा प्रयत्न करणे, शासकीय नियमाची पायमल्ली व आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून आदिवासी शेतकऱ्यांवरच दबाव टाकणे, त्यांची फसवणूक करणे, एकूणच या जमिन भूसंपादनामध्ये आदिवासी बांधवांची फसवणूक करून शासकीय अधिकारी जमिनीचा गैरव्यवहार करीत असणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी व याबाबत शासनाची भूमिका."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६. | ४८३ | **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर,** प्रविण दरेकर, **वि.प.स.**<br>" महाराष्ट्र राज्य सहकारी दुध महासंघ मर्या. (महानंद) या शासकीय संस्थेत झालेल्या आर्थिक गैरप्रकाराबाबत पावसाळी अधिवेशन २०२२ दरम्यान लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात येणे, सदर लक्षवेधी सूचनेवर विधानपरिषद सभागृहात झालेल्या चर्चेमध्ये मंत्री महोदयांनी सदर झालेल्या गैरप्रकाराबाबत चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल असे आश्वासन दिले असणे, यानुसार दिनांक २२ ऑगस्ट २०२२ च्या शासन निर्णयानुसार आयुक्त दुग्धव्यवसाय यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आल्याचे निदर्शनास येणे, सदर चौकशी समितीचा अहवाल शासनास सादर करण्यात आला असून अद्यापपर्यंत तो प्रसिद्ध करण्यात न आल्याचे समोर येणे, महासंघाने संचालक मंडळाच्या मान्यतेने पिशवीबंद दुधाला रु. २८ कोटी अनुदान वाटप केल्याने महासंघाच्या अर्थव्यवस्थेवर | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | अनावश्यक भार पडून महासंघाची आर्थिक स्थिती ढासळली असल्याची बाब उघडकीस होणे, याबाबत संचालक मंडळाने चुकीचा ठराव मंजूर केल्याने सदर स्थिती उद्‌भवली असून रु.२८ कोटी रकमेची वसुली संबंधित संचालकांकडून करण्याची कार्यवाही करावी असे आदेश शासनाने दिले असल्याची बाब समोर येणे, महासंघाच्या गलथान कारभारामुळे येथील कामगार व कर्मचारी यांना अनेक समस्या भेडसावत असणे, कामगारांच्या प्रश्नांबाबत दिनांक २२.११.२०२२ रोजी मुख्यमंत्री व दुग्धविकास मंत्री यांच्या समवेत कामगारांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीमध्ये मुख्यमंत्री यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी राज्य शासन व दुध महासंघाच्या व्यवस्थापनाकडून योग्य रीतीने झालेली नसल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी कामगारांमध्ये शासनाप्रती तीव्र असंतोषाची भावना निर्माण होणे, कामगारांचे होत असलेले हाल लक्षात घेता सदर आदेशाची अंमलबजावणी तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." | | |
| **१७.** | **५२७** | **डॉ.वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण सरनाईक, धीरज लिंगाडे, **वि.प.स.**<br>" पुणे शहराला स्मार्ट सिटीचा दर्जा असून याच स्मार्ट पुण्यातील ससून रुग्णालयासारख्या नामांकित रुग्णालयात सुपरस्पेशालिटी सुविधांची वानवा असणे, तसेच राज्यातील अनेक सुपर स्पेशलिटी रूग्णालयांना सुविधा उपलब्ध होत नसणे तसेच अनेक पदे रिक्त असल्याची बाब समोर येणे, ससून रुग्णालयात मेडिकल विभागाच्या कार्डिओलॉजी, जठरांत्रमार्ग रोग विभाग (गॅस्ट्रॉइटेरॉलॉजी), मेंदूविकार (न्यूरोलॉजी) व नेफ्रॉलॉजी विभाग तर शल्यचिकित्सामध्ये | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

असलेल्या हृदयशल्यचिकित्सा विभाग (सीव्हीटीएस), प्लास्टीक सर्जरी, मेंदुशल्यचिकित्सा (न्युरोसर्जरी), मूत्रविकार (युरोलॉजी) व बालशल्यचिकित्सा (पेडियाट्रिक सर्जरी) या विभागात स्पेशालिस्ट, सुपरस्पेशालिस्ट मनुष्यबळाची पदेच मंजूर नसल्याने शल्यसुविधा पुरविण्यास अत्यंत अडचणी येणे, या विभागाचे श्रेणीवर्धन किंवा विस्तार अनेक वर्षांपासून रखडले असून हे विभाग पूर्ण ताकतीने सुरू होण्यासाठी प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक अशी पदे भरणे आवश्यक असताना याकडे रुग्णालय प्रशासनाचे व शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, या विभागांत गोरगरीब रुग्णांना तसेच उच्च स्वरूपाच्या उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना यापासून वंचित राहवे लागत असल्याने त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करून ससून रुग्णालय, तसेच अशीच परिस्थिती असलेल्या राज्यातील अनेक सुपर स्पेशलिटी रुग्णालयातील रिक्त असलेली अनेक पदे त्वरीत भरण्याची व या रूग्णालयात सुपर स्पेशालिटी साठी आवश्यक सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याची कार्यवाही तातडीने करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१८. ५७३ **श्री. महादेव जानकर, वि.प.स.** १३ मार्च २०२३ चर्चा झाली

" राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत पायाभूत सुविधा कक्ष मुंबई येथे कार्यरत अधिक्षक अभियंता यांनी बांधकामाच्या निविदामध्ये ठराविक कंत्राटदाराला निविदा बहाल करून सदर कामे वेळेत पार न पाडणे व राज्याचा बांधकामाचा खर्च कमी होणे, यामध्ये आर्थिक भ्रष्टाचार केल्याचे उघड झाले असणे, तसेच उपरोक्त अधिकारी यांनी फिल्ड हॉस्पिटलची निविदा अटी व शर्ती पूर्ण न करता ठराविक कंत्राटदाराला दिल्यामुळे तीन महिन्याची मुदत असतानाही वर्षभर काम पूर्ण न होणे व निकृष्ट दर्जाचे काम होणे, MCH WING ची निविदा प्रकिया उशिरा करणे ठराविक कंत्राटदाराला काम देण्याकरता अटी व शर्ती बदलणे, निविदा प्रकिया

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | पूर्ण होऊनही वर्कऑर्डर न देणे यामध्ये मोठे प्रमाणात निविदाधारकाकडून टक्केवारी घेणे, एकंदरीत राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत पायाभूत सुविधा कक्षामार्फत होत असलेल्या कामांमध्ये तांत्रिक मान्यतेसाठी टक्केवारी घेणे, ठराविक निविदाधारकाला निविदा देणे त्यामध्ये आर्थिक फायदा झाल्याशिवाय पुढची कारवाई न करणे हे करताना उपसंचालक स्तरावरील कार्यकारी अभियंता यांना हाताशी धरुन निविदा प्रकिया पूर्णपणे मॅनेज करून ठराविक ठेकेदाराला देणे, सदर निविदा प्रकियेमध्ये फक्त कंत्राटी अधिकारी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अनियमितता असणे, त्यामुळे एक वर्षाचे काम चार-पाच वर्ष होत आले तरी पूर्ण न होणे असे असून निविदाधारकावर जिल्हा स्तरावरुन ब्लॅकलिस्टिंग कारवाई प्रस्तावित केली तरी आर्थिक फायद्यापोटी त्यांच्यावर कोणतीही कारवाई न करणे, त्यामुळे खर्च न होणे, केंद्र शासनाने याबाबत नाराजी व्यक्त केली असणे, राज्याचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होणे, त्यामुळे जनसामान्यांमध्ये आरोग्य यंत्रणेचा बोजवारा उडाला असल्याचे आढळून येत असणे, तसेच वरील प्रकरणी चौकशी केली नसल्याने व या भ्रष्टाचार करणाऱ्या अधीक्षक अभियंता यांच्यावर कोणतीही कारवाई किंवा चौकशी न केल्यामुळे जनतेत शासनाच्या विरोधात तीव्र संतापाची लाट उसळली असणे, परिणामी शासनाने तातडीने करावयाची कारवाई किंवा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१९.** | **३३५** | **श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स.**<br>" तत्कालीन सहायक निबंधक, सहकारी संस्था इगतपुरी/निकाह (जि.नाशिक) यांनी त्यांच्या कार्यकाळात घाटनदेवी औद्योगिक सहकारी वसाहत मर्या, इगतपुरी या संस्थेचे बेकायदेशीररित्या | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

घाटनदेवी गृहनिर्माण सहकारी संस्थेत रूपांतर करणे, मंजूर सहकार संस्थेच्या पोटनियम दुरुस्ती प्रस्तावास मंजूरी देतांना वैधानिक कार्यकक्षा ओलांडून संस्थेच्या कार्यक्षेत्रात बदल करणे, उक्त सहायक निबंधक इगतपूरी येथे कार्यरत असतांना मुख्यालयी वास्तव्यास न राहणे, तसेच ते नियमितपणे कार्यालयात उपस्थित न राहणे, मासिक दैनंदिनी सादर न करणे त्याचप्रमाणे त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कायदा कलम ८८ चौकशी न करणे, कामकाज विहित मुदतीत पूर्ण न करणे, या सर्व प्रकरणी त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित असणे, त्यांनी शासकीय कामकाजात हलगर्जीपणा करून, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम (एक) (तीन) चा भंग केल्याप्रकरणी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांनी सविस्तर प्रस्ताव दिनांक ०४/०५/२०२२ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करणे, त्यानंतर दिनांक ३१/१०/२०२२ रोजी विद्यमान सहायक तसेच दिनांक २८/१२/२०२२ रोजी सहायक निबंधक, सहकारी संस्था, निफाड यांनी उक्त गैरव्यवहार प्रकरणीचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांना सादर करणे. तथापि, अद्याप याप्रकरणी कोणतीच कारवाई करण्यात न येणे, उक्त तत्कालीन सहायक निबंधक हे सध्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे येथे कार्यरत असून त्यांच्या कामकाजाबाबत धुळे व नंदुरबार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धुळेच्या अध्यक्षांनी दिनांक २२/०९/२०२२ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार दाखल करणे, शासनाने या सर्व प्रकरणी तातडीने चौकशी करून कामकाजात हलगर्जीपणा व गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **२०.** | **४४१** | **सर्वश्री किरण सरनाईक, वि.प.स.**<br>" इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत राज्यामध्ये विमुक्त जाती, भटक्या जमाती, उच्च माध्यमिक आश्रम शाळा, ज्युनिअर कॉलेज १४७ असणे, त्यामध्ये उच्च माध्यमिक शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू असणे, परंतु उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा वेतन बँड लागू असणे, शालेय शिक्षण विभाग व आदिवासी विभाग यामध्ये कार्यरत उच्च माध्यमिक शिक्षकांना हा लाभ मिळत असणे, परंतु बहुजन कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या जवळपास आश्रमशाळेतील ११२९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ मिळत नसणे, हे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी शिक्षण विभागाचा भाग असणे, त्यांनाही निवड श्रेणी व वरिष्ठ श्रेणीचा लाभ सातवा वेतन आयोगानुसार देण्याची मागणी सातत्याने या शिक्षकांकडून करण्यात येत असणे, त्यांना हा लाभ मिळत नसल्याने या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मनात शासनाप्रती चिडीची व संतापाची भावना निर्माण झालेली असणे, बहुजन कल्याण विभागामार्फत चालू असलेल्या आश्रमशाळेतील जवळपास ११२९ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वरिष्ठ व निवड श्रेणीचा लाभ मिळण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| **२१.** | **४** | **सर्वश्री सुनिल शिंदे, विलास पोतनीस, वि.प.स.**<br>" वरळी, मुंबई येथील गांधीनगर परिसरात निर्माणाधीन असलेल्या इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट पडल्याने रस्त्याने जाणाऱ्या दोघा पादचाऱ्यांचा नाहक | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना दिनांक १४ फेब्रुवारी, २०२३ रोजी घडली असणे, या दुर्घटनेत मृत झालेल्या व्यक्ती एका एक्स्पोर्ट कंपनीत कामाला असणे, वरळीच्या गांधीनगर परिसरात "फोर सीझन हॉटेलच्या नव्या इमारतीचे बांधकाम सुरू असणे, या निर्माणाधीन इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठ्या आकाराची वीट खाली कोसळलेली असणे, या दुर्घटनेत गंभीर जखमी झालेल्या दोनही पादचाऱ्यांना तब्बल अर्धा तास रस्त्यावर उपचाराविना पडून राहावे लागणे, गोल्डन अवर मध्ये त्यांना वैद्यकीय मदत सहाय्यता देण्यात संबंधित विकासकाच्या व्यवस्थापनाने अक्षम्य हलगर्जीपणा केलेला असणे, अखेर त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असणे, या दुर्घटनेत काही वाहनांचेदेखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असणे, इमारतीच्या ४२ व्या मजल्यावरून मोठी वीट पडल्याने विकासकाकडून करण्यात आलेल्या सुरक्षाविषयक उपाययोजनांबाबत गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे, तसेच निर्माणाधीन इमारतीतील अनेक अनियमिततेकडे शासकीय यंत्रणेने हेतुपुरस्सर केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू दुर्घटनेत विकासक आणि त्याच्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे दोघांना नाहक प्राण गमवावे लागले असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, भविष्यात संबंधित विकासकाच्या बेपर्वा वर्तणूकीमुळे अशाच प्रकारची दुर्घटना घडून अन्य नागरिकांनादेखील जीव गमवावा लागण्याची असलेली दाट शक्यता, परंतु याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष आणि संबंधित विकासकाच्या अनधिकृत कृत्यास शासनाकडून देण्यात येत असलेले अभय, परिणामी, सर्वसामान्य जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव सदरहू दुर्घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **२२.** | **७३** | **सर्वश्री शशिकांत शिंदे, विक्रम काळे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, वि.प.स.**<br>" सातारा जिल्ह्यातील कोरेगांव तालुक्यातील मौजे तडवळे स. वाघोली येथील गट क्र. ६४/१ या ठिकाणी अवैध पद्धतीने स्टोन क्रशर सुरू असून मंडळाची संमती न घेता हे स्टोन क्रशर चालविले जात असणे, हे क्रशर चालू करतांना पुढील निकष आवश्यक असतांना १) सदर स्टोन क्रशर निरा- सातारा राज्य महामार्गापासून सुमारे २२० मीटर अंतरावर असून बोर्डाचे दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२० च्या परिपत्रकानुसार अंतराचे निकष पूर्ण करु शकत नाही. २) कन्व्हेअर बेल्ट शीटने झाकलेले नाही त्यावर पाणी शिंपडण्याची व्यवस्था करण्यात आलेली नाही. ३) क्रशरच्या परिघाभोवती वारा तोडणारी भिंत करण्यात आलेली नाही. ४) वाहनांच्या हालचालीतून निर्माण होणाऱ्या धुळीच्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणेसाठी कोणतीही सुविधा करण्यात आलेली नाही. ५) सदर क्रशरच्या ठिकाणी पुरेसे वृक्षारोपण करण्यात आलेले नाही. ६) सदरच्या स्टोन क्रशरकडून (मालकाकडून) जल प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम, १९७४, वायू प्रतिबंध नियंत्रण अधिनियम, १९८१ च्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष केले असणे, अशाप्रकारे अवैध स्टोन क्रशर चालवून क्रशरच्या मालकाने शासनाचे नुकसान केलेले असणे, यासंदर्भात चौकशी करून संबंधित स्टोन क्रशर मालकाविरुद्ध कारवाई करण्याबाबत होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

२३. १०७ **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** १३ मार्च २०२३ चर्चा झाली

" ग्रामीण भागातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना राहण्याची चांगली व्यवस्था होण्यासाठी शासनाने शासकीय वसतीगृह उभारले असून मुंबईतील चेंबूर नाका परिसरात १ हजार विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधण्याचा निर्णय सन २००७ मध्ये घेणे, परंतु वसतीगृहाचे बांधकाम अद्यापपर्यंत पूर्ण झालेले नसणे, खाजगी विकासकाने सदर वसतीगृहाचे काम अर्धवट सोडल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना भाड्याने शिक्षणासाठी राहावे लागत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आढळून येणे, शासकीय वसतीगृहाचे काम गेल्या १६ वर्षांपासून रखडले असल्यामुळे राज्य शासनाने लक्ष घालून सदर प्रकरणी तात्काळ वसतीगृहाचे बांधकाम पूर्ण करण्यासाठी चेंबूर येथे शेकडो विद्यार्थ्यांनी माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात आंदोलन सुरू करणे, त्यामुळे शासनाने याची सखोल चौकशी करून तातडीने शासकीय वसतीगृह उभारण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

२४. ४२३ **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.** १३ मार्च २०२३ चर्चा झाली

" वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने नंदुरबार जिल्ह्यात ग्रामीण भागात असलेल्या आरोग्य संस्थांची पुनर्बांधणी होणे आवश्यक असणे, तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र यांचे दर्जा वाढ होणे तसेच नवीन केंद्रास मंजुरी मिळण्याकरिता जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी बृहत आराखडा तयार करणे, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी याप्रकरणी नियमान्वये सविस्तर प्रस्ताव आरोग्य विभागास सादर केलेला असणे, सदर आराखड्यास गेल्या अनेक वर्षांपासून मंजुरी प्रलंबित असल्याने जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर विपरित परिणाम होत असणे, नंदुरबार हा एक आदिवासी व अतिदुर्गम जिल्हा असल्याने शासकीय आरोग्य सेवेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या लक्षणीय असणे, त्यामुळे नंदुरबार

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | जिल्ह्यातील आरोग्य सेवेस बळकटी देण्याच्या हेतूने जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. नंदुरबार यांनी सादर केलेल्या बृहत आराखड्यास तात्काळ मंजुरी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **२५.** | **३५०** | **ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>" राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर आधारीत पूर्व प्राथमिक ते इयत्ता २ री साठी दिनांक २० ऑक्टोबर, २०२२ रोजी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा प्रकाशित झाला असणे, त्या पार्श्वभूमीवर एनसीआरटी पाठ्यपुस्तके तयार करीत असल्याचे निदर्शनास येणे, राज्यात इयत्ता १ ली व २ री साठी नवीन पाठ्यपुस्तके येत्या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यासाठी शासनाने कार्यवाही करणे, सदर अभ्यासक्रम आराखडा आहे तसाच लागू करणार किंवा कसे, एनसीआरटी आणि बालभारती मिळून शैक्षणिकदृष्ट्या दर्जेदार पुस्तकासाठी एक अभ्यास समिती असावी असा निर्णय झाला असणे, असे असतानासुद्धा एनसीआरटी व बालभारतीपेक्षा एक वेगळी समिती शासनाने नेमण्याची योजना असल्याचे निदर्शनास येणे, यामुळे शासनाची नेमकी भूमिका व केंद्र सरकारप्रमाणे शिक्षक हस्तपुस्तिका तयार केली त्याच धरतीवर शिक्षक हस्तपुस्तिका तयार करून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | १३ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| **२६.** | **२०८** | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>" देशामध्ये मागील ५ ते ६६ वर्षात बेरोजगारीचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, तसेच महाराष्ट्र राज्यातसुद्धा हे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढत असल्याचे | १५ मार्च २०२३ | चर्चा झाली |

आढळून येणे, यामुळे राज्यात सुशिक्षित बेरोजगारांची संख्या दिवसें-दिवस मोठ्याप्रमाणात वाढत असल्याचे आढळून येणे, नोकरी नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणे, यामुळे अनेक तरुण गुन्हेगारीकडे वळले जात असल्याचे आढळून येणे, यामुळे तरुण पीढी उध्वस्त होत असल्याचे आढळून येणे, यामुळे पालकांमध्ये चिंतेचे व भितीचे वातावरण निर्माण होणे, राज्यातील पदवीधर बेरोजगारांना इतर कोणतीही नोकरी मिळत नाही तोपर्यंत या पदवीधर बेरोजगारांना आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी दरमहा ५ हजार रुपये मानधन म्हणून देण्यात यावे अशी लोकप्रतिनिधी यांनी वारंवार संबंधितांकडे मागणी करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

२७. ७५ **श्री. अरुण लाड, वि.प.स.** १५ मार्च २०२३ चर्चा झाली

" महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने संयुक्त गट-ब व गट-क संवर्गातील ८,१६९ विविध पदांसाठी जानेवारी, २०२३ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करणे, लिपिक टंकलेखक संवर्गातील सुमारे ७,०३४ पदांसाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्ज करतांना एका विभागाची किंवा सर्व विभागांची उमेदवार निवड करु शकतील असा नियम घेण्यात येणे, त्यामुळे उमेदवार नोकरी मिळविण्यासाठी अधिकाधिक विभागाची निवड करणार असणे, पूर्वपरीक्षा जरी एक होणार असली तरी विभागानुसार गुणवत्ता यादीत जाहीर करण्याचा निर्णय महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने घेतल्यामुळे मुख्य परिक्षेला अनेक विद्यार्थी अपात्र ठरण्याची भिती व्यक्त करण्यात येत असणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विभागवार गुणवत्ता यादीच्या अटीत बदल करण्याची उमेदवारांकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **२८.** | **५५२** | **ॲड. अनिल परब, वि.प.स.**<br>" मुंबई महानगरपालिकेतील घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत सॅनिटरी नॅपकिन मशीन बसविण्यासाठी काढलेल्या निविदेमध्ये ४२ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे माहे फेब्रुवारी २०२३ च्या अंतिम आठवड्यात उघडकीस येणे, मुंबई महापालिका हद्दीत ५००० सार्वजनिक स्वच्छतागृहे व एकूण टॉयलेट्स ब्लॉकची संख्यादेखील ५००० नसताना एकूण ५००० मशिन्स बसविण्यासाठी निविदा काढणे, सदर निविदेसाठी रियलझेस्ट वेंडकॉन, किरवॉन वेंडसोल व पीआर एंटरप्राईजेस या कंपन्यांनी माहे डिसेंबर २०२२ मध्ये निविदाप्रक्रियेमध्ये सहभागी होणे व त्याच महिन्यात सदर तिन्ही कंपन्यांना मुंबई महापालिकेकडून वेंडर आयडी उपलब्ध होणे, सदर निविदाप्रक्रियेत केवळ नमूद तीनच कंपन्यांनी सहभागी होणे, ४०००० रुपये बाजारमूल्य असताना महापालिका सदर मशीन्स ७०००० रुपयांना खरेदी करीत असणे, निविदेमध्ये सॅनिटरी नॅपकिन मशीन बसविण्यासाठी जागा निश्चितीबाबत कोणतीही स्पष्टता नसणे, वापरलेल्या सॅनिटरी नॅपकिनची विल्हेवाट लावण्यासाठी इन्सिनरेटरस पुरविण्याबाबत अस्पष्टता असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये व विशेषकरून महिला वर्गामध्ये असंतोष निर्माण होणे, त्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | १५ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| **२९.** | **३८१** | **सर्वश्री रमेशदादा पाटील,** प्रविण दरेकर, प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री निलय नाईक, महादेव जानकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी पाटील, **वि.प.स.**<br>" राज्यात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे मार्फत अनुसूचित जाती प्रवर्गातील संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिप देऊन संशोधनास चालना देते | १५ मार्च २०२३ | चर्चा झाली |

परंतु संपूर्ण महाराष्ट्रातून केवळ दोनशे विद्यार्थ्यांची निवड करण्यात येत असणे, सारथी व महाज्योती या संस्थांनी येथील अर्जदारांना सरसकट फेलोशिप मंजूर केल्या जातात त्याप्रमाणे बार्टी संस्थांमध्येही सरसकट फेलोशिप सुरू करण्याची मागणी विद्यार्थी करीत असणे, त्यासाठी बार्टीतील विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री व उप मुख्यमंत्री महोदयांना निवेदन देऊन मागणी करणे, या मागण्यांवर तात्काळ कारवाई करून मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या संविधानिक हक्काचे रक्षण करावे अशी मागणी सर्वत्र होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०. | १४ | **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.**<br>" खुलताबाद तालुक्यातील वेरुळ परिसरातील तलाववाडी शिवारात १३३ एकर क्षेत्रात शिवकालीन (पुरातन) तलाव असणे, सदर तलाव मागील अनेक वर्षापासून तुडुंब भरत असून तलावाचा सांडावा/चारी बुजल्यामुळे सदर तलाव भरल्यानंतर बॅक वॉटरमुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साचत असून शेतकऱ्यांचे नुकसान होत असणे, बॅक वॉटरमुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी पसरत असून किमान ५० शेतकऱ्यांचे २०० एकर क्षेत्र बाधित होत असणे, बाधित जमिनीचे भुसंपादन करण्यासाठी शेतकरी मागील १० वर्षापासून शासन दरबारी प्रयत्न करीत असणे, उप विभागीय अधिकारी महसूल, तहसिलदार खुलताबाद व उप विभागीय जलसंधारण अधिकारी (ल.पा.) जिल्हा परिषद उप विभाग, कन्नड यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०२२ रोजी स्थळ पाहणी करून तलावाचे एफटीएल (पूर्ण पाणी पातळी) निश्चित करून बाधित क्षेत्राचे भुसंपादन प्रस्तावित करण्यासाठी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना त्याच दिवशी अहवाल सादर केलेला असणे, परंतु त्यावर अद्याप काहीही कार्यवाही झालेली नसल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असणे, डमडम | १५ मार्च २०२३ | चर्चा झाली |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू



| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | तलावाची एफटीएल (पुर्ण पाणी पातळी) निश्चित करून बाधित क्षेत्राचे भुसंपादन करण्यासाठी होत असलेली मागणी यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ३१. | ६२९ | **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.**<br>" विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण मिळावे म्हणून शासन वेळोवेळी प्रयत्न करीत असणे परंतु काही विषयांचा अभ्यासक्रम कठीण असल्याने अनेक विद्यार्थी अभ्यासाकडे दुर्लक्ष करत असणे, प्रत्येक पालकांची बदलत्या काळात अपेक्षा असणे, माझ्या पाल्याला इंग्रजी बोलता यावे व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकून राहावे अशी पालकांची भावना झाली असणे, त्यामुळे पालकांचा ओढा मराठी माध्यम सोडून अन्य माध्यमांकडे वळलेला असणे, त्यामुळे मराठी माध्यमांच्या शाळाची पटसंख्या दिवसें-दिवस कमी होत चाललेली असणे, ही महाराष्ट्रासाठी चिंतेची बाब असणे, त्याकरिता विद्यार्थ्यांना गोडी वाटेल असा, सोपा अभ्यासक्रम पाठ्यपुस्तकांमध्ये असणे, ज्यात इंग्रजी बोलणे, लिहिणे, वाचणे, सोप्या कविता इत्यादी गोष्टींचा अंतर्भाव व आनंददायी शिक्षण झाल्यास पालक आपोआपच आपल्या पाल्याला मराठी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेण्यास उत्सुक राहतील व मराठी माध्यमांच्या शाळांची पटसंख्या आपोआपच वाढेल तसेच गणित आणि विज्ञान व अन्य विषयांचा सुद्धा सोपा आणि आवडीचा अभ्यासक्रम असणे, याबाबत शासनाने घ्यावयाचा निर्णय करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | १५ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| ३२. | १३९ | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.**<br>" राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक | १६ मार्च २०२३ | चर्चा झाली |

भागात आरक्षण समर्थनार्थ दीर्घ काळापासून सुरू झालेली तीव्र स्वरुपाची आंदोलने, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरू असणे, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती स्फोटक होण्याचा निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरू रहावी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गाच्या आरक्षणाप्रमाणे मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

३३. ५५५ **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** १६ मार्च २०२३ चर्चा झाली

" तारापूर औद्योगिक क्षेत्रातील अनेक कारखान्यांकडून रासायनिक पाण्यावर कोणतीही प्रक्रिया न करता नाल्यामध्ये, जमिनीमध्ये बोअरवेल खोदून तसेच टॅंकरद्वारे इतर ठिकाणी सोडण्यात येणारे प्रदूषित पाणी, त्यामुळे नाल्याचे व विहिरींचे पाणी प्रदूषित होऊन पर्यावरणास पोहचलेली हानी, नाल्याचे पाणी पिऊन गत तीन महिन्यांत अनेक जनावरांचा झालेला मृत्यू, नाल्याचे पाणी प्रदूषित असल्यामुळे व जमिनीमध्ये बोअरवेल खोदून रासायनिक द्रव्य त्यामध्ये सोडल्याने त्याचे पाझर होऊन विहिरींचे प्रदूषित झालेले पाणी त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, यासंदर्भात बजाज हेल्थ केअर कंपनीने मागील दोन वर्षांपासून गुप्तपणे चार इंचाची पाईप लाईन टाकून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ड्रेनेजच्या बाजूला खड्डा खोदून त्यामध्ये प्रती दिन २० ते ३० हजार लिटर सोडत असलेले रासायनिक द्रव्य, तसेच याच कंपनीच्या इतर कारखान्यात देखील उक्त औद्योगिक परिसरात पर्यावरणाच्या नियमांचे होत असलेले उल्लंघन, या संदर्भात उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण महामंडळ, तारापूर यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही जाणीवपूर्वक करीत असलेले दुर्लक्ष,

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | पर्यावरण विभाग व कारखान्याचे अधिकारी यांच्यात होत असलेले संगनमत, उक्त प्रकरणी पर्यावरण कायद्याअंतर्गत कारखान्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेला असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **३४.** | **३२४** | **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.**<br>" केंद्र शासनाचा २००९-१० पासून सुरू असलेला राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम" जलजीवन मिशनमध्ये समाविष्ट केला असणे, हे मिशन राज्यात राबविण्यासाठी राज्य शासनाने ४ सप्टेंबर २०२० रोजी मार्गदर्शक सूचना जारी करणे, या मार्गदर्शक सूचनामध्ये ही योजना राबविण्यासाठी या योजनेच्या एकूण भांडवली खर्चाच्या १० टक्के व डोंगराळ/वन भागामध्ये किमान ५ टक्के अशी लोकवर्गणी गोळा करणे अनिवार्य केले असणे, परंतु ही अट जाचक असणे, काही ग्रामपंचायतींचे उत्पन्नाचे स्त्रोत मर्यादित असल्याने ही योजना राबविणे शक्य नसणे, तसेच या क्षेत्रातील लोकांची ऐपत नसल्याने लोकवर्गणी गोळा करणे शक्य होत नसणे, व सदरील योजना अपूर्ण अवस्थेत राहण्याचा धोका असणे, त्यामुळे ही योजना यशस्वी करावयाची झाल्यास सदरील १० टक्के व ५ टक्के लोकवर्गणी करावयाची जाचक अट शासनाने रद्द करून ही योजना १०० टक्के राज्य शासन पुरस्कृत करावी, अशी राज्यातून मागणी होत असणे, परंतु त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया." | १६ मार्च २०२३ | चर्चा झाली |

**३५.** **५९१** **श्री. कपिल पाटील, वि.प.स.** १६ मार्च २०२३ चर्चा झाली

" राज्यभरातील शैक्षणिक संस्था आणि महाविद्यालयांना ३१ मार्चपूर्वी मूल्यांकन करून घेणे किंवा त्या संदर्भातील प्रारंभिक नोंदणी करणे संचालनालयाने बंधनकारक केले असणे, संस्था व महाविद्यालयांनी ही प्रक्रिया मुदतीत पूर्ण करणार नाहीत, त्या संस्था आणि महाविद्यालयावर संलग्नीकरण रद्द करण्याची कारवाई करून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील प्रवेश थांबविण्यात येणे, त्यांना नो ॲडमिशन संवर्गात वर्ग करण्यात येईल असा प्रस्ताव सादर करण्यात येईल अशा सूचना वजा इशारा संचालनालयाने दिला असणे, कोविड काळात केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या निर्देशानुसार पालक आणि विद्यार्थ्यांना फी मधील सवलत, मुदतवाढ आणि टप्या-टप्याने पैसे भरण्याच्या सूचना सर्व शैक्षणिक संस्थांना देण्यात आल्या असणे, त्यामुळे शैक्षणिक संस्थांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असणे, फीची थकबाकी असताना विद्यापीठांनी सर्व महाविद्यालयांकडून १०० टक्के विद्यापीठाचा भाग आणि परीक्षा फी वसूल केली असणे, NAAC ला सुमारे २, ७५, ०००/- अधिक जीएसटी भरावे लागणार असणे, शासनाने पगारा व्यतिरिक्त वेतनेतर अनुदान दिलेले नसणे, सन २००८ पासून आकारण्यात येणारी फी बदललेली नसून तीच ठेवली असणे, सरकारने सर्वांना NAAC मान्यता आवश्यक करून संस्था आणि महाविद्यालयांची आर्थिक कोंडी केली असणे, मात्र NAAC मूल्यांकनाच्या कारभारात अनेक त्रुटी असून या कारभाराची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी) त्याकडे दुर्लक्ष करीत असणे, तेथील कारभारात अनागोंदी, गैरप्रकार लक्षात असल्यामुळे युजीसीचे उपाध्यक्ष यांनी NAAC चे कार्यकारी अध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन NAAC समितीच्या राष्ट्रीय स्तरावरील चौकशीची मागणी केली असणे, शासकीय महाविद्यालये किंवा संस्थांच्या बाबतीत त्यांना

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मिळणारे अनुदान रद्द करण्याचा प्रस्तावामुळे राज्यातील संस्था आणि महाविद्यालयातील संचालकांमध्ये पसरलेला प्रचंड असंतोष आणि संताप, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही." | | |
| **३६.** | **५४०** | **श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स.**<br>" राज्यातील सरपंच/उप सरपंच यांच्या मानधन वाढीची घोषणा माहे जुलै, २०१९ च्या आसपास होऊनही त्यांना ते वाढीव मानधन न मिळणे, सद्यःस्थितीला मिळणारे मानधन वेळेवर न मिळता मानधन मिळण्याची प्रक्रिया किचकट असणे, मानधन मिळवण्यासाठी दर महिन्याला ऑपरेटरद्वारे पंचायत समिती नंतर जिल्हा परिषदेद्वारे राज्य सरकारकडे माहिती आल्यानंतर बँकेत यादी सादर होणे, त्यापेक्षा गट विकास अधिकारी यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करून सरपंच/उप सरपंच यांच्या मानधन वाटपाची कारवाई करणे, नवी मुंबई येथे सरपंच भवनाची निर्मिती करणे, सरपंचांना ओळखपत्र आधारे शासकीय कार्यालयांमध्ये प्रवेश देणे, ग्रामपंचायतीचे खाते ICICI बँके पेक्षा IPPB (Indian Postal Payment Bank) मध्ये असणे व त्याद्वारे मानधन मिळणे, पंधराव्या वित्त आयोगातून पथ दिवे अथवा कोणत्याही वीज बिलाची रक्कम अदा केली जाऊ नये, पंतप्रधान आवास योजनेद्वारे शहरी भागात मिळणारी रक्कम ग्रामीण भागातही सारखीच असावी, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना." | १६ मार्च २०२३ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३७. | ५५० | **सर्वश्री प्रवीण दटके,** चंद्रशेखर बावनकुळे, निलय नाईक, **वि.प.स.**<br>" नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय परिसरातील ४ एकर क्षेत्रात राज्य सरकारने कॅन्सर हॉस्पिटल व रिसर्च सेंटरकरिता १०० बेडचे हॉस्पिटल मंजूर होऊन देखील अद्याप काम सुरू झालेले नसणे, सदर कॅन्सर हॉस्पिटलचे काम सुरू होण्यासंदर्भात दिनांक ११/४/२०१८ चे पूरक विवरण क्रमांक १९६ नुसार लोकप्रतिनिधींनी दिनांक २१/१२/२०२२ रोजी पाठपुरावा केलेला असणे, या संदर्भात तत्कालीन वित्तमंत्री यांनी मशीन खरेदी करिता रुपये २० कोटी पुरवणी मागणीतून मंजूर केलेले असणे, कॅन्सर हॉस्पिटलसाठी आर्किटेक्ट नेमला असणे, सदर कामाचे ड्रॉईंग व इतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झालेली असणे, कोरोना कालावधीत काम थांबल्याने हाफकीनने पैसे परत पाठवले असणे, तसेच एनआयटी मार्फतही प्रक्रिया पूर्ण न झाल्याने सदर काम प्रलंबित असणे, तरी रुग्णांच्या सोयीने अत्यंत महत्त्वाचे असणारे कॅन्सर हॉस्पिटल व रिसर्च सेंटर तातडीने पूर्ण होण्यासाठी तातडीने आदेश देऊन काम सुरू करण्याचे आदेश देण्यात यावेत याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | १६ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| ३८. | २६० | **श्रीमती उमा खापरे,** श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, **वि.प.स.**<br>" राज्यात सांगली जिल्ह्यातील पलूस तालुक्यातील खाजगी सावकारांच्या अत्याचाराला कंटाळून कित्येक शेतकऱ्यांनी जीवन संपवले असल्याने अनेक कुटुंबे रस्त्यावर येत असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, तत्कालीन गृहमंत्री यांनी राज्यातील सावकारी मोडीत काढण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली होती, मात्र आता पुन्हा एकदा सावकारांविरुद्ध पलूस तालुक्यात आणि राज्यात विशेष मोहीम राबवून शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या खाजगी सावकारांना पायबंद घालण्यासाठी आवश्यकता | १७ मार्च २०२३ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | नागरिक व्यक्त करीत असणे, दुधोंडी येथील खाजगी सावकारांवर कुंडल पोलीस ठाण्यात सावकारीचा गुन्हा दाखल असतानाही पिडीताना धमकावले जात असतानाही शासनाचे दुर्लक्ष होणे, खाजगी सावकारांच्या अत्याचारातून शेतकऱ्याला न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही." | | |
| **३९.** | **५०६** | **श्री. सत्यजित तांबे, वि.प.स** " महाराष्ट्र व मुंबई महानगरपालिका अधिनियमानुसार, नगरपालिका कार्यपद्धती नियमांद्वारे परिषद व समितीच्या बैठकीत रचनात्मक चर्चा व विचारविनिमय सुनिश्चित करण्यासाठी सभा घेण्याबाबतचे तपशील व कार्यपद्धती नमूद केल्या असणे, एमसीजीएमच्या सर्वपरिषद व समितीच्या बैठकीत एमसीजीएमचा सविस्तर महानगरपालिका कार्यपद्धतीविषयक नियम व विनियम (Bye-Laws) अनुसरण होत असणे, राज्यातील अन्य २६ नगरपालिकांमध्ये नगरपालिकांची कार्यपद्धती केली जाणे व त्याआधारे मनपा कार्यपद्धती नियम तयार व मंजूर केले जाणे, परंतु त्यामध्येच अनेक त्रुटी असणे, त्यामुळे अनेक समस्या निर्माण होणे, त्यामुळे महानगरपालिकेच्या कार्यपद्धती नियमांना मान्यता न मिळाल्यास अन्य २६ नगरपालिकांमध्ये योग्य चर्चा व विचारविनिमय करण्यासाठी राज्य शासन महानगरपालिका कार्यपद्धती नियमावलीचा मसुदा तयार करण्यास मान्यता द्यावी, अशी मागणी जनतेतून होत असणे, परंतु त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | १७ मार्च २०२३ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४०. | २०५ | **सर्वश्री अमोल मिटकरी,** शशिकांत शिंदे, विक्रम काळे, सतिश चव्हाण, **वि.प.स.**<br>" यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील टाकळी गावात राहणाऱ्या नागरिकांना जाण्या-येण्यासाठी रस्ता नसल्यामुळे गावातील नागरिकांनी २६ जानेवारी, २०२३ रोजी शांततेने आंदोलन केले असता पोलिसांनी सुमारे ५९ गावकरी महिला व पुरुषांवर गुन्हे दाखल केल्याची बाब उघडकीस येणे, टाकळी येथे राहणाऱ्या ग्रामस्थांनी २३ जानेवारी, २०२३ पासून तहसील कार्यालयासमोर शांततेने उपोषण सुरू करणे, परंतु संबंधित पालिसांनी ग्रामस्थांशी चर्चा न करता आंदोलन करणाऱ्या पुरुष व महिला ग्रामस्थांवर गुन्हे दाखल केल्यामुळे त्यांच्यात पसरलेले भितीचे वातावरण, आंदोलकांनी संबंधित एसडीओ, एसडीपीओ या अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता त्यांनी कोणावरही गुन्हे दाखल करण्यात येणार नाही असे आश्वासन देऊनसुद्धा नागरिकांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असणे, शांततेने आंदोलन करणाऱ्या नागरिकांविरुद्ध गुन्हे दाखल न करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | १७ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| ४१. | १८१ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>" नागपूर जिल्हा परिषदेतील प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजनेअंतर्गत कौशल्य विकास या शिर्षकाखाली रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत नागपूर जिल्ह्यातील १३ तालुक्यांत दुग्ध विकास व शेळीपालन लाभार्थ्यांकरिता गट वाटप योजना राबविलेली असणे, या योजनेत लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतर योजना राबवून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे निदर्शनास आलेले असणे, याबाबत विभागीय आयुक्त, नागपूर यांनी १७ नोव्हेंबर २०२२ ला ग्रामविकास विभागाला आपला स्पष्ट अहवाल सादर केलेला असणे, शासन निर्णय दि. १२ डिसेंबर २०१७ च्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास महामंडळ यांना गायगट व शेळीगट उपलब्ध करून देणेसंदर्भात थेट लाभ हस्तांतरण योजनेमधून वगळण्यास शासन | १७ मार्च २०२३ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मान्यता प्रदान करण्यात आलेली असणे, जिल्हा परिषद द्वारा याबाबत मागणी केली असता महामंडळाने दिनांक २५/५/२०२१ च्या पत्रानुसार रोठा करण्यांस असमर्थता दर्शविल्याचे दिसून येत असणे, जिल्हा परिषद नागपूरने थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) करून योजना राबविणेबाबत शासनाचे मार्गदर्शन घेणे स्पष्ट केलेले असतांनाही जि.प. नागपूर पशु संवर्धन विभाग यांनी याबाबत कोणतीही कार्यवाही न करता योजना राबवून लाभार्थ्यांची योग्य निवड न करता मर्जीतील लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे दिसुन येत असणे, तसेच लाभार्थ्याला देय केलेल्या गाय गट व शेळी गट अनेक लाभार्थ्यांना पुरवठा कागदोपत्री दाखवून व जिल्ह्याच्या काही तालुक्यातच वाटप केल्याचे निदर्शनास आले असणे, त्याबाबत जि.प. सदस्य तथा लोकप्रतिनिधी यांनी वारंवार तक्रार करूनही कोणतीही दखल जि.प. प्रशासनाने घेतलेली नसणे, तसेच कोणतीही कार्यवाही संबंधित अधिकाऱ्यांवर केलेली दिसून येत नसणे, प्रधानमंत्री खनिज क्षेत्र अंतर्गत निधीचा गैरवापर करून योग्य लाभार्थ्यांची निवड व योजनेची निकष न पाळता तथा जि.प. पदाधिकाऱ्याच्या पदाचा गैरवापर करून शासनाच्या निधीचा अपव्यय व भ्रष्टाचार केल्याने तथा यावर कोणतीही कार्यवाही न झाल्याने शासनाप्रती रोष निर्माण होऊन असंतोषाची भावना तयार होत असणे, तातडीने याबाबत भ्रष्टाचाराची संपूर्ण चौकशी योग्य यंत्रणेमार्फत करून दोषी अधिकारी व जि.प. पदाधिकारी यांचेवर कारवाई करणेबाबत शासनाची आवश्यक कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |

४२. ३८३ **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.** १७ मार्च २०२३ चर्चा झाली

“ सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण हे पाणी साठवण्याच्या क्षमतेनुसार राज्यातील सर्वात मोठे धरण असून त्याचे क्षेत्रफळ १४८५८ चौ.किमी असणे, धरणाची पाणी साठवण क्षमता ११७ टिएमसी असणे, परंतु उजनी धरणाच्या प्रचंड विस्तारामुळे उजनी धरणात पाण्याबरोबर वाहुन येणाऱ्या गाळाचे प्रमाण वाढत असणे, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेने (मेरी) सन २००७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार उजनी धरणात १२.७७ टक्के इतका गाळ असणे, सन २०११ साली केंद्रीय जल आयोगाने दिलेल्या आदेशानुसार दिल्लीच्या तेजो विकास इंटरनॅशनल संस्थेने डीजीपीस तंत्रज्ञानानुसार केलेल्या सर्वेक्षणानुसार हे प्रमाण १२.७७ टक्केवरून २७.९४ टक्के पर्यंत गेलेले आढळुन येणे, त्यामुळे उजनी धरणाची पाणी साठवण क्षमता ३२ टिएमसी नी कमी झाल्याचे समोर येणे, दर वर्षी उजनी धरणात ०.४३ टिएमसी गाळ साचत असल्याचे अभ्यासातुन समोर येणे, परिणामी गेल्या ११ वर्षांत पुन्हा उजनी धरणात आलेला वाळुमिश्रीत गाळ लक्षात घेता सद्यस्थितीत उजनी धरणात सुमारे ३६ टक्के वाळुमिश्रीत गाळ असणे, त्यामुळे पाणी साठवण क्षमता ४३ टिएमसी नी कमी झालेली असण्याचा तज्ञांचा अंदाज असणे, दर १० वर्षांनी धरणातील गाळाचा आढावा घेऊन अतिरीक्त गाळ काढणे अपेक्षित असताना गेल्या ४२ वर्षांत उजनी धरणातील गाळ काढण्यात आलेला नसणे, राज्य सरकारने २०१७ साली उजनी धरणातील गाळ काढण्यासाठी निविदा प्रसिद्ध करणे, परंतु गाळ काढण्याच्या कामाला अजुनही परवानगी मिळालेली नसणे, परिणामी पाणी साठवण क्षमता कमी झाल्याने सिंचनक्षमता कमी होऊन पाणी वाटपाच्या नियोजनात विस्कळीतपणा येणे, वर्षभरात शेतीसाठीच्या पाण्याची आवर्तने कमी होणे, तसेच पाणीपुरवठा योजनांना उन्हाळ्यात अपुरा पाणीपुरवठा होणे, अलीकडच्या काही वर्षांत धरण परिसर आणि सोलापूर जिल्ह्यात निर्माण होणारी तीव्र अवर्षणस्थिती आणि पाण्याची वाढती

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मागणी पाहता उजनी धरणाच्या पाणीवाटपावर मर्यादा येत असणे, परिणामी भविष्यात सिंचनाची व पिण्याच्या पाण्याची गंभीर स्थिती निर्माण होण्याची शक्यता असणे, यामुळे लाभक्षेत्रातील शेतकरी व नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याकडे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष यामुळे शासनाने उजनी धरणातील गाळ काढून पाणी साठवण क्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **४३.** | **४३१** | **सर्वश्री सुधाकर अडबाले,** अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सत्यजीत तांबे, जयंत आसगावकर, **वि.प.स.**<br>" राज्य शासनाने माहे जून, २०२२ मध्ये विनाकारण अधिकारी/कर्मचारी यांचे नियतकालिक बदलीस स्थगिती देणे, त्यानंतरही ही स्थगिती न उठविली जाणे, मागील दोन वर्षांपासून बदली प्रक्रिया बंद असणे, विशेषतः जलसंपदा विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी नवीन सरकार आल्यानंतर बदली न करणे, त्यामुळे कर्मचाऱ्यांत तीव्र असंतोष पसरला असणे, जलसंपदा विभागाच्या नाकर्तेपणामुळे कर्मचाऱ्यांना बदलीस पात्र असूनही एकाच ठिकाणी चार-पाच वर्षे काम करावे लागणे, जलसंपदा विभागातील पदोन्नती प्रक्रियाही रखडलेली असणे, क्षेत्रीय कार्यालयातील महत्वाची पदे रिक्त असणे, तरीही त्याकडे जलसंपदा विभाग दुर्लक्ष करीत असणे, याकरीता तातडीने नियतकालिक बदली प्रक्रिया पूर्ण करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपायोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | १७ मार्च २०२३ | चर्चा झाली |

**४४. ३२७ श्री. राजहंस सिंह, वि.प.स.** — १७ मार्च २०२३ — चर्चा झाली

“ मुंबईतील म्हाडा कोंकण गृहनिर्माण मंडळ व मुंबई मंडळ यांच्याकडून शहर आणि ग्रामीण भागासाठी घरांची लॉटरी काढली जाणे, लॉटरी विजेता ठरणाऱ्या प्रत्येक अर्जदारांकडून दक्षिण मुंबईसह महाराष्ट्रातील पंधरा वर्षे वास्तव्य असल्याचा दाखला घेण्यात येणे, त्यामुळे मुंबईसह महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेल्या मराठी माणसांकडून म्हाडाने १५ वर्षांचा (अधिवास) वास्तव्याचा दाखला मागू नये, मराठी माणसांना सदर अटीतून वगळण्यात यावे, अशी मागणी काही सामाजिक कार्यकर्त्यांकडून म्हाडाचे उपाध्यक्षांकडे लेखी निवेदनाद्वारे नुकतीच करण्यात येणे, परंतु अद्यापपर्यंत निर्णय न होणे त्यामुळे शासनाने यांची तातडीने दखल घेऊन मराठी माणसांना न्याय देऊन सदर अटीतून वगळण्याची गरज, शासनाने करावयाची कार्यवाही व आवश्यकता.”

**४५. ३२० श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.** — १७ मार्च २०२३ — चर्चा झाली

“ अलिबाग शहरातील (जि. रायगड) गोविंद बंदर येथील डम्पींग ग्राऊंडवर दिनांक १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी रात्री ११ च्या सुमारास लागलेल्या आगीमुळे शहरामधील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरणे, डम्पींग ग्राऊंडमधील कचऱ्याला वारंवार आग लावली जात असल्याने या परिसरामध्ये धुराचे साम्राज्य पसरून प्रचंड प्रदूषण होत असणे, वयोवृद्ध आणि बालकांचे आरोग्य धोक्यात येत असणे, धुरामुळे नागरिकांना खोकल्याचा त्रास होऊन नागरिकांना भररात्री घराबाहेर यावे लागणे, प्रदुषणामुळे जेष्ठ नागरिकांनीसुद्धा तात्पुरते शहराबाहेर जाण्याचा निर्णय घेणे, डम्पींग ग्राऊंडवर दर १५ ते ३० दिवसांनी अशाचप्रकारे जाणून बुजून आग लावली जात असल्याने स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, अलिबाग नगरपालिकेकडून रस्ते सफाई करणे, घरोघरी घंटागाडीद्वारे कचरा संकलन करणे, कचरा डम्पींग ग्राऊंडवर नेऊन टाकणे व मृत जनावरांची विल्हेवाट

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | लावणे, बेणणी काढणे, माती उचलणे इत्यादी कामासाठी रु. ६ कोटी ७३ लाख २४ हजार ७२० इतकी रक्कम कंत्राटदारांना अदा करूनही कचऱ्याची योग्य रितीने विल्हेवाट न लावता आग लावून स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आणले जात असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेली चिडीची भावना, डम्पींग ग्राऊंडवर टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याचा ठेका घेणाऱ्या ठेकेदारांना कचऱ्याला आग न लावता तो इतर योग्य मार्गाने नष्ट करण्याची तसेच या आगीबाबत सखोल चौकशी करून आग लावणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **४६.** | **४६६** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>" मुंबई महानगरपलिकेने शहरातील विशेष मुलांना आजारात दर्जात्मक सेवा मिळावी, त्यांच्या पालकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर व्हाव्यात तसेच खाजगी आरोग्यसेवेप्रमाणे परवडणाऱ्या दरात सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेकडून अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरू करण्याबाबत सन २०१८ मध्ये घोषणा करण्यात येणे, त्यानुसार सन २०१८ च्या अर्थसंकल्पापासून दरवर्षी १ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद देखील करण्यात येणे, तथापि चार वर्षे उलटून देखील सदर सेंटर अद्याप रुग्णसेवेसाठी कार्यान्वित झालेले नसल्याचे दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महापालिकेने विशेष मुलांसाठी एकाच छताखाली सोयीसुविधा मिळण्याचे दृष्टीकोनातून एकूण ३६, ००० चौ. फूट क्षेत्रफळाच्या जागेत अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर, नागपाडा बेलासिस रोड या मार्गावर सेंटर | १७ मार्च २०२३ | चर्चा झाली |

उभारण्यात येणे व त्यासाठी भांडवली खर्च ४ कोटी तर महसूली खर्च १० कोटी इतक्या रक्कमेची आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली असणे असे असतांना देखील अद्याप अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरू करण्यात न आल्याने ही योजना फक्त कागदावरच आहे की काय असे जनतेमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण, त्याप्रकरणी शासनाने चौकशी करण्याची नितांत आवश्यकता, परिणामी मुंबईतील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून सदर केंद्र सुरू करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४७. | ६७३ | **श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.**<br>" परभणी जिल्ह्यातील पाथरी नगर परिषद अंतर्गत सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत करून (संस्था क्र.पी.बी.एन.एच.एस.जी/१०४) यांनी सर्वे नं ९/१ आणि ८ गैरमार्गाने ताब्यात घेणे, सदर जागेवर कोणत्याही प्रकारच्या नगर प्रशासनाच्या परवानग्या न घेता अनधिकृत पद्धतीने त्या जागेवर सर्व्हीस रोड व ओपन स्पेसवर व्यापारी संकुल बांधकाम करणे, ले आउट करणे, परवानगी नसणे, सदर इमारतीस बाबा टॉवर नाव देऊन अनधिकृत बांधकाम करून संकुलाचे भाडे व्यापाऱ्याकडून घेणे, सर्व्हीस रोड वर गाळे बांधणे, त्यातील गाळे भाड्याने देणे, गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर वाणिज्य इमारत बांधकाम झाल्यामुळे गृहनिर्माण कायद्याचा भंग होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया शासनाची प्रतिक्रिया." | १७ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| ४८. | ५५६ | **श्री. राजेश राठोड, वि.प.स.**<br>" आशिया खंडातील एक मोठे मासेमारी बंदर म्हणून ओळख असलेल्या मुंबईतील कुलाबा विभागात ससून डॉक नावाजलेले असणे, या ठिकाणी मासळीचा मोठा व्यापार चालत असून, सर्वदूर भारतातून आलेला बंजारा समाज येथे आपली रोजी रोटी कमावण्यासाठी आलेला | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | असणे, या ससून डॉकमधून दरवर्षी हजारो कोटी रुपयांची मासळी परदेशी निर्यात होत असणे, निर्यात होण्यापूर्वी या मासळीचे काम हा आदिवासी समाज कित्येक वर्षांपासून करत असणे, उदाहरणार्थ बोटीतून मासळी उपसणे, हाताच्या नखाने मासळी सोलणे, बोटीची निगा राखणे अशी अंगमेहनतीची अनेक कामे बंजारा समाजातील जवळपास २० हजार कामगार अहोरात्र मेहनत करत असणे, परंतु महत्वाच्या व्यापारपेठेतील हे कामगार अनेक मूलभूत सोयी सुविधांपासून वंचित राहत असणे, स्वातंत्र्योत्तर काळापासून वंचित राहिलेल्या व दुर्लक्षित असलेल्या या आदिवासी बंजारा समाजाला बोटीवरील हजारो टन निर्यातक्षम मासळी सोलणाऱ्या मुख्यतः महिला व पुरुष कर्मचाऱ्यांसाठी विश्रांती घेण्यासाठी व भोजन करण्यासाठी स्वतंत्रर विश्रामगृहाची आवश्यकता, महिलांसाठी सुलभ शौचालयाची स्वतंत्र व्यवस्था, नवजात बालके आणि लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणाघर, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वस्त दरातील शिवभोजन उपहारगृह व प्राथमिक शिक्षणासाठी बालवाडीची गरज तसेच माफक दरात प्राथमिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यासाठी "स्व. बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना" घनकचरा व्यवस्थापनाची व्यवस्था इत्यादी त्यांच्या मूलभूत मागण्या असून, त्या मागण्या मंजूर झाल्यास त्यांना दिलासा मिळेल, याकरीता शासनाने लक्ष घालून मासळी व्यवसायातील बंजारा कामगारांच्या समस्या सोडविण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया." | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४९. | ९४ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>" सोलापूर जिल्ह्यातील सांगोला तालुक्यात दुष्काळी परिस्थितीच्या अनुषंगाने माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीत १४६ चारा छावण्या सुरू होत्या, सदर चारा छावण्यामध्ये दाखल जनावरांची गुरे छावणी व्यवस्थापन यंत्रणेमध्ये नोंदणी करून आठवड्यातून एकदा बारकोडद्वारे स्कॅनिंग केल्यानंतर ऑनलाईन हजेरीद्वारे अनुदान वितरित करण्याबाबत निर्देश देण्यात आले असणे, सदर ऑनलाईन हजेरीप्रमाणे ऑनलाईन हजेरी न लागलेल्या पशु संख्येचे २२, ५४, २७, २९९/- इतके अनुदान शासनास समर्पित करण्यात आले असणे, सदर समर्पित झालेले अनुदान मिळण्याच्यादृष्टीने आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २० च्या तरतुदीनुसार दिनांक २८.४.२००६ व दिनांक १०.७.२०१७ च्या शासन निर्णयानुसार मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती गठीत करून सदर समितीने सुधारित प्रस्ताव सादर केल्याचे कळविले असणे, त्या अनुषंगाने समितीच्या निर्णयामध्ये असे म्हणण्यात आले आहे की ज्या पशुधनाच्या यंत्रणेमध्ये कधीतरी स्कॅनिंगनुसार उपस्थितीची नोंद झाली असणे, त्याची इतर नोंदीच्या आधारे पडताळणी उपस्थितीची संख्या ग्राहय धरण्यात यावी व त्यानुसार किती निधी देणे आवश्यक आहे हे प्रमाणित करून सुधारित प्रस्ताव राज्य शासनास तात्काळ सादर करण्यात यावा असे निर्णय घेण्यात येऊनही अद्याप जिल्हाधिकारी, सोलापूर, विभागीय आयुक्त, पुणे यांनी यासंदर्भात कोणताही प्रस्ताव राज्य शासनास सादर करण्यात न येणे, त्यामुळे सांगोला तालुक्यातील १४६ चारा छावण्यांची २१, ४७, १४, ९२२/- रूपये तर मंगळवेढा तालुक्यातील चारा छावण्यांची सुमारे १२, २०, ९६, २५१/- रूपये इतक्या अनुदानाची रक्कम चारा छावण्यांना देण्याचे प्रलंबित असल्याने, चारा छावणी चालकांमध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, सबब माहे एप्रिल, २०१९ ते ऑक्टोबर, २०१९ या कालावधीतील अनुदानाची रक्कम राज्य | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | शासनाकडून तात्काळ वितरित करण्याबाबत शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही." | | |
| **५०.** | **५८३** | **डॉ.वजाहत मिर्झा,** सर्वश्री अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, सत्यजीत तांबे, **वि.प.स.**<br>" राज्यात कोचिंग क्लास फक्त शाळा-कॉलेजपुरते मर्यादित नसून त्यांचे अनेक प्रकार असणे, दहावी, बारावी, विद्यापीठांचे अभ्यासक्रम, बँकिंगच्या परीक्षा, स्पर्धा परीक्षा, एमपीएससी/ यूपीएससी यांचे कोचिंग क्लास यांचे पेव फुटले असणे, इंग्रजी स्पोकन क्लास, विविध परकीय भाषा शिकण्याचे वर्ग, संगीत, नृत्याचे क्लास, अगदी शेअरमार्केटचे शिक्षण देणारेही क्लास असणे, पोलीस भरती, तलाठी, ग्रामसेवकपासून ते स्टाफ सिलेक्शन कमिशन आणि यूपीएससी अंतर्गत सगळे शिकवणी क्लास सर्वत्र उपलब्ध होऊ लागले असणे, या क्लासच्या स्वतःच्या नोट्स, सराव परीक्षा, त्यांचे वेगळे पैसे, उन्हाळी वर्ग, शॉर्ट टर्म कोर्सेस, अकरावीनंतर बारावीचे फक्त व्हेकेशन, सीईटी प्रवेश परीक्षा क्लास असे अनेक प्रकारचे खाजगी क्लासेस राज्यात सुरू असणे व यातून हे क्लास चालवणारे कोट्यवधी - अब्जावधी रुपये कमावत असणे, राज्यात दहावी, बारावी राज्य मंडळाची आणि पुढे सर्व प्रवेश परीक्षेला सीबीएसई, आयसीएसई, आयबी, बोर्डाचा अभ्यासक्रम असा विरोधाभास चालू असताना शहरी व ग्रामीण शाळा, कॉलेजातील प्रचंड तफावत जाणवू लागणे, साधा किराणा दुकानदार शॉप ॲक्ट लायसन्स काढत असणे, पुढे त्याच्या दुकानात वजनकाटा तपासणारे, अन्न-औषधीवाले, बालकामगार तपासणारे अधिकारी तपासण्या करत असणे, प्रत्येक व्यवसायासाठी तपासणी | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली |

करणाऱ्या स्वतंत्र यंत्रणा असणे, मग कोट्यवधी- अब्जावधी रुपयांची उलाढाल असणाऱ्या कोचिंग क्लासची सरकारदरबारी नोंद करणे सुद्धा अत्यंत आवश्यक असणे, त्यांच्या जाहिरातीतील दाव्याची सत्यता तपासून पाहणारी यंत्रणा, तेथे मुलींच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र व्यवस्था, अपघात, अग्निशमन यंत्रणा, ऑक्सिजन सिलेंडर, वैद्यकीय प्राथमिक उपचार यांचीही व्यवस्था आवश्यक असणे, राज्यभर अशा क्लासची संख्या लाखोंनी असून अशा कोचिंग क्लासमध्ये शिकवणाऱ्या शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांच्या वेतनाबाबत नियम करणे, त्यांच्यासाठी या क्लास संचालकांनी आपला नफा खर्च करणे, अशा शिकवणी वर्गाला सर्व्हिस इंडस्ट्रीचा दर्जा असेल तर त्यांना सर्व इंडस्ट्रीचे कायदे लागू करणे, कोचिंग क्लास व्यापार असेल तर त्यांना कोणते कायदे लागू पडतात या सर्व प्रश्नांसाठी राज्यातील खासगी क्लासेसचे नियमन करण्याची व राज्य सरकारने यावर देखरेख ठेवण्यासाठी नियम व कायदे करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

५१. २८८ **श्री. कपिल पाटील, वि.प.स.** २१ मार्च २०२३ चर्चा झाली

" राज्यातील ऑटोरिक्षा चालक व मालक यांचा सर्वांगीण विकास, उन्नती आणि कुटुंब कल्याणासाठी परिवहन खात्यांतर्गत ऑटोरिक्षा व्यवसाय कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्याची होत असलेली मागणी, रिक्षा चालक-मालक यांची नोंदणी करून संबंधितांना निवृत्ती वेतन, उपदान, भविष्य निर्वाह निधी, अपघात विमा योजना आणि दहा लाख रूपयांचे विमा संरक्षण असलेली वैद्यकीय कुटुंब आरोग्य योजनेचे लाभ मिळण्याची आवश्यकता, रिक्षांची वाढती संख्या पाहता ऑटोरिक्षाचे मुक्त परवाना वाटप धोरण बंद करण्याची गरज, सरकारी, निमसरकारी, खाजगी नोकरी करणाऱ्या चालक-मालकांचे परवाने रद्द करण्याची मागणी, अवैध सार्वजनिक प्रवासी वाहतुकी विरोधात कायमस्वरूपी भरारी पथकाद्वारे आवश्यक

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | सक्तीची कारवाई, मॅक्सि कॅब तसेच अनधिकृतरित्या चालणाऱ्या अँपबेस्ड दुचाकी प्रवासी वाहतुकीवर बंदी आणण्याची गरज, मुक्त परवाना वाटप धोरणाचा फायदा घेऊन असंख्य बेरोजगार तरूणांनी ऑटोरिक्षा घेतल्या असून दोन वर्षाच्या कोरोना महामारीच्या रिक्षा व्यवसायावर परिणाम झाल्याने सदर कर्जाची परतफेड न झाल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केल्यामुळे रिक्षा जप्त करण्यात येणे, सदर कर्ज व त्यावरील व्याज माफ करण्याची आवश्यकता, ऑटोरिक्षाच्या वाहन विमा हप्त्याची रक्कम कमी करण्याची गरज, राज्यातील रिक्षाचालक - मालक यांच्यावरील उपासमारीची वेळ, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाची दुर्दशा, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **५२.** | **३३** | **श्री. विक्रम काळे, वि.प.स.**<br>" राज्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर केंद्रिय निवासी २८८ आश्रमशाळांना राज्य सरकारने मान्यता देणे, या सर्व शाळा नियमित सुरू असून त्यामधून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत असणे, या सर्व शाळांना शासनाने अनुदान द्यावे, ही सातत्याने मागणी होत असणे, मराठवाड्याच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी यापूर्वी प्रत्येक अधिवेशनामध्ये याविषयी शासनाचे लक्ष वेधले, तत्कालीन मंत्रीमहोदयांनी या सर्व शाळांची तपासणी करून अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल असे आश्वासित करणे, त्यानुसार वारंवार तपासणी करून अ, ब, क, ड अशी श्रेणी करणे, या श्रेणीनुसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा तत्कालीन शासनाने निर्णय घेणे, अनेक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या शाळांमधील शिक्षक- | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली |

कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीनुसार वेतन अनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांना वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

५३. ३३२ **सर्वश्री सुनिल शिंदे,** विलास पोतनीस, **वि.प.स.** २१ मार्च २०२३ चर्चा झाली

" पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गोरगरीब आदिवासी कुटुंबांकडे आधारकार्ड, घरकुल, जॉबकार्ड, मतदान ओळखपत्र, अंत्योदय योजनेचा लाभ, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ, पाणी व वीज यासारख्या विविध समस्यांना सामोरे जावे लागणे, मूलभूत सुविधा मिळत नसल्याने प्रशासनाच्या दिरंगाईचा भुर्दंड आदिवासी कुटुंबांना सोसावा लागत असल्यामुळे दिनांक १ ऑगस्ट, २०२२ ते १० ऑगस्ट, २०२२ दरम्यान श्रमजीवी संघटनेने प्रत्येक आदिवासी पाड्यावर जाऊन आदिवासी कुटुंबांचे सर्वेक्षण केलेले असणे, आदिवासी लाभार्थ्यांना वाडा तहसिलदार कार्यालयाअंतर्गत अंत्योदय योजनेचा लाभ मिळण्यासाठी रेशन कार्ड त्वरित मिळावित, २५० प्राधान्य रेशनकार्डवर अजूनही धान्य सुरू न झाल्याने रेशनकार्ड तात्काळ ऑनलाईन करून धान्य पुरवठा सुरू करावा, पंतप्रधान आवास योजनांची "ड" यादी पक्की करण्यात आलेली असून पात्रर कुटुंबांना घरे नाकारण्यात आली आहे, अशा अपात्रर कुटुंबांचा सर्वे करून योजनेचा लाभ द्यावा, जातीचे दाखले मिळण्याबाबत ६२० अर्ज प्राप्त झालेले असून आदिवासींना जातीचे दाखले त्वरित देण्यात यावेत, आदिवासींची घराखालची जागा नावे करण्यासाठी ९४० आदिवासी कुटुंबाचे दावे दाखल केलेले असून याबाबत सुनावणी सुरू करावी, रोजगारासाठी स्थलांतरीत होणाऱ्या कुटुंबांचा नव्याने सर्वे करून पात्रर कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ देण्यात यावा, मंजूर वनपट्टे असलेल्या वनहक्क दावेदारांचे भूमी-अभिलेख कार्यालयांतर्गत त्वरित गटबुक नकाशे देण्यात यावेत आदी मागण्यांसाठी श्रमजीवी संघटनेने दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ रोजी वाडा तहसिलदार

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कार्यालयावर बिऱ्हाड मोर्चा काढून निवेदन सादर करण्यात येऊनही आजमितीस ३ महिने लोटले तरी सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून ठोस कार्यवाही करण्यात होत असलेला विलंब, परिणामी आदिवासी जनतेत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण या प्रकरणाची तात्काळ चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **५४.** | **७१७** | **श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स.**<br>" आयटी कामगारांची व्यवस्थापनाकडून होणारी पिळवणूक, कामगारांना कुठलीही पूर्व सूचना न देता कामावरुन काढून टाकणे, अशा प्रकारे अन्याय झालेल्या कामगारांना न्याय मागण्यासाठी योग्य व्यासपीठ उपलब्ध नसणे, या निमित्ताने कामगार या व्याख्येची व्यापकता वाढवणे, तक्रार निवारणासाठी शासन स्तरावरुन समिती गठीत करण्याची आवश्यकता असणे, Campus Hiring च्या माध्यमातून ऑफर लेटर, लेटर ऑफ इंटेन्ट मिळणे, मात्र प्रत्यक्षात कामावर रुजू करून न घेणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| **५५.** | **३२५** | **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.**<br>" राज्यात १९/११/१९९४ च्या शासन निर्णयानुसार सहकारी पाणीपुरवठा संस्थांना २५ टक्के शासकीय अनुदान दिले जाणे, परंतु सदर शासन निर्णय होण्याआधी स्थापन झाल्या आहेत अशा संस्थांना या योजनांचा लाभ मिळत नसणे, या संस्था जवळपास ४० ते ५० वर्षापूर्वी स्थापन झाल्या असल्याने या पाणीपुरवठा संस्थांची पाईपलाईन, विद्युत मोटारी आदी खराब झालेल्या असणे, त्यांच्या दुरुस्तीसाठी येणारा खर्च हा खूप मोठा असून या संस्थांचे सभासद | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली |

अल्पभूधारक असल्याने त्यांना तो परवडणारा नसणे, त्यामुळे अशा पाणीपुरवठा संस्थांमधील शेतकरी सभासदांकडून संदर्भिय शासन आदेशानुसार सदर शासन आदेशापूर्वी स्थापन झालेल्या संस्थांनाही शासनाने अनुदान उपलब्ध करून द्यावे, अशी आग्रही मागणी होत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सहकार क्षेत्रात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५६. | ७५८ | **श्री. विलास पोतनीस,** ॲड.अनिल परब, श्री. सुनिल शिंदे, **वि.प.स.** | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली |

" ठाणे महापालिकेच्या अतिक्रमण, स्थावर व जंगम मालमत्ता कार्यभार सांभाळणाऱ्या सहायक आयुक्तांची दादागिरी, मनमानीपणे गैरकारभार सुरू असणे, वास्तविक पाहता त्यांचा मुळ पदभार उप कार्यालयीन अधीक्षक या पदावरचा असतांना वरिष्ठांशी संगनमत करून सन २०१८ पासून बेकायदेशीररित्या प्रभारी सहायक आयुक्त पदावर कार्यरत असणे, त्यांचेकडून अनधिकृत बांधकाम करणारे व फेरीवाल्यांकडून दैनंदिन लाखो रुपयांची आर्थिक वसुली करत असल्याची दिनांक १५ मार्च, २०२३ दरम्यान गंभीर तथा धक्कादायक माहिती उघडकीस येणे, सहायक आयुक्तांच्या उपस्थितीत त्यांचा शिपाई ठाणे महापालिकेतील कार्यालयात त्यांच्या उपस्थितीत लाखो रुपये मोजत असून दिवसाला चाळीस लाख रुपये कमाई असल्याची सहायक आयुक्त संवाद करत असल्याची चित्रफीत प्रसारित झालेली असणे, ठाणे महापालिकेच्या प्रत्येक प्रभागात अनधिकृत बांधकामे सुरू असून प्रत्येक बांधकामामागे सहा लाख रुपयांची वसुली दलालामार्फत केली जात असणे, प्रकल्पग्रस्तांना द्यावयाची घरे कोणत्याही प्रकारचे पुरावे नसतांना बेकायदेशीरपणे जवळच्या व्यक्तींना देण्यात आलेली असणे, एमएमआरडीए, म्हाडा कडून उभारण्यात आलेल्या व महापालिकेकडे वर्ग करण्यात आलेल्या इमारतीतील घरे खोटे पुरावे दाखवून जवळच्या परिचितांना देण्यात आली असणे, यामध्ये रॅकेटच कार्यरत

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | असून कोट्यवधी रुपये वसूल केले जात असणे, सन २०२१ मध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल होणे, मात्र पुढे कोणतीही कारवाई झालेली नसणे, खोट्या कागदपत्रांच्या आधारे सुमारे हजार पेक्षा जास्त घरे या सहायक आयुक्तांनी आपल्या अधिकारात वाटलेली असणे, संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने सुरू असलेला प्रचंड आर्थिक तथा अनागोंदी गैरकारभार, त्यास वरिष्ठांचे मिळत असलेले गैरवाजवी संरक्षण, पर्यायाने महापालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे सुरू असून निकृष्ट दर्जाच्या बांधकामांमुळे सदरच्या इमारती कोसळून पुढील काळात गंभीर अपघात होऊन मोठ्या प्रमाणात जिवीत तथा वित्त हानी होण्याची परिस्थिती निर्माण झालेली असणे, सदर प्रकरणी सखोल चौकशी करण्याची मुख्यमंत्री, प्रधान सचिव, नगर विकास, आयुक्त, ठाणे महापालिका यांचेकडे अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतांनाही सदर बाबत कोणतीही कारवाई केली जात नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संताप तसेच चिडीची भावना, सहायक आयुक्तांच्या मनमानी व दहशतीच्या कारभारामुळे ठाणे महापालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांचेबरोबरच महापालिका क्षेत्रातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले असणे, सदर गंभीर प्रकरणी शासनाने उच्चस्तरीय सखोल चौकशी करून तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **५७.** | **१५६** | **सर्वश्री अभिजित वंजारी,** अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, जयंत आसगावकर, सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री. धीरज लिंगाडे, **वि.प.स.** " केंद्र सरकारच्या शिक्षण हक्क कायदा, २०१३ नुसार देशातील गोरगरीब व आर्थिकदृष्टया दुर्बल असलेल्या पालकांच्या मुलांना सीबीएससी शाळांमध्ये २५ टक्के प्रवेश देणे बंधनकारक | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | केले असून, त्यानुसार सन २०१४ पासून राज्यात त्या कायद्यानुसार राज्यातील सीबीएससीच्या विविध शाळांमध्ये आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात असणे, आणि केंद्र शासनाच्या वतीने या २५ टक्के प्रवेशात विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्कांची रक्कम प्रती विद्यार्थी २८ हजार रुपये ठरली असून राज्यात प्रत्यक्षात ही रक्कम प्रती विद्यार्थी सीबीएससी शाळांना १७ हजार ५०० च्या दराप्रमाणे दिली जात असणे, त्यामुळे सीबीएससी शाळांवर अन्याय होत असणे, तसेच मागील ५ वर्षापासून राज्य शासनाने अनेक सीबीएससी शाळा आर्थिक डबघाईला आल्यापासून त्या शाळांमधील शिक्षक व इतर कर्मचाऱ्यांचे पगार देणे दुरापास्त झाले असणे त्यामुळे त्यांच्यात पसरलली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून सीबीएससी शाळांतील आर्थिकदृष्ट्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्काचा परतावा देण्यासाठी करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | | |
| ५८. | ५७० | **सर्वश्री जयंत आसगावकर,** अभिजित वंजारी, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, अशोक ऊर्फ भाई जगताप, **वि.प.स.**<br>" राज्यातील शिक्षकांची भरती पवित्र पोर्टलच्या माध्यमातून होत असणे, नुकतीच अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षा जाहीर झालेली असणे, परंतु यामध्ये कला व क्रीडा शिक्षकांचा समावेश नसणे, क्रीडा शिक्षकांकरिता बी. पी. एड. किंवा बी.एड. (फिजी.) पदवी आवश्यक असणे, बी. पी. एड. पदवी बी.एड. अर्हतेशी समकक्ष असणे, तसेच पवित्र पोर्टल मध्ये कला व क्रीडा या जागांचा उल्लेख नसणे, यास्तव या शिक्षकांना शाळांमध्ये नोकरीची संधी नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांचे खेळ व कला विषयाचे अतोनात नुकसान होणे, भविष्यात चांगले खेळाडू तयार न होणे, परिणामी विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान व शिक्षकांत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | २१ मार्च २०२३ | चर्चा झाली | ३११ |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ५९. | १६९ | **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.**<br>" गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यात तेलंगणा सिमावर्ती भागात गोदावरी नदीवर मेडीगड्डा प्रकल्प तेलंगणा शासनाने उभारला जाणे, परंतु सदर प्रकल्पामुळे सिरोंचा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित होणे, त्यांच्या भूसंपादन, पूनर्वसन बाबी प्रलंबित असून शेतकऱ्यांना त्याचा मोठा फटका बसणे, सदर प्रकल्पातून तेलंगणाच्या अनेक भागातील १८ लाख ५० हजार एकर शेतीला सिंचनाची सोय करण्याची क्षमता असणाऱ्या प्रकल्पाचे पाणी हैद्राबादपर्यंत नेले जात असणे, परंतु पावसाळ्यात गोदावरी नदी भरल्यानंतर नदीचे बॅकवॉटर पाणी गोदावरीला येऊन प्राणहिता नदीच्या बॅकवॉटरमुळे सिरोंचा तालुक्यातील अनेक गावात व शेतात पसरले जाणे, त्यामुळे शेतकऱ्यांची शेती खरडून जाणे, त्यात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणे, परिणामी सदर प्रकल्पाचा महाराष्ट्राला सिंचनाचा फायदा न होता उलट नुकसान सहन करावे लागणे, त्यामुळे सिरोंचा तालुक्यातील शेतकऱ्यांचे पुनर्वसन, भूसंपादनाचे प्रश्न व शेतकऱ्यांचे नुकसान भरपाईचा योग्य मोबदला मिळण्याची अत्यंत आवश्यकता, शासनाचे याकडे होणारे दुर्लक्ष, शेतकरी हिताच्या निर्णयासाठी योग्य निर्णय घेऊन न्याय देण्याची आवश्यकता, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | २३ मार्च २०२३ | चर्चा झाली |
| ६०. | ७३८ | **श्री. महादेव जानकर, वि.प.स.**<br>" मौजे सेलू, ता.वाशी, जि. धाराशिव येथे गट नंबर ४४५, ४४६, ४४७ व ४६४ मध्ये मे. इंडीग्रीड कंपनी यांचा कळंब ट्रान्समिशन लि. या नावाने ४००/२०० के. व्ही. चा प्रकल्प | २३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

प्रस्तावित असणे, या प्रकल्पाकरिता कंपनीने स्थानिक शेतकऱ्यांकडून जागा खरेदी केलेली असणे, शासनाकडून जागेचा NA व लेआउट न करता कंपनीने प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरू करणे, खरेदी करण्यात आलेल्या जमिनीभोवती जबरदस्तीने वॉल कंपाउंड बांधणे, खरेदी करण्यात आलेल्या शेत जमिनीतून पिंपळगाव- सेलू सारोळा कवडेवाडी मार्गे वाशी तालुक्यात जोडणारा ६० फुटी ग्रामीण रस्ता (VR-५०) असणे, सदर रस्ता कळंब ट्रान्समिशन कंपनीने परस्पर बंद करून त्यावर खोदकाम व बांधकाम करणे, कंपनीच्या प्रस्तावित कामास ग्रामपंचायत व नागरिकांचा विरोध असणे, अनधिकृत बांधकामाबाबत जिल्हा प्रशासनाकडे पाठपुरावा करून देखील प्रशासनाने नागरिकांच्या मागणीकडे दुर्लक्ष करणे, तालुक्याला जोडणारा (VR-५०) रस्ता कंपनीने अनधिकृतपणे बंद केल्याने स्थानिक नागरिकांची प्रचंड गैरसोय होणे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाने काम बंद करण्याची नोटीस देऊन देखील कंपनीने काम बंद न करणे, कंपनीने भाडोत्री गुंडांमार्फत स्थानिकांना दमबाजी करणे, मे. इंडीग्रीड कंपनीच्या कळंब ट्रान्समिशन लि. ने बीज प्रकल्पाकरिता प्रस्तावित जमिनीचा NA व लेआउट न करता शासनाचा महसूल बुडवून प्रकल्पाचे अनधिकृत बांधकाम सुरू करणे, तालुक्याला जोडणारा ग्रामीण रस्ता बंद करून स्थानिक नागरिकांना दमबाजी करणे, जिल्हा परिषद बांधकाम विभागाने दिलेल्या नोटिशीकडे दुर्लक्ष करणे, यामुळे स्थानिक लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला असंतोष व प्रकल्पास विरोध, यावर शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

६१. ६८४ **डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स.** २३ मार्च २०२३ चर्चा झाली

" नवी मुंबई महानगरपालिकेच्या नगररचना विभागाने विकास आराखडा प्रसिद्ध करतेवेळी विकासकांच्या फायद्यासाठी नागरी सोयी सुविधांकरिता आरक्षित असलेल्या भूखंडाच्या झोनमध्ये

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | परस्पर बदल करून विकास आराखडा प्रकाशित करणे व सोईस्कररित्या अपूर्ण माहिती प्रकाशित करणे, नवी मुंबई मनपाचा विकास आराखडा प्रकाशित करताना महासभेने मान्यता दिलेल्या २२६ सूचनांचा समावेश विकास आराखड्यामध्ये केलेला नसणे, सदर विकास आराखड्यामध्ये शासनाच्या नगर विकास विभागाचे दिनांक १४/०६/२०१९ आणि दिनांक ०६/०९/२०२१ चे भूखंडावरील आरक्षणाबाबत शासनाने कलम १५४(१) अन्वये निर्देश दिलेले असल्याने ते नवी मुंबई मनपावर बंधनकारक असणे, असे असताना देखील दिनांक ०३/०१/२०२२ रोजीच्या नगर विकास विभागाच्या आदेशात देण्यात आलेल्या स्थगितीचा कुठेही उल्लेख नसणे, दिनांक ०३/०१/२०२२ रोजीच्या नगर विकास विभागाच्या आदेशाची विकास आराखड्यामध्ये कुठेही माहिती नमूद केलेली नसून जनतेची दिशाभूल करून ही गंभीर बाब जनतेपासून लपवून ठेवल्यामुळे, जनतेला विकास आराखड्यावर आक्षेप नोंदवणे अशक्य होणे, नवी मुंबई मनपा क्षेत्रासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने दिनांक १४/०६/२०१९ रोजी च्या शासन आदेशान्वये १४/०६/२०१९ रोजी पर्यंतच्या भूखंडाचे लिलाव सिडकोच्या माध्यमातून अभिप्रेत असताना व दिनांक ०३/०१/२०२२ रोजी भूखंड विक्रीस स्थगिती दिलेली असताना सुद्धा नवी मुंबई मनपा नगररचना विभाग आणि सिडको यांनी संगनमताने दिनांक १४/०६/२०१९ नंतर आरक्षित भूखंडाची लिलावाद्वारे अनधिकृत विक्री करणे, सदर विकास आराखड्यामध्ये प्रकरण ९.२.६ मध्ये रेल्वे स्टेशन परिसरात उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सार्वजनिक वाहन तळाबाबत आयआयटी, मुंबई यांनी केलेल्या सर्वेक्षण अहवालात सार्वजनिक वाहनतळ/ पार्किंग व्यवस्था वाढवण्याचे नमूद | | |

केलेले असताना देखील नेरूळ रेल्वे स्टेशन येथे तत्कालीन महासभेने मंजूर केलेल्या विकास आराखड्यामध्ये सदर भूखंड क्रमांक ३२ से. १०A हा ट्रान्सपोर्टेशन झोन असून देखील नवी मुंबई मनपाच्या नगररचना विभागाने सिडको प्राधिकरणासोबत संगनमताने सोईस्कररित्या झोन बदल करून रहिवास आणि वाणिज्य वापराकरिता करणे, सदर नेरूळ स्टेशन परिसरात पार्किंगची गंभीर समस्या असताना देखील नवी मुंबई मनपाच्या नगररचना विभागाने सदर भूखंडाकरिता ट्रान्सपोर्ट झोन मध्ये बदल करून रहिवास आणि वाणिज्य असा करणे, नेरूळ स्टेशन परिसरातील नागरिकांचा सदर झोन बदलास विरोध असून सदर भूखंड सार्वजनिक वाहनतळांकरिता आरक्षित ठेवण्यात यावा व या गंभीर प्रकरणात दोषी असलेले नवी मुंबई मनपाचे तत्कालीन आयुक्त व नगररचना विभागाचे अधिकारी यांच्यावर करावयाची कारवाई व उपाययोजना तसेच शासनाची प्रतिक्रिया."

**६२.** **७७३** **श्री. आमश्या पाडवी,** ॲड.अनिल परब, **वि.प.स.** २३ मार्च २०२३ चर्चा झाली

" मे. मैनदिप एंटरप्रायजेस कंपनीने मेहबूब स्टुडिओ जंक्शन, वांद्रे-प. येथे सन २०१८ साली केलेल्या खराब कामासाठी मुंबई महापालिकेच्या रस्ते विभागाने सदर कंपनीचा ५ वर्षासाठी काळ्या यादीत समावेश केलेला असणे, परंतु सदर कंपनीचा काळ्या यादीतील समावेश कोणत्याही कारणाशिवाय ५ वर्षे ऐवजी ३ वर्षे इतका कमी केलेला असणे, सदर कंपनी नालेसफाई व मिठी नदी साफसफाईच्या कामासाठी पात्र होणे, सदर कंपनीचा पूर्व इतिहास पाहता सदर कंपनीस मिठी नदीच्या साफसफाईच्या कामासाठी महापालिकेच्या पर्जन्य जलवाहिनी विभागाकडून कारणे दाखवा नोटीस देण्यात येणे, परंतु तरीदेखील सदर कंपनीने मिठी नदी सफाईच्या नुकत्याच जाहिर झालेल्या निविदेसाठी निविदा भरणे, नव्या निविदा भरण्यासाठी बनावट कागदपत्रांचा वापर करणे, सदर कंपनीने मूळ उत्पादक कंपनी ही नेदरलँडस्थित मोबॅर्न असतांना क्लिनटेक इन्फ्रा या कंपनीला मूळ उत्पादक कंपनी दाखवून त्यांचे बनावट

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | हमीपत्र सादर करणे, पर्जन्य जलवाहिनी विभागातील अधिकाऱ्यांनी सदर कंपनीला अपात्र करण्यासाठी अहवाल सादर केलेला असतांना त्याच विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कंपनीशी संगनमत करून सदर कंपनीला पात्र करण्यासाठी अपात्र अहवाल दुर्लक्षित करून पात्र करणे, सदर कंपनीबाबत बनावट कागदपत्रांच्या अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या असतांनादेखील कोणतीही चौकशी न करता सदर कंपनीचा बचाव करणे, अशा गैरप्रकारामुळे महापालिकेची आंतरराष्ट्रीय पातळीवर बदनामी होण्याची शक्यता असणे, याबाबत शासनाने तातडीने योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| **६३.** | **६३८** | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.**<br>" राज्यात आदिवासी बहुल भागातील आदिवासींचे ख्रिस्ती धर्मात आणि राज्यातील मुली आणि महिला यांना फसवून त्यांचे इस्लाम मध्ये धर्मांतर करण्याचे षडयंत्र गेली अनेक दशके प्रचंड मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे निदर्शनास येणे, नुकतेच लव्ह जिहाद मधून घडलेल्या आफताबच्या केसमध्ये भयावह गोष्टी देशासमोर येणे, अशा घटनांचे तक्रार, निवेदनांवर पोलीस प्रशासनाकडून जलदगतीने कारवाई होत नसणे, मात्र धर्मांतराच्या प्रकरणी तत्परतेने अटक होऊन संबंधितांवर कारवाई होण्याच्या घटना अत्यल्प असणे, नुकतेच पालघर जिल्ह्यातील डहाणू येथील एका आदिवासी महिलेने धर्मांतराच्या उद्देशाने आलेल्या चार ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार केल्याचे माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, पोलीस प्रशासनाची निष्क्रियता, भ्रष्टाचार, पीडितांनी पुढे येणे, लढयासाठी लागणारे मनोधैर्य, पैसा आणि पुढाकार आदी अनेक गोष्टी आरोपिंना शिक्षा | २३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

होणे किंवा न होणे यासाठी कारणीभूत असल्या तरी कायदा झाल्यामुळे पीडितांना 'आपल्या पाठीशी कायदा आहे' असे नैतिक पाठबळ असणे हे पाठबळ त्यांना अन्यायाच्या विरोधात आवाज उठवण्यास आणि धर्मांतर करणाऱ्यावर वचक बसवण्यास निश्चितपणे उपयोगी ठरण्याची आशा असणे, हिंदू व आदिवासी बांधवांच्या दृष्टीने धर्मांतराचा कायदा हा अनन्यसाधारण महत्त्वाचा असणे, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, छत्तीसगड, ओडीसा, गुजरात आणि हिमाचल प्रदेश या राज्यात धर्मांतर विरोधी कायदा अस्तित्वात असणे, त्यामुळे याच धर्तीवर महाराष्ट्रात देखील वाढत्या धर्मांतर व लव्ह जिहादच्या घटनांना आळा घालण्यासाठी धर्मांतर विरोधी कायदा लागू करून त्याची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असणे, अशी मागणी देखील राज्यात विविध ठिकाणी निघालेल्या मोर्चे, आंदोलनातून केली जात असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**६४. ७७५ श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, वि.प.स.** २३ मार्च २०२३ चर्चा झाली

" पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात नीरा देवघर प्रकल्पामधील शिल्लक राहणाऱ्या किंवा बचत झालेल्या पाणी साठ्यामधून कायमस्वरुपी दुष्काळी असलेल्या सांगोला, खंडाळा, पंढरपूर, फलटण आणि माळशिरस तालुक्यातील दुष्काळग्रस्त गावांना प्रत्येकी ०१ टी.एम.सी. असे एकूण ०३ टी.एम.सी. पाणी बंदिस्त पाईपलाईनद्वारे नातेपुते येथून नीरा उपसा कालव्यात सोडण्यात यावे अशी मागणी तेथील लोकप्रतिनिधी व जनतेने केलेले असून ही मागणी वाढत असणे, त्याचप्रमाणे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडून नीरा देवघर प्रकल्पाच्या तृतीय सुधारित प्रकल्पास मिळालेली मान्यता, नीरा देवघर प्रकल्पातून धोम बलकवडी प्रकल्प चारमाही ऐवजी आठमाही करण्याकरिता लागणारे ०.९३ टी.एम.सी. पाणी उपसा सिंचन योजनेतून देणे गरजेचे असणे, सन २०२२-२३ च्या आर्थिक वर्षाचे निधी नियोजन पूर्ण झालेले असून रु.३, ९७६.८३ कोटी इतक्या रकमेची सुधारित प्रशासकीय मान्यता दिनांक

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | ३१ जानेवारी, २०२३ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मिळालेली असणे, निधी उपलब्धतेनुसार रु.१००० हजार कोटींच्या कामांच्या तात्काळ निविदा काढण्यास मान्यता मिळणे आवश्यक असणे, तरच प्रकल्पाचे उर्वरित ३५ टक्के काम जलद गतीने पूर्ण होण्यास मदत होणार असून फलटण, खंडाळा, पंढरपूर व माळशिरस या तालुक्यातील दुष्काळी भागातील गावांना न्याय मिळावा यासाठी राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ६५. | १२ | **सर्वश्री सतिश चव्हाण,** विक्रम काळे, **वि.प.स.**<br>" वाळुंज महानगर (छत्रपती संभाजीनगर) परिसरात औद्योगिक वसाहतीमुळे परिसराचा झपाट्याने विकास झाला देशभरातून नोकरी व व्यवसायासाठी लाखो नागरिक स्थायिक झाले असणे, त्यामुळे परिसरातील शेतकरी व खाजगी विकासकांनी स्वतःच्या जमिनीवर प्लॉटींग करून जमिनी विकसीत केल्या असणे, वाळुंज परिसरातील स्थायिक झालेल्या नोकरी/व्यवसाय निमित्त आलेल्यांनी जागा घेऊन घरे बांधली परंतु नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक यांनी दिनांक १२ जुलै २०२१ अन्वये तुकडा बंदीचा आदेश पारित केला असणे, सर्वसामान्य कामगार, मजूर इत्यादींना घर घेण्याचे व शेतकऱ्यांच्या जमिनी विकसीत करण्याचे स्वप्न भंगले असणे, सदर तुकडा बंदी विरोधात शेतकरी व विकासकांनी उच्च न्यायालय, खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर येथे आव्हान दिले असणे व न्यायालयाने दिनांक ०५ मे, २०२२ रोजी नोंदणी महानिरीक्षक यांचा तुकडा बंदीचा आदेश रद्द ठरवून दस्तनोंदणी करण्याचे आदेश दिले असणे, उच्च न्यायालयाचा आदेश शासनाने अद्याप मान्य न केल्याने व त्यावर कोणतीही सकारात्मक कार्यवाही न झाल्याने दस्तऐवज नोंदण्या रखडल्या असणे, | २३ मार्च २०२३ | चर्चा झाली |

ज्या नागरिकांनी भूखंड घेतला तो त्यांच्या नावावर होत नसणे, तर सर्वसामान्य नागरिकांस भूखंड घेता येत नसणे, उच्च न्यायालयाच्या दिनांक ०५ मे २०२२ च्या आदेशानुसार शासनाने तात्काळ कार्यवाही करून दस्तऐवज नोंदण्या करण्यासाठी मान्यता देण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

६६. ७६७ **श्री. सुरेश धस, वि.प.स.** २३ मार्च २०२३ चर्चा झाली

" राज्यात दुध व दारुमध्ये भेसळ करण्याचे सातत्याने आढळून येत असलेले प्रकार, बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यामध्ये दुध उत्पादन हा शेतकऱ्यांचा जोडधंदा असून सुमारे सव्वादोन लाख लिटर दुध उत्पादन होत असणे, आष्टी शहरातील संभाजीनगर भागात जगदंबा मिल्क अँण्ड प्रॉडक्टस् यांच्या मालकीचे घर मागील एक महिन्यापासून भाडे तत्वावर दिले असल्याचे निदर्शनास येणे, या घरात १३२ गोण्या पावडर, रसायन आणि २२० पाम तेलाचे डबे जप्त करण्यात येणे, या प्रकरणी जगदंबा मिल्क दुकानाचे मालक यांच्यावर गुन्हा दाखल झाला असणे, तसेच अहमदनगर जिल्ह्यातील श्रीगोंदा येथे एका घरात बनावट दुध तयार करण्याचे साहित्य ठेवत असल्याचे निदर्शनास येणे, दररोज सुमारे ३० हजार लिटर बनावट दुध तयार होत असल्याची बाब निदर्शनास येणे, दिनांक १६/३/२०२३ रोजी २५ किलो क्षमतेच्या एका उघडलेल्या बॅगमध्ये २१ किलो व्हे परमिटे पावडरचा साठा व ४० लिटर क्षमतेच्या प्लॅस्टिक व कॅनमध्ये ३५ लिटर लाईट लिक्विड पॅराफिनचा साठा आढळल्याचे निदर्शनास येणे, या प्रकरणी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात एफआयआर नोंद असणे, परिणामी आष्टी तालुक्यात सर्वसाधारण नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र भिती व संतापाची लाट, अशाप्रकारे राज्यात दारु व दुधामध्ये भेसळीचे प्रकार मागील काही वर्षापासून सातत्याने सर्रास सुरू असल्याचे निदर्शनास येणे, या प्रकारामुळे राज्यातील अनेकांच्या विशेषतः बालकांच्या जीवीतास नाहक धोका निर्माण होणे, काही प्रकरणी निष्पाप व्यक्तींचे बळी जाणे इ.प्रकार

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | आढळून येणे, ही बाब गंभीर असल्याने याबाबत कठोर कारवाई होण्याच्या दृष्टीने अन्न भेसळ अधिनियम महाराष्ट्र राज्यास लागू असताना त्यात या गुन्ह्याबद्दल अधिक कठोर शिक्षेची तरतूद करण्याची आवश्यकता, आष्टी तालुक्यात नुकत्याच घडलेल्या दुध भेसळीच्या वरील प्रकाराची तातडीने चौकशी करण्याची व दोषींना कठोर शिक्षा करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना." | | |
| **६७.** | **६७१** | **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.**<br>" राज्यातील विविध प्रकल्पांसाठी शासनाने हजारो शेतकऱ्यांच्या लाखो हेक्टर जमिनी संपादित करणे, प्रकल्पासाठी शेतजमीन संपादन झाल्याने शेतकऱ्यांसमोर निर्माण झालेला रोजगाराचा प्रश्न, सदर प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरभरतीमध्ये दिलेले ५ टक्के आरक्षण, २००९ पूर्वी सदर प्रकल्पग्रस्त बेरोजगारांना सरळसेवा भरतीने जेष्ठता क्रमाने व शैक्षणिक पात्रतेनुसार भरती करणे, मात्र दिनांक २७ ऑक्टोबर, २००९ च्या शासन निर्णयाद्वारे सदर पदभरती ही जाहिरात देऊन सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवाराची पात्रता तपासून व स्पर्धा परिक्षेद्वारे करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, प्रकल्पासाठी शेती, घरे संपादित झाल्याने बेघर, निर्धन झालेल्या शेतकऱ्यांच्या पाल्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष, राज्य शासनाकडून अनुकंपा, नोकरभरतीच्या धर्तीवर सरळसेवा पद्धतीने प्रकल्पग्रस्तांच्या ठेवलेल्या ज्येष्ठता यादीनुसार स्पर्धात्मक परिक्षेशिवाय प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्तांना सेवेत सामावून घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | २४ मार्च २०२३ | चर्चा झाली |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६८. | ६७२ | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.** | २४ मार्च २०२३ | चर्चा झाली |

" मुंबई उपनगरातील कांदिवली, ता.बोरीवली येथील क्लस्टर डेव्हलपमेंट योजनेच्या प्रस्तावाबाबत एल्टी गीजे सी.एच.एस.कडून दिनांक ०५/१२/२०२२ आणि दिनांक ०१/०२/२०२३ रोजी प्राप्त झालेल्या पत्रानुसार आणि दिनांक ०५/१२/२०२२ रोजी महापालिका आयुक्तांना उद्देशून लिहिलेल्या पत्रानुसार सोसायटी किंवा जि.बी.आर. (जनरल बॉडी रिझोल्यूशन) यांच्या संमती आणि पुष्टीशिवाय सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने दिनांक २१ डिसेंबर २०२२ रोजी क्लस्टर डेव्हलपमेंट स्कीम सादर केली असणे, ज्यात एल्टी गीजे सी.एच.एस. समाविष्ट असणे, सोसायटीने दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी उप मुख्य अभियंता इमारत प्रस्ताव (आर-सेंट्रल) डब्ल्यू.एस. II कडे चुकीच्या पद्धतीने सादर केल्याबद्दल आक्षेप घेतला असणे, सोसायटीचा लेखी आक्षेप असूनही डीवायसीई डब्ल्यू.एस. II-आर-सेंट्रल ने सीडीएस प्रस्ताव एम.सी.जी.एम. आयुक्तांकडे पाठवला असणे, उच्चाधिकार समितीने आपल्या दिनांक ११/०१/२०२३ च्या बैठकीत हा प्रस्ताव मान्य करून, सोसायटीच्या आक्षेपानंतरही प्रस्ताव नगरविकास विभागाकडे पाठविला असणे, एल्टी गीजे सी.एच.एस. सोसायटीमध्ये १७२ सदस्य असून मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने माहे मे, २०२२ मध्ये लबाडीने आणि चुकीच्या हेतूने ३८ सभासदांकडून परस्पर संमती मिळवून त्यांना कोणत्याही अधिकाराशिवाय आणि सोसायटीच्या जनरल बॉडी ठरावाशिवाय पाठिंबा दिलेला असणे, (३८ सभासदांपैकी ६ सदस्यांनी त्यांची संमती काढून घेतली असणे) संमतीचे उघड निरीक्षण केल्यावर हे स्पष्टपणे उघड होते की एस.जी.एम. किंवा इतिवृत्तांचे तपशील हेतुपुरस्सर रिक्त सोडले गेले असणे, कारण अशी कोणतीही मिनिटे/ठराव मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडच्या बाजूने वैयक्तिक संमतीच्या अंमलबजावणीसाठी मंजूर केलेला नसणे, सदस्यांची किमान ५१% संमती मिळवल्याशिवाय, डेप्युटी सी.एच.ई. (बी.पी.) डब्ल्यू.एस. II सी.डी.एस. मध्ये

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | असा प्रस्ताव कसा स्वीकारू शकत नाही, तरीही सदरील प्रस्ताव उच्चाधिकार समितीमध्ये मंजूर केला असणे, सदरील इमारत ही जिर्ण अवस्थेत असल्याने या क्लस्टर डेव्हलपमेंटचा प्रस्ताव तात्काळ थांबविण्यात येऊन मेसर्स सितारा बिल्डर्स प्रायव्हेट लिमिटेडने सादर केलेल्या त्यांच्या या प्रस्तावातून एल्टी गीजे सी.एच.एस. ला काढून टाकण्याबाबत तसेच कांदिवली, ता.बोरिवली येथील सी.टी.एस. क्रमांक ४/१० (पी.टी.) असलेल्या भूखंडाचा समावेश करण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **६९.** | **६६७** | **ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.**<br>" नवी मुंबई प्रकल्पासाठी राज्य शासनाने नियोजन प्राधिकरण म्हणून सिडको महामंडळाची स्थापना करणे, नवी मुंबई प्रकल्पाच्या विकासाबरोबरच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प, नवी मुंबई मेट्रो, नैना प्रकल्पांसारख्या महत्वाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी सिडकोवर सोपविण्यात येणे, सद्यःस्थितीत नवी मुंबईच्या कार्यक्षेत्रामध्ये नवी मुंबई महानगरपालिका व पनवेल महानगरपालिकांची स्थापना झाल्यानंतरही काही नोडसाठी सिडको हे नियोजन प्राधिकरण असणे, नवी मुंबईतील जमीन सिडको महामंडळाने भाडेपट्ट्याने वाटप केलेल्या जमिनीच्या विकासकांशी विविध बाबींवर चर्चा करून बांधकाम व्यवसायांशी संबंधित अडचणींबाबत निर्णय घेण्यासाठी शासनाने माहे ऑक्टोंबर, २०२२ मध्ये समिती गठित करणे, उक्त समितीने १२.५ टक्के योजनेंतर्गत वाटप केलेल्या भूखंडावर येणारी मोठ्या प्रमाणातील मावेजा रक्कम व त्यानुषंगाने बांधकाम मुदतवाढीसाठी वाढणारे अतिरिक्त भाडेपट्टा शुल्काबाबत, अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) आकारणीसाठी ११५ | २४ मार्च २०२३ | चर्चा झाली |

टक्के पर्यंतच्या दराबाबत, बांधकाम पूर्णत्वाचा दाखला वास्तुविशारद यांनी प्रमाणित केल्यानंतर अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) आकारण्याबाबत निर्णय घेऊन समितीने तीन महिन्यात शासनास अहवाल करणे शासन निर्णयामध्ये नमूद असतांना देखील अद्याप समितीने अहवाल शासनास सादर न करणे, रेडीरेकनर दरानुसार टेंडर प्लॉट मूळ रकमेच्या तीन ते चार पट अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क आकारण्यात येत असणे, २०१७ पर्यंत सिडको व विकासकांमध्ये होणाऱ्या करारनाम्यानुसार अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क ४० टक्के (ALP) आकारण्यात येत असणे, परंतु सन २०१७ नंतर त्यामध्ये ११५ टक्के पर्यंत वाढ करणे, सद्यःस्थितीत लागू करण्यात आलेल्या धोरणानुसार मूळ भूखंडाच्या किंमतीच्या अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) १२ वर्षापर्यंतच्या कालावधीपर्यंतचे मुल्य ६२५ टक्के होत असल्याने ही बाब आर्थिकदृष्टीने अव्यवहार्य असणे, त्यामुळे भोगवटा प्रमाणपत्र (OC) मिळणेस विलंब होत असल्याने विकासक आणि सदनिकाधारकांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, सिडको आकारत असलेले अतिरिक्त भाडे शुल्क भूखंडाच्या मूळ किंमतीपेक्षा जास्त वाजवी दराने न आकारता सवलतीच्या दराने आकारण्यात यावा अशी होत असलेली मागणी, अतिरिक्त भाडेपट्टा शुल्क (ALP) चे धोरण सिडको क्षेत्राव्यतिरिक्त इतर कुठेही नसणे, विकासक व सदनिका धारकांना दिलासा देण्याकरिता वर नमूद बाबींबाबत सर्वसमावेशक धोरण जाहीर करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७०. | ६३३ | **श्रीमती उमा खापरे,** श्री. **रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>" मुंबई शहरातील शेकडो कबुतर खाने विना परवानगीने सुरू असल्याची बाब माहे मार्च, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या कबूतरखान्यांची रीतसर परवानगी महापालिकेकडून घेणे आवश्यकता असतानाही विना परवाना हे कबूतर खाने सर्रास सुरू असणे, मुंबई शहरातील काही कबूतरखान्याला हेरिटेज दर्जा प्राप्त असून हे | २४ मार्च २०२३ | चर्चा झाली |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कबूतर खाने पाहण्यासाठी देश विदेशातून अनेक पर्यटक येत असतानाही याची नोंद महापालिकेकडे नसणे म्हणजे आश्चर्य व्यक्त होत असणे, कबूतरांना उघडल्यावर खाद्य पदार्थ टाकल्यास राज्यातील इतर महानगरपालिका दंड आकारत असतानाही मुंबई महापालिकेचे याकडे कोणतेही लक्ष नसणे, त्यातच मुंबईतील लाखो नागरिकांना श्वसनाच्या आजाराचा सामना करावा लागतो त्यासाठी कबूतराच्या अतिवावर असलेल्या परिसरातील नागरिकांचा त्यात समावेश असतानाही महापालिका आणि राज्य शासन नागरिकांना श्वसन विकाराचा त्रास होऊ नये यासाठी कोणतीच उपाययोजना करीत नसणे, त्यासाठी राज्य शासन आणि मनपाने संयुक्त मोहीम राबवून या कबूतर खान्यांना रितसर परवानगी द्यावी आणि त्यांच्यापासून श्वसन विकार व इतर आजार होणार नाही याची दखल मुंबईतील नागरिक घेत असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **७१.** | **७७९** | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>" जयपूर (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शेतकऱ्यांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या वसाहतीकरिता सन २०१७-२०१८ साली संपादित केल्या असणे, शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला काही ठराविक लोकांना मिळाला असून संपादित जमिनीमधील फळझाडे, विहिरी व घरे यांचे मुल्यमापन करण्याचे कामही अद्याप प्रलंबित असणे, तसेच शेतकऱ्यांना नवीन जमीन खरेदी करण्यासाठी इसार पावती करण्यात आल्या असूनही मोबदल्याची रक्कम मिळाली नसल्याने दुसऱ्या गावात जमीन घेता येत नसणे, उक्त प्रकरणी नागरिकांनी छत्रपती संभाजीनगर येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास | २४ मार्च २०२३ | चर्चा झाली |

महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, प्रादेशिक अधिकारी व मुख्य अभियंता याकडे पाठपुरावा करूनही अद्याप मोबदला मिळालेला नसल्याने नागरिकांच्या मनात शासनाच्या धोरणाबाबत निर्माण झालेली संभ्रमावस्था, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करून सदरहू शेतकऱ्यांना तात्काळ संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७२. | ७७४ | **श्री. रामराजे नाईक-निंबाळकर, वि.प.स.** | २४ मार्च २०२३ | चर्चा झाली |

" दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरच्या धर्तीवर बँगलोर-मुंबई आर्थिक कॉरिडॉर (BMEC) अंतर्गत सातारा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या औद्योगिक वसाहती विकसित करण्याचा राज्य शासनाचा मानस असणे, त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (MIDC) भूसंपादन कार्यवाही सुरू होणे, राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रम (NICDC) अंतर्गत केंद्र शासनाच्या समितीने तांत्रिकदृष्ट्या सातारा जिल्ह्यातील उत्तर कोरेगाव मधील जागा पात्र ठरलेली असणे, उत्तर कोरेगाव भाग राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८ पासून ४ किमी अंतरावर पुणे-कोल्हापूर रेल्वे महामार्गापासून ६ किमी अंतरावर पुरंदरचा प्रस्तावित विमानतळ व लॉजिस्टीक पार्क ५० किमी अंतरावर त्याचप्रमाणे पुणे-बँगलोर ग्रीन-फिल्ड हायवेपासून ५ ते १० किमी अंतरावर असणे, उत्तर कोरेगाव भागात वीज व पाण्याची सहज असलेली उपलब्धता, त्याचप्रमाणे पुणे-मुंबई या मेट्रोसिटीपासून अगदी जवळ असल्याने ट्रान्सपोर्ट व्यवस्था तसेच कुशल व अकुशल कामगारांची उपलब्धता असणे, उत्तर कोरेगाव मधील शासनाने निवडलेली सोळशी, नायगाव, रणंदुल्लाबाद, नांदवळ, पिंपोडे, भावेनगर व तडवळे या सर्व गावातील ७० टक्के पेक्षा जास्त शेतकरी औद्योगिक वसाहतीसाठी जमीन देण्यासाठी तयार असणे, या प्रकल्पासाठी एकूण १२,२३८ एकर जागा लागणार असणे, त्यापैकी पहिल्या टप्प्यात ८,००० एकर जागा उत्तर कोरेगाव मधील शेतकरी या प्रकल्पासाठी

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | जमीन द्यायची तयारी दर्शविणे, उत्तर कोरेगाव मधील लॉजिस्टीक किंमत देशाच्या सरासरी लॉजिस्टीकच्या किंमतीपेक्षा १३ टक्के पेक्षा कमी असल्याने उत्पादन खर्चात घट होणार असणे, या प्रकल्पामध्ये GDP मध्ये वाढ होण्यास मदत होणार असणे, बँगलोर-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरसाठी कोरेगाव येथील जागा निवडीबाबत माहे जुलै, २०२२ मध्ये केंद्रीय अर्थमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली समितीच्या दिल्ली येथील ऑनलाईन बैठकीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांनी उत्तर कोरेगाव या भागासाठी सहमती दर्शविणे, असे असतांना या प्रकल्पाचे काम पुढे नेण्यास उशीर झालेला असणे, त्यामुळे उत्तर कोरेगाव मधील जनतेत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजी आणि संतापाची भावना, हा प्रकल्प सुरू व्हावा यासाठी शासनाने तात्काळ करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **७३.** | **१२०** | **सर्वश्री शशिकांत शिंदे, विक्रम काळे, अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>“ इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या राज्यात ९७६ आश्रमशाळा कार्यान्वित असून वारंवार उच्च न्यायालयाचे आदेश होऊनही व दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ च्या विधि व न्याय विभागाच्या परिपत्रकाप्रमाणे एकाला दिलेला न्याय त्याच संवर्गातील इतरांना लागू होतो व राज्य घटनेच्या “समान काम समान वेतन” या राज्यघटनेने दिलेल्या अधिकारावर बाधा येत असून इतर अधिक्षकांना लाभ दिला जात असणे, तथापि १५८ वसतिगृह अधिक्षकांना ४२०० ग्रेड पे लाभापासून वंचित ठेवण्यात आल्याचे दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच आदिवासी विकास व इतर मागास बहुजन कल्याण | २४ मार्च २०२३ | चर्चा झाली |

आश्रमशाळा ध्येय धोरण व अधिक्षकांचे कामाचे स्वरुप एकच असतांना आदिवासी विभागातील अधिक्षकांना सर्व लाभ मिळत असणे, मात्र इतर मागास बहुजन कल्याण विभागातील अधिक्षकांना ते मिळत नसणे, त्यामुळे संबंधित १५८ वसतिगृह अधिक्षकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, संबंधित अधिक्षकांना ४२०० ग्रेड पे मंजूर करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७४. | ७६८ | **श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.**<br>" शनिवार दिनांक १८ मार्च, २०१३ रोजी दहिसर मुंबई येथे भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यावर जीवघेणा हल्ला करण्यात येणे, हल्ला करणाऱ्यांमध्ये अंदाजे ४० पेक्षा जास्त गुन्हेगारांचा समावेश असणे, हा हल्ला होत असताना, सदर घटना सी.सी.टी.व्ही. फूटेज मध्ये चित्रीत हाणे, सदर घटना प्रकरणाचा गुन्हा दाखल करण्यासाठी पोलीस स्थानकामध्ये फिर्यादी गेले असता, गुन्हा नोंद करतांना स्थानिक पोलीस प्रशासनाकडून टाळाटाळ करण्यात येणे, सी.सी.टी.व्ही. फुटेज मध्ये सदर घटना व हल्लेखोर स्पष्ट दिसत असतांनाही व स्पष्ट पुरावे असतानाही स्थानिक पोलीस निरीक्षक व उपायुक्त (मुंबई पोलीस) यांच्या कडून अक्षम्य दुर्लक्ष करण्यात येणे, गुन्हे दाखल करताना टाळाटाळ तर होणेच परंतु कलम लावतानाही किरकोळ कलमे (भा.द.वि.) लावण्यात येणे, शताब्दी रुग्णालयाच्या प्रशासनानेही जखमी कार्यकर्त्याला ॲडमिट करतांना दिरंगाई करणे, त्यामुळे संपूर्ण दहिसर परिसरात अनागोदींची परिस्थिती निर्माण होणे, ५० ते ५५ नागरिकांनी हल्ला करूनही त्यांच्यावर कारवाई न होणे, ते मोकाट असल्याने संपूर्ण दहिसर परिसरातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली भितीची व असुरक्षिततेची भावना, ही परिस्थिती बदलून जनतेमध्ये सुरक्षा निर्माण होण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनातील आरोपींना पाठीशी घालणाऱ्या पोलीस निरीक्षक | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | व उपायुक्त यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व भूमिका." | | |
| **७५.** | **७२२** | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.** | | |
| | | " राज्यातील धर्मादाय संघटनेतील सहायक धर्मादाय आयुक्त या पदावरील एका अधिकाऱ्याची धर्मादाय उप आयुक्त, जळगांव येथे रिक्त पदावर माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये पदोन्नती झालेली असणे, धर्मादाय संघटनेमध्ये सध्या मुंबई, ठाणे व सोलापूर या ठिकाणी प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या तीन न्यायिक अधिकारी/न्यायाधीश यांची सेवा उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत न झाल्याने पदोन्नती करिता पात्र असणाऱ्या नियमित अधिकाऱ्यांना धर्मादाय उप आयुक्त या पदावर पदोन्नती मिळण्यास प्रचंड विलंब होत असणे, सदरील तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करणेकामी विधी व न्याय विभागाने कार्यवाही करणे अपेक्षित असतांनाही त्याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, तसेच या तीन न्यायिक अधिकाऱ्यांची/न्यायाधिशांची सेवा उच्च न्यायालयास प्रत्यावर्तीत करून घेणेकामी महाप्रबंधक, उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडून विधी व न्याय विभागाच्या पत्रव्यवहारास कोणताही प्रतिसाद दिला जात नसणे, त्यामुळे शासनाने याप्रकरणाची चौकशी करून सदरील अधिकारी यांना पदोन्नतीसाठी निर्देश देणे आवश्यक असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या संघटनेतील अधिकारी वर्गामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व तीव्र नैराश्याची भावना, शासनाने याप्रकरणाची चौकशी करून व न्यायिक | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |

अधिकारी यांची प्रतिनियुक्ती तात्काळ रद्द करून शासन सेवेतील अधिकाऱ्यांना तातडीने पदोन्नती देणेबाबत करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७६. | ७३० | **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.**<br>" महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडून (एमडब्ल्यूआरआरए) राज्यात घरगुती आणि औद्योगिक पाणीपट्टीत केलेली वाढ १ जुलैपासून लागू करण्यात आली असणे, त्यानुसार कच्च्या मालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना प्रति हजार लिटरला ३३० रुपये मोजावे लागणार असणे, डिस्टलरी कडील अल्कोहल व इथेनॉल उत्पादनाकरिता होणारा पाणीवापर हा कच्चा माल गृहीत धरुन सुधारित दराने पाणी बिलाची आकारणी होणार असणे, सन २०१८ च्या शासनाच्या परिपत्रकाप्रमाणे पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होणाऱ्या उद्योगात शितपेये, आसवानी (ब्रुअरिज) मिनरल वॉटर किंवा तत्सम उद्योग यांचा समावेश असल्याने डिस्टलरी करिता रेग्युलर दराने पाणी पट्टी आकारण्यात येत असणे, पण शासनाच्या सन २०२२ च्या परिपत्रकामध्ये बाटलीबंद पिण्याचे पाणी, शितपेये, स्पिरीट, अल्कोहोल, इथेनॉल, ब्रुअरिज, आसवानींना (डिस्टलरीज) व तत्सम उद्योगांचा पाण्याचा कच्चा माल म्हणून वापर होणाऱ्या उद्योगात समावेश केलेला असणे, त्यामुळे डिस्टलरी करिता प्रति हजार लिटरमागे ११.५२ रु. वरुन ३३० रु. दरवाढ झालेली असणे, सदरची दरवाढ डिस्टलरी उद्योगास परवडणारी नसल्याने त्याचा डिस्टलरी उद्योगावर विपरित परिणाम होऊन उत्पादन निर्मितीला फटका बसणे, त्यामुळे डिस्टलरी उद्योगात पाणीवापर हा थेट कच्च्या मालासाठी होत नसून तो प्रक्रियेसाठी होत असल्याने म्हणजेच औद्योगिक कारणासाठी होत असल्याने डिस्टलरी युनिटसाठी औद्योगिक पाणीवापर दरानुसार पाणीपट्टी आकारण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **७७.** | **७६२** | **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स.**<br>" नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १६६ या मार्गावरील रत्नागिरी-कोल्हापूर विभागातील रस्त्याचे विस्तारीकरण, चौपदरीकरण या कामासाठी भूसंपादनाचे काम विशेष भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर यांच्यामार्फत सुरू असून कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले, करवीर, पन्हाळा व शाहूवाडी या चार तालुक्यातील ४९ गावातील शेतकऱ्यांचे भूसंपादन होत आहे, यामध्ये काही गावे कोल्हापूर नागरी क्षेत्र प्राधिकरण मध्ये समाविष्ट असून सदर गावांची अंतिम निवड करीत असताना ही गावे नागरी क्षेत्र प्राधिकरणामध्ये समाविष्ट असल्याने येथील जमिनीचे भाव शहरी रेडीरेकनर प्रमाणे देणे आवश्यक असताना ग्रामीण रेडीरेकनरप्रमाणे दर दिले जात असल्याने त्या ठिकाणच्या शेतकऱ्यांमध्ये व प्रकल्प बाधितांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने चौकशी करून सदर प्राधिकरणाअंतर्गत गावातील भूसंपादन करण्यात येणाऱ्या प्रकल्पबाधितांना शहरातील रेडीरेकनरच्या चौपट दराने किंवा प्रस्तावित हायवे समुख क्षेत्रातील अधिकृत बिनशेती झालेल्या जमिनीच्या चौपट दराने जमिनीचे मूल्यांकन करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |
| **७८.** | **३२३** | **ॲड.अनिल परब, वि.प.स.**<br>" अंधेरी पूर्व, मरोळ, सहार आंतरराष्ट्रीय हवाई अड्डा रोड, येथील व्यावसायिक विकास न.भू.क्र. १४२५ (पैकी) १४२६, १५९० (पैकी), १५४८, १५८८, १४६६, १४७७, १४५९, १४६२, १४७८, १४८२, १४९२, १४४९, १४८१ १४९४, १४९३, १४५५, १४६०, १४८०, | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |

१४६५, १४७४, १४५८, १४३२, १५५२, १५४९, १४७५, १४५४, १४५१, १४६१, १४२९, १४३१, १४७६, १५५०, १४२८, १४६३, १४५६, १४५३, १४३०, १४५२, १४६४ वरिल भूखंडावर मे.मार्स हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणात घोटाळा झाल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०२२ मध्ये उघडकीस येणे, सदरहू भूखंड हा मुंबईच्या विकास नकाशामध्ये सन १९९२ च्या पूर्वीपासून मनोरंजन मैदानाकरिता आरक्षित असणे, आरक्षणामध्ये उक्त भूखंड हा ५० टक्के मनोरंजन, ५० टक्के हॉटेलकरिता राखीव असतांना मे.मार्सस हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांनी जमीन कमाल नागरी कायद्यांतर्गत शासनाच्या अखत्यारितील भूखंडाला ना हरकत प्रमाणपत्र करिता केलेला अर्ज, त्याकरिता प्रिमियम शुल्क शासनाला भरल्यानंतर सदर हॉटेलचे बांधकाम सुरू करण्याची घातलेली बंधनकारक अट, परंतु मे.मार्सस हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी शासनाचा प्रिमियम न भरता शासनाची अधिकृत परवानगी न घेता हॉटेलचे पूर्ण केलेले बांधकाम व महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करून घेणे, मे.मार्सस हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. यांच्या भूखंडामधून ३.५ मीटरचा मोठा नाला असतांना मे.मार्सस हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी महानगरपालिकेचे अधिकारी, युएलसीचे अधिकारी यांच्या संगनमताने गेल्या २२ वर्षापासून शासनाचे प्रिमियम पोटी भरावयाचे शुल्क बुडविले असणे, शासनाचे एकूण रुपये १, २५, ५४, ९५, ०२१/- प्रिमियम शुल्क भरले नसल्याचे उघड होणे, जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भातील आपला अहवाल शासनास सादर केल्यानंतर त्या आधारावर कायदा व सुव्यवस्था विभागांनी देखील आपला अहवाल शासनास सादर करणे, तदनंतर शहर विकास विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्रीमहोदयांची मान्यता घेऊन जमीन कमाल नागरी धारणा (युएलसी) प्रिमियमची एकूण रुपये १, २५, ५४, ९५, ०२१/- माफ केलेली असणे, मे.मार्सस हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांला युएलसी ची अट व शर्ती लागू होत्या

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | त्याच अटी व शर्ती शेजारी असलेल्या भूखंडावरील हॉटेलवर असणे, आणि त्यांनी त्या अटीची पुर्तता केलेली असणे, शेजारच्या भूखंडामधून सुद्धा नाला जात होता पण त्यांनी महानगरपालिकेकडे रितसर परवानगी मागून ६.० मीटर रुंदीचा मार्ग सोडण्याची परवानगी घेणे, सदर भूखंड एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडियाच्या जागेमधून जात असून वापरण्याकरिता करारनामा सादर केलेला नसणे, मे.मार्सस हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. च्या मालकांनी शासनाची व महानगरपालिकेची फसवणूक केलेली असणे, शासनाच्या नियमाचे उल्लंघन करून केलेल्या बांधकामाची शासनाने सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत स्थानिक नागरिकांच्या आलेल्या अनेक तक्रारी, शासनाने बैठक घेण्याचे आश्वासित करून देखील सदर विषयाबाबत बैठक न होणे, याबाबत शासनाने सखोल चौकशी करून यास जबाबदार असणाऱ्या मे.मार्सस हॉटेल आणि रिसॉर्ट प्रा.लि. चे मालक, महापालिकेचे अधिकारी, तसेच शासनाचे अधिकारी यांच्याकडे कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| **७९.** | **६४५** | **श्री. विक्रम काळे, वि.प.स.**<br>" राज्यामध्ये माहे डिसेंबर, २००१ पासून राज्य सरकारकडे वरिष्ठ महाविद्यालयाला परवानगी देण्यासाठी कायम विना अनुदान धोरण स्विकारण्यात येणे, त्या निर्णयापासून आजपर्यंत राज्यभरामध्ये उच्च व तंत्र शिक्षण मंत्रालयाच्यावतीने हजारो महाविद्यालयांना कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात येणे, या महाविद्यालयातून हजारो विद्यार्थी-विद्यार्थीनी पदवी व पदव्युत्तर असे उच्च शिक्षण घेत असणे, यातील अनेक महाविद्यालये ही ग्रामीण भागात | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |

असणे, यामध्ये ग्रामीण भागातील गोरगरीब कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे हजारो विद्यार्थी-विद्यार्थीनी शिकत असणे, यामुळे ग्रामीण भागातील मुली उच्च शिक्षण घेण्यासाठी पुढे येत असणे, या महाविद्यालयांमधून हजारो शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी कार्यरत असणे, त्या-त्या विद्यापीठाकडून दरवर्षी या महाविद्यालयांची वार्षिक तपासणी करण्यांत येणे, तपासणी अंती पात्र ठरणाऱ्या महाविद्यालयाला त्या-त्या वर्षी विद्यापीठाने संलग्नीकरण देणे, ही सर्व महाविद्यालये कायम विनाअनुदान तत्वावर असल्यामुळे या महाविद्यालयातील शिक्षक-कर्मचाऱ्यांना तुटपूंज्या मानधनावर काम करावे लागणे, यामुळे शिक्षक-कर्मचाऱ्यांना वारंवार आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागणे, यामधील अनेक शिक्षक-कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ येणे, शासन अनुदान नसल्यामुळे अनेक महाविद्यालयांना भौतिक सुविधा पुरविण्यात अडचणी निर्माण होणे, त्यामुळे माहे डिसेंबर, २००१ पुर्वी कायम विनाअनुदान धोरण नसतांना शासनाने मान्यता दिलेल्या महाविद्यालयांना तसेच माहे डिसेंबर, २००१ नंतर कायम विनाअनुदान तत्वावर दिलेल्या महाविद्यालयांचा "कायम" शब्द काढून त्यांना अनुदान देण्याचा शासनाने निर्णय घ्यावा, या मागणीसाठी गेल्या अनेक दिवसांपासून आझाद मैदानावर राज्यातील हजारो शिक्षक कर्मचारी धरणे आंदोलन करीत असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८०. | ७०१ | **श्री. कपिल पाटील, वि.प.स.**<br>" प्राथमिक, माध्यमिक शाळा आणि उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना वैद्यकीय प्रतिपूर्तीची योजना सुरू असणे, तथापि, आपात काळात वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक तजवीज नसणे, प्रतिपूर्ती होत असली तरी महागड्या उपचारांमुळे पूर्णतः प्रतिपूर्ती न होणे, वैद्यकीय उपचारांसाठी कर्ज उचलावे लागणे, पोलीस कर्मचारी, सेल्स टॅक्स, न्यायालयीन कर्मचारी आणि अन्य काही खात्यांमध्ये कॅशलेस आरोग्य सुविधा उपलब्ध असणे, त्या | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |

**विवरण क्रमांक २१—**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | धर्तीवर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी सावित्री-फातिमा कॅशेलस कुटुंब आरोग्य योजना राबविण्याची आवश्यकता असणे, या आणि अन्य मागण्यांबाबत शिक्षक भरतीने सातत्याने पाठपुरावा करणे, शासनाने तत्वतः मान्यता देऊनही याबाबत अंमलबजावणी न होणे, शालेय शिक्षण विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना अन्य राज्यांप्रमाणे सरकारी व निमसरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे किरकोळ रजा १२ ऐवजी १५ दिवसाची करण्याची आवश्यकता असणे, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन आणि महाराष्ट्र दिन हे तीन दिवस सार्वजनिक सुट्टीचे असले तरी ते दिवस राष्ट्रीय कर्तव्य म्हणून शिक्षकांसाठी अनाध्ययन दिवस म्हणून हजेरीचे असतात, ही बाब लक्षात घेण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **८१.** | **७४९** | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>" अकोला जिल्ह्यातील श्रीराम मराठी प्राथमिक व माध्यमिक शाळा, खेतान नगर, कौलखेड, अकोला या शाळेतील एका आदिवासी महिला शिक्षिकेला शाळेचे संस्थाचालक/अध्यक्ष, मुख्याध्यापक यांच्याकडून नाहक त्रास देऊन मानसिक छळ करण्यात येणे, सदर आदिवासी शिक्षिकेची सन २०२३ मध्ये नियुक्ती करण्यात आलेली असून गेल्या १८ वर्षापासून त्यांच्याविरुद्ध कोणतीही तक्रार नसतांना तसेच त्यांना कोणतीही कार्यवाही संदर्भात नोटीस देण्यात आलेली नसणे, सदर आदिवासी शिक्षिकेने उक्त शैक्षणिक संस्थेच्या व शाळेच्या कांही नियमाबाह्य | २५ मार्च २०२३ | चर्चा झाली नाही. |

कृत्यांना नियमानुसार विरोध केल्यामुळे सूडबुद्धीने शाळेचे अध्यक्ष, प्राथमिक व माध्यमिकचे मुख्याध्यापक यांच्याकडून अन्याय करण्यात येणे, त्यांना शाळेच्या हजेरी पत्रकावर स्वाक्षरी करण्यास मनाई करण्यात येणे, त्यानंतर शाळेत गैरहजर दाखवण्यात येऊन गेल्या ९ महिन्यांचा पगार परत करण्याची मागणी करण्यात येणे, त्याच प्रमाणे त्यांना शाळेत येवू न देणे, शाळेच्या कार्यालयात येऊ न देणे, त्या शाळेत प्रवेश करत असतांना शाळेच्या गेटवर कुलूप लावण्यात येणे, तसेच त्यांना अपमानास्पद वागणूक देऊन त्यांना बहिष्कृत करण्यात येणे, यासर्व प्रकारामुळे सदर आदिवासी शिक्षिकेला मानसिक त्रास सहन करावा लागत असणे, त्यामुळे सदर आदिवासी शिक्षीकेने शाळेचे अध्यक्ष, मुख्याध्यापक यांच्या विरोधात खदान पोलीस स्टेशन, अकोला येथे ९९५/२०२१ नुसार ॲट्रॉसिटी ॲक्टचा गुन्हा दाखल करण्यात येणे, तसेच जिल्हा शिक्षणाधिकारी यांच्याकडेही तक्रार करण्यात येणे, तथापि या आदिवासी शिक्षिकेला न्याय न मिळणे, उलट सदर शिक्षिकेच्या विरोधात चौकशी समिती नेमण्यात येणे, तद्नंतर दिनांक ११/०८/२०२२ रोजी विना सही-शिक्क्याचा एका साध्या पानावर सेवासमाप्तीचे आदेश देण्यात येणे व पगार बंद करण्यात येणे, त्याच प्रमाणे त्यांच्या विरुद्ध गुन्हा नोंदवण्यामुळे या आदिवासी महिलेला रस्त्यावर अडवून धमक्या देण्यात येणे, परिणामी सदर आदिवासी महिलेमध्ये वाढती असुरक्षितता, शासनाने या सर्व प्रकरणी तातडीने चौकशी करून आदिवासी महिलेला मानसिक त्रास देणाऱ्या उक्त शाळेचे अध्यक्ष, मुख्याध्यापक यांच्यावर कठोर कारवाई करण्याची तसेच आदिवासी शिक्षिकेवर बेकायदा करण्यात आलेली सेवासमाप्तीची कार्यवाही मागे घेऊन पुन्हा सेवेत रुजू करून घेण्याची आवश्यकता, शासनाने यासंदर्भात केलेली कार्यवाही वा याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८२. | २३३ | **श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे वि.प.स.**<br>“महिनाभर काबाड कष्ट करूनही वेतन मिळत नसल्याने एसटी कर्मचाऱ्यांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागत असून आर्थिक विवंचनेतून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सांगली विभागातील कवठेमहाकाळ येथील चालक भीमराव सूर्यवंशी यांनी राहत्या घरी आत्महत्या केल्याची घटना दि. ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी घडली असणे, या आत्महत्येला प्रशासनातील अधिकारी जबाबदार असून, त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी एसटी कर्मचारी काँग्रेसच्या सरचिटणीस यांनी केली असणे, एसटी कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आगामी चार वर्षे अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली जाईल व महिन्याला लागणारी पूर्ण रक्कम देण्याचे सरकारच्या वतीने न्यायालयात संप काळात मान्य करण्यात आले असणे, तसेच १९ जानेवारी, २०२३ रोजी एसटी महामंडळाने मागील सहा महिन्यांच्या वेतनातील थकीत रकमेसह या महिन्याच्या वेतनासाठी १०१८. ५० कोटी रुपयांची मागणी राज्य सरकारकडे केली असणे, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे वेतन, इंधन आणि अन्य असा एसटीचा दरमहा एकूण सुमारे साडेआठशे कोटींचा खर्च असणे, यापैकी सवलतीसह प्रवासी तिकिटांतून ६०० कोटींपर्यंत उत्पन्न मिळणे, उर्वरित १५० कोटींचा तुटवडा असून, तो भरून काढण्यासाठी राज्य सरकारकडून आर्थिक मदत घेण्यात येणे, मागील सहा महिन्यांच्या थकीत वेतनासह यंदाच्या वेतनासाठी एकूण एक हजार कोटींची मदत महामंडळाने सरकारकडे मागितली असणे, परंतु अजूनही शासनाने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिलेला नसणे, परिणामी, एस.टी. कर्मचाऱ्यांत शासनाप्रती पसरलेली तीव्र असंतोषाची आणि नाराजीची | कित्ता | |

भावना, यास्तव एसटी कर्मचाऱ्याच्या आत्महत्या प्रकरणी सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासह भविष्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी त्यांचे थकीत वेतन तातडीने अदा करण्याबाबत शासनाने तातडीने करावयची कार्यवाही, उपाययोजन आणि शासनाची प्रतिक्रिया."

८३. २८३ **श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स.** कित्ता

"तत्कालीन सरकारच्या काळात २९ ऑक्टोबर २०२१ पासून सुरू झालेला एसटी कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप जवळपास सहा महिने चालणे, कर्मचाऱ्यांनी मुंबईतील आझाद मैदानावर पुकारलेल्या संपामध्ये एसटी कर्मचाऱ्यांच्या एकूण १८ मागण्यांपैकी १६ मागण्या मान्य करण्यावर गेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२२ मध्ये चर्चा करण्यात आलेली असणे, परंतु या १६ मागण्यांपैकी अनेक मागण्यांची अद्यापही अंमलबजावणी झालेली नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, या मागण्यांची अंमलबजावणी तातडीने करावी यासाठी सेवा संघर्ष समिती एसटी कर्मचारी संघाने २० डिसेंबर २०२२ पासून नागपूर येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा सरकारला दिलेला होता परंतु सरकार ने दिलेल्या आश्वासनानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले तरीदेखील अद्याप या मागण्याची अंमलबजावणी झालेली नसणे, सदरहू मागाण्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

८४. ३४८ **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** कित्ता

"राज्य शासनाच्या अखत्यारित असलेल्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एस.टी) कर्मचाऱ्यांना पगार मिळण्यासाठी शासनाकडे रुपये १ हजार १८ कोटीची मागणी महामंडळाने केलेली असणे, सदर निधी उपलब्ध करून देण्यासाठी एसटी महामंडळाला आपला जमा-खर्चाचा तपशील सादर करण्यास शासनाने सांगितल्याप्रमाणे महामंडळाने सन २०२२ च्या एप्रिल ते

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | डिसेंबर, २०२२ पर्यंतच्या नऊ महिन्यांच्या कालावधीत रुपये ५, १७२ कोटींचे उत्पन्न झाले असून रुपये १, १४५ कोटी शासनाच्या दिल्या जाणाऱ्या सवलतीसाठी वजा करून रुपये ४, ०२७ कोटी महामंडळाकडे शिल्लक राहिलेल्या रकमेत ही नऊ महिन्याच्या कर्मचाऱ्यांचा पगारासह इतर बाबींवर रुपये ७,२५२ कोटी खर्च झाल्याने महामंडळाला रुपये ३,२२८ कोटींचा तोटा सहन करावा लागला असल्याचा अहवाल अर्थ विभागाला सादर करण्यात आलेला असणे, शासनाकडून एसटी महामंडळाने केलेल्या मागणीनुसार निधी वितरीत न करता रुपये २२३ कोटी रुपये शासनाकडून उपलब्ध करून देण्यात आल्याने शासनाप्रती एसटी कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, मा.उच्च न्यायालयाने एसटी कर्मचाऱ्यांना शासनाच्या निश्चित तारखेप्रमाणे वेतन देण्याचे आदेश दिला असतानाही शासनाकडून त्याची अंमलबजावणी करण्यात येत नसणे, याबाबत शासनाने एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत तसेच त्यांच्या मागणीप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **८५.** | **६९६** | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>"परिवहन विभागातील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी तसेच सहायक मोटार वाहन निरीक्षक पदावरील अधिकारी पदोन्नतीस पात्र असूनसुद्धा त्यांच्या पदोन्नत्या मागील २-३ वर्षामध्ये होऊ न शकणे, परिवहन विभागातील २७ सहायक मोटार वाहन निरीक्षक या पदावर कार्यरत असणाऱ्या अधिका-यांची मोटार वाहन निरीक्षक या पदावर पदोन्नतीने पदस्थापना करण्याबाबतची डीपीसी बैठक यापूर्वी अमुस परिवहन | कित्ता | |

यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३०.८.२०२२ रोजी पूर्वी झालेली असणे, तथापि, त्यानंतर कोणताही निर्णय न होणे, विभागाच्या आकृतीबंधामध्ये बरीच पदे रिक्त असल्याचे दिसून येणे, राज्यस्तरावर परिवहन विभागाची नवीन ९ कार्यालये कार्यान्वित करण्यात आली असून सदर ठिकाणी मोठ्याप्रमाणावर अधिकारी कर्मचारी यांची पदे रिक्त असणे, परिवहन विभागातील अधिका-यांना पदोन्नती न दिल्यामुळे पदे रिक्त राहून विभागातील कामकाजावर विपरित परिणाम होत असल्याचे निदर्शनास येणे, परिवहन विभागातील अधिकारी पदोन्नतीस पात्र असून नियमानुसार त्यांना पदोन्नती देणे आवश्यक असणे, याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनास पत्रव्यवहार करूनसुद्धा शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे शासनाप्रती निर्माण झालेला असंतोष व त्यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

८६. **श्री. विक्रम काळे, श्री. शशिकांत शिंदे, श्री. अमोल मिटकरी, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. सचिन अहिर वि.प.स. यांच्या लक्षवेधी सूचना क्र.५५ वरील निवेदन मुख्यमंत्री सभागृहासमोर ठेवतील :-** कित्ता

“ मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत जून ते ऑक्टोबर, २०२२ दरम्यान नैसर्गिक आपत्तीने शेती पिकांचे मोठे नुकसान होऊन शेतकरी अडचणीत येणे, अतिवृष्टी, सततचा पाऊस, गोगलगायीच आक्रमण आदिं नैसर्गिक आपत्तीमुळे मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील ४८ लाख ४५ हजार ७३९ शेतकऱ्यांच्या जिरायत, बागयत व फळ पिकांचे मिळून ३२ लाख २३ हजार १७२ हेक्टरवर नुकसान झालेले असणे, या नुकसानापोटी शासनाकडून ४४८० कोटी ८७ लाख रुपयांच्या मदत निधीची मागणी करण्यात येणे, त्यानुसार शासनाने सुरुवातीला १००८ कोटी ३० लाख ८१ हजार त्यानंतर ५९७ कोटी ५४ लाख, त्यानंतर ९८ कोटी ५८ लाख व ५९ कोटी ८७ लाख रुपयांचा निधी शासनाकडून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वितरणासाठी उपलब्ध करून देण्यांत येणे, परंतु अजूनही सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२२ मध्ये

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या मदतीपोटी आवश्यक १२१४ कोटी ७२ लाख ५७ हजार रुपये तसेच सप्टेंबर-ऑक्टोबर, २०२३ मध्येच सततच्या पावसामुळे झालेल्या शेती पिकाच्या मदती पोटी देणे आवश्यक असलेला १५०१ कोटी ८४ लाख रुपयांचा निधी असे मिळून २७१८ कोटी रुपये अजूनही शासनाकडून वितरणासाठी उपलब्ध झालेले नसणे, त्यामुळे तीन ते चार महिने उलटूनही शासनाची जाहीर मदत न मिळाल्याने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेत भर पडणे, तरी शेती पिकांचे झालेले नुकसान व शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व पीक उत्पादनाचा वाढत असलेला खर्च पाहतां शेतकऱ्यांवर उपासमारीची पाळी आलेली असणे, परिणामी, शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिंतेची भावना, शासनाने त्याबाबत शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **८७.** | **४९३** | **श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.**<br>"बुलेट ट्रेनसाठी जमीन अधिग्रहित करताना पालघर जिल्ह्यातील शिगाव पाटीलवाडा येथील मौजे सात मधील तब्बल ५४ कुटुंबाची नावे विवरणपत्रात नमूद न करता त्यांना जमिनीच्या मोबदल्यापासून वंचित ठेवण्यात आले असल्याची गंभीर बाब दि. २० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास उघडकीस येणे, बुलेट ट्रेनसाठी जागा ताब्यात घेतना शिगाव-पाटीलवाडा येथील मौजे सातमध्ये राहणाऱ्या ७० कुटुंबांपैकी १६ कुटुंबांची नावे विवरणपत्रात आली असणे, उर्वरित ५४ कुटुंबांची नावे मात्र वगळण्यात येणे, सन २०१३-१४ पासून पाटीलवाड्यामध्ये ही ७० कुटुंबे वास्तव्यास असणे, त्यांच्याकडे घरपट्टी, आधारकार्ड, पाणीपट्टी | कित्ता | |

इत्यादी सर्व कायदेशीर पुरावे असणे, सदरहू जमिनही त्यांच्या नावे असणे, मोलमजुरी करून मिळालेल्या पैशात त्यांनी या जागेची खरेदी केली असणे, सन २०१९ मध्ये बुलेट ट्रेनचे अधिकारी मोजण्यासाठी आले असताना त्यावेळी केवळ १६ कुटुंबे घरी उपस्थित असणे आणि उर्वरित ५४ कुटुंबे मोलमजुरीसाठी बाहेर गेली असणे, त्यामुळे केवळ १६ कुटुंबाची नावे विवरणपत्रात आली असणे, याबाबत सातत्याने शासनाशी पत्रव्यवहार करूनही या कुटुंबांना अद्यापही न्याय मिळालेला नसणे, त्यामुळे सदरहू कुटुंबियांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव बुलेट ट्रेनसाठी जमीन अधिग्रहित करताना पालघर जिल्ह्यातील शिगाव पाटीलवाडा येथील मौजे सातमधील तब्बल ५४ कुटुंबांना संपादित जमिनीचा मोबदला मिळवून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

८८. ६३० **श्रीमती उमा खापरे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. राजेश राठोड वि.प.स.** कित्ता

"राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, खानदेश, विदर्भ या भागात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पिकासह द्राक्ष, संत्रा, चिकू, केळी, आंबे या फळ पिकांच्या बागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणे, चिंचणी ता. तासगाव, जि. सांगली येथील द्राक्ष बागांच्या मांडवांचे मोठ्याप्रमाणात नुकसान होऊन अख्खी द्राक्ष बागच भुईसपाट झालेली असणे, वाशिम भागातील संत्री बागांचेही मोठ्याप्रमाणात नुकसान होणे, गहू, मका, खपली, हरभरा, सोयाबिन, ज्वारी, धान आलेले नुकसान होत असतानाच, कांदे आणि टोमेटोला हमी भाव नसल्याने शतक-यांनी या पिकात जनावरे सोडत उपसून टाकण्याचा निर्णय घेणे, अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचे आदेश मा. मुख्यमंत्री महोदय, आणि कृषी मंत्र्यांनी दिले असणे, सदर पंचनामे तातडीने करून येत्या आठवड्यात या सर्व नुकसानीची भरपाई देण्याची शेतकऱ्यांची मागणी असणे, राज्यात अचानक झालेल्या हवामान

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | बदलामुळे शेतकरी आणि सामान्य जनता त्रस्त असणे, त्यासाठी शासनाने तातडीने मदत मंजूर करून शेतकऱ्यांना न्याय देण्याची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **८९.** | **२२६** | **श्री. सचिन अहिर, श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.**<br>"दिनांक १४ जानेवारी २०२३ रोजी अंबरनाथ येथून शिर्डीला देवदशर्नासाठी जाणाऱ्या भक्तांची खाजगी बस व ट्रक समोरासमोर धडक, झाल्याने बसमधील दहाजणांचा झालेला मृत्यू तर २४ प्रवासी गंभीर जखमी होणे, अपघात घडलेल्या सिन्नर ते शिर्डी राष्ट्रीय महामार्गावर क्रमांक १६० च्या चौपदरी रस्त्याचे कामसुरू असणे, अपघातग्रस्त जागेवर रस्ते सुरक्षेविषयी कोणतीच यंत्रणा उपाययोजना नसणे, खराब रस्त्यावर अंदाज न आल्याने अपघात घडला असण्याची शक्यता वर्तविणे, गाडी चालकांच्या बेदरकारपणामुळे वारंवार होत असलेला जीवघेणे अपघात त्यामुळे जनमाणसात पसरलेले भीतीचे वातावरण याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | कित्ता | |
| **९०.** | **३८७** | **श्री. अभिजित वंजारी, श्री. राजेश राठोड, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील वि.प.स.**<br>" मराठवाडा व विदर्भातील मृद व जलसंधारणाच्या सुमारे २७५ कोटीच्या कामांचे एकत्रीकरण करण्याचा घाट जलसंधारण महामंडळाने घातला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, महाराष्ट जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सुनील कुशिरे यांचे नांव लाचखोरीच्या प्रकरणात समोर आल्याने जलसंधारण | कित्ता | |

विभागातील सुमारे २७६ कोटीची कामे संशयाच्या भोवऱ्यात सापडले असणे, मराठवाड्यातील १०० कोटींहून अधिकची कामे एकत्रितपणे निविदेत आणण्यात आल्याचे बोलेले जात असणे, औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर, सिल्लोड, औरंगाबाद तालुक्यातील द्वारयुक्त सिमेंट साठवण बंधाऱ्यांच्या कामांचा मोठ्याप्रमाणात समोवश असणे, फायनान्शियल क्लॉजप्रमाणे सर्व कामे क्लब करून निविदा काढता येत नसणे परंतु नियमांना फाटा देत दोन्ही प्रशासकीय विभागांची निविदा प्रक्रिया एकत्रितपणे राबविण्यामागे टक्केवारीचा खेळ असल्याची चर्चा असणे या सर्व बाबींमुळे निविदांबाबत संशय निर्माण झाला असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये या सर्व प्रकरणामुळे निर्माण झालेली चिडीची भावना लक्षात घेता शासनाने त्वरीत चौकशी करून करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

९१. ३० **श्री. विक्रम काळे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.** कित्ता

“महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मुंबईतील दादर येथे इंदू मिल परिसरात आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय शासनाने सन २०१२ मध्ये घेतला असून सदर स्मारकांचे काम अद्यापही अपूर्ण नसल्याचे जानेवारी, २०२३ वा त्यासूमारास निदर्शनास येणे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या संपूर्ण प्रकल्पासाठी सन २०१२ मध्ये ४२५ कोटी रुपयांचा अपेक्षित असणारा खर्च आता साधारण दिड हजार कोटी रुपयांवर पोहोचला असल्याचा अंदाज आहे, स्मारकाचे काम अपूर्ण राहिल्यामुळे दिवसेंदिवस या खर्चात वाढ होण्याची शक्यता नाकारता न येणे, परिणामी अपूर्ण असलेले स्मारकाचे काम सद्यःस्थितीत किती टक्के व कोणत्या स्तरापर्यंत पूर्ण झाले आहे तसेच उर्वरित काम केव्हापर्यंत पूर्ण होईल याबाबत अद्याप संभ्रमावस्था असणे, परिणामी, राज्यातील जनतेमध्ये व आंबेडकरी अनुयायांमध्ये निर्माण झालेली नाराजीची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९२. | २२० | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.**<br>"राज्यात जातीवरुन होणारा अन्याय, अत्याचार थांबविण्यासाठी ॲट्रोसिटी हा विशेष कायदा, १९८९ मध्ये अस्तित्वात येऊन त्यामध्ये १९९५ व २०१६ मध्ये सुधारित नियम लागू करण्यात येणे, या कायदयाच्या नियम-१६ नुसार मा. मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय उच्चाधिकार, दक्षता व नियंत्रण समिती गठीत करणे बंधनकारक असताना मागील तीन वर्षापासून सदर समिती गठीत करण्यात न येणे, त्यामुळे अट्रोसिटी ॲक्टच्या उद्देशाचे उल्लंगन होत असणे, अट्रोसिटी ॲक्टची अंमलबजावणी परिणामकारक न होणे, या ॲक्टमुळे हत्या, खुन झालेल्या पिडीत कुटूंबांना नोकरी न मिळणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, शासनाने याबाबत तातडीने निर्णय घेऊन अट्रोसिटी ॲक्टच्या नियम-१६ अन्वये राज्यस्तरीय उच्चाधिकार दक्षता व नियंत्रण समिती त्वरीत गठीत करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचीप्रतिक्रिया." | कित्ता | |
| ९३. | ३२६ | **श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील वि.प.स.**<br>"राज्यातील निराधार, अपंग आदींच्या पुनर्वसनासाठी शासनाने संजय गांधी निराधार यासारख्या अनेक योजना अंमलात आणणे परंतु त्यांतील उत्पन्नाची मर्यादा, दरवर्षी उत्पन्नाचा दाखला देणे यासारख्या जाचक अटींमुळे अनेक लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ घेता येत नसणे, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन आर्थिक उत्पन्नाची मर्यादा ५० हजारांपर्यंत वाढविणे, दरवर्षी उत्पन्नाच्या दाखल्याची अट काढून टाकणे, याशिवाय लाभार्थ्यांची मुले २४ वर्षांची होईपर्यंत किंवा त्यांना नोकरी मिळेपर्यंत लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा, लाभार्थ्यांच्या मुलाला | कित्ता | |

नोकरी मिळाल्यानंतर मुलाचे व कुटूंबाचे उत्पन्न विचारात घेऊन लाभार्थ्यांची पात्रता ठरविणे, तसेच या योजेनांचे अर्ज स्थानिक पातळीवरच म्हणजे तलाठयांनी स्वीकारणे इ. मागण्या लाभार्थींच्या असणे, परंतु या मागण्यांवर निर्णय घेण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंब व दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

९४. ५३० **श्री. राजेश राठोड,** श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. सुधाकर अडबाले, श्री. जयंत आसगावकर **वि.प.स.** कित्ता

“राज्यात अनुसूचित जातीच्या प्रवर्गात ५९ जाती असून या प्रवर्गासाठी असलेल्या नोकरी आणि शिक्षणातील प्रचलित आरक्षणाचा लाभ प्रामुख्याने १ - २ जातींना मिळणे, मातंग जातीसह इतर ५७ जाती आरक्षणाच्या लाभापासून वंचित असणे, त्यामुळे विषमता निर्माण होणे, त्यामुळे अनुसूचित जातीच्या प्रवर्गातील सर्व जातींना आरक्षणाचा समान लाभ मिळण्यासाठी अनुसूचित जातीच्या १३ % आरक्षणात अ, ब, क, ड वर्गीकरण करण्याची आवश्यकता निर्माण होणे, याशिवाय अनुसूचित जातीच्या पदव्युत्तर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर उंचवावा यासाठी स्थापन केलेल्या बार्टी वर काही विशिष्ट जातींचे प्राबल्य असून मातंग व इतर अनुसूचित जातींना बार्टीच्या योजनांचा कोणताही लाभ मिळत नसणे, त्यामुळे बार्टी च्या धर्तीवर साहित्य रत्न डॉ. अण्णाभाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था (आर्टी) स्थापन करण्याची होत असलेली मागणी, मात्र त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील तमाम अनुसूचित जातीत पसरलेले असंतोषाचे वातावारण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबबात करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९५. | ७४१ | **श्री. राजेश राठोड,** डॉ. प्रज्ञा सातव, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. अभिजित वंजारी **वि.प.स.**<br>“देशातील कोटयावधी बंजारा समाजबांधवाची काशी समजल्या जाणाऱ्या पोहरादेवी गड (ता. मानोरा, जि. वाशिम) येथे १२/२/२०२३ रोजी “सेवाध्वज” हा कार्यक्रम पार पडणे, या कार्यक्रमात राज्यातील बंजारा समाजाने आपल्या प्रलंबित २२ मागण्या शासनाकडे मांडणे, त्यात प्रामुख्याने नॉन-क्रिमीलर, पदोन्नतीमधील आरक्षण, वनार्टी (वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था), वसंतराव नाईक महामंडळातून कर्ज वितरण, कर्नाटकच्या धर्तीवर तांडा डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, संविधान सुची ८ नुसार गारबोली भाषेला राज भाषेचा दर्जा देण्यात याव्यात, इत्यादी मागण्या करण्यात येणे, यावेळी शासनाकडून या मागण्यांवर आश्वासने देण्यात येणे, तसेच पोहरादेवी गडाचा तीर्थक्षेत्र धर्तीवर विकास करण्याचे आश्वासन देणे, नवी मुंबई येथे बंजारा भवन उभारण्याचे आश्वासन देणे, राज्य बंजारा प्राधिकरण स्थापन करणे, वसंतराव नाईक तांडा सुधार योजनेतून प्रत्येक तांड्यावर पाणी, रस्ते आदी मुलभूत सुविधांसह अंगणवाडी, शाळा, दवाखाने उपलब्ध करून देण्याचे आश्वासन देणे, परंतु या आश्वासनांच्या पूर्ततेबाबत अद्याप शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील बंजारा समाजात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया.” | कित्ता | |

९६. **अॅड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. रमेशदादा पाटील, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे **वि.प.स.** यांच्या **लक्षवेधी सूचना क्र.३०९** वरील निवेदन **मुख्यमंत्री** सभागृहासमोर ठेवतील:- कित्ता

"राज्यातील नवीमुंबई येथील कृषि उत्पन्न बाजार समिती ही आशिया खंडातील सर्वात मोठी बाजार पेठ असून या बाजार पेठेत कोट्यावधी रूपयांची उलाढाल होत असणे, मात्र १९८२ साली बांधलेल्या नवीमुंबईतील कांदा-बटाटा मार्केट, फळे व भाजीपाला मार्केट, मसाला मार्केट आणि दाणाबंदर मार्केट ह्या पाचही बाजार पेठा निकृष्ट दर्जाच्या बांधकामामुळे धोकादायक घोषित केल्या असून बाजार पेठांच्या पुनर्बांधणीसाठी व्यापाऱ्यांसह बाजार समितीच्या संचालक मंडळाने वाढीव एफएसआय ची मागणी केली असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ च्या प्रथम सप्ताहात उघडकीस येणे, मात्र भ्रष्टाचारी संचालक मंडळाच्या ठरलेल्या स्क्रिप्टनुसार बाजार समितीकडे पुनर्बांधणीकरिता पुरेसा निधी उपलब्ध नसल्याने द्वबांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर पुर्नविकास करून त्याकरीता सल्लागार नेमण्यात आलेला असून त्यांच्यामार्फत बाजारपेठांचा आराखडा तयार करण्यात येणार असणे, सदर पुनर्बांधंणीमध्येही भ्रष्टाचार होण्याची दाट शक्यता असल्याने राज्य शासनाने सदर पाचही बाजारपेठांच्या पारदर्शित पुनर्बांधणीसाठी एक स्वतंत्र समिती गठीत करणे किंवा प्रशासक नेमण्याची आवश्यकता असणे, तसेच यापूर्वीही सर्व बाजारपेठांमध्ये फार मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून अद्यापही तेथे मुलभूत सुविधांची वानवा असणे, उदा. रस्त्यांची देखभाल, पाण्याचा निचरा, घनकचरा व्यवस्थापन तसेच इमारतींची डागडुजी व शौचालय अशा अनेक बाबींवर दरवर्षी खर्च केला जातो मात्र सदर खर्च फक्त कागदावरच दिसत असणे, काही बाजार समिती कर्मचारी कर्तव्य आणि जबाबदारीची कामे सोडून आज दलाल म्हणून वावरताना दिसत

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | असणे, त्यातील काही महाशयांनी बाजार आवाराच्या आजुबाजूला गोदामे घेतली असून त्यामध्ये विविध मालाची साठवणूक करून ठेवणे व कालांतराने तोच माल ज्यादा दराने विकुन काळाबाजार केला जात असणे, ह्यात काही बाजार समिती संचालकांचाही समावेश असणे, तसेच नवीमुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती ही भ्रष्टाचाराचा मोठा अड्डा बनल्याची बोंब सर्वत्र पसरलेली असणे, त्यामुळे नवीमुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळाच्या गैरव्यवहाराची तातडीने चौकशी करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासानाने केलेली कार्यवाही व शासनाची भूमिका." | | |
| ९७. | १४० | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.**<br>"राज्य शासनाने मुस्लीम समाजास आरक्षण लागू करण्याबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नसणे, तसेच याबाबतची कार्यवाही अद्यापही प्रलंबित असणे, मुस्लीम या अल्पसंख्यांक समाजाचे सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी या समाजास आरक्षण लागू करण्याची गरज, याबाबत दिनांक २९ जानेवारी, २०२० रोजी अथवा त्यासुमारास झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत झालेली चर्चा, मात्र अंतिम निर्णय घेण्यात आलेला नसणे, मुस्लीम समाजाची स्थिती सुधारण्यासाठी तत्कालीन राज्य शासनाच्या दिनांक ९ जुलै, २०१४ रोजीच्या आदेशानुसार मुस्लीम समाजास आरक्षण लागू करण्याची नितांत गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही." | कित्ता | |

९८. **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे, श्री. प्रसाद लाड **वि.प.स.** यांच्या **लक्षवेधी सूचना क्र.१** वरील निवेदन **मुख्यमंत्री** सभागृहासमोर ठेवतील :- — कित्ता

"मुंबईतील मालाड (पूर्व) कुरार गाव येथील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग असलेल्या वनजमिनीवरील जाम ऋषीनगर झोपडपट्टीत दि. १३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास भीषण आग लागली असणे, कुरार गाव येथील वन विभागाच्या जमिनीवर मोठ्या संख्येने झोपड्या वसलेल्या असणे, लाकडी सामान आणि प्लास्टिक कापडाने येथे झोपड्या उभारण्यात आल्याने आग वेगाने पसरली असणे, त्यामुळे पुढील काही अवधीतच ही आग स्तर-२ ची असल्याचे अग्निशमन दलाकडून जाहीर करण्यात येणे, सदर आगीमुळे तब्बल १० ते १५ गॅस सिलिंडरचा एकापाठोपाठ एक झालेला स्फोट, सदरहू दुर्घटनेत या ठिकाणच्या १०० हून अधिक झोपड्या जळून खाक झाल्या असणे, तसेच सदरहू दुर्घटनेत एका १२ वर्षीय मुलाचा मृत्यू झाला असून, तीन जण जखमी झाले असणे, जखमींना कांदिवली (पश्चिम) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शताब्दी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असणे, या आगीमुळे शेकडो कुटुंब रस्त्यावर आली असणे, त्यामुळे सदरहू आगीच्या कारणांचा शोध घेण्याची असलेली नितांत आवश्यकता, तसेच आगीमुळे बाधित झालेल्या कुटुंबांना खास बाब म्हणून मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मदत करण्याबाबत आणि त्यांचे तात्पुरते किंवा कायमस्वरूपी स्थलांतर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

९९. ६२ **श्री. विक्रम काळे,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. अमोल मिटकरी, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे **वि.प.स.** — कित्ता

"मुंबई महानगरपलिकेने शहरातील विशेष मुलांना (Special child) आजारात दर्जात्मक सेवा मिळावी, त्यांच्या पालकांना भेडसावणाऱ्या समस्या दूर व्हाव्यात तसेच खासगी

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | आरोग्यसेवेप्रमाणे परवडणाऱ्या दरात सेवा उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेने अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरू करण्याबाबत २०१८ मध्ये घोषणा करण्यात येणे, त्यानुसार सन २०१८ च्या अर्थसंकल्पापासून दरवर्षी १ कोटी रुपयांची आर्थिक तरतूददेखील करण्यात येणे, तथापि चार वर्षे उलटून देखील सदर सेंटर अद्याप रुग्णसेवेसाठी कार्यान्वित झालेले नसल्याचे दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, महापालिकेने विशेष मुलांसाठी एकाच छताखाली सोयीसुविधा मिळण्याचे दृष्टीकोनातून एकूण ३६, ००० चौ.फूट क्षेत्रफळाच्या जागेत ॲन अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर, नागपाडा बेलासिस रोड या मार्गावर सेंटर उभारण्यात येणे व त्यासाठी भांडवली खर्च ४ कोटी तर महसूली खर्च १० कोटी इतक्या रक्कमेची आर्थिक तरतूद देखील करण्यात आलेली असणे असे असतांना देखील अद्याप अर्ली इंटरव्हेन्शन सेंटर सुरू करण्यात न आल्याने ही योजना फक्त कागदावरच आहे की काय असा जनतेमध्ये निर्माण झालेले संभ्रमाचे वातावरण त्याप्रकरणी शासनाने चौकशी करण्याची आश्यकता, परिणामी मुंबईतील जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व चिडीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून सदर केंद्र सुरू करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका. | | |
| **१००.** | **९१** | **श्री. जयंत पाटील वि.प.स.** | कित्ता | |
| | | " नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पामुळे वडघर विभागात कोपर, चिंचपाडा, कोल्ही, वरचे ओवळे, वाघिवलीवाडी व वहाळ विभागात उलवा, कोबडभुजे, तरघर, गणेशपुरी व वाघिवली ही १० गावे विस्थापित झाली असून त्यांच्या सोबत शाळा व ग्रामपंचायत सुद्धा | | |

संपादित करण्यात आलेल्या असणे, सन २०१७ मध्ये घरे तसेच शाळा ह्या निष्कासीत झाल्या असून त्याबदल्यात सिडकोने भुखंड दिलेले असणे, परंतु अद्यापर्यंत सदर भुखंडावर शाळा बांधण्यात आलेल्या नाहीत त्यामुळे प्रकल्पग्रस्त विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत असून प्रकल्पग्रस्तांना शिक्षण घेण्याकरीता दूरवर जावे लागत असणे, महाराष्ट्र शासन निर्णय महसुल व वन विभाग क्र.एस-३५/र १, दि.१४-०९-२००४ नुसार "आधी पुनर्वसन मग प्रकल्प" हे शासनाचे धोरण असताना देखील प्रकल्पास सहकार्य करण्याच्या दृष्टीने प्रकल्पग्रस्तांनी घरे व शाळा २०१७ साली निष्कासीत करण्यात आलेली असून अद्यापपर्यंत शाळा व ग्रामपंचायतीचे भुखंड बांधण्यात आलेले नसणे, त्यास सिडको व जिलहा परिषद जबाबदार असणे, सिडकोने शाळांसाठी देवू केलेले भुखंड व ग्रामपंचायतीचे भुखंड जिल्हा परिषदेने ताब्यात घेवून करार करावेत व ग्रामस्थांना विश्वासात घेवून जिल्हा परिषदेने भुखंडावर शाळा व ग्रामपंचायती बांधण्याचा आराखडा (प्लॅन) तयार करावा व सदरचा प्लॅन सिडोकोस सादर करून सिडकोच्या खर्चाने सिडकोनेच सदर भुखंडावर प्लॅननुसार शाळा व ग्रामपंचायत बांधण्यास सिडकोस जिल्हा परिषदेकडून ग्क्र् देण्यात यावी, तसेच शाळा व ग्रामपंचायत बांधून झाल्यानंतर शाळेसंदर्भात प्रशाकीय धोरण हे जिल्हा परिषदेकडून राबविण्यात यावे अशी पुनर्वसित १० गावाचे ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीची मागणी असणे, तरी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाआंतर्गत पुनर्वसित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या शाळा व ग्रामपंचायतीचे भुखंड सिडकोकडून बांधण्याची आवश्यकता असणे, सबब सदर प्रकरणी शासनाने केलेली उपाययोजना व करावयाची कार्यवाही."

१०१. ११५ **श्री. जयंत पाटील वि.प.स.** कित्ता

"मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सदनिका हस्तांतरण प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असून ठाणे ते दिवा पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिका विस्तारीकरणामध्ये

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मोफत सदनिका मिळविण्यासाठी काही बनावट झोपडीधारकांनी खोटे दस्तऐवज बनवून शासनाची दिशाभूल करत फसवणूक करण्यात येत असणे, २०१५ साली एमएमआरडीएने ठाणे ते दिवा पाचव्या आणि सहाव्या रेल्वे मार्गिका विस्तारीकरणामध्ये आवश्यक जागा ताब्यात घेत ती संबंधित प्रशासनाकडे हस्तांतरीत केली असणे व निष्कासन कारवाई होण्याआधी आणि कारवाई नंतर संबंधित प्रशासनाकडून झालेल्या जागेचा सर्वे अहवाल, पंचनामा, झोपडपट्टीधारकांच्या नावे क्षेत्रीय तक्रार निवारण समितीकडे अर्ज करून सुनावणी आयोजित करून खोटे दस्तऐवज बनवून मोफत सदनिका लाटण्याचा प्रयत्न केला जात असणे, मोफत सदनिका लाटण्यासाठी दलालांपासून झालेली साखळी वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत जात असून अशा मोफत सदनिकांसाठी लाखोंची बोली लागत असणे, मात्र प्रकल्पांत बाधित झालेला गरजू माणूस शेवटपर्यंत हक्काच्या घरापासून वंचित राहणे, मात्र प्राधिकरणाकडून याबाबत काहीच कारवाई केली जात नसणे, सदर प्रशासकीय यंत्रणेतील या भ्रष्टाचाराबाबत कित्येक तक्रारी येउनही तसेच प्रकल्प बाधितांची आंदोलने होवूनही ज्यांच्यावर कारवाई होणे अपेक्षित असते त्यांच्यावर कारवाई न होणे, परिणामी संबंधित दोषी अधिकारी तथा दलालांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची तसेच मोफत सदनिका वितरित करण्याचे दिलेले आदेश रद्द करावेत अशी मागणी सातत्याने करण्यात आली असणे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |

**१०२. २२१ ॲड. अनिल परब वि.प.स.** कित्ता

" मुंबई महानगरपालिकेच्या नुकत्याच जाहीर झालेल्या अर्थसंकल्पामध्ये आर्थिक वर्ष २०२३ - २०२४ साठी विविध पायाभूत, मूलभूत व नागरी सुविधा तसेच विकास कामे करण्याकरिता एकूण ६५० कोटींची तरतूद केलेली असणे, परंतु सदर निधीची तरतूद असमान पद्धतीने करणे, सदर तरतूद करीत असताना एका विशिष्ट पक्षाच्या माजी गटनेत्याच्या पत्राच्या आधारे त्या पक्षाच्या एकूण ७७ माजी नगरसेवकांच्या प्रभागांमध्ये प्रत्येकी ३ कोटींप्रमाणे २३१ कोटींची तरतूद करणे, परंतु उर्वरित १५० प्रभागांमध्ये केवळ प्रत्येकी १ कोटीप्रमाणे केवळ १५० कोटींची इतक्याच निधीची तरतूद करणे, सदर तरतूद करीत असताना कोणतेही निकष न पाळणे, सदर असमान निधी वाटप करताना मुंबई महापालिका कायदा १८८८ च्या कोणत्याही तरतुदीचे पालन न करणे, स्थायी समिती अस्तित्वात नसताना देखील सदर निधीची तरतूद केलेली असणे, सदर निधीची तरतूद पारदर्शकपणे राबविण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**१०३. २४६ श्री. अंबादास दानवे वि.प.स.** कित्ता

"अमृत नगर, जोगेश्वरी (पश्चिम), मुंबई येथील अलमिना अपार्टमेंटसह इतर २० इमारतींचा पुनर्विकासासाठी प्रोत्साहन एफ.एस.आय. व ले आऊटप्रमाणे राखीव प्लॉट जमीन विकसित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करूनही अद्यापपावेतो त्यास मंजूर मिळालेली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, सदरहू इमारती या जवळपास ४० वर्षे जुन्या असून मोडकळीस आलेल्या असल्याने या इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव एमएमएआरडीए यांच्याकडे सादर करण्यात आलेला असणे, या इमारतीला पूर्वीच १.५० एफ.एस.आय. वापरून झालेला असून त्यांच्याकडे अतिरिक्त एफ.एस.आय. शिल्लक राहिलेला नसणे, या इमारतींच्या अध्यक्ष व सचिवांनी

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मुंबई महानगरपालिकेकडे वारंवार अतिरिक्त एफ.एस.आय. मिळावा याकरिता पत्रव्यवहार केला असून मुंबई महानगरपालिकेने जाहिर केलेल्या डी.पी. प्लानमध्ये याबाबतचा उल्लेख केलेला नसणे, परिणामी रहिवाशांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा संताप व संभ्रमाचे वातावरण, अलमिना अपार्टमेंटसह इतर २० इमारतीचा पुनर्विकासासाठी प्रोत्साहन एफ.एस.आय. व ले-आऊटप्रमाणे राखीव प्लॉट जमीन विकसित करण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची भूमिका." | | |
| **१०४.** | **४१९** | **श्रीमती उमा खापरे,** श्री. रमेशदादा पाटील, श्री. निलय नाईक, श्री. महादेव जानकर **वि.प.स.** | कित्ता | |
| | | "मुंबई शहर आणि उपनगरात विशेषता पश्चिम उपनगरासह मध्य मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणात गगनचुंबी इमारती उभारत असल्याने यातून उडणारी धुळधाण मुंबईच्या प्रदूषणाला कारणीभूत ठरत असल्याचे बाब माहे फेब्रुवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शने परिणामी इमारत बांधताना उडणारे धूळ सिमेंटचे कण अशा घटकांना अटकाव करण्यासाठी महापालिकेने विकासकांना चांगलेच फैलावर घेतलेले असणे, बांधकामाच्या ठिकाणी उठणारी धुळ कमी करण्यासाठी बांधकाम व्यवसायिकांना मार्गदर्शक तत्वे जारी केली असणे, वांद्रे कुर्ला संकुल परिसरात पायाभूत सेवा सुविधांची कामे सुरू असणे, रस्ता आणि फुलांच्या कामास मैदानातून उडणारी धूळ मुंबईकरांच्या नाकी नऊ आणत असून हे प्रकल्प राज्य सरकारचे असणे, या संपूर्ण परिसरात मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरणाच्या हद्दीत असल्याने महापालिका आणि प्राधिकरण यावर काय उपाय करणार या प्रश्नाचे उत्तर | | |

प्रशासकीय यंत्रणाकडे नसणे, ज्या इमारतीचे फिनिशिंग प्रगतीपथावर आहे त्या इमारतीच्या बाहेरील भागावर धुळरोधक पडदे, डस्ट क्रीम लावा धुळरोधक पडद्यावर तळमज्यावरील मोकळ्या जागी पाणी शिंपडा बांधकामाच्या ठिकाणावर बाहेर पडताना सर्व वाहनांची चाके धुवा बांधकाम कचऱ्याची वाहतूक करणारी सर्व वाहने झाका बांधकाम सुरू असताना पडणाऱ्या डेब्रीज पासून सुरक्षेसाठी जाळी बसवा, आय ओडी देताना इमारती भोवती वाजवी उंचीपर्यंत जीआयसी पडदे उभारणे बंधनकारक करणे, आर एम सी प्लांट मंजूर करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे ना हरकत प्रमाणपत्र बंधनकारक करणे आदी करण्याच्या सूचना दिल्या असणे, त्याची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका आणि म्हाडा प्रशासनाकडून पुरेशी व्यवस्था नसल्याने यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

१०५. ४७९ **श्री. रमेशदादा पाटील,** श्री. प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री. निलय नाईक **वि.प.स.** कित्ता

"स्मार्ट सिटी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील आदिवासी पाडे आजही मूलभूत सुविधांपासून वंचित असल्याचे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास येणे, स्वातंत्र्यापूर्वीपासून हे पाडे अस्तित्वात असूनही त्यांच्याकडे दुर्लक्ष केले जात असणे, कोपरखैरणे विभागातील अडवली, भूतवली या आदिवासी पाड्यातील शौचालयात गेल्या अनेक महिन्यापासून पाणी नसल्याचे तसेच रस्त्याच्या दुतर्फा पाईपलाईन मार्गावर डेब्रिजचे डोंगर, स्मशानाची दुरावस्था, अंतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली असणे, त्याचप्रमाणे आदिवासी पाड्यातील हक्काचे घर मिळण्याच्या प्रतीक्षेत असलेल्या अनेक कुटुंबावर भाड्याच्या घरात राहण्याची वेळ आली असणे, नवी मुंबई महापालिका प्रशासनाने या आदिवासी पाड्यांमध्ये तात्काळ मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १०६. | ४८२ | **ॲड. अनिल परब वि.प.स.**<br>“मुंबईतील सँडहार्स्ट रोड रेल्वे स्थानकाजवळील शिवदास चापसी मार्ग येथील रेल्वे लाईनवरील हँकॉक पुलाचे दुहेरी रुंदीकरणच्या अतिरिक्त बांधकामामुळे तसेच वॉलेस फ्लोअर मिल ते सकीना मंझील दरम्यान रस्ता रुंदीकरणामुळे लक्ष्मीबाई तुकाराम चौकातील ०७ इमारतीमधील ६३० रहिवाशी कुटुंबे बाधित होत असल्याची बाब माहे डिसेंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, यासंदर्भातील निष्कासन कारवाई करण्यापूर्वी प्रस्तावित बाधित रहिवाशांना त्यांचे म्हणणे मांडण्यास संधी मिळावी याकरिता सदरहू रहिवाश्यांच्या वतीने प्रगती गृहनिर्माण संस्थेद्वारे महानगरपालिका ई प्रभागाचे सहायक आयुक्त, संबंधित उप-आयुक्त, अति-आयुक्त, परिमंडळ -०१, म्हाडा अधिकारी यांना अनेक पत्रव्यवहार करूनही त्यांच्या पत्राला पोच न देणे, सदरहू बाधित कुटुंबाचे स्थलांतर प्रचलित नियमांनुसार ३ किमीच्या आत करावे अथवा रेडी रेकनरच्या दराने घराच्या किंमती अदा कराव्यात अशी मागणी सदरहू संस्थेने उक्त पत्रव्यवहाराद्वारे करणे, याप्रकरणी महापालिकेने भूमिका स्पष्ट केली नसल्याने बाधित कुटुंबीयांमध्ये भीतीचे व चिंतेचे वातावरण निर्माण होणे, याप्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून मुंबई महानगरपालिकेच्या दि. २१ ऑक्टोबर २०२१ रोजीच्या धोरणानुसार सदर ६३० कुटुंबांना रेडिरेकनरच्या दराने घरांच्या किंमती अदा करण्याची आवश्यकता अथवा त्यांच्या राहत्या घरापासून तीन किमीच्या आत त्यांचे पुनर्वसन करण्याची गरज याप्रकरणी शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |

१०७. ४८४ **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर,** श्री. प्रविण दरेकर **वि.प.स.** कित्ता

"मुंबई महानगरपालिकेकडून दि. १ मे २०२२ रोजी मुंबईत सर्वांसाठी पाणी ह्या धोरणाची घोषणा करण्यात येणे, मुंबईकरांना २४ तास पाणी देण्याचे स्वप्न महानगरपालिका दाखवित असतानाच आजही सुमारे १३ ते १४ लाख नागरिक कायदेशीर पाण्यापासून वंचित असल्याचे धक्कादायक वास्तव उघड होणे, मुंबईतील नागरिकांना अनौपचारिक पाणी मिळवण्यासाठी महिन्याला हजारो रुपये खर्च करावे लागत असल्याची बाब निदर्शनास येणे, आपण जे शुद्ध पाणी वापरतो ते आपला मळ - कचरा घेऊन सरळ निघून समुद्रात सोडले जात असणे, या वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया करून या पाण्याचा पुनर्वापर करणे ही संकल्पना केवळ कागदावरच राहिली असणे, काही खाजगी संस्थांनी हा प्रयोग करून पुनर्वापरासाठी पाणी दिले असले तरी महानगरपालिकेकडे व्यवस्था नसल्याचे कोरडे उत्तर महापालिका प्रशासनाकडून दिले जात असल्याची धक्कादायक बाब समोर येणे, पाणी वितरण व्यवस्थेत दररोज ३० टक्के बेहिशेबी पाणी वाया जात असून हे पाणी हॉटेल, निवासी आणि खाजगी क्रीडा संकुलांना अवैध जोडण्या देऊन वितरित केले जात असल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबईच्या भौगोलिक हद्दीत केवळ ३ टक्के पाणी स्त्रोत असून मुंबईला ९७ टक्के पाणी मुंबई बाहेरून आणावे लागत असणे, मुंबईतील पाण्याचे स्त्रोत विकासाच्या नावाखाली नष्ट झाल्या असून हे स्त्रोत बुजवून जमीन विकसित करताना, काँक्रिटीकरण करताना भूगर्भातील पाण्याचे स्त्रोत नाहीसे झाले असणे, मुंबईतील पाणी चोरी रोखण्यासाठी नियमित वॉटर ऑडीट करण्याची आवश्यकता, त्याचप्रमाणे मुंबईतील पाणी समस्या लक्षात घेता मुंबईतील पाण्याचे संवर्धन करण्यासाठी दहिसर, पोयसर आणि ओशिवरा या नद्यांचे पुनरुजीवन करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १०८. | ५३४ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>"नवी मुंबईत आर्थिक दुर्बल आणि अल्प उत्पन्न घटकांसाठी सिडकोने ६७ हजार घरे बांधण्याचा निर्णय घेतलेला असणे, सिडकोने आतापर्यंत लाखो घरे बांधलेली आणि विकलेली असणे, या कामाचा मोठा अनुभव गाठीशी असताना सिडकोने यावेळी ही घरे विकण्यासाठी खासगी कंपन्यांची नियुक्ती केलेली असणे, सिडकोच्या घरासाठी सर्वसामान्य लोकांच्या प्रचंड मोठया प्रमाणावर मागणी असणे, सिडकोने ही घरे विकण्यासाठी खासगी कंपनीची नियुक्ती करून त्या कंपनीच्या घशात ६९९ कोटी रुपये घालणार असणे, म्हणजेच या प्रकल्पातील प्रत्येक विक्री झालेल्या घरावर या कंपनीला १ लाख रुपये कमीशन मिळणार असणे, सिडकोने याकामाचे कंत्राट थॉटट्रेन डिजाईन प्रायव्हेट लिमिटेड, हेलीअस मीडीयम बाजार प्रायव्हेट लिमिटेड या दोन कंपन्याला संयुक्त रितीने दिलेले असणे, या कंपन्या या प्रकल्पाचे मार्केटींग, ब्रँडीग, सेल्स आणि प्रकल्प अस्तित्वात आल्यानंतर त्याचे मार्केटींग करणार असणे, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२२ ला या संदर्भात या दोन्ही कंपन्यासोबत करार झालेला असणे, या घरांचे मार्केटिंग करण्यासाठी ७०० कोटी रुपये सिडको खर्च करणार असणे, पूर्वी सिडको स्वतः घर विकायचे आता मात्र आता सिडकोला मार्केटिंग करण्याची वेळ आल्याने यासाठी कोटयावधींचे कमीशन सर्वसामन्याच्या खिशातुन काढुन खाजगी कंपन्यांना देण्याचा कट सिडकोने आखलेला असणे, इतका खर्च घरे विकण्यासाठी सिडकोकडे करण्यात येणार असल्याने त्याऐवजी घरांच्या किंमती कमी करून घरांची लॉटरी काढल्यास जाहिरातीवर | कित्ता | |

खर्च करण्याची वेळ न येता सर्वसामान्य जनतेला परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करण्याचा शासनाचा उद्देश साध्य होणार असल्यामुळे याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१०९. ६६८ **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे वि.प.स.** कित्ता

"कल्याण-डोंबिवली महापालिका क्षेत्रात १९ किमी लांबीच्या ३२ नाल्यांवाटे खाडीत आणि नद्यांमध्ये प्रदूषित पाणी तसेच रसायनांवर कोणतीही प्रकीया न करता ते थेट सोडले जात असणे, कल्याण-डोंबिवली येथील खाड्यांमध्ये तसेच अंबरनाथ-उल्हास नद्यांलगत या प्रकारांची वारंवार पुनरावृत्ती होऊनही त्याकडे संबंधित प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, शहरात दररोज २६८ एमएलडी सांडपाणी तयार होत असून यातील फक्त ८० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जात असणे, उर्वरित सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करताच खाडीत तसेच नदीत सोडले जात असल्याचे निदर्शनास येणे, चिखलोली आणि वडोल या दोन ठिकाणी सांडपाणी प्रक्रिया केंद्रे उभारण्यात आली असून यातून २४ एमएलडी पाण्यावर प्रक्रिया होत असल्याचा दावा महापालिकेकडून केला जातो परंतु प्रत्यक्षात शहरातील अनेक रहिवाशी संकुलांपर्यत भुयारी गटार योजनाच पोहोचली नसल्याने हजारो घरांतील सांडपाणी थेट नाले आणि वालधुनीच्या प्रवाहात सोडले जाणे, अंबरनाथमध्ये भुयारी गटारांच्या अभावी ही परिस्थिती उदभवलेली आहे त्याहून भयाण अवस्था उल्हासनगर पालिका क्षेत्रात असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने सखोल चौकशी / पाहणी करून दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **११०.** | **६९७** | **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस **वि.प.स.**<br>“मुंबई शहर आणि परिसरात गेल्या काही वर्षांत कॉर्पोरेट खासगी रुग्णालयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली असणे, सर्व सुविधांयुक्त अशा कॉर्पोरेट रुग्णालयांत उपचार घेण्यासाठी देशासह परदेशातूनही रुग्ण येणे, परंतु हि सेवा सामान्यांच्या आवाक्यात नसल्याने या सुविधेचा लाभ केवळ ठराविक वर्गाला होणे, मुंबईतील कॉर्पोरेट रुग्णालयांची संख्या वाढत असताना महापालिकेच्या रुग्णालयांची संख्या गेल्या कित्येक वर्षांत वाढलेली नसणे, महापालिकेच्या रुग्णालयांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असणे, गेल्या काही वर्षांत मुंबई शहराची लोकसंख्या वाढल्याने महानगरपालिका रुग्णालयांवर येत असलेला कमालीचा ताण, या रुग्णालयांमध्ये एक तर सर्व सुविधा उपलब्ध नसणे किंवा त्या तोकड्या असणे, मुंबई मनपा अखत्यारित असलेली रुग्णालये दुरुस्तीच्या प्रतिक्षेत असल्याने सोयी - सुविधांचा अभाव असणे, मुंबई शहरातील सर्वांत जुने रुग्णालय असलेल्या आणि सन २०२४ मध्ये शंभरी गाठत असलेल्या के.ई.एम. रुग्णालयाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होणे, या रुग्णालयातील लायब्ररी इमारत धोकादायक अस्वस्थेत असल्याने त्याठिकाणी नवीन इमारत बांधण्याची आवश्यकता असतानाही केवळ अधिकाऱ्यांच्या अट्टाहासापोटी या इमारतीच्या दुरुस्तीचा घालण्यात आलेला घाट, या इमारतीच्या दुरुस्तीचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले असणे, या रुग्णालयातील सिटी स्कॅन, रेडीओलॉजी, सीव्हीटीएस विभाग बंद असल्याने रुग्णांची मोठ्या प्रमाणावर होत असलेली रुग्णांची हेळसांड, के.ई.एम मध्ये चाचण्या होत नसल्याने रुग्णांना चाचण्यांसाठी खासगी लॅबमध्ये जावे लागणे, तब्बल १२ | कित्ता | |

वर्षांपासून प्रलंबित असलेले JMT शस्त्रक्रिया विभागाचे काम, परिणामी, वैद्यकीय उपचारासाठी सर्वसामान्य रुग्णांना खासगी रुग्णालयांत घ्यावी लागत असलेली धाव आणि सहन करावा लागत असलेला आर्थिक भुर्दंड, के.ई.एम. रुग्णालयातील परिचारिकांना नर्स क्वार्टर्स रिकामी करण्याची आणि शिवडी येथील क्षय रुग्णालयात स्थलांतरित होण्याची काढण्यात आलेली नोटीस, त्यामुळे के.ई.एम. रुग्णालयातील परीचारिकांत पसरलेली नाराजीची भावना, यास्तव १०० वर्षांचा इतिहास असणाऱ्या के.ई.एम. रुग्णालयाच्या इमारती, विभाग, वैद्यकीय साधनसामुग्री तातडीने अद्ययावत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

१११. ७०६ **ॲड. अनिल परब वि.प.स.** कित्ता

"नाशिक जिल्ह्यातील सटाणा नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी नगरपरिषद हद्दीतील सर्वे नंबर १०८ क्षेत्रातील आरक्षण क्रमांक २८ चे प्रयोजन बदलून सदर आरक्षणाच्या जागेत शासनाची मान्यता न घेता परस्पर राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्रमांक दोन या कार्यालयाचे बांधकाम सुरू करणे, मान्यता देणे, तसेच सदर आरक्षित बांधकाम अंमलबजावणीसाठी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांनी जाणून- बुजून दुर्लक्ष करून सटाणा नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांनी लोक नियुक्त नगरअध्यक्ष व नगरसेवक नसताना स्वतः प्रशासकीय अधिकारी या नात्याने सदर आरक्षण स्थलांतर करण्याचा प्रस्ताव स्वतःच्या अधिकारात मंजूर करणे, राष्ट्रीय महामार्ग लगत असणाऱ्या इमारत रेषेपासून सदरचे बांधकाम अगदी जवळ असल्याने सदर बांधकामास नियमानुसार मान्यता देण्यात येत नसताना देखील मुख्याधिकारी यांनी त्यांच्या अधिकारात सदर बांधकामाला मान्यता देणे, नगरपालिकेची आर्थिक स्थिती बेताची असताना व सदर आरक्षण हे नगरपालिका विकास योजनेच्या शॉपिंग सेंटरसाठी प्रयोजन असताना सदर आरक्षणाकडे दुर्लक्ष करून स्वतःचे

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | आर्थिक हित साधण्यासाठी व संगनमताने सदर आरक्षण बदलणे, त्यामुळे जनतेत पसरलेले नैराश्याचे वातावरण, त्या अनुषंगाने सटाणा नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांना जबाबदार धरून त्याला सेवेतून बडतर्फ करणे व त्यांनी यापूर्वी केलेल्या सर्व कामाची चौकशी करून त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची आवश्यकता, सटाणा नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांनी शासनाचे कोणतेही आदेश न मानता स्वतःच्या मर्जीने अनियमित बांधकामाला मंजुरी देणे, त्यांच्या या कृतीमुळे नगरपालिकेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊन नगरपालिका डबघाईला येणे, त्या अनुषंगाने नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याला व इतर अधिकाऱ्यांना जबाबदार धरून त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता यावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **११२.** | **७५७** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** | कित्ता | |
| | | "नाशिक शहरामध्ये स्मार्ट सिटी कंपनीमार्फत राबविण्यात आलेल्या गावठाण पुनर्विकास योजनेंतर्गत कोट्यवधी रुपयांची कामे सुरू असणे, सदरहू योजनेंतर्गत १८१ रस्त्यांची कामे सुरू करण्यात आली असून त्यातील १०० रस्त्यांची कामे पूर्ण झाली असणे, कोरोनामुळे संबंधित ठेकेदाराला काम पूर्ण करण्यासाठी दिनांक ६ मार्च, २०२२ पर्यंत मुदत देण्यात आली असणे, उक्त कालावधीत सदरहू रस्त्यांचे कामे पूर्ण न झाल्याने परत सहा महिन्यांची मुदत वाढ देण्यात आली असणे, सदरहू मुदत वाढीमध्ये स्मार्ट सिटी कंपनीकडून कागदपत्रे प्राप्त न झाल्यामुळे पुन्हा दुसरी मुदतवाढ देण्यात आली असणे, अश्याप्रकारे वारंवार मुदतवाढ देताना दंड आकारण्याची आवश्यकता, परंतु स्मार्ट सिटीचे मुख्य कार्यकारी | | |

अधिकारी यांनी ठेकेदाराशी अर्थपूर्ण वाटाघाटी करून दंडाच्या कारवाई पासून दूर ठेवणे, रस्त्यांची कामे रखडल्यामुळे नाशिक शहराची मुख्य बाजारपेठ ठप्प झाले असून व्यापाऱ्यांच्या अतोनात नुकसान झाले असणे, उक्त प्रकरणी नागरिकांनी वेळोवेळी या ठिकाणी आंदोलने देखील केले असणे, गोदावरी किनाऱ्यावर बसविण्यात आलेल्या फरशा पुराच्या पाण्यामध्ये वाहून जाईल हे माहीत असताना देखील श्री मोरे यांनी संबंधित योजनेचा पाठपुरावा केला असणे, अश्याप्रकारे गावठाण पुर्नविकास योजनेसह अन्य योजनांमध्ये सुमारे ११०० कोटी रुपयांच्या कामांमध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले असणे, उक्त प्रकरणी के पी एम जी सारख्या सल्लागार कंपनीच्या कारभाराविषयी तक्रारी प्राप्त झाल्या असणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांची किंवा एसआयटीसारखी समिती गठीत करून स्मार्ट सिटी योजनेंतर्गत कामांची चौकशी करून या सर्वांवर नियंत्रण असलेल्या आणि प्रतिनियुक्तीच्या काळावर एक वर्षाहून अधिक काळ असणाऱ्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**११३.** **११६** **श्री. प्रसाद लाड वि.प.स.** कित्ता

“रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील पाताळगंगा नदीत कारखाने, हॉटेल्स, फुडमॉल यांचे सांडपाणी थेट सोडले जात असल्याने नदीच्या पाणी प्रदूषणाचा प्रश्न गंभीर झाला असल्याचे फेब्रुवारी २०२३ मध्ये निदर्शनास आले असणे, पाताळगंगा नदी प्रदूषणाच्या विळख्यात सापडल्यामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून याबाबतची तक्रार नागरिकांनी तहसिलदार, खोपोली पोलीस ठाणे व प्रदूषण मंडळाला निवेदनाद्वारे केली असणे, तसेच जलप्रदूषण थांबवून नदीपात्र साफ करून घेण्याची मागणी देखील करण्यात येणे, पाताळगंगा नदीचे पाणी लाखो लोक पिण्याकरिता वापरत असल्यामुळे

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | नागरिकांना रोगराई व मोठे आजार होऊ नये याकरिता शासनाने घ्यावयाची दक्षता व यावर करावयाची कार्यवाही." | | |
| ११४. | १४३ | **श्री. प्रसाद लाड,** श्री. सुनिल शिंदे, श्री. विलास पोतनीस, श्री. सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे **वि.प.स.**<br>"विदर्भातील नागपूर व चंद्रपूरसह गोंदिया व अमरावतीच्या वातावरणात सल्फर डायऑक्साइड (एसओ-२) व नायट्रोजन डायऑक्साइड (एनओ-२) चा स्तर प्रचंड वाढला असणे, कोपर्निकस ॲटमॉस्फिअर मॉनिटरिंग सर्व्हिस उपग्रहाने नुकत्याच केलेल्या सर्वेक्षणाचे चित्र जारी केले असून आर्थिक राजधानी मुंबईसुद्धा प्रदूषणाच्या विळख्यात असणे, याच कारणामुळे सध्या या शहरांमध्ये फुफ्फुसाचे विकार, अस्थमा व त्वचेचे आजार वाढले असून कायमस्वरूपी मास्क घालण्याशिवाय पर्याय राहणार नाही, अशी भीती डॉक्टरांनी व्यक्त केली असणे, देशात आणि महाराष्ट्रात सुरू असलेल्या औष्णिक वीज केंद्रामधून राखेची धूळ मोठ्या प्रमाणावर हवेत सोडली जाणे, त्यात एनओ-२, एसओ-२चे प्रमाण प्रचंड असणे, ही राख हवेच्या दिशेने वाहत जाते व त्या भागाला प्रभावित करणे, अवकाशातून घेतलेल्या उपग्रह चित्राद्वारे नागपूर आणि चंद्रपूर ही शहरे दोन्ही वायूंच्या बाबतीत अत्याधिक प्रदूषित तर गोंदियाच्या वातावरणात सल्फरडाय ऑक्साइड आणि अमरावतीमध्ये नायट्रोजन डायऑक्साइडचा लाल थर जमा झालेला दिसणे, याशिवाय मुंबईच्या आसपासचा परिसरातही एसओ-२, एनओ २ वायूचा स्तर वाढल्याचे या उपग्रह सर्वेक्षणात दिसून येत असणे, एसओ २ वायू कोळसा आणि क्रूड ऑइलच्या ज्वलनातून बाहेर पडणे, एनओ-२ हा वायूसुद्धा वीज केंद्र आणि वाहनांच्या धुरातून | कित्ता | |

बाहेर पडणे, देशात २०० च्यावर औष्णिक वीज केंद्र आहेत, ज्यातील २० प्रकल्प महाराष्ट्रात असणे, एका मोठ्या प्रकल्पामधून दररोज ५०० टनांच्या जवळपास वायू हवेत फेकला जाणे, यामुळे विदर्भात आम्लवर्षा (ॲसिड रेन) होण्याचा धोका वाढला असणे, पाण्यातील आम्लता वाढल्याने त्याचे गंभीर परिणाम जलीय जीव आणि वनस्पतींवर होणे, वृक्ष, जंगल आणि शेतीही प्रभावित होणे, एनओ-२, एसओ-२ चा स्तर वाढल्याने श्वासनलिकेची प्रतिकार शक्ती कमी होणे, यामुळे सामान्य लोकांमध्ये भविष्यात फुफ्फुसासंबंधी आजार बळावण्याची शक्यता असणे, आधीपासूनच दमा, अस्थमासारखे श्वसनाचे आजार असलेल्यांचा त्रास अत्याधिक बळावणे, लोकांमध्ये डोळे व त्वचेसंबंधीचे आजारही वाढल्याचे दिसून येत असणे, त्यामुळे यावर शासनाने तातडीने उपाययोजना करून प्रदूषण नियंत्रणात आणण्याकरिता करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

११५. ३४० **श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स.** कित्ता 

"चंद्रपूर जिल्ह्यातील लॉयड्स मेटल्स प्रा.ली.कंपनी धुगुस या कंपनीच्या प्रदूषणाद्वारे लगतच्या परिसरातील शेती खराब होत असल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शेती पिकांचे नुकसान होणे, या कंपनीच्या प्रदूषणाद्वारे तेथील धुराचा त्रास होऊन परिसरातील नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होणे, त्यामध्ये गरोधर माता, लहान मुलांना खोकला, अस्थमा यासारखे गंभीर आजार कॅन्सर सारखे रोग होण्याच्या घटना निदर्शनास येणे, NGT ने या कंपनीला संपूर्ण नवीन सुविधा बसविण्यात सांगण्यात आलेले असतांनाही सदर कंपनीने अद्यापही कुठलीही दक्षता घेतला सुविधा बसविलेल्या नसणे, प्रदूषण नियंत्रणासाठी कामं करणाऱ्या निरी या संस्थेने सदर कंपनीची पाहणी करून सदर प्रकल्प बंद करून नव्या स्वरूपात हा प्रकल्प उभारण्यात यावा असा अहवाल दिलेला असतांनाही अद्याप अहवाला नुसार हा प्रकल्प नव्या स्वरूपात उभा राहिलेला नसणे असे असतांनाही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | मंडळ चंद्रपूर यांच्याकडून अद्यापप या कंपनीवर कुठली कारवाई करण्यात आलेली नसणे त्यामुळे शासनाकडून याबाबत चौकशी करून नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सदर कंपनीवर कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **११६.** | **३९६** | **श्रीमती उमा खापरे,** श्री. रमेशदादा पाटील, श्री. निलय नाईक, श्री. महादेव जानकर, श्री. अंबादास दानवे **वि.प.स.**<br>"मुंबई गोवंडी प्रदूषणात झालेल्या वाढीमुळे गोवंडीकरांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत असणे, अतिप्रदूषणामुळे गोवंडीत जन्माला येणारी बाळे आजार घेऊन येत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करीत असणे, इतकेच नव्हे तर मुंबईतील २४ वार्डामध्ये येथील एम पूर्व वार्डाचा माता मृत्यू दर सर्वाधिक असल्याची धक्कादायक बाब वर्तमानपत्रात नुकतीच प्रसिद्ध होणे, त्यामुळे गेल्या १३ वर्षापासून गोवंडीतील डंपिंग ग्राउंड आणि बायोमेडिकल वेस्ट प्लांट मुळे होणारे प्रदूषणाचा भार स्वस्त असणाऱ्यांना गोवंडीकरांचे आरोग्य धोक्यात आले असणे, एम पूर्व वार्डामध्ये हवेतील अतिप्रदूषणामुळे शोषण मार्गाशी संबंधित विविध क्षयरोग, अस्थमा, फुप्फुसाच्या कर्करोगा बरोबरच हृदयरोगग्रस्तांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असून मुंबईतील इतर वार्डापेक्षा जास्त माता मृत्यू असणे, मागील दहा वर्षात तब्बल १० हजार ८७७ नागरिकांचा क्षयरोगामुळे मृत्यू होणे, यामुळे गोवंडीकर जनता प्रदूषणमुक्त होण्याची मागणी करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कित्ता | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११७. | ६४९ | **श्री. सचिन अहिर वि.प.स.**<br>“सांगली जिल्ह्यातील कृष्णा आणि वारणा नद्यामध्ये नदी काठांवरील अनेक उद्योग साखर कारखान्यांतून घातक रसायनयुक्त सांडपाणी सोडण्याचा उद्योग सातत्याने बेलगाम सुरू असल्याने यातून पिण्याचे पाणी प्रदुषित होत असणे, शिवाय नदीतील अत्यंत दुर्मीळ जलसंपदा, दुर्मिळातील दुर्मीळ माशांचा अक्षरशः वंशच्छेद होऊन हजारो मासे अक्षरशः तडफडून मरत असणे, तसेच अंकली नदीतील (ता. मिरज) येथे दि. ९ मार्च २०२३ च्या सुमारास कृष्णा नदी पात्रात प्रदुषित पाण्यामुळे अक्षरशः लाखो मासे तडफडून मरत असताना प्रत्यक्षात लोकांच्या नजरेत पडणे, कृष्णा नदीत आरोग्याला धोकादायक रसायनांचा अंश असलेले पाणी मिळत असल्याचे स्पष्ट होणे, तर जल प्रदुषणावर नियंत्रण ठेवणारी यंत्रणा मात्र याकडे सोयीस्कर डोळेझाक करणे, त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया." | कित्ता |
| ११८. | ६८ | **श्री. विक्रम काळे,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. अमोल मिटकरी, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे, श्री. अरुण लाड, श्री. प्रसाद लाड, श्री. सचिन अहिर **वि.प.स.**<br>“महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागातील ८६५ गावांतील पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य सरळसेवेच्या व महाराष्ट्र राज्यसेवा आयोगाच्या उप जिल्हाधिकारी ते नायब तहसीलदार अशा विविध पदांच्या परीक्षा देता येत असणे, परंतु महिला आणि इतर कोणत्याही प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ घेता येत नसल्याचे तसेच इतर सरळसेवेच्या परीक्षा देता येत नसल्याचे दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी निदर्शनास येणे, तसेच इतर सरळसेवेच्या परीक्षा देत येत नसल्यामुळे पोलिस तलाठी, ग्रामसेवक, लिपिक या सारख्या अनेक पदांच्या संधी वाया जात असल्याने तेथील विद्यार्थ्यांनी, महिला व इतर प्रवर्गातील आरक्षणाचा लाभ तसेच सरळ | कित्ता |

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | परीक्षा देण्यास शासनाने परवानगी द्यावी अशी मागणी तेथील विद्यार्थ्यांनी शासनाकडे केली असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास येणे, एकीकडे सीमा भागात कन्नड विषय सक्तीचा असतांना, सीमा भागातील मराठी भाविक विद्यार्थ्यांना मराठीची आस असल्याने विद्यार्थी केवळ कन्नड विषयात ऊत्तीर्ण होण्यापुरता अभ्यास करतात, परिणामी अनेकांना अधिक चांगल्या पद्धतीने कन्नड येत नाही त्यामुळे कर्नाटक राज्य स्पर्धा परीक्षा देणे त्यांना अडचणीचे ठरते तर दुसरीकडे महाराष्ट्र राज्याच्या स्पर्धा परीक्षा व सरळसेवा परीक्षा देत येत नाहीत असे तेथील मराठी भाषिक विद्यार्थी व नागरिकांनी सांगितले असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सीमा भागातील पदवी, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या सरळसेवा परीक्षा देण्याची परवानगी आरक्षणाच्या लाभासह शासनाने द्यावी अशी तेथील १० हजार विद्यार्थ्यांची शासनाकडे मागणी केलेली असल्याचेही निदर्शनास येणे, परिणामी, सीमा भागातील विद्यार्थ्यांना शासनाच्या स्पर्धा परीक्षा व सरळसेवा परीक्षांना वंचित राहावे लागल्यामुळे त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, त्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." | | |
| **११९.** | **११७** | **श्री. प्रसाद लाड,** श्री. सचिन अहिर, श्री. अभिजित वंजारी, श्री. राजेश राठोड, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील **वि.प.स.**<br>"महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २०२३ पासून नवीन अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात घेतलेल्या निर्णयाविरोधातील आंदोलनाच्या दबावात येत राज्य सरकारने नवीन अभ्यासक्रम २०२५ पासून लागू करण्याची विनंती करणे, परंतु नवीन अभ्यासक्रम आता चालू करा अशी | कित्ता | |

मागणी होत असणे, नवीन अभ्यासक्रम लागू करण्यावर दोन मतप्रवाह झाल्याने एमपीएससीनेही अद्याप भूमिका स्पष्ट न करणे, त्यामुळे अभ्यासक्रम कधीपासून लागू होणार याबाबत विद्यार्थी संभ्रमात पडणे, आयोगाने कोणतीही पूर्व कल्पना न देता नवीन अभ्यासक्रम लागू करण्याचे घोषित करणे, आयोगाने पुर्नविचार करावा अशी मागणी विद्यार्थ्यांकडून होत असणे, पुर्नविचार न केल्यास सदर निर्णयामुळे लाखो विद्यार्थ्यांवर अन्याय होणार असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झाल्याने शासनाने तातडीने लक्ष देऊन विद्यार्थ्यांना न्याय देण्याची आवश्यकता, यावर शासनाची भूमिका."

१२०. ४२७ **श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील वि.प.स.** कित्ता

"सोलापूरहून, तिरुपती, मुंबई, पुणे, हैद्राबाद, दिल्ली, चेन्नई, बंगळुर शहरात येणाऱ्या जाणाऱ्यांची संख्या अधिक असणे, त्यादृष्टीने सोलापूर जिल्ह्याच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय विमानतळाची आवशकता असणे, सद्या अस्तिवात असलेल्या होटगी रोड विमानतळाचा जागेअभावी विस्तार करणे शक्य नसणे, परिणामी २००४ साली बोरामणी नाका परिसरात ६०० हेक्टर क्षेत्रावर आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित करण्यात येणे, २००४ साली संबंधित विमानतळाला मंजुरी देऊन २००८ साली विमानतळाचे भुमिपुजन करण्यात येणे, विमानतळासाठी लागणाऱ्या ५४९ हेक्टर जमिनीचे संपादनही पूर्ण झालेले असणे, अजुन ४१ हेक्टर जमीनीचे भुसंपादन करण्यात येत असणे, विमानतळासाठी अधिग्रहण होत असलेल्या बोरामणी व तांदुळवाडी या दोन गावांचा नकाशा एकत्र केल्याने या नकाशामध्ये काही गट नंबर नसल्याने त्या गटातील जमीनींचे अधिग्रहण रखडलेले असणे, याच गटातील जमिनी प्रस्तावीत विमानतळाच्या धावपट्टीत येत असल्याने त्यातील सुमारे २९.९४ हेक्टर क्षेत्राचे अधिग्रहण करणे आवश्यक असणे, नियोजित विमानतळाच्या आराखड्यात वनविभागाकडील ३३.७२ हेक्टर जमिनीची आवश्यकता असणे, संबंधित जमीन दुर्मिळ माळढोक अभयारण्यासाठी राखीव असणे,

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | त्याच्या निर्वनीकरनाचा प्रस्ताव नागपुर वनविभाग कार्यालकडे पाठवण्यात येणे, नान्नज येथील माळढोक अभयारण्यात मादी पक्षाचे वास्तव्य असून तिच्या सुरक्षिततेसाठी निर्वनीकरण मंजूर होऊ शकत नसल्याने या वनजमिनीच्या निर्वनीकरणाचा वनविभागाकडे पाठवलेला प्रस्ताव वनखात्याच्या प्रादेशिक अधिकार समितीने फेटाळला असणे, वन विभागाच्या नागपूर कार्यालयाने निर्वनीकरणाचा प्रस्ताव फेटाळल्याने महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणासमोर नवीन अडचण निर्माण झाली असणे, एकुणच महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरणाने प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करून परिपूर्ण पुर्निविलोकन व पुनःविचारासाठी नागपूर कार्यालयास पाठवण्याची गरज, निर्वनीकरण, जमीन अधिग्रहण करण्यात येत असलेल्या अडचणी, निधीची कमतरता यामुळे बोरामणी येथील प्रस्तावित विमानतळाचे काम रखडलेले असणे, यामुळे सोलापुर जिल्ह्याच्या विकासाला येत असलेल्या मर्यादा, उद्योजक, व्यापारी, यात्रेकरु यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे बोरामणी विमानतळाच्या कामाला गती देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१२१.** | **७३६** | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.** | कित्ता | |
| | | "राज्यात सरासरी चार दिवसाला एका पत्रकारावर हल्ला होणे त्यामुळे राज्यात पत्रकारांना निर्भयपणे आणि निपक्षपातीपणाने काम करणे अवघड होणे, राज्यात पत्रकार संरक्षण कायदा झाल्यावर २०० पेक्षा पत्रकारांवर हल्ले होणे, मात्र केवळ ३७ आरोपींवर या कायद्याखाली गुन्हे दाखल होणे त्यामुळे या कायद्याची कठोर अंमलबजावणी व्हावी व गंभीर प्रकरणातील | | |

खटले जलदगती न्यायालयात चालवावेत अशी पत्रकारांतून मागणी होत असणे, याशिवाय पत्रकारांवर खंडणी व अन्य प्रकारचे खोटे गुन्हे दाखल करण्याचे प्रकार वाढले असणे, हे थांबविण्यासाठी गुन्हा दाखल करण्यापूर्वी त्याची सत्यता वरिष्ठ अधिका-यांकडून त्यासाठी आणि नंतरच गुन्हा दाखल व्हावा अशीही मागणी असणे मागील आठ वर्षापासून अधिस्विकृती समित्या अस्तित्वात नाही ते नेमल्या जाव्यात पत्रकार सन्मान योजनेचे नियम शिथिल करावेत पत्रकार आरोग्य योजनेचा लाभ मिळावा, याशिवाय शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण योजनेतील ठेव १००/- कोटी करावी अशी राज्यातील पत्रकारांची मागणी असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी राज्यातील पत्रकारांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया."

**१२२. १५७ श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.** कित्ता

"महानिर्मिती, महापारेषण आणि महावितरण कंपन्यांनी २०२३-२४ व २०२४-२५ या वर्षासाठी जवळपास ३७ टक्के वीज दरवाढीचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे सादर करणे, सदरील वीज दरवाढीमुळे महागाईवर, राज्यात येणाऱ्या उद्योगधंद्यावर परिणाम करणारे असणे, महावितरणाचे औद्योगिक, घरगुती, व्यापारी व कृषिपंप वीज सध्याचे दर हे देशात सर्वात जास्त असणे, इतके जास्त दर असूनही इतकी प्रचंड दरवाढ करण्याचा प्रस्ताव राज्यातील सर्व सर्वसामान्य घरगुती व व्यावसायिक वीज ग्राहकांना प्रचंड शॉक देणारा असणे, उद्योगांना देशातंर्गत व जागतिक पातळीवर स्पर्धा करावयाची असते, आजच्याच इंधन समायोजन आकारामुळे अडचणीत असलेले उद्योग पुन्हा दरवाढ झाल्यास स्पर्धेत टिकुच शकणार नाही असे असणे, त्यामुळे प्रस्तावित वीज दरवाढ राज्यात येऊ घातल्यास उद्योगांना

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | रोखणारी आणि सध्या राज्यात असलेल्या उद्योगांना राज्याच्याबाहेर ढकलणारी असणे, शेतीचा विकास महत्वाचा असणे, कंपनीची अवाढव्य दरवाढीची मागणी शेती क्षेत्राला व शेतक-यांना अधिक आर्थिक संकटात टाकणारी असणे, महावितरणाने प्रस्तावित केलेल्या दरवाढीचे राज्याच्या हितावर आणि विकासावर अत्यंत गंभीर व घातक परिणाम करणारी असणे, त्यामुळे शासनाने वीज दरवाढीबाबत शासनाने आपली भुमिका स्पष्ट करून करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१२३.** | **३१२** | **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. रमेशदादा पाटील, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे **वि.प.स.**<br>"मौजे कांजूर ता.कुर्ला जि. मुंबई उपनगर येथील सिटी सर्व्हे न. ११, ११/१, ११/२, १४ व ६१ या मिळकतीमधून उच्चदाब विद्युत वाहक तारा व टॉवर उभारण्यात आलेले असणे, सदरचे टॉवर उभारतांना व उच्चदाब विद्युत वाहक लाईन साठी या मिळकतीतील क्षेत्राचे संपादन करण्यात आले असणे, यामध्ये ही जागा बाधित झालेली असणे, बाधित क्षेत्राच्या मोबदल्यात नुकसान झालेल्या क्षेत्रासाठी जमीन मालकांना नुकसान भरपाई देणे आवश्यक असणे, मात्र सदर नुकसान भरपाई देण्याकरिता टाटा पावर कंपनीकडून दिरंगाई व टाळाटाळ केली जात असणे, त्यामुळे नुकसानग्रस्त जागा मालकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झालेला असणे, बाधित जमिनीचा मोबदला देण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |

१२४. १५८ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** श्री. सचिन अहिर, श्री. अमोल मिटकरी, श्री. शशिकांत शिंदे, श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण, श्री. अंबादास दानवे, श्री. अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव **वि.प.स.** कित्ता

"राजापूर (जि.रत्नागिरी) येथील "महानगरी टाइम्स" चे पत्रकार शशिकांत वारिशे यांनी ५ फेब्रुवारी, २०२३ रोजी रिफयनरीसमर्थक पंढरीनाथ आंबेरकर यांच्याविरोधात बातमी प्रसिद्ध करण्यात येणे, त्यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी आंबेकर यांनी आपल्या गाडीने दुचाकीवर असलेल्या वारिशे यांना चिरडणे, कोल्हापूर येथे उपचार घेत असताना वारिशे यांचा ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी दुर्दैवी मृत्यू होणे, अपघाती मृत्यू म्हणून पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा नोंदविण्यात येणे, नाणार रिफायनरीविरोधात बातमी लिहिणाऱ्या पत्रकाराची हत्या झाल्याने राज्यभरातील पत्रकार संघटनांनी याचा तीव्र निषेध करीत तहसील, जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात येणे, कोकणात येऊ घातलेल्या रिफयनरीच्या विरोधात शशिकांत वारिशे सातत्याने आवाज उठवत असणे, याबाबत लिखाण करीत असणे, रिफायनरीचे समर्थक म्हणवून घेणारे गुंड प्रवृत्तीचे लोक त्यांना धमक्या देत असणे, रिफायनरीला कोकणातील जनतेचा विरोध असणे, शशिकांत वारिशेसारखे पत्रकार रिफायनरीच्या विरोधात लोकांना जागृत करीत असणे, त्यांची हत्या होणे ही महाराष्ट्राच्या पुरोगामी प्रतिमेस कलंक लावणारी गोष्ट असणे, वारिशे यांची हत्या संशयास्पद असणे या हत्येमागील कोणाचे हितसंबंध आहेत हे उघड होणे गरजेचे असणे या प्रकरणाचा मास्टरमाइंड कोण आहे हे जनतेसमोर येणे गरजेचे असल्याने या प्रकरणाची एसआयटीमार्फत चौकशी करून आंबेरकर यांच्यावर खुनाचा गुन्हा दाखल करून मारेकऱ्यास फाशीची शिक्षा देण्याची होत असलेली पत्रकार व जनतेची मागणी त्यानुसार शासनाने याप्रकरणी तातडीने करावयाची कारवाई व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१२५.** | **५३८** | **श्री. एकनाथराव खडसे वि.प.स.**<br>“जळगांव जिल्ह्यातील अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर कारवाई करतांना दि. ४ जानेवारी, २०२३ रोजी शासनाच्या बैठे पथकातील अधिकाऱ्यावर केलेला जीवघेणाहल्ला, यासंबंधात संबंधीत तलाठ्याने निंभोरासिम पोलिस स्टेशनला दिलिप मुनेरे व त्यांचे सोबत असणारे १० सहकारी यांचे विरुद्ध गुन्हा दाखल करणे, गुन्हा दाखल करून सुद्धा अद्यापही मुनेरे व त्यांच्या साथीदारांविरुद्ध कारवाई न केल्यामुळे तेथील नागरिकांत व शासकीय कर्मचाऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष, वाळू तस्काराविरुद्ध एम पी डी ए नुसार कारवाई करून व त्यांना कायद्याची भिती दाखवल्यास यापुढे अशी अवैध कृती करणाऱ्यास कुणी धजावणार नसल्याने या वाळू तस्कराविरुद्ध त्वरीत कारवाई करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | कित्ता | |
| **१२६.** | **७१६** | **श्री. शशिकांत शिंदे वि.प.स.**<br>“सातारा जिल्ह्यातील नीलम सोमनाथ बेंद्रे, राहणार- नागठाणे (तालुका सातारा) या गर्भकाळाच्या पहिल्या महिन्यापासून घाडगे रुग्णालयात नागठाणे येथे गर्भधारणेबाबत उपचार घेत असणे, उपचार घेत असताना ९ व्या महिना सुरू असताना दि. १/०२/२०२३ रोजी त्यांना पोटात दुखू लागल्याने त्या उपचार घेत असलेल्या घाडगे रुग्णालय नागठाणे (जि.सातारा) येथे सकाळी ९.१५ वाजता वैद्यकीय सल्ला व उपचार घेण्यासाठी रुग्णालयात दाखल होणे, परंतु गेले असतां तिथे डॉक्टर उपस्थित नसल्याने रुग्णालयातील कंपाऊंडरने डॉक्टर म्हणून प्रकरणार्थी श्रीमती निलम बेंद्रे यांची प्रसुती उपचार करण्यात येणे, तथापि रुग्णालयातील | कित्ता | |

कंपाऊंडर (श्री. निलेश घाडगे) हे स्त्रीरोग तज्ञ नसताना अपुऱ्या ज्ञानाच्या आधारे त्यांनी गर्भवती महिलेची प्रसुती प्रक्रिया करण्यांत येणे, तथापि त्याबाबतचे कोणतेही ज्ञान नसताना आरोपीने केलेल्या या प्रक्रियेत बाळ दगावल्याची दुर्घटना घडणे, याबाबत रुग्णालयाचे मुख्य डॉक्टर व अन्य आरोपी विरोधात दि.७/३/२०२३ रोजी बोरगाव पोलीस ठाणे, जि.सातारा येथे तक्रार नोंदविण्यात येणे, परंतु अद्याप पोलिसांनी कोणतीही कारवाई करण्यांत न येणे, उलटपक्षी आरोपीला वाचविण्याचा पोलिसांकडून जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यांत येत असून तेथील एपीआय तेलतुंबडे हे गुन्हेगारांस पाठीशी घालत येत असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी, बेंद्रे कुटुंबिय व नागठाणे येथील नागरिकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याचे भावना, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

**१२७. ७५५ श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.** कित्ता



"मुंबईतील आयआयटीतील दलित विद्यार्थी दर्शन सोलंकी या विद्यार्थ्याने दिनांक २२ फेब्रुवारी २०२३ रोजी आत्महत्या करणे, जातीय भेदभावातूनही आत्महत्या झाल्याचा त्यांच्या कुटुंबाचा आरोप असणे, तसेच हे प्रकरण दडपले जात असल्याचेही त्यांचे म्हणणे असणे, या विद्यार्थ्याने आत्महत्या केल्यानंतर प्रक्रियेनुसार त्याचे शव विच्छेदन झाले नसणे, शवविच्छेदनासाठी त्याच्या कुटुंबाकडून संमती घेण्यात आलेली नसणे, तसेच त्याचे कुटुंबीय येण्यापूर्वीच शव विच्छेदन करण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणात संशय बळावत असणे, त्यामुळे या विद्यार्थ्याच्या आत्महत्येची सखोल चौकशी होऊन दोषींवर रॅगिंग, अॅट्रॉसिटी कायद्यान्वये कारवाई व्हावी यासाठी या विद्यार्थ्याचे कुटुंबीय, विविध संस्था, संघटना, विद्यार्थी आंदोलने करीत असतानाही त्याकडे शासन करीत होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यातील तमाम दलित समाजात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना याबाबत राज्य शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१२८.** | **३४** | **श्री. विक्रम काळे,** श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. अभिजित वंजारी, श्री. जयंत आसगावकर, श्री. राजेश राठोड, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री. अमोल मिटकरी, श्री. शशिकांत शिंदे, श्री. सत्यजीत तांबे, श्री. किशोर दराडे, श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.**<br>"राज्यामध्ये दि. १ नोव्हेंबर, २००५ रोजीपासून सेवेत आलेल्या शिक्षक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी व त्यानंतर एनपीएस पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, सन २००५ पासून आजपावेतो १७ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनदेखील अनेकांची पेन्शन खाती न उघडणे, ही नवीन पेन्शन योजना शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या हिताची नसणे, राज्यभरातून शिक्षक तसेच शासकीय, निमशासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना मिळावी यासाठी वेळोवेळी आंदोलन करणे, नोकरी हा एकमेव आधार व उत्पन्नाचे साधन असल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर एक मोठा आधार जुन्या पेन्शनचा असणे, सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत पंजाब, झारखंड, राजस्थान व हिमाचल प्रदेश इत्यादी राज्य सरकारांनी निर्णय घेणे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात एनपीएस पेन्शन योजनेऐवजी सन १९८२ ची जुनीच पेन्शन योजना आमचे सरकार देणार, अशी उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी जानेवारी, २०२३ च्या शिक्षक–पदवीधर निवडणूकीमध्ये करणे, तरीही जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अद्यापही शासनाने कोणताच निर्णय न घेणे, या गंभीर परिस्थितीवर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | कित्ता | |

**१२९.** **४२४** **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** किता

"राज्याच्या सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पामध्ये ६ लाख ४६ हजार ५३६ कोटी रुपयांची तरतूद तत्कालीन महाविकास आघाडीच्या सरकारने केलेली असणे, विद्यमान सरकारच्या काळात तरतूद करण्यात आलेल्या निधी पैकी ४७ टक्के निधीच खर्च करण्यात आला असुन ५३ टक्के निधी खर्च करण्यात आलेला नसणे, राज्यातील विकासकामे निधी अभावी प्रलंबित असतानाही सदर कामांना शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येत नसल्याने त्याचा परिणाम राज्याच्या विकासकामांवर होत असून परिणामी राज्यात बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले असणे, राज्याच्या अर्थसंकल्पात प्रत्येक विभागाला मंजूर केलेल्या निधी पैकी पर्यटन व सांस्कृतिक विभागाने १५.६४ टक्के, गृहनिर्माण विभागाने १६.०४ टक्के, पर्यावरण विभागाने १७ टक्के, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने १७.६५ टक्के, नियोजन विभागाने १७.०८ टक्के, उद्योग व ऊर्जा विभागाने १७.०९ टक्के निधी अद्यापपर्यंत खर्च करण्यात आलेला असणे, तत्कालीन महाविकास आघाडीच्या सरकारने मंजूर केलेल्या विकासकामांना विद्यमान सरकारने स्थगिती दिल्याने अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेल्या निधीच्या खर्चावर परिणाम झालेला असणे, ग्रामीण व शहरी भागातील कामांना स्थगिती दिल्याने उद्योग धंद्यांसाठी आवश्यक असलेल्या मूलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध होत नसल्याने राज्यात येणारे उद्योगधंदे हे बाहेरील राज्यात जाण्याचे प्रमाण वाढलेले असणे, परिणामी स्थानिक जनतेमध्ये शासनाप्रती नाराजीची भावना निर्माण झालेली असणे, राज्याच्या विकासाला गती मिळण्यासाठी विकासकामांना देण्यात आलेली स्थगिती उठवून त्यांना निधी वितरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| **१३०.** | **८७** | **ॲड. अनिल परब,** श्री. अंबादास दानवे **वि.प.स.**<br>"मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी सन २०२२ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची गंभीर बाब माहे डिसेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, सदरहू प्रकल्पासाठी २०१८ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये सेकलिंक टेकनॉलॉजी कंपनी सर्वात जस्त म्हणजेच रुपये ७२०० कोटी रुपयांची बोली लावत प्रथम क्रमांकावर असणे तर अदानी समुह दुसऱ्या क्रमांकावर असणे, तथापि सदरहू प्रकल्पासाठी रेल्वेची अतिरिक्त ४५ एकर जमीन उपलब्ध झाल्याचे सांगून सन २०१८ मधील निविदा प्रक्रिया रद्द करणे, राज्य शासनाद्वारे अशाप्रकारे मनमानी पद्धतीने व कुहेतूपूर्वक सन २०१८ मधील निविदा प्रक्रिया रद्द करणे म्हणजे राज्य शासनाने प्रॉमिसरी एस्पॉटल नैसर्गिक न्यायाचे तत्त्वांचे भंग झाला असल्याचे कायदे तज्ज्ञांचे म्हणणे असणे, सन २०२२ मध्ये नव्याने राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेमध्ये सेकलिंक टेक्नोलॉजी कंपनीला सहभागी होता येणार नाही यादृष्टीने निविदेच्या व अटींमध्ये व शर्थीमध्ये बदल करणे, त्यामुळे सन २०२२ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत अदानी समूहाने रुपये ५०६९ कोटी रुपयांची बोली लावत प्रथम क्रमांक असणे, परिणामी सन २०१८ मध्ये राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेत सेकलिंक टेक्नोलॉजी कंपनीने रुपये ७२०० कोटींच्या बोलीच्या तुलनेत अदानी समूहाच्या रुपये ५०६९ कोटींच्या प्राप्त बोलीमुळे राज्य शासनाचे २१३१ कोटी रुपयांचे नुकसान होणे, सदरहू निविदेमध्ये शासन निर्णय विकास नियंत्रण नियमावली यात फेरबदल करण्यात न येणे, पुनर्विकासानंतर राहत्या जागेत घर मिळण्याची शक्यता कमी असणे, | कित्ता | |

तसेच सभासदांना मोफत पार्किंग व जेथे आहे त्याच ठिकाणी संक्रमण शिबिर बांधून त्यांचे स्थलांतरण करण्यात येणार नसणे, कॉरपस फंड २००० प्रति चौ.फू. न मिळणे, पुनर्विकास झाल्यानंतर घर मालकी हक्काने देण्यात येणार नसणे, तसेच व्यावसायिक गाळेधारकांचा पुनर्विकास नियमाप्रमाणे न होणे, सदरहू पुनर्विकास प्रकल्प राबविताना, मूळ रहिवाशांना विश्वासात न घेणे, त्यांचे म्हणणे ऐकून न घेणे, अदानी उद्योग समूहाची घसरलेली विश्वासार्हता व त्यामुळे धारावीतील जनतेच्या मनात पुनर्विकासाबाबत निर्माण झालेली साशंकता परिणाम स्थानिकांमध्ये. शासनाविषयी प्रचंड नाराजी असणे. सदरहू प्रकल्प शासनाचा व स्थानिक जनतेच्या हिताचा होईल या दृष्टीने सन २०२२ मध्ये काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

**१३१.** **२४५** **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** कित्ता

“मौजे गुंदवली, अंधेरी, मुंबई येथील न.भू.क्र. २६६ (१ ते १७२) झोपडपट्टी पुनवर्सन योजनेंतर्गत तयार असलेल्या इमारतीतील पी.ए.पी. अंतर्गत असलेल्या सदनिका प्राधिकृत मंडळाने योजनेबाहेरील व्यक्तींना विकल्या असल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ च्या तिसऱ्या आठवड्यात उघडकीस आलेली असणे, या इमारतीच्या जागेवर प्रकाशवाडी एस. आर. ए. गृहनिर्माण संस्थेतर्फे ओमकार रियल्टी डेव्हलपर्समार्फत निष्कासित केल्यानंतर तेथे १५ मजली इमारती तयार करण्यात आलेल्या असणे, या इमारती तयार केल्यानंतर त्यात पी.ए.पी.च्या सदनिका झो.पु. प्राधिकरणाचे सी.ई.ओ.यांनी आपल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संगनमताने आर्थिक व्यवहार करून खोटी कागदपत्रे तयार करून इतर विभागातील नागरिकांना विकलेल्या असून लाखो रुपयांची कमाई केलेली असणे, या प्रकल्पातील अधिकृत व पात्र झोपडीधारकांना सदनिकाविना ठेऊन इतर विभागातील नागरिकांना पी.ए.पी. च्या सदनिका

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विकल्याने झोपडपट्टीधारकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, या प्रकल्पातील अधिकृत व पात्र झोपडीधारकांना सदनिका त्वरीत वितरीत करून या प्रकल्पातील पी.ए.पी. सदनिकांच्या विक्री घोटाळ्यामध्ये सामील असलेल्या झो.पु. प्राधिकरणाचे सी.ई.ओ. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका." | | |
| **१३२.** | **२५८** | **श्रीमती उमा खापरे,** श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. रामदास आंबटकर **वि.प.स.**<br>"मुंबई महारेरा कायद्यानुसार प्रकल्पाची बंधनकारक माहिती अद्यावत करणार नाहीत अशा एकोणीस हजारहून अधिक विकासकांना महारेराने कारणे दाखवा नोटीस पाठवले असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या सर्व विकासाकांना त्रुटीची पूर्तता करण्यासाठी नोटीस मिळाल्यापासून ३० दिवसांच्या कालावधी देण्यात आला असणे, त्यामूळे या प्रकल्पातील सन २०१७ -१८ ते २०२१- २२ अशा पाच वर्षातील माहिती सादर करावयाचे असणे यामुळे प्रकल्पातील किती सदनिका प्लॉट्स विकले गेले याची माहिती संकेतस्थळावर टाकणे अनिवार्य केल्याने ग्राहकाला याचा दिलासा मिळणार असणे, यावर शासनाने करावयाची योजना उपाययोजना व कार्यवाही." | कित्ता | |
| **१३३.** | **३२८** | **श्री. कपिल पाटील वि.प.स.**<br>"शासनामार्फत सन २०११ पर्यंतच्या पात्र झोपड्यांना संरक्षण देण्यात येणे, अनेक झोपडीधारक या धोरणांतर्गत पात्र असून देखील आजतागायत त्यांना सदनिका न मिळणे, तसेच सशुल्क | कित्ता | |

पुनर्वसनासाठीची रक्कम निश्चित झालेली नसणे, यामुळे मुंबई शहर व उपनगरातील अनेक झोपडीधारक बेघर असणे, मानवतेच्या दृष्टीकोनातून पुनर्वसनाची किंमत ठरेपर्यंत पात्र रहिवाशांना घरे देण्याची मागणी जोर धरत असणे, गोरेगाव (प.) येथील लिंकरोडवरील देवी कन्याकुमारी गृहनिर्माण संस्थेचे झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत सन १९९९साली पुनर्वसन झालेले असणे, सदर संस्थेत झोपडीधारक वास्तव्यास असताना विकासक मे. दत्ताणी कन्सस्ट्रक्शन कडून देवीकन्याकुमारी गृहनिर्माण सोसायटीच्या नावाने आजही चुकीच्या कागदपत्रांच्या आधारे परिसरातील सोसायट्यांच्या योजना राबवत असल्याचे निदर्शनास येणे, परिशिष्ट-२मध्ये देवीकन्याकुमारीच्या नावाने असणे, संपूर्ण भगतसिंग नगर १, २ व ३ तसेच इंदिरानगर, गोरेगाव (प.) मधील बहुतांश झोपडीधारकांची नावे देवीकन्याकुमारी प्रकल्पात दाखवलेली असणे, या सर्व प्रकारामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष असल्याची भावना, याबाबत शासनाने दखल घेऊन तातडीने करावयाची उपाययोजना, केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**१३४.** **६५१** **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** कित्ता

"संभाजीनगर महापालिका क्षेत्रात प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी सुमारे साडे चार हजार कोटी रुपये खर्चून सात ठिकाणी तब्बल ३९ हजार ७६० सदनिका बांधण्यात येणार असणे, सदरहू योजनेअंतर्गत हर्सुल, पडेगाव, तिसगाव येथे १९.२२ हेक्टर क्षेत्रावर घरे बांधण्यात येणार असून उक्त योजनेसाठी दिनांक १७ फेब्रुवारी, २०२२ रोजी पालिकेने निविदा प्रक्रिया राबविली असणे, तदानुषंगाने दिनांक १९ मार्च २०२२ रोजी में समरथ कन्स्ट्रक्शन या कंपनीस यांना घरे बांधणीसाठी इरादापत्र दिले असणे, मात्र, त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाकडून याच योजनेसाठी पालिकेला सुंदरवाडी, चिकलठाणा, या ठिकाणी तीन भूखंड दिले असणे, सदरहू ठिकाणी नव्याने निविदा प्रक्रिया न राबवता

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | पालिकेने वाटाघाटी अंती दिलेल्या इरादापत्राच्या आधारे संबंधित ठेकेदाराने हर्सुल, पडेगाव, तिसगाव सुंदरवाडी आणि चिकलठाणा या सात ठिकाणी ३९ हजार ७६० सदनिका बांधण्याचा प्रकल्प अहवाल तयार केला असून त्यास राज्य व केंद्र शासनाने मान्यता दिली असणे, त्यामुळे ३९ हजाराहून अधिक घरांचा आराखडा मंजूर करून घेण्यात आला असूनही प्रत्यक्षात या ठिकाणी केवळ १५ ते १७ हजार घरेच उभारली जाणार असणे, तसेच संबंधित ठेकेदाराने मागील ५ वर्षात ५५७ कोटी रुपयांच्या कामाचा अनुभव असल्याचे नमूद केले असून त्याची क्षमता नसतानाही त्याला ४ हजार ६२४ कोटींचे काम देण्यात आले असून प्रकल्पात ठेकेदाराच्या आर्थिक व भौतिक आणि तांत्रिक क्षमतेचा विचार न करताच महानगरपालिकेने वाढीव काम दिलेले असणे, त्यामुळे उक्त कामात विकासकाने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठ्याप्रमाणात भ्रष्टाचार केला असल्याचे निदर्शनास येणे, उक्त बाबीकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांच्या मनात शासनाप्रती निर्माण झालेली असंतोषाची भावना, उक्त प्रकरणी चौकशी करून महानगरपालिकेच्या अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१३५.** | **७०९** | **श्री. सचिन अहिर वि.प.स.** | कित्ता | |
| | | " पुणे, ठाणे व कल्याण आदि शहरातील जुन्या इमारती, ऐतिहासिक वाडे व कोळीवाडे यांच्या पुनर्विकासाबाबत अनेक वर्षापासून प्रश्न शासन दरबारी प्रलंबित असणे, त्याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करूनही शासन स्तरावर कोणताच निर्णय न होणे, याचबरोबर | | |

मुंबई इमारत व पुनर्रचना मंडळ(म्हाडा) यांनी पुर्नविकासासंदर्भात नुकताच काढलेल्या शासन निर्णयात असलेल्या त्रुटी, परिणामी इमारतीचा पुनर्विकास खोळंबला असणे, तसेच खाजगी तसेच एनटीसी गिरण्यांच्या चाळीमध्ये गेल्या दोन पिढ्या म्हणजेच ५० वर्षांपेक्षा जास्त वास्तव्य करीत असलेल्या भाडेकरुंच्या इमारतीचे पुर्नवसन रखडलेले असणे, सद्य:स्थितीमध्ये एनटीसी गिरण्यांच्या चाळीची अवस्था अत्यंत बिकट असून कोणत्याही क्षणी कोसळून मोठी जिवीतहानी होण्याची शक्यता, वाडे, कोळीवाडे, तसेच खाजगी व एनटीसी गिरण्यांच्या चाळीचे पुर्नविकास करण्यास शासनाचे उदासिन धोरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालणे, गिरण्यांच्या चाळीचा पुनर्वसन बीडीडी चाळीच्या धर्तीवर करीत असतांना मुद्रांक शुल्कात नाममात्र सवलत देऊन पुनर्विकास करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कामगारांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

१३६. १८३ **श्री. चंद्रशेखर बावनकुळे वि.प.स.** कित्ता

"नागपूर शहरासाठी पाणीपुरवठा व सिंचनासाठी पाणी मागील २८ वर्षापासून तोतलाडोह धरणातून होत असणे, मध्यप्रदेश शासनाने पेंच नदीवर चैराई येथे धरण बांधल्यामुळे पेंच जलविद्युत प्रकल्प व तोतलाडोह धरणात येणाऱ्या पाण्यात घट झाल्याने तोतलाडोह धरणाच्या पाणीसाठ्यात व सिंचनात लक्षणीय घट येवून नागपूर शहराचा पाणीपुरवठा प्रभावित झालेला असणे, नागपूर शहरातील पाणी तुटीच्या गंभीर समस्येवर कायमस्वरूपी मात करण्यासाठी लोहघोगरी तोतलाडोह वळन योजनेचा (टनेल) प्रकल्प कार्यान्वीत करणे हेतू दिनांक १८ सप्टेंबर २०१९ ला जलसंपदा विभागामार्फत शासन निर्णयद्वारा प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असणे, यानुसार मध्यप्रदेशातील लोहघोगरी गावाजवळ कन्हान नदीमधून

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | ६२ कि.मी. लांबीच्या बोगदयाद्वारे १० अब्ज घन फुट पाणी तोतलाडोह धरणात वळविण्याच्या या वळन योजना प्रकल्पाला ३६१२ कोटी रू. किंमतीस दोन टप्प्यास मान्यता दिलेली असणे, त्यानुसार सर्व प्रकारच्या वैधानिक मान्यता घेणे, मध्यप्रदेष शासनाची सहमती करून सामंजस्य करारनामा करणे ईत्यादी बाबींकरीता १७.५५ कोटी रू. पहिला टप्प्यात खर्च केलेला असुन सबंधित नेमलेल्या एजेंसी ला अदा केलेला असणे, २०१९ ते २०२२ पर्यंत अद्यापही पहिला टप्पा नुसार वैधानिक मान्यता सुद्धा प्राप्त न झाल्याने वळन योजनेचे काम सुरू झालेले नसने त्यामुळे नागपूर शहराचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न बिकट होत चालला असने, प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष व उदासीनतेमुळे प्रकल्पासाठी लागणारी आवश्यक अनुमती सुद्धा घेतली नसणे त्यात वनविभागाअंतर्गत येणाऱ्या जागेची अनुमती खोळंबलेली असने, यात बोगद्यातून अपेक्षीत १०० घनफुट पाण्याद्वारे तोतलाडोह जलविद्युत प्रकल्पातून होणाऱ्या एकुण १०५ दशलक्ष युनीट विजनीर्मिती पैकी मध्यप्रदेशाला ७०.४० दशलक्ष युनीट विज कोणताही अतिरिक्त खर्च न करता मिळत असणे सोबतच बोगद्याद्वारे प्रवाही पद्धतीने पाणी वळवीणे प्रस्तावित असल्याने अतिरिक्त उर्जेची विद्युत पुरवठाची आवश्यकता नसने, १९/०३/२०२० ला अन्वये शासन निर्णयानुसार पेंच प्रकल्पाचे फेरपाणी नियोजनास सुद्धा मान्यता आलेली असणे, सदर योजना अतिमहत्वाची असुन सुद्धा अद्यापही प्रकल्पाच्या बांधकामाला सुरूवात न झाल्याने पहिल्या टप्प्यात केलेला सर्व खर्च वाया जावून नागपूर शहराला प्रभावित होत असलेला पाणीपुरवठा केव्हा होईल याबाबत प्रश्न निर्माण होवून आर्थिक दृष्ट्या परिपूर्ण असलेला वळण योजनेचा प्रकल्प पूर्ण करण्याच्या निर्धार शासन | | |

करणार की नाही असा प्रश्न नागपूर शहरवासीयांना पडल्यामुळे शासनाप्रती रोष निर्माण होवून संतापाची लाट निर्माण होत असणे, त्यामुळे तातडीने आवश्यक वैधानिक परवानगी प्राप्त करून वळन योजनेचे काम सुरू करून नागपूर शहराला पाणीपुरवठा करणेबाबत शासनाची अति महत्त्वाची व संवेदनशीलतेची प्रशासनीक कार्यवाही व प्रतिक्रिया."

१३७. ४२५ **श्री. आमश्या पाडवी वि.प.स.** कित्ता

"अक्कलकुवा तालुक्यातील (जि. नंदुरबार) अतिदुर्गम भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी व ग्रामस्थांना कायम स्वरूपी पाणी उपलब्ध व्हावे याकरिता देहली व रामपूर हे धरण प्रस्तावित असणे, त्यापैकी देहली धरणास सन १९७९ मध्ये रु. ३९५ लक्ष इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता मिळालेली असून काम कायम रखडत आल्याने त्याचा खर्च आजतोवर २४६ कोटी झालेला असणे, उपरोक्त नमूद खर्च होऊन देखील वितरिकेचे काम अपूर्ण असल्याने प्रत्यक्षात सदर धरणाचा लाभ हा स्थानिक शेतकऱ्यांना व ग्रामस्थांना उपलब्ध झाला नसल्याने धरण निर्मितीचा मूळ हेतू साध्य होणे, परिणामी अतिदुर्गम भागातील आदिवासी समाजात वाढता असंतोष, हीच परिस्थिती रामपूर धरणाच्या बाबतीत असणे, सदर रामपूर धरण हे सन १९९९ साली मंजूर होऊन देखील अद्याप पर्यंत फक्त ५० % काम पूर्ण झालेले असणे, सदर धरणचे काम करणाऱ्या कंत्राटदारास त्याचे देयक अदा झालेले नसतानाही त्याची काम करण्याची तयारी असणे, या धरणास पूर्णत्वाकडे नेण्याबाबत स्थानिक प्रशासन, जिल्हाधिकारी व जलसंपदा विभागातील उच्च पदस्थ अधिकारी यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, तसेच सदर धरणाच्या बाबतीतही कोट्यवधींचा निधी खर्च होऊन देखील प्रत्यक्ष लाभ उपलब्ध होत नसल्याने स्थानिक स्थरावर रोष असणे, या प्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १३८. | ४८१ | **श्री. शशिकांत शिंदे वि.प.स.** "कोल्हापूर जिल्ह्यातील कोरेगांव विधानसभा मतदारसंघातील दुष्काळी भागाला वरदान ठरणाऱ्या जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून कोरेगांव, खटाव या तालुक्यातील काही भागातील कायम दुष्काळी गावांना पाणी मंजूर करण्यात आलेले असणे, त्यावेळेला रामोशीवाडी, शेल्टी, खिरखिंडी या गावांना टँकरने पाणीपुरवठा करावा लागत असणे, याला पर्याय म्हणून वर्धनगड बोगद्याचे काम सुरू असताना रामोशी तलावात पाणी सोडण्यासाठी व त्यातून शेतीसाठी व पिण्याच्या पाण्यासाठी निर्णय घेण्यात येऊन काम सुरू करण्यात आलेले असणे, या कामाला प्रशासकीय मंजुरी घेण्याबाबतच्या सूचना संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या असणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन तेथील लोकांवर होत असलेला अन्याय दूर करण्याबाबत निर्णय घेण्याची आवश्यकता, आतापर्यंत या गावासाठी पाणी सोडणे सुरू होते, परंतु, अचानक पाणी सोडणे बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यामुळे तेथील जनमानसात पसरलेला तीव्र असंतोष, जिहे कठापूर उपसा सिंचन योजनेतून वर्धनगड बोगद्याच्या माध्यमातून दाभहरण कुंडाच्या असणाऱ्या स्कोअर वॉल मधूनरामोशीवाडी, भाटमवाडी, शेल्टी, खिरखिडी, एकांबे या गावांना पिण्यासाठी तसेच शेतीसाठी विशेष बाब म्हणून पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | कित्ता | |
| १३९. | ६० | **श्री. विक्रम काळे वि.प.स.** "लातुर जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत शासनाच्या विविध योजना राबविण्यात येत असल्याचे व त्यासाठी शासनाकडून वेळोवेळी निधी उपलब्ध केला जात असणे, त्यानुसार जलयुक्त | कित्ता | |

शिवार योजनेअंतर्गत मिळालेल्या शासन निधीपैकी रुपये २२ कोटी ८७ लाख ६२ हजार २५ इतका निधी तेथील अव्वल कारकून यांनी अधिकाऱ्याच्या बनावट स्वाक्षरी करून स्वतःसह, भाऊ व भावाच्या दुकानातील कर्मचाऱ्याच्या खात्यावर निधी परस्पर वळवून जिल्हाधिकारी कार्यालयातील श्री. मनोज नागनाथ फुलेबोयने, अव्वल कारकून (पेशकार) यांनी गैरव्यवहार केल्याचे दि. २२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, चौकशीअंती सदर गैरव्यवहार हा दि. २६ मे, २०१५ ते ८ जून, २०२२ या कालावधीतील असून बनावट प्राधिकर पत्र तयार करून व अधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या करून शिक्क्यांचा गैरवापर करून गैरव्यवहार करण्यात आला असल्याचे निदर्शनास येणे, जलयुक्त शिवार योजनेतील देयक जमा न झाल्याचे आढळून आल्यानंतर मा. जिल्हाधिकारी, लातूर यांनी पाच महिन्यांपासून त्याप्रकरणी केलेल्या चौकशीअंती सदर गैरव्यवहार झाल्याचे आढळून येणे, त्याबाबत पोलिस तक्रार दाखल करण्यात आल्यावर पोलिसांनी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात येणे, परंतु, त्यामध्ये आणखी कोण सामील आहेत व रणनिती अवगत होण्याची आवश्यकता असणे, त्यानुसार संबंधितांविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

१४०. १०४ **श्री. प्रसाद लाड वि.प.स.** कित्ता

"राज्याच्या महसूल खात्याच्या अखत्यारितील भूमी अभिलेख विभागाकडून भू करमापक तथा लिपीक-टंकलेखक पदासाठी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परीक्षेचा निकाल नुकताच घोषित होणे, मात्र या निकालात चुका असल्याने उमेदवारांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण होणे, आयबीपीएस या कंपनीमार्फत ही परीक्षा घेण्यात आली असणे, या परिक्षेतील सर्व उमेदवारांचा गुणानुक्रमे निकाल (मेरिट लिस्ट) नुकताच जाहीर झाला असून त्यात उमेदवारांची जन्मतारीख, त्यांचा प्रवर्ग यात चुका असल्याचे निदर्शनास येणे, अनेक उमेदवारांनी ईडब्ल्यूएसमधून अर्ज केला होता त्यांचा प्रवर्ग खुला दाखवण्यात आला असणे, त्यामुळे उमेदवाराची नोकरीची संधी

**विवरण क्रमांक २१**–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | जाण्याची भीती निर्माण होणे, सदरहू प्रकरणी शासनाने तात्काळ चौकशी करून भूमी अभिलेख पद भरती परीक्षेतील निकालातील चुका दुरुस्त करून उमेदवारांना न्याय देण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१४१.** | **२८०** | **bÉ\|ÉÝÉ°ÉÉÉÉ** श्री. अभिजित वंजारी, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** "कळमनुरी, जि. हिंगोली तालुक्यात कयाधू नदीपात्रात येथील १५ वाळुघाटांचे लिलाव झाले नसतानाही या घाटातून प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे लाखो रुपयांची वाळू अवैध वाळू उपसा होत असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास येणे, यातून शासनाचा लाखो रुपयांना महसूल बुडविला जात असणे, येथे चोरट्या पद्धतीने वाळू उपसा करणा-यांची एक फळीच तयार झाली असून प्रशासनाचे दुर्लक्ष व संगनमताने दिवसरात्र मजूर व जेसीबीच्या सहाय्याने वाळू उपसा व वाहतूक होणे, काही भागांत प्रशासनाचा वाळू माफियांवर वचकच राहिलेला नसणे, त्यामुळे या अवैध वाळू उपसा व वाळु वाहतुकला प्रतिबंध करावा अशी येथील नागरिक मागणी करीत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी येथील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |
| **१४२.** | **४३८** | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** "राज्यातील गायरान जमिनीवरील अतिक्रमणे ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत निष्कासित करणेबाबत मा. उच्च न्यायालयाने प्रशासनाला आदेश देण्यात येणे, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाने | कित्ता | |

जिल्हा प्रशासनाकडून अतिक्रमण धारकांना नोटीसा बजावून जिल्हा व तालुका स्तरावर समित्यांच्या माध्यमातून गायरान जमिनी मुक्त करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणे, राज्यातील जिल्हाधिकारी, तसेच तहसिलदारांकडून अतिक्रमणधारकांना नोटीस बजावण्यात आल्याने नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात खळबळ उडणे, राज्यातील सन २०११ पर्यंत राज्य शासनाच्या नियमात असलेल्या सर्व गायरान जमिनींचा उपयोग राहण्यासाठी व गुरे चरईसाठी केला जात असताना मागील अनेक वर्षांपासून गायरान जमिनीवर सुमारे २ लाख २२ हजार १५३ अतिक्रमणांपैकी गेल्या ११ वर्षात शासनाच्या माध्यमातून कोणत्याही गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्कासित करण्यात आलेली नसणे, अलिकडेच माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये मा. उच्च न्यायालयाने गायरान जमिनीवरील अतिक्रमणासंदर्भात नोटीसांना दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत स्थगिती देण्यात आल्याचे समोर येणे, मा. उच्च न्यायालयाने सरकारच्या गायरान जमिनीवर असलेली अतिक्रमणे निष्कासित करण्याचा घेतलेला निर्णय योग्य असल्याने सर्वात मोठ्या गायरान जमिनीवर बड्या संस्थांची अतिक्रमणे मोठ्या प्रमाणात असणे, राज्य शासनाने त्याचे ऑडिट करणे व अतिक्रमणांच्या नोटीसा काढण्याचे गरजेचे असणे, विशेषतः गायरान जमिनीवर अनुसूचित जाती-जमाती समाज देखील झोपड्यांमध्ये पिढ्यानपिढ्या वास्तव्य करीत असणे, शासनाच्या माध्यमातून त्यांच्याकडे घरे बांधण्यासाठी स्वतःच्या मालकीची जागा उपलब्ध नसल्याने अनेकांना शासनाच्या घरकुल योजनेपासून वंचित रहावे लागत असणे, गायरान जमिनीवर अतिक्रमण करून राहत असलेल्या गोरगरीब कुटुंबांना गायरान जमिनीवरील अतिक्रमणे कायम करून घरकूल बांधण्यास परवानगी द्यावी यासाठी मा. उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्याची शासनाकडे सामाजिक संस्था-संघटनांनी माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये शासनाकडे मागणी केलेली असणे, त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, राज्यातील पालघर, ठाणे, रायगड, नाशिक जिल्ह्यातील

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | गायरान जमिनीवरील अतिक्रमणासोबतच राज्यात अनेक ठिकाणी आदिवासी, कातकरी तसेच पारधी, भिल्ल या समाजातील भूमिहीन पुत्रांवर अन्याय होऊ नये यासाठी इतर ठिकाणी गरीब आदिवासी, पारधी या मागास दुर्लक्षित जमातीनी केलेल्या शासकीय वन विभागाच्या गायरान व खाजगी जमिनीवरील अतिक्रमणे कायम करून गायरान जमिनींपैकी दोन गुंठे जागा देऊन पंतप्रधान घरकुल योजनेच्या माध्यमातून घर बांधून मिळण्याबाबत शासनाकडे वेळोवेळी मागणी करूनही अद्यापही त्यांना घरे बांधण्यासाठी दोन गुंठे जागा न मिळणे, परिणामी स्थानिक नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र स्वरूपाचा असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने लक्ष घालून सखोल चौकशी करून करावयाची कार्यवाही व उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१४३.** | **४८५** | **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस **वि.प.स.**<br>"मुंबई - बडोदा एक्स्प्रेस महामार्गासाठी माती - मुरूम आणि दगडांसाठी पालघर जिल्ह्यात सुरू करण्यात आलेल्या दगडांच्या खाणीत रात्रंदिवस बिनदिक्कतपणे करण्यात येत असलेल्या स्फोटांमुळे स्थानिक नागरिकांच्या घरांचे, तसेच शेती द्व बागायतींचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असणे, तरीदेखील पालघर तालुक्यातील आदिवासी पूर्व पट्ट्यात पेसा विभागातील खडकोली गावातील बंद करण्यात आलेली दगडखाण ग्रामस्थांचा विरोध असतानाही संबंधित कंपनीने ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून पुनःश्च सुरू करण्याचा प्रयत्न सुरू केला असल्याची गंभीर बाब दि. २० फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, यापूर्वी खडकोली गावातील दगडखाणीसाठी संबंधित इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला | कित्ता | |

पेसा ग्रामसभेची गणपूर्ती झाली नसतानाही बेकायदा देण्यात आलेला ना- हरकत दाखला, त्यानंतर कोणत्याही सुरक्षा साधनांशिवाय संबंधित कंपनीने सुरू केलेल्या सततच्या स्फोटांमुळे संपूर्ण गावातील घरांना बसलेले हादरे, त्यामुळे नागरिकांत निर्माण झालेली भीतीची भावना, सदरहू खदानीतील खडी, माती आजूबाजूच्या परिसरात पडून झालेले शेतीचे नुकसान, त्यामुळे बिघडलेले पर्यावरणाचे संतुलन, त्यामुळे सदरहू खदानीचे काम बंद करण्यासाठी हजारो ग्रामस्थांनी केलेले तीव्र आंदोलन, तद्नुसार सुनावणी अंती सदरहू खदानीतील दगड उत्खनन आणि वाहतुकीची परवानगी शासनाने रद्द केली असल्याने सदरहू खदान बंद झालेली असणे, सद्यःस्थितीत सदरहू खदान पुनःश्च सुरू करण्यासाठी संबंधित कंपनीने सुरू केलेले जोरकस प्रयत्न, त्याविरोधात स्थानिक ग्रामस्थांनी दिलेला आमरण उपोषणाचा इशारा, तरीदेखील प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक ग्रामस्थांत पसरलेली तीव्र नाराजीची भावना, यास्तव पालघर तालुक्यातील आदिवासी पूर्व पट्ट्यात द्वपेसा विभागातील खडकोली गावातील बंद करण्यात आलेल्या दगडखाणीसा पुनःश्च सुरू करण्यास परवानगी न देण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

१४४. ६९४ **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** कित्ता

"पाचेगाव (ता.नेवासे, जि.अहमदनगर) येथील गट नंबर ९०/१/अ या वर्ग २ गायरान जमिनीवर शिवा ट्रस्ट औरंगाबाद या विश्वस्त संस्थेने नर्सिंग व आयुर्वेदिक महाविद्यालय रुग्णालयासाठी अनधिकृत इमारतीचे बांधकाम केल्याची बाब माहे दिनांक २ मार्च, २०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, ग्रामपंचायत आकारणी यादीचा उतारा नमुना क्रमांक ८ नियम ३१ (१) वर नियमबाह्यपणे भोगवटादार म्हणून शिवा ट्रस्ट औरंगाबादचे नाव लावलेले असणे, सदर जमिनीवर बांधकामासाठी ग्रामसभेचा ठराव, जिल्हा परिषद कार्यकारी अधिकाऱ्यांची परवानगी अथवा महसूल विभागाची मान्यता नसणे, इमारतीच्या बांधकामाला

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | नियमाप्रमाणे नगररचना व इतर कोणत्याही विभागाची परवानगी नसताना अनधिकृत बांधकाम करून शासनाच्या नियमाची पायमल्ली करण्यात आलेली असणे, स्थानिक प्रशासनावर दबाव आणून शैक्षणिक संस्थेच्या नावाखाली रुग्णालय सुरू करण्यासाठी बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये मुलींचे वसतीगृह व मेससाठी सुरू करण्यात आलेली असणे, सदर गायरान जमिनीवर केलेल्या अनधिकृत बांधकामाबाबत शासनाने चौकशी करून अनधिकृत बांधकाम निष्कासित करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१४५.** | **७३३** | **ॲड. अनिल परब वि.प.स.** | कित्ता | |
| | | "पुणे पेठ, एरंडवणा (ता.पुणे शहर, जि. पुणे) येथील फा. प्लॉ.नं. २६ (एकूण क्षेत्र ४५५२.६० चौ.मी.) व फा.प्लॉ.नं. २७ (एकूण क्षेत्र ७८६०.९० चौ.मी.) या मिळकतीपैकी अनुक्रमे ३८८१.४६ चौ.मी. व ७१४२ चौ.मी. क्षेत्र ३० मीटर रूंदीच्या विकास आराखडा रस्त्याकरिता (डीपी रोडकरिता) दिनांक २० जुन, २००० रोजी संपादन कायद्यांतर्गत पुणे महानगरपालिकेमार्फत संपादित करण्यात येणे, उक्त नमूद फा.प्लॉ.क्र. २६ व २७ या मिळकती मुळात वक्फ बोर्डाच्या मालकीच्या व देवस्थान वर्ग-३ च्या असल्याने सदरहू मिळकती हस्तांतरीत करताना धर्मादाय आयुक्त यांची परवानगी घेणे आवश्यक असणे, तथापि या प्रकरणी नियमानुसार धर्मादाय आयुक्त यांची कोणतीच परवानगी न घेताच तसेच अन्य कायदेशीर प्रक्रिया पूर्ण न करताच सदरहू मिळकती हस्तांतरीत करण्यात येणे, तसेच या मिळकतीच्या मोबदल्यात देण्यात आलेल्या टीडीआर स्वरूपातील मोबदलाही बेकायदेशीररित्या | | |

एका खाजगी व्यक्तीला देण्यात येणे, तसेच सदरहू टीडीआर स्वरूपातील मोबदला संबंधितांना देताना संपादित क्षेत्राच्या एकूण मूल्याच्या ५० टक्के रक्कम नजराणा म्हणून शासनाकडे जमा करणे आवश्यक असणे, तथापि या प्रकरणी शासनाकडे कोणत्याही स्वरूपाचा नजराणा जमा करण्यात आलेला नसणे, परिणामी यामुळे शासनाचे जवळपास ५० ते ६० कोटी रूपयांच्या महसुलाचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच या प्रकरणी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० व प्रचलित कायदे लागू होत असल्याने नगर भुमापन अधिकारी क्र. १, पुणे मामलेदार कार्यालय यांनी सदरहू मिळकत हस्तांतरणाच्या फेरफार संदर्भातील नोंदी दिनांक २४ डिसेंबर, २०२१ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केलेल्या असणे, असे असतानाही जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, पुणे यांनी या प्रकरणी दाखल अपिला संदर्भात निर्णय देताना नगर भूमापन अधिकारी क्र. १, पुणे माममलेदार कार्यालय यांच्या निर्णयाकडे हेतुपुरस्सरपणे दुर्लक्ष केल्याची तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० नुसार सदरहू प्रकरणी मिळकत हस्तांतरणास धर्मादाय आयुक्तांच्या परवानगी परवानगी नसतानाही सदरहू मिळकत हस्तांतरणास स्वाधिकारात बेकायदेशीररित्या परवानगी दिल्याची बाब निदर्शनास येणे, परिणामी सदरहू मिळकत हस्तांतरण प्रकरणी नियमबाह्यरित्या व बेकायदेशीररित्या परवानगी देणारे जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख, पुणे यांची भूमिका संशयास्पद असल्याची बाब निदर्शनास येणे, तसेच या प्रकरणी शासनाच्या महसुली नुकसानीस जबाबदार अधिकाऱ्यांमार्फत मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार करण्यात आल्याची शक्यता निर्माण होत असल्याने शासनाप्रती नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण होणे, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित दोषींवर कारवाई करण्याचे अनुषंगाने शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबतची शासनाची नेमकी भूमिका."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १४६. | | **श्रीमती उमा खापरे,** श्री. प्रसाद लाड, अ‍ॅड. निरंजन डावखरे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. रामदास आंबटकर **वि.प.स.** यांच्या **लक्षवेधी सूचना क्र.२६३** वरील निवेदन **पशुसंवर्धन मंत्री** सभागृहासमोर ठेवतील :- “राज्यात सांगली जिल्ह्यातील कवठेमंकाळ तालुक्यातील रांजणी येथील मेष पालन केंद्राच्या जागेवर ड्रायपोर्ट उभारण्यात येणार असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास आली येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी पालन प्रकल्पासाठी २२०० एकर जागा राखीव असून तेथील केंद्रातून दरवर्षी हजारो शेळ्या मेंढ्यांचा पुरवठा होतो पशुपालन योजनांसाठी ही येथूनच पिले घेण्याची अट आहे या स्थितीत येथे ड्रायपोर्ट उभारणे अन्यायकारक असणे, ही जागा धनगर समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक असून शेळी मेंढी पालनाचे प्रशिक्षण तसेच नवनवीन संशोधने व तंत्रज्ञानाच्या विकासासाठी या जागेचा वापर व्हावा हक्कावर गदा आणून विस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यास धनगर समाजाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी पालन प्रकल्पाच्या जागेवर नियोजित ड्रायपोर्ट शासन तात्काळ रद्द करणाची मागणी करणे, यावर शासनाने करावयाची योजना उपाययोजना व कार्यवाही." | कित्ता | |
| १४७. | २८४ | **श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स.** “राज्यात सांगली जिल्ह्यातील कवठेमंकाळ तालुक्यातील रांजणी येथील मेष पालन केंद्राच्या जागेवर ड्रायपोर्ट उभारण्यात येणार असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी | कित्ता | |

पालन प्रकल्पासाठी २२०० एकर जागा राखीव असून तेथील केंद्रातून दरवर्षी हजारो शेळ्या मेंढ्यांचा पुरवठा होत असणे, पशुपालन योजनांसाठी ही येथूनच शेळ्या मेंढ्या घेण्याची अट असणे अश्या परिस्थितीत स्थितीत येथे ड्रायपोर्ट उभारणे अन्यायकारक होणार असून, ही जागा धनगर समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक असून शेळी मेंढी पालनाचे प्रशिक्षण केंद्र तसेच नवनवीन संशोधने व तंत्रज्ञानाच्या विकासासाठी या जागेचा वापर व्हावा व धनगर समाजाच्या हक्कावर गदा आणून विस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यास धनगर समाजाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला असणे, त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेळी मेंढी पालन प्रकल्पाच्या जागेवर नियोजित ड्रायपोर्ट करण्याचा निर्णय शासनाने तात्काळ रद्द करणाची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१४८. ५१२ **श्री. सचिन अहिर वि.प.स.** कित्ता

"कोल्हापूर जिल्ह्यातील कन्हेरी मठातील एका सामाजिक कार्यक्रमाअंतर्गत भाविकांना देण्यात आलेले अन्न शिल्लक राहिल्याने ते शिळे अन्न गोशाळामधील गाईंना देण्यात आल्याने, विषबाधा होऊन ५३ गार्यींचा झालेला आकस्मिक मृत्यू तर अनेक गार्यींना पोटफुगीसारखी लागण होणे, अनेक गार्यींची प्रकृती चिंताजनक असणे त्यामुळे गोधनाला बसलेला फटका त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती याबाबत घातपात असण्याची शक्यता त्यामुळे जनमानसात पसरलेले चिंतेचे वातावरण याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

१४९. २६४ **श्रीमती उमा खापरे,** श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. रामदास आंबटकर **वि.प.स.** कित्ता

"महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित मुंबई म्हणजेच महानंदाची दैनंदिन दूध संकलन क्षमता सुमारे दहा लाख लिटर आहे त्यापैकी आज घडीला जेमतेम ऐंशी हजार लिटर वर आल्याने महानंदाचा डोलारा कोसळण्याच्या स्थितीत आल्याची बाब आहे जानेवारी २०२३

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | च्या शेवटच्या आठवडा वा त्या सुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे महानंदाच्या कर्मचाऱ्यांना महिन्याचा पगार भागवण्यास इतपत ही आर्थिक क्षमता महानंदा संघाकडे राहिलेली नसणे, महानंदाच्या गोरेगाव येथे एक लाख लिटर क्षमतेच्या अत्याधुनिक टेट्रा प्रकल्प तयार आहे या प्रकल्पासाठी ही पुरेशी दूध मिळत नसल्याने सैन्य दलाला रोज दूध पुरवठा करण्याचा मिळालेला ठेका ही रद्द झाला असणे, महानंदाच्या नागपूर, पुणे, लातूर, सांगली, गोरेगाव आणि जिल्हा दूध संघातून येणाऱ्या दुधात वाढ करून पुन्हा गावे गावी दूध संघ ची केंद्रे सुरू करावीत अशी मागणी दूध उत्पादकांकडून होत असणे, तसेच राज्यात पर राज्यातून येणाऱ्या दुधाचे नियंत्रण महानंदामार्फत केल्यास महानंद संघ आणि राज्यातील दूध उत्पादकांना पुन्हा उभारी येत असताना ही प्रशासनाचे त्याकडे दुर्लक्ष होत असणे, राज्यातील सर्व बस, रेल्वे, स्थानकावर मोठ्या शहरातील वार्डा -वार्डात आणि प्राथमिक शाळेतील मुलांना दररोज पोषक आहारात दुधाचा समावेश केल्यास महानंद संघ आर्थिक गर्दीतून बाहेर येणे शक्य होणार असणे, यावर शासनाने करावयाची योजना उपाययोजना व कार्यवाही." | | |
| **१५०.** | **१५५** | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.**<br>"पर्यावरणदृष्टया अत्यंत संवेदनशील आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाचा भाग असलेल्या येऊरच्या जंगलात अशांतता वाढत असून ढाबे आणि हॉटेल्स, लग्नसमारंभभ आणि खासगी बंगले, मेजवान्यांमधील कानठळया बसविणाऱ्या संगीतामुळे येऊरचे पर्यावरण धोक्यात आल्याचे माहे जानेवारी २०२३ च्यासुमारास निदर्शनास येणे, येऊर जंगलात बेकायदा टर्फ, हॉटेल्स, ढाबे, क्लबमधील प्रखर प्रकाशझोतात रात्री उशीरापर्यंत सुरू असणाऱ्या पाटर्या, | कित्ता | |

क्रिकेट आणि फुटबॉलच्या सामन्यांच्या प्रकाशझोतामुळे येऊर क्षेत्रातील प्राणी, पक्ष्यांचा अधिवास धोक्यात आल्याचे काही पर्यावरणवादयांनी ठाणे महानगरपालिका व वन विभागाकडे तक्रारी करण्यात येणे, येऊर हे क्षेत्र शांतता क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले असणे, ठाणे शहराला प्राणवायूचा पुरवठा करणारे केंद्र म्हणूनही येऊर महत्वपूर्ण मानले जाते मात्र येऊर येथील बेकायदेशी वाढत्या नागरिक वस्त्यांमुळे येऊरचे अस्तित्व नष्ट होत असल्याची भिती निर्माण होणे, याप्रकरणी ठाणे महानगरपालिका आणि वन विभाग तक्रारी करूनही कारवाई करण्याबाबत करीत असलेला अक्षम्य दुर्लक्ष त्यामुळे जनमानसात व पर्यावरणवादयांमध्ये निर्माण झालेला असंतोष व चिडीची भावना, शासनाने याप्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रिया."

**१५१.** **३७६** **श्री. रमेशदादा पाटील,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे **वि.प.स.** कित्ता

"राज्यात ठाणे जिल्ह्यातील पर्यावरण राखण्यासाठी शहापुरातील कानविंदे गावाजवळ वन विभागाच्या वतीने लाखो रुपये खर्च करून उत्तमराव पाटील जैवविविधता उद्यान उभारले परंतु सरकारच्या दुर्लक्षामुळे हे उद्यान आता भंगारत जमा झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे, या उद्यानातील खेळाचे साहित्य गंजले असून वनकुट्या उध्वस्त झाले असणे, तलाव कोरडे टाक पडले तर सौर ऊर्जा यंत्रणा ही कोलमडले असून जैवविविधता उद्यानाचे रूपांतर आता चक्क रोपवाटिकेत झाल्याचा संताप जनक प्रकार उघडकीस येणे, या जैवविविधता केंद्राची व दुरुस्तीसाठी शहापूर प्रदेश वन विभागाकडे संपूर्ण करण्यात येऊन ही या उद्यानाची दुर्दशा होणे, त्यामुळे येथील ग्रामस्थांनी पर्यटक मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही उपाययोजना."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१५२.** | **२९७** | **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. रमेशदादा पाटील, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे **वि.प.स.**<br>"व्यावसायिक अभ्यासक्रम बी.ई. एम. ई. बी. फार्म. एम. फार्म, हॉटेल मॅनेजमेंट, इ. अभ्यासक्रमांचे प्रवेश हे महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्षामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे होत असणे, सदर प्रवेशप्रक्रियेमध्ये प्रवेशासाठी तीन फेऱ्या असणे, ह्या फेऱ्यामध्ये असणारे बेटरमेंट ह्या ऑप्शनमुळे महाविद्यातयातील प्रवेश रिक्त राहत असून विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित राहत असणे, पहिल्या फेरित विद्यार्थ्यांना पंसतीनुसार एक महाविद्यालय लागणे, ह्या परिस्थितीत विद्यार्थी प्रवेश निश्चित न करता बेटरमेंट पर्याय निवडतो व दुसरा राऊंड खेळणे, त्यामुळे त्याची हि जागा निश्चित राहून ती जागा दुसऱ्या राऊंडला भरल्या जात नसणे, दुसऱ्या वेळेमध्येसुद्धा हा विद्यार्थी बेटरमेट पर्याय निवडतो व तिसरा राउंड खेळणे, ह्यावेळेसुद्धा त्याची जागा निश्चित राहते व तिसऱ्या राऊंडसाठी विद्यार्थी पात्र राहणे, तिसऱ्या वेळेस विद्यार्थीस पहिले महाविद्यालय अलॉट झाल्यानंतरसुद्धा विद्यार्थी प्रवेश घेत नसणे व त्याला पाहिजे त्या दुसऱ्या महाविद्यालयात अगेंस्ट कॅप प्रवेश घेणे, त्यामुळे त्याला शिष्यवृत्ती मिळत नसणे, किंवा ड्रॉप घेवून प्रवेशासाठी पुढील वर्षाची प्रतिक्षा करणे, तसेच पहिल्या महाविद्यालयात प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला सुद्धा दुसऱ्या महाविद्यालयाची रिक्त जागा अगेंस्ट कॅप घ्यावी लागणे, त्यामुळे त्यालासुद्धा शिष्यवृत्ती मिळता नाही पर्यायाने दोन्ही विद्यार्थ्यांचे नुकसान होणे, याकरीता शासनाने एक तर बेटरमेंट हा पर्याय वापरण्याची | कित्ता | |

मर्यादा एका फेरीपुरतीच मर्यादित ठेवण्याची गरज, किंवा एक अतिरिक्त फेरी घेवून दोन फेऱ्या बेटरमेंटसह व दोन फेऱ्या बेटरमेंट पर्यायरहित ठेवल्यास यामुळे विद्यार्थ्यांना कॅपअंतर्गत प्रवेश मिळून शासनाच्या शिष्यवृत्तीच्या सवलती विद्यार्थ्याला मिळू शकेल आणि त्यामुळे शासनाचे १०० टक्के प्रवेशाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यास मदत होईल, याकरीता शासनाने घ्यावयाचा निर्णय व उपाययोजना."

१५३. ३३० **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे, श्री. सचिन अहिर **वि.प.स.** कित्ता

"मुंबई विद्यापीठाच्या विधी शाखेच्या एलएलबी आणि बीएलएस अभ्यासक्रमाच्या परीक्षेला ७५ दिवस उलटल्यानंतरही अद्यापही निकाल लागला नसल्याची बाब दि. २३ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, विधी शाखेच्या एलएलबी ३ वर्षे अभ्यासक्रमाच्या ५ व्या सत्राची आणि बीएलएस अभ्यासक्रमाच्या नवव्या सत्राची परीक्षा दि. २९ नोव्हेंबर, २०२२ रोजी सुरू होवून दि. ७ डिसेंबर, २०२२ रोजी संपली असणे, या परीक्षांचा निकाल पुढील ४५ दिवसांत म्हणजेच जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात जाहीर होणे अपेक्षित असणे, विधीच्या अनेक महाविद्यालयांनी परीक्षेला अडीच महिने उलटल्यानंतरही उत्तरपत्रिकेच्या तपासणीचे काम पूर्ण केले नसणे, अद्यापही सुमारे ५ हजार उत्तरपत्रिकांची तपासणी होणे बाकी असणे, निकालाला विलंब होणार असल्याने त्याचा फटका विधीच्या या विद्यार्थ्यांच्या पुढील सत्राच्या नियोजनावर होण्याची निर्माण झालेली दाट शक्यता, त्यामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, मुंबई विद्यापीठाच्या विधि शाखेच्या एलएलबी आणि बीएलएस अभ्यासक्रमाच्या परीक्षेला होत असलेल्या विलंबाची सखोल चौकशी करण्याची असलेली नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी, विधी विभागाच्या विद्यार्थ्यांत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजीची भावना, यास्तव मुंबई

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विद्यापीठाच्या विधि शाखेच्या एलएलबी आणि बीएलएस अभ्यासक्रमाच्या परीक्षेचा निकाल तातडीने जाहीर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१५४.** | **३३१** | **श्री. विलास पोतनीस,** श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.** "मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील विद्यार्थिनींसाठी उभारलेल्या 'न्यू गर्ल्स हॉस्टेल' या वसतिगृहात पाणी टंचाईमुळे विद्यार्थिनींची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची गंभीर बाब दि. २० फेब्रुवारी, २०२३ रोजी निदर्शनास येणे, सदरहू वसतिगृहाचे उद्‌घाटन माहे जुलै २०२२ मध्ये महामयीन राज्यपाल महोदयांचे हस्ते करण्यात येणे, कलिनासारख्या मुंबईच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या मुंबई विद्यापीठात राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो विद्यार्थी शिक्षणासाठी येणे, त्यांची गैरसोय होवू नये, याकरिता विद्यापीठात वसतिगृहाची सोय करण्यात आली असणे, १४८ विद्यार्थिनींची प्रवेश क्षमता असलेया सदरहू वसतिगृहात सद्यस्थितीत केवळ ७५ मुलींनाच प्रवेश देण्यात आला असणे, क्षमतेपेक्षा कमी मुली सदरहू वसतिगृहात वास्तव्यास असतानाही वसतिगृहात पाणी टंचाई भासत असणे, वसतिगृहातील पाण्याच्या टंचाईमुळे वसतिगृहास पाण्याच्या टँकरने पाणी पुरवठा करण्यात येणे, वसतीगृहासाठी दिवसाआड २० हजार लिटर पाण्याचा टँकर मागवावा लागणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून अद्यापही पाण्याच्या नळाची जोडणी न देण्यात आल्याने विद्यापीठास टँकरसाठी लाखो रुपयांचा भार सहन करावा लागणे, तसेच विद्यार्थिनींची देखील मोठ्या प्रमाणावर गैरसोय | कित्ता | |

होणे, त्यामुळे विद्यापीठातील विद्यार्थिनींत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची आणि संतापाची भावना, यास्तव मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलातील वसतिगृहात तातडीने पाण्याची सोय उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

१५५. ७११ **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** श्री. अभिजित वंजारी **वि.प.स.** कित्ता

"मुंबईतील अंधेरी येथील चिनाय एमव्हीएल कॉलेज बंद करण्याचा निर्णय महाविद्यालय व्यवस्थापनाने घेणे, सदर महाविद्यालय अंधेरीतील मोक्याच्या जागी असून ८ हजार विद्यार्थी क्षमता, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, १५० शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि पूर्ण अनुदानित असलेली ही शैक्षणिक संस्था कायमची बंद झाल्यास अंधेरी परिसरातील सामान्य कुटूंबातील हजारो विद्यार्थी परिसरातील सामान्य कुटूंबातील हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहण्याची भिती व्यक्त होणे, तसेच या महाविद्यालयाची २ हजार कोटीची जागा खासगी विकासकाच्या घशात घालण्याची व्यवस्थापनाचा डाव असल्याचा गंभीर आरोप होणे, त्यामुळे मा. धर्मादाय आयुक्त, मा.उच्च न्यायालय, मुंबई या सर्वोच्च न्यायालयानेही व्यवस्थापनालय पुन्हा कॉंग्रेस सुरू करण्याचे आदेश देणे असे असतानाही मागील काही वर्षापासून कॉलेज बंद असणे, त्यामुळे शासनाने सदर कॉलेज सुरू करून तेथे प्रशासक नेमा अशी मागणी होत असणे, यासंदर्भात शासनाने लक्ष घातले नाही तर मुंबईतील आणखी २६ शैक्षणिक संस्था बंद केल्या जातील अशी भिती व्यक्त होत असतानाही त्याकडे शासन करीत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी मुंबईतील तमाम जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१५६.** | **१८** | **श्री. अमोल मिटकरी,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री. सचिन अहिर, श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>"राज्यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ४१७ शासकीय आश्रमशाळा असून या सर्व आश्रमशाळांमध्ये १६ हजार ४४३ पदे मंजूर असून त्यापैकी ९ हजार ५५३ (५९%) पदांची भरती करण्यांत येऊन ६ हजार ६९० पदे रिक्त असणे, तसेच शिक्षक व मुख्याध्यापकांची दोन हजार ७३१ पदे रिक्त असणे, तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची तर ५१६ पदे रिक्त असल्याचेही निदर्शनास येणे, त्याचप्रमाणे राज्यात ५४० अनुदानित आश्रमशाळांमध्ये ९५४ पदे रिक्त असणे, यावरुन आदिवासी विकास विभागांतर्गत राज्यातील आश्रमशाळांतील रिक्त पदे मागील अनेक वर्षांपासून भरण्यात आलेली नसणे, शासनाच्या तसेच अनुदानित आश्रमशाळांमधील आदिवासी बालकांच्या मृत्युसंदर्भात रिक्त पदे भरती हे महत्वाचे कारण असले तरीही जे कर्मचारी सध्या आश्रमशाळेमध्ये जे शिक्षक, कर्मचारी कार्यरत आहेत ते त्याच आश्रमशाळांसाठी काम करतात का याची छाननी होण्याची गरज असणे, ज्या आश्रमशाळांमध्ये शिक्षक मिळत नाहीत, तिथे अतिरिक्त शिक्षक असलेल्या शाळांमधील शिक्षकांची नियुक्ती का केली जात नाही याचाही शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज व्यक्त होत असणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण व समग्र विकास करणाऱ्या वातावरणापासून या शाळा दुर्गम भागांमध्ये आहेत त्याठिकाणी गरज आहे त्याच ठिकाणी आश्रमशाळांची उपलब्धता आहे का, याबाबत सर्वेक्षण करण्याची तसेंच सर्व आश्रमशाळांचे किमान दोन वर्षांतून एकदा मूल्यमापन करण्याबाबत | कित्ता | |

व दर्जाप्रमाणे या आश्रमशाळांना शेरे देण्यात यावेत, अशी जनतेकडून शासनाकडे मागणी करण्यांत येणे, शासकीय आश्रमशाळांमध्ये आजच्या घडीला ६ हजार ६९० पदे रिक्त असल्याचे राज्य मानवी हक्क आयोगापुढे झालेल्या सुनावणीमध्ये मान्य करून डिसेंबर, २०२२ या महिन्यांमध्ये पदभरतीची प्रक्रिया सुरू करु असे शासनामार्फत आयोगापुढे सांगण्यात आल्याचेही निदर्शनास येणे, अद्याप मात्र त्याबाबत कार्यवाही झालेली नसणे, सबब, यासर्व प्रकरणी शासनाने आढावा घऊन कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

१५७. ४३ **श्री. विक्रम काळे वि.प.स.** कित्ता

“आदिवासींच्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे यासाठी शासनाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प योजनासुरु करण्यात येणे, या प्रकल्पांतर्गत शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क शासनाकडून भरण्यात येत असणे, तथापि शासनाने मागील ३ वर्षापासूनचे शैक्षणिक शुल्क भरले नसल्याचे व त्यामुळे राज्यातील १५० पेक्षा अधिक शाळा बंद पडल्याचे दिनांक १६ नोव्हेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, परिणामी राज्यातील पहिली ते १२ वीच्या जवळपास ५५ हजार मुलांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात सापडल्याचे निदर्शनास येणे, शिक्षण संस्थांना विद्यार्थ्यांचा शैक्षणिक खर्च झेपत नसल्यामुळे संस्थाचालक व शिक्षकांनी थकलेले शैक्षणिक शुल्क मिळावे म्हणून अनेकदा शासनाकडे मागणी करण्यात येणे, परंतु त्याकडे शासनाच्या झालेल्या दुर्लक्षाबाबत नाशिकमध्ये त्या विरोधात संस्थाचालक व शिक्षकांनी आंदोलन करण्यात येणे, आंदोलनानंतरही कार्यवाही न झाल्याने संस्थाचालक, शिक्षकवर्ग व त्याचबरोबर विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व नैराश्याचे भावना, त्याबाबत शासनाने चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**विवरण क्रमांक २१–**पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१५८.** | **१४२** | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.**<br>"धनगर समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याबाबत गेल्या अनेक वर्षांपासून शासनाच्या विचाराधीन असलेल्या न्याय मागणीवर अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नसणे, या मागणीच्या पाठपुराव्यासाठी राज्यात अनेक वर्षापासून झालेली आंदोलने, यासाठी तीव्र आंदोलने होण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, महाराष्ट्र विधीमंडळाच्या अधिवेशानांमध्ये अनेकवेळा धनगर समाजास आरक्षण देण्याबाबतच्या मागणीसंदर्भात झालेल्या चर्चा, मात्र प्रत्येकवेळी शासनाकडून सदर संशोधन अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्याची सभागृहात देण्यात आलेली आश्वासने, धनगर समाजाला शासनाची दिसून आलेली अनास्था, अद्यापही याबाबतचा निर्णय प्रलंबित असणे, परिणामी धनगर समाजात पसरलेली नैराश्याची भावना, याबाबत राज्यात पुन्हा यासाठी तीव्र आंदोलने होण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, शासनाने याबाबत त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |
| **१५९.** | **२११** | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे,** श्री. सचिन अहिर, श्री. सुनिल शिंदे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री. अंबादास दानवे **वि.प.स.**<br>"राज्याच्या आदिवासी विकास विभागाच्या आश्रम शाळांमध्ये सन २०१७ ते २२ या पाच वर्षात ६८० आदिवासी विद्यार्थ्यांनी प्राण गमावले असून अनुदानित आणि शासकीय आश्रम शाळांमध्ये ११२६ विद्यार्थ्यांना विविध कारणांमुळे जीव गमवावा लागण्याची गंभीर बाब उघडकिस येणे, राज्याच्या एकूण अंदाजपत्रकाच्या नऊ टक्के खर्चाची तरतूद आदिवासी विकासासाठी करण्यात येत असून त्या अंतर्गत विविध योजनाद्वारे समाजाच्या उन्नतीसाठी | कित्ता | |

प्रयत्न करण्यात येत असणे, याचाच एक भाग म्हणून आदिवासी समाजातील मुलांच्या शिक्षणासाठी आश्रम शाळा चालविण्यात येत असून कुटुंबापासून दूर राहत असलेल्या मुलांना निवासी शिक्षण देण्याची सोय करण्यात येत असणे, मात्र याच शाळांमध्ये गळफास घेणे, अपघात होणे, पाण्यात बुडणे, सर्पदंश, विजेचा धक्का लागणे, विष प्राशन करणे, अन्नातून विषबाधा होणे, भाजणे अशा विविध कारणांनी मुलांचा वारंवार मृत्यू झाल्याचे समोर येणे, तसेच अनेक ठिकाणी राहण्यायोग्य वस्तीगृह नसल्याने सर्पदंशासह झाडावरून पडून, शौचालय नसल्याने नदीवर जावे लागत असल्याने पाण्यामध्ये बुडून विद्यार्थ्यांचा मृत्यू होत असणे, याबाबत केंद्र सरकारच्या आदिवासी कल्याण कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता असून शासकीय पातळीवर एवढ्या मोठ्या प्रमाणावर होत असणाऱ्या मृत्यूची उच्चस्तरीय चौकशी करण्याची गरज असणे, तसेच यातील कोणत्या घटना टाळता येऊ शकल्या असत्या व याची जबाबदारी निश्चित करण्यात येणे, या सर्व घटनांमुळे पालकांमध्ये निर्माण होत असलेला प्रचंड असंतोष, त्यामुळे जबाबदार असलेल्यांवर शासनाकडून तातडीने करण्यात आलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."



१६०. ३५२ **श्री. सचिन अहिर वि.प.स.** कित्ता

"शहापूर तालुक्यातील ५७ आदिवासी पाडे जि. ठाणे मुंबईपासून जवळच्या अंतरावर असतांना या ५७ आदिवासी पाड्यांमध्ये पाणी तर उपलबध नाहीच पण या पाड्यांवर जाण्या.येण्यासाठी साधे रस्तेही नसल्याचे निदर्शनास येणे त्यामुळे रात्री-अपरात्री तसेंच ऊन असो वा वाराए झोळी करूनच शहराच्या ठिकाणी आदिवासी बांधवांना व गावकऱ्यांना पायवाटा तुडवत जावे.यावे लागणे व त्यांत रुग्णांचे बळी गेल्याच्या घटना वारंवार घडल्याचे निदर्शनास येणे त्यामुळे शहापूरातील आदिवासींना व गावकऱ्यांना मजबूत रस्ते मिळावे व त्यायोगे ५७ आदिवासी पाडे मजबूत रस्त्याने मुख्य मार्गांना जोडावेत यासाठी आदिवासी

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | प्रकल्प कार्यालयाने शहापूर पंचायत समितीच्या बांधकाम विभागाकडून रस्त्यासाठी २० कोटींचे अंदाजपत्रक तयार करण्यांत येणे व ते ठाणे जिल्हा परिषदेकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आल्याचे दिनांक २१ जानेवारी २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास येणे. तथापि सदर प्रस्तावाची नस्ती, फाईल अनेकदा पाठपुरावा करूनही जिल्हा परिषद प्रशासनाने जाणीवपूर्वक अडकवून ठेवली असल्याचेही दि. २१ जानेवारी २०२३ रोजी निदर्शनास येणे त्यामुळे याप्रकरणाची शासनाने चौकशी करण्याची आवश्यकता व सदर प्रस्तावाची नस्ती अडकवून ठेवणाऱ्या जिल्हा परिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी त्यासंदर्भात शासनाने चौकशी करून केलेली वा करावयाची कारवाई तसेच प्रलंबित प्रस्तावानुसार कार्यवाही करण्याची गरज व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१६१.** | **५४७** | **श्री. रमेशदादा पाटील वि.प.स.** | कित्ता | |
| | | "राज्यात अनुसूचित क्षेत्राबाहेरील (otsp) ५.४% आदिवासींना प्रत्येक जिल्ह्यातील सक्षमप्राधिकाऱ्यांकडून अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्रे दिले जात नसणे, अनुसुचित क्षेत्राबाहेरील आदिवासी नागरिकांना मोठ्या प्रमाणात समस्या निर्माण होत असणे, "(otsp)" मधील ५.४% आदविसींना त्यांच्या सांविधानिक आरक्षणापासून वंचित ठेवल्याकारणाने त्यांचे जगण्याचे मुलभूत अधिकार हिरावून घेतल्याकारणाने, शैक्षणिक नोकरी विषयक आणि शासनाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असणारे जातीचे प्रमाणपत्र वर्षोनुवर्षे न मिळाल्याने आदिवाशी क्षेत्राबाहेरील नागरिक मोठ्या प्रमाणात वंचित राहत असणे, त्यासाठी अनुसूचति क्षेत्राबाहेरील (otsp) ५.४% आदविसींना राज्यातील प्रत्येक पडताळणी समित्यांकडून | | |

वैधता प्रमाणपत्रे सुलभपणे व विना अट अनुसूचति जमातीचे प्रमाणपत्रे व वैधता प्रमाणपत्रे देण्यासाठी आदिवासी विकास विभागाकडून परिपत्रक काढण्याची आवश्यकता असणे, अनुसूचति क्षेत्राबाहेरील (otsp) ५.४% आदिवासींना जमातीचे प्रमाणपत्रे आणि वैधता प्रमाणपत्रे सुरळीतपणे दिल्यास, आदिवासी नागरिकांचे जीवन कल्याणकारी होत असणे, त्यामुळे प्रत्येक जिल्हानिहाय आणि जमाती निहाय एकूण लाभार्थ्यांची आकडेवारी उपलब्ध देणे, त्याचबरोबर राज्यात अनुसूचति क्षेत्राबाहेरील (otsp) ५.४% आदिवासींना, प्रत्येक जिल्यातील सक्षम प्राधिकाऱ्याकडून अनुसुचीत जमातीचे प्रमाणपत्र वेळेत न देणाऱ्या संबंधित सक्षम प्राधिकारी व पडताळणी समित्यामधील प्रत्येक दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही गरज असणे, यावर शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

१६२. ५४५ **श्री. सचिन अहिर वि.प.स.** कित्ता

"मुंबई, भिवंडी, ठाणे शहर परिसरात मोठया संख्येने बोगस डॉक्टरांचा आणि खाजगी पॅथॅलॉजिक (प्रयोगशाळा) यांच्या मोठया प्रमाणात सुळसुळाट झालेला असून, त्यामुळे या भागातील रुग्णांचा जीव धोक्यात आलेला असणे, महापालिकेला कारवाईसाठी पोलिस बंदोबस्त न मिळाल्याने पालिकेच्या पथकांची कारवाई पूर्णतः थंडावलेली असणे, ही कारवाई थांबवल्याने बोगस डॉक्टरांचे व खाजगी पॅथॉलॉजिक यांचे गोरख धंदे राजरोजपणे सुरू असल्याने नागरिक आणि रुग्णांचा जीव मात्र टांगणीला लागलेला असणे, शहरात मोठया प्रमाणावर कामगार वस्ती असून ते झोपडपट भागात राहत असून बहुतांश कामगार अशिक्षित असल्याने ते डॉक्टरांची पदवी न पाहता उपचार घेत असणे, काही डॉक्टर कच्च्या घरात तर काही डॉक्टर भाड्याच्या जागेत दवाखाना फलक लावून प्रॅक्टीस करणे, अशा डॉक्टरांवर कारवाई करण्याची जनतेतून होणे, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१६३.** | **५६८** | **श्री. जयंत आसगावकर,** श्री. अभिजित वंजारी, श्री. राजेश राठोड, श्री. सुधाकर अडबाले, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.** मध्यप्रदेश, गुजरात व उत्तर प्रदेश या राज्यात आयुर्वेद, होमिओपॅथी व युनानी या वैद्यकीय शाखांना चालना मिळत असून महाराष्ट्र राज्यात आयुष्य मंत्रालय स्थापन व्हावे अशी आयुर्वेद टिचर असोसिएशनची आग्रही मागणी सतत होत असल्याचे नुकतेच आढळून येणे, राज्य स्वतंत्र आरोग्य मंत्रालय असून फक्त ॲलोपॅथिकच शाखेला चालना दिली जात असून इतर वैद्यकीय शाखांकडे दुर्लक्ष होत असणे, कोरोना संसर्गाच्या काळात आयुर्वेदाचे महत्व पटल्यामुळे आयुष मंत्रालयाची स्थापना होणे अतिशय गरजेचे असल्याचे निदर्शनास आले असणे, तसेच राज्यात आयुर्वेदिक प्राध्यापकांच्या साडेतीनशे पदे रिक्त असल्यामुळे आयुर्वेद शिक्षणात सतत अडथळे येत असणे, त्यामुळे या विद्यार्थ्यांवर होत असलेला अन्याय व शिक्षक वर्गात पसरलेला असंतोष व संतापाची भावना, याबाबत राज्य शासनाने राज्यात आयुष मंत्रालयाची स्थापना करण्यासाठी व आयुर्वेद प्राध्यापकांची रिक्त पदे भरण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |
| **१६४.** | **१७८** | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे वि.प.स.** "बीड जिल्ह्यात आष्टी तालुक्यातील मौजे दरेवाडी बावी या गावात पहिली पाणी पुरवठा योजना कार्यरत असताना बनावट कागदपत्रे तयार करून परत पाणी पुरवठा योजना करण्याची वर्क ऑर्डर दिली असणे, गावाची मुळ लोकसंख्या ७४ असताना बोगस कागदपत्राद्वारे ५१० लोकसंख्या दाखवून पाणी पुरवठा योजनेचे लाखो रूपयांचे टेंडर मंजूर करण्यांत | कित्ता | |

आलेले असणे, दि. ३१ जानेवारी २०२३ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. बीड यांनी याबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ असुन सुद्धा वर्क ऑर्डर दिलेली असणे. बीड जिल्ह्यात जलजिवनाच्या कामाचा घोटाळा मोठया प्रमाणात होत असून याबाबत समितीने दिलेल्या अहवालानुसार अद्यापही कोणतीही कार्यवाही झालेली दिसून येत नसणे, त्यामुळे कंत्राटदार व अधिकारी आपल्या संगनमताने अनेक कामे बोगस पद्धतीने करून अपूर्ण कामे पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले असणे, सोबतच केज तालुकातील लहुरी येथील जलजिवनाच्या कामासाठी निघालेल्या टेंडरमध्ये कोलेब्रेशन बॉन्ड न जोडल्यामुळे अपात्र झालेल्या कंत्राटदाराला जिल्ह्यात इतर ठिकाणी कामासाठी पात्र करण्यांत आलेले असणे, राष्ट्रीय पेयजल योजनेचे काम पूर्ण करण्यांसाठी १२ महिन्याची मुदत असुनही मंजूर कंत्राटदाराने ५ वर्षे लावलेली असणे, निव्वळ ग्रामसेवकानी दिलेल्या वर्कडन बोगस प्रमाणपत्रावर यापूर्वी सारणी, आनंदगांव, सादोळा या गावातील तीन कामे बोगस करूनही लहुरी येथील कामाची वर्क ऑर्डर बोगस कंत्राटदाला दिलेली असणे, जिल्हा परिषद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जलजिवनाच्या कामातील अधिकाऱ्यांच्या संगनमताने बोगस कामे दाखवून शासनाची कोटयावधीची आर्थिक फसवणूक होत असल्याने तातडीने सदर प्रकरणाची चैकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत शासनाची आवश्यक प्रतिक्रिया व कार्यवाही."

१६५. २४३ **श्री. अंबादास दानवे वि.प.स.** कित्ता

"राज्यात विशेषतः पालघर, ठाणे, नाशिक व अहमदनगर जिल्ह्यात आदिवासी समाजाच्या गरीबीचा व अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांच्या लहान मुलांकडून वेठबिगारी करून घेत असणे, उभाडे (ता. इगतपुरी, जि. नाशिक) येथे वेठबिगारीसाठी नेण्यात आलेल्या कातकरी आदिवासी कुटुंबातील अल्पवयीन मुलीचा मालकाने मारहाण केल्याने झालेला मृत्यू झाल्याची घटना घडलेली असणे, उभाडे गावामध्ये आदिवासी कुटुंबियांना विविध आमिष, प्रलोभने दाखवून व

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | दमदाटी करून काही दलाल मुलांना वेठबिगारीला घेऊन जात असून ठाणे व पालघर जिल्ह्यात देखील वेठबिगारीसाठी मुलांची खरेदी केल्याच्या घटना उघडकीस येणे, अशा घटनांमुळे आदिवासी बांधवांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले असणे, वेठबिगारीच्या वाढत्या घटना रोखण्याबाबत तसेच आदिवासी भागातील नागरिकांना रोजगार उपलब्ध करण्यासाठी तसेच मुलांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी विविध योजना राबविण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व करावयाच्या उपाययोजना." | | |
| **१६६.** | **३०६** | **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. रमेशदादा पाटील, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे **वि.प.स.**<br>"मुंबईतील ग्रेन डेपो रेल्वे यार्ड शिवडी येथे मे. ए टू झेड एक्झीम हे हाताळणी ठेकेदार म्हणून शासनाच्या किराणा बाजार व दुकाने मंडळात नोंदीत असून तेथे किराणा मालाची लोडींग, अनलोडींगची अंगमेहनतीची कामे बोर्डातील नोंदीत टोळी क्र. १२६, १२८, ६३३, ६३४ आणि ५३४ ते ५७६ मधील माथाडी कामगार करीत असणे, तसेच माथाडी कामगारांनी केलेल्या कामाची मजूरी व लेव्हीची रक्कम किराणा बाजार व दुकाने मंडळात भरणा करणे ठेकेदारास बंधनकारक असतानाही ठेकेदाराने एकूण ११७,७९,८६,७०६/- (अक्षरी रूपये एकशे सतरा कोटी एकोणऐंशी लाख शहाऐंशी हजार सातशे सहा) एवढ्या रक्कमेची थकबाकी, किराणा बाजार व दुकाने मंडळात भरणा केलेली नसणे, त्यामुळे माथाडी मंडळाच्या कायद्यानुसार कलम १३ चे उल्लंघन झालेले असणे, तसेच याबाबतची तफावत आणि विगतवारीची मुंबई पोर्ट ट्रस्टकडून मिळालेली माहिती शासनाच्या किराणा बाजार व दुकाने | कित्ता | |

मंडळास दिलेली असणे आणि सदर मजूरी व लेव्हीच्या वसुली संदर्भात दिनांक १३ जुलै २०२२ रोजी ए टू झेड एक्झीम या ठेकेदारास हे पत्र मिळाल्यापासून सात दिवसाचे आत वरील थकीत मजूरी व लेव्हीची रक्कम मंडळात भरण्याची नोटीसही दिलेली असणे, तरीही ठेकेदाराने मजूरी व लेव्हीची थकबाकी रक्कम माथाडी मंडळात भरणा न केल्यामुळे कष्टाची कामे करणाऱ्या माथाडी कामगारांवर आलेली उपासमारीची वेळ आणि त्यांच्यामध्ये पसरलेला तीव्र संताप याबाबत शासनाने केलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

१६७. ५५३ **श्री. अमोल मिटकरी,** श्री. प्रसाद लाड **वि.प.स.** कित्ता

"पालघर जिल्ह्यातील डोंगराळ भागातील जव्हार, मोखाडा या तालुक्यांच्या ठिकाणी अतिदुर्गम लोकवस्तीत ९५ टक्के आदिवासी कुटुंबे राहत असणे, येथील आदिवासी क्षेत्रातील स्थानिक मजूरांना गावात काम नसल्याने रोजगार देणे गरजेचे असताना बेरोजगारीमुळे बेकारभत्ताही देण्यात न आल्याने त्यांच्यावर उपासमारीची पाळी येणे, प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे या तालुक्यातील वाड्या-वस्तीतील आदिवासी कुटुंबे पोटाची खळगी भरण्यासाठी झोपड्यांना काटे-कुलूप लावून इतरत्र ठिकाणी स्थलांतरित होत असल्याचे दिसून येणे, पालघर ग्रामपंचायतीतील आदिवासी कुटुंबांना रोजगार मिळावा ही जबाबदारी प्रशासनाची असताना त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करून शासनाची दिशाभूल करणे, केंद्र व राज्य सरकारने महात्मा गांधी रोजगार हमी योजना कार्यान्वित करून 'मागेल त्याला काम व १५ दिवसांत दाम' अशी तरतूद करण्यात येऊनही पालघर जिल्ह्यातील डोंगराळ आदिवासी भागातील जव्हार, मोखाडा हे अतिदुर्गम तालुके आजही विकास कामाच्या वाटेने कोसो दूर असणे, शासनाची रोजगार हमी सारखी मोठी योजना वेळीच नियंत्रणात न आणल्यास त्याचे परिणाम पुढील पिढीस भोगावे लागण्याचे दिसून येत असणे, रोजगार हमी योजना ही आदिवासींचे स्थलांतर रोखण्यासाठी गरजेची असणे, मात्र हिच परिस्थिती कायम राहिल्यास आदिवासींच्या

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | वाड्या, वस्त्या, पाडे स्थलांतरामुळे ओस पडू लागणे, आदिवासी कुटुंबांतील मुलांच्या शिक्षणावर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाल्याचे दिसून येणे, आदिवासी भागातील मुलांच्या शिक्षणाच्या गैरसोयीमुळे शाळासुद्धा ओसाड पडण्याचा धोका निर्माण होणे, आदिवासी महिला रुग्णांना तातडीने आरोग्याच्या सुविधा मिळत नसल्याने रुग्णांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, गावातील आदिवासींची अल्प शेतीची कामे आटोपल्यानंतर त्यांच्या मुळगांवी रोजगार मिळत नाही आणि जेथे रोजगार आहे तेथे शोषण आहे अशी परिस्थिती झाली असल्याने पालघर जिल्ह्यातून रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबविण्याची आदिवासींची आग्रहाची मागणी असताना त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, पालघर जिल्ह्यात आदिवासी मजूर रोजगारापासून वंचित राहणार नाही यासाठी पालघर जिल्ह्याच्या परिसरातील तसेच पंचक्रोशीतील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी व त्यांच्या गरजा भागवण्यासाठी सर्वोतोपरी प्रशासनाने ग्रामीण भागामध्ये लवकरात लवकर गावातील आदिवासी गोर-गरिबांना रोजगाराची कामे सुरू करणे याबाबत शासनाने योग्य ते तातडीच्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१६८.** | **२०३** | **प्रा. राम शिंदे वि.प.स.**<br>"राज्यातील औद्यगिकदृष्टया क्षेत्रातील छोट्या उद्योगांचा समूह (cluster) विकास होण्याच्या दृष्टीकोनातून केंद्र शासनाच्या क्लस्टर (MSE-CDP) या योजनेच्या धर्तीवर "महाराष्ट्र राज्य आद्यौगिक समूह विकास योजना" दि. २५ फेब्रुवारी २०१४ रोजी राज्यात सुरू करण्यात आली असणे, ग्रमीण/अविकसित भागातील छोट्या उद्योगांसाठी अतिशय महत्त्वाकांशी | कित्ता | |

योजना असणे, राज्यातील विविध भागात सदर योजनेंतर्गत जवळपास ३० ते ७०० CFC / क्लस्टर सुरू २०० पेक्षा जास्त क्लस्टर सुरू होण्याच्या प्रतीक्षेच्या मार्गावर असणे, ग्रामीण भागातील छोट्या उद्योगांचा क्लस्टर / CFC च्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विकास होऊन प्रत्येक क्लस्टर मागे हजारो रोजगारांना व नवीन रोजगार निर्मितीला चालाना मिळणार असणे, मार्च २०२२ पासून कोरोना महामारीमुळे राज्यातील अनेक क्लस्टर उद्योग अडचणीत आले असून शासनाने सदर क्लस्टर तातडीने सुरू करण्याच्या दृष्टीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**१६९.** **४६४** **श्री. सचिन अहिर वि.प.स.** कित्ता

"राज्यात कुवेत येथील रिफायनरी अँण्ड फर्टिलायझर कंपनीने विदर्भात उद्योग उभारण्याचे ठरविण्यांत आलेले असणे, त्यानुसार २६ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक त्या माध्यमातून राज्यात येण्याची निर्माण झालेली शक्यता, यासंदर्भात सदर कंपनीच्या अधिकाऱ्यांनी काही महिन्यांपूर्वी नागपूर येथे संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात येणे, त्यानंतर विदर्भ विकास परिषदेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. शिवकुमार आणि श्री. प्रदीप महेश्वरी यांनी सदर कंपनीच्या कुवेत, अधिकाऱ्यांची मा. केंद्रीय वाहतूक मंत्री यांच्याबरोबर भेट घडवून आणणे, सदर भेटीमध्ये प्रकल्पसाठी आवश्यक जमीन, वीज व पाणी यांची काहीच अडचण भासणार नाही असे मा. केंद्रीय वाहतूक मंत्री महोदयांनी कंपनी अधिकाऱ्यांना त्याचवेळी सांगण्यात येणे, असे असतांना महाराष्ट्र उद्योग महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी व शासनाने हा प्रकल्प विदर्भात यावा यासाठी कोणताही पाठपुरावा करण्यांत आला नसल्याचे दि. ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आलेले असणे, त्यामुळे कंपनीने विदर्भात उद्योग उभारुन गुंतवणूक करण्याऐवजी मध्यप्रदेश राज्यात उद्योग उभारुन गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला असल्याचेही त्याचसुमारास निदर्शनास येणे, यापुर्वी मागणी ६.७ महिन्यात

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | लाखो रोजगार देणारे वेदान्ता फॉक्सकॉन, टाटा एअरबसएसॅफ्रन ग्रुप इ. उद्योग राज्याबाहेर गेलेले असतांना कुवेतचा प्रकल्पही शासनाच्या पाठपुराव्याअभावी मध्यप्रदेश राज्यात गेल्याने स्थानिकांना रोजगारांला मुकावे लागण्याची आलेली पाळी याबाबत शासनाने नेमकी वस्तुःस्थिती काय आहे याबाबत चौकशी करण्याची तसेच यामध्ये अधिकाऱ्यांचा हलगर्जीपणा झाला असल्यास त्यांचेविरुद्ध कारवाई करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका." | | |
| **१७०.** | **५९७** | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,** श्री. अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. सुधाकर अडबाले, श्री. जयंत आसगावकर **वि.प.स.** "रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील नाणार परिसरात सुमारे दोन लाख कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या गुंतवणुकीचा सुमारे चार वर्षापूर्वी शासनामार्फत तेलशुद्धीकरण प्रकल्प (रिफायनरी प्रकल्प) उभारण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले असणे, या परिसरातील शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होण्याचा धोका असल्यामुळे या प्रकल्पास बहुतांश गावातून झालेला तीव्र विरोध, त्यामुळे सदर प्रकल्प रद्द करण्याचा सुमारे अडीच वर्षापूर्वी शासनाने घेतलेला निर्णय, तद्नंतर हा प्रकल्प रायगड जिल्ह्यात उभारण्याचा झालेला विचार, मात्र तेथेही गावकऱ्यांचा झालेला तीव्र विरोध विचारात घेऊन पुढे कोणतीही कार्यवाही झालेली नसो, असे असतानना आता रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील बारसू परिसरातील गावांमध्ये सदर प्रस्तावित तेलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्याचा शासनाने निर्णय घेतलेला असणे या प्रकल्पामुळे शेतकऱ्यायंचे शेती व बागायती क्षेत्र बाधित होऊन शेतकरी | कित्ता | |

उद्ध्वस्त होणार असल्यामुळे या प्रकल्पास बारसू परिसरातील बहुतांश ग्रामस्थांनी केलेला तीव्र स्वरुपाचा विरोध, प्रकल्पा विरोधात केलेली व सुरू असलेली आंदोलने, पंचक्रोशीतील जेथे रिफायनरी प्रकल्प होणार आहे त्या पाच ग्रामपंचायतीनी ग्रामसभेमध्ये रिफायनरी प्रकल्पाविरोधी ठरव मंजूर केलेले असणे, ही परिस्थिती दुर्लक्षित करून बारसू परिसरातील गावांमध्ये भूगर्भाची तपासणी जबरदस्तीने सुरू केलेली असणे, रिफायनरी विरोधातील आंदोलनात सहभागी झालेल्या आंदोलनापैकी काही काढलेल्या तडीपारीच्या नोटीसा, या परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून लागू असलेली जमावबंदी, त्यामुळे गावकऱ्यांचे दैनंदिन व्यवहार/कामकाज ठप्प झालेले असणे, त्यांच्यवर ओढवलेले आर्थिक संकट, बारसू परिसरातील बहुतांश गावांमधील गावकऱ्यांमध्ये पसरलेले नैराश्याचे, भितीचे, घबराटीचे व असुरक्षिततेचे वातावरण, ग्रामस्थ आक्रमक भूमिका घेण्याची असलेली स्थिती, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार प्रकल्पासाठी शिवणे, देवाचे गोठणे व सोलगाव या गावांचे भूसंपादन आता होणार नाही, असे जाहिर करण्यात आलेले असले तरी प्रत्यक्षात दहशतीखाली भूगर्भाची तपासणी सुरू असणे, यावरुन शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याची होत असलेली कृती, त्यामुळे, शेतकऱ्यांमध्ये पसरलेली संतापाची लाट, याशिवाय या परिसरात मोठ्या प्रमाणात असलेली कातळ शिल्प, सदर कातळ शिल्प या ऐतिहासिक वर्गात असलेल्या (हेरिटेज वर्गात असलेल्या) ऐतिहासिक वास्तू असणे, ही बाब शासनाच्या संबंधित विभागाच्या निदर्शनास आलेली असणे, त्यांचेकडून याची पाहाणीही करण्यात आलेली असणे, यासंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी युनेस्कोकडे प्रस्ताव सदर केलेला असणे, या हेडिटेज वर्गात मोडणाऱ्या पुरातन वास्तूंचे जतन व संवर्धन करण्यासाठी शासनाने प्राध्यान्याने लक्ष देण्याची गरज, हेरिटेज वर्गात येणाऱ्या वास्तूंच्या ठिकाणी अन्य कोणतेही प्रकल्प उभारण्यात असलली बंधने, तसेच प्रकल्पा विरोधात

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | लिखाण करणाऱ्या एक पत्रकाराची अलिकडेच झालेली हत्या, त्यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती, या सर्व बाबीं विचारात घेता, तसेच बारसू परिसरात उभारावयाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पाचा फेर विचार करण्याची गरज व यावर शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १७१. | ६३९ | **श्री. अंबादास दानवे वि.प.स.**<br>"डोंबिवली औद्योगिक क्षेत्रातील फेज १ मधील खंबाळपाडा येथील रामसन्स व प्रयाग या कारखान्यांस दिनांक ९ मार्च, २०२३ रोजी आग लागून दुर्घटना झाली असणे, तसेच डोंबिवली औद्योगिक वसाहत महामंडळ कार्यक्षेत्रात मोठ्याप्रमाणात केमिकल कारखाने असून सदरहू कारखान्यांमध्ये उच्च ज्वलनशील पदार्थांचा वापर होत असणे, उक्त परिसरातील Indo amines A ३९, ४० व इतर कारखान्यांनी उद्योग व अग्निशमन विभागाच्या नियमांचे उल्लंघन केलेले असणे, उद्योग व अग्निशमन विभागाच्या नियमानुसार कारखान्याच्या सर्व बाजुंनी ६ मीटर जागा सोडणे आवश्यक आहे जेणेकरून आग लागल्यास हायड्रन्टला जाण्यास मदत मिळून आगीवर प्रतिबंधक घालण्यास मदत मिळेल परंतू उक्त बाबीकडे सदरहू औद्योगिक क्षेत्रातील कारखाने जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत असणे, तसेच बहुतेक कारखान्यांकडे अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र देखील नसणे, त्यामुळे येथे आगीची घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जिवितहानी होण्याची शक्यता निर्माण होणे, त्यामुळे उक्त औद्योगिक वसाहतीच्या जवळ राहणाऱ्या व कारखान्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, उक्त प्रकरणी चौकशी करून सदरहू विभागातील | कित्ता | |

कंपन्यांचे अग्निशमन विभागाकडून ऑडीट करून ज्या कारखान्यांकडे अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र नाही व अग्निशमन विभागाच्या नियमांचे पालन केलेले नाही अश्या कारखान्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१७२. १९ **श्री. अमोल मिटकरी,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे, श्री. सचिन अहिर **वि.प.स.** कित्ता

"सन २०१६ मध्ये तत्कालीन सार्वजनिक आरोग्य मंत्री यांच्या कार्यकाळात प्रथमतः बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजनेच्या अंमलबजावणीचा निर्णय घेण्यात आलेला असणे, सदर योजनेनुसार, राज्यात रस्त्यावर कुठेही अपघात झाल्यास या योजनेअंतर्गत ७२ तास मोफत औषधोपचार करण्याचा निर्णय झालेला असणे, तथापि गेल्या अनेक वर्षांपासून सदर योजना कागदावरच आहे की काय अशी संभ्रमावस्था झालेली असणे, या योजनेअंतर्गत एकूण ७४ प्रकारच्या उपचार प्रक्रियांसाठी ३० हजार रुपये खर्चापर्यंत मोफत उपचार देण्याचेही अंतर्भूत असणे, तथापि अद्याप या योजनेची अंमलबजावणी झालेली नसणे, इतकेच नव्हे तर, तत्कालीन आरोग्य मंत्री व विद्यमान मा.मुख्यमंत्री यांच्या काळातही या योजनेची अंमलबजावणी होऊ शकली नसल्याचेही दिनांक ७ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, विद्यमान सार्वजनिक आरोग्य मंत्री, यांनी या योजनेचा आढावा घेऊन आगामी अर्थसंकल्पात त्याचा समावेश करण्याचा मनोदय व्यक्त केल्याचेही माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, वाहन अपघातांची वाढती संख्या व अपघातग्रस्तास वेळीच मदत मिळणेच्यादृष्टीने शासनाने या योजनेची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१७३.** | **४०** | **श्री. विक्रम काळे वि.प.स.**<br>"राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यातील राज्यातील ५९७ परिचारीकांच्या पदांना केंद्र शासनाने अनुमती नाकारल्यामुळे या परिचारीकांची सेवा समाप्त करण्याचा निर्णय शासनाने दि. १९/१०/२०२२ मध्ये घेतलेला असणे, त्यामुळे या परिचारीकांत पसरलेला तीव्र असंतोष, या परिचारीकांची सेवा समाप्त करण्याची कारणे काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला असणे, ऐन दिवाळीच्या हंगामात त्यांची सेवा समाप्त केल्यामुळे त्यांच्यासह त्यांच्या कुटूंबियांवर उपासमारीची परिस्थिती उद्‌भवलेली असणे, यांची सेवा समाप्त न करता त्यांना पुर्ववत सेवेत घेण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | कित्ता | |
| **१७४.** | **१२८** | **श्री. प्रसाद लाड वि.प.स.**<br>"मुंबईसह राज्यामध्ये गोवरचा उद्रेक झाल्यानंतर रुग्णांचे तातडीने निदान व्हावे यासाठी राज्यात निदान प्रयोगशाळा उभ्या करण्याच्या सूचना गोवर राज्य कृती दलाने दिल्या असणे, मात्र तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटल्यानंतरही कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, गोवरचा उद्रेक आटोक्यात आणण्यासाठी राज्य सरकारने तातडीने पावले उचलून वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक यांच्या अध्यक्षतेखाली गोवर राज्य कृती दलाची स्थापना करणे, कृती दलाने तातडीने काही महत्त्वपूर्ण निर्णय घेणे त्यामुळे शासनाने तातडीने निदान प्रयोग शाळा उभ्या करण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |

१७५. ३०० **ॲड. निरंजन डावखरे,** श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. रमेशदादा पाटील, श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे **वि.प.स.** कित्ता

"रायगड जिल्हा हा औद्योगिक, पर्यटन तसेच राष्ट्रीय महामार्गाने जोडलेला जिल्हा असणे, जिल्ह्याचे मुख्यालय अलिबागमध्ये असणे, जिल्ह्यात औद्योगिक क्षेत्रात तसेच महामार्गावर अपघातांचे प्रमाणही अधिक असणे, मात्र जिल्ह्याची आरोग्य यंत्रणा हवी तशी सक्षम नसल्याने अतिगंभीर रुग्णाला उपचारासाठी रस्तामार्गे मुंबईमध्येच न्यावे लागणे, अशा रुग्णांना त्वरित उपचार मिळावेत, यासाठी समुद्रमार्गे बोट रुग्णवाहिका हा उत्तम पर्याय असणे, मात्र गेली पाच वर्षे बोट रुग्णवाहिका प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असणे, त्यामुळे बोट रुग्णवाहिका लवकर सुरू करावी अशी मागणी रायगड जिल्ह्यातील नागरिक व लोकप्रतिनिधी करीत असणे, अलिबाग शहरात जिल्हा शासकीय रुग्णालय असून नुकतेच जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले असणे, हे महाविद्यालय पूर्ण क्षमतेने सुरू होण्यास अजून बराच कालावधी लागणार असणे, त्यामुळे जिल्ह्यातील रुग्णांचा ताण हा जिल्हा रुग्णालयावर पडत असणे, अलिबाग ते मुंबई हे अंतर १२० कि.मी. असणे, त्यातच रस्त्याच्या खड्डेमय अवस्थेमुळे मुंबईत पोहचण्यास चार ते पाच तासांचा कालावधी लागणे, त्यामुळे रुग्णांना रस्तेमार्गे रुग्णालयात नेताना अनेकवेळा मुंबईत पोहचण्याआधी रुग्ण दगावणे, त्यामुळे रुग्णाला त्वरित कमी वेळेत मुंबईत पोहोचविण्यासाठी समुद्रमार्गे बोट रुग्णवाहिका सुरू करण्याचा निर्णय प्रशासनातर्फे घेण्यात आला असणे, परंतु सदरहू प्रस्ताव शासनाच्या आरोग्य विभागाकडे गेल्या पाच वर्षांपासून प्रलंबित असल्याने ही सेवा रुग्णांना मिळण्यास विलंब होत असणे, शासनाने तात्काळ सदरहू प्रस्ताव मंजूर करून बोट रुग्णवाहिका सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **१७६.** | **४१६** | **श्रीमती उमा खापरे,** श्री. रमेशदादा पाटील, श्री. निलय नाईक, श्री. महादेव जानकर **वि.प.स.**<br>“राज्यात ठाणे जिल्ह्यातील भिवंडीतील एकमेव शासकीय स्वर्गीय इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल महिलेची रुग्णालय कर्मचाऱ्यांनी वेळी दखल घेत प्रसूती न केल्याने वेदनेने कळवळणाऱ्या महिलेने रुग्णालय परिसरात उघड्यावर प्रसूती होण्याची वेळ आली असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे या रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या निष्काळाची पणामुळे प्रसूती दरम्यान जास्त रक्तस्त्राव झाला झाल्याने ही महिला बेशुद्ध झाली त्यानंतर तिची प्रकृती खालावल्याने मुंबईतील रुग्णालयात हलविण्यात येणे, सदर प्रकारामुळे सर्वत्र तीव्र नाराजी व्यक्त होत असणे, यामुळे भिवंडी शासकीय उपजिल्हा रुग्णालयाचा कारभार चव्हाट्यावर येत, याकडे शासनाने वेळीच लक्ष देण्याची गरज निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना." | कित्ता | |
| **१७७.** | **४३४** | **श्री. सत्यजीत तांबे वि.प.स.**<br>“राज्याच्या आरोग्य विभागामध्ये जिल्हा रुग्णालय व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या अंतर्गत वर्ग-१ ते वर्ग-४ चे कर्मचारी वेगवेगळ्या पदावर शहरी व ग्रामीण भागामध्ये आरोग्याच्या सुविधा देत असणे, त्यामध्ये वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी, नर्सिंग स्टाफ (जीएनएम) लॅब ऑफिसर, फार्मसिस्ट, तसेच वैद्यकीय अधिकारी (१ व २), आरोग्य सहायक, आरोग्य सहायिका, परिचर, क्लर्क, आशा पर्यवेक्षिका, डाटा इन्ट्री ऑपरेटर | कित्ता | |

यासारख्या वेगवेगळ्या पदावर काम करत असणे, परंतु वैद्यकीय क्षेत्रासारख्या महत्त्वाच्या विभागात वेगवेगळ्या पदावर काम करत असणाऱ्या काही कर्मचारी हे शासकीय सेवेत कायम आहे आणि काही मागील ५-६ वर्षांपासून मानधन तत्वावर व कंत्राटी पद्धतीवर काम करत असणे, कंत्राटी व मानधन तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना शासन सेवत सामावून घेण्याबाबत अनेक वेळा शासन स्तरावर पाठपुरावा होणे, यामुळे कंत्राटी व मानधन तत्वावर काम करणाऱ्या कर्मचारी यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष लक्षात घेता शासनाने त्वरित करावयाची आवश्यक कारवाई व धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता."

**१७८.** **१५** **श्री. अमोल मिटकरी,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. विक्रम काळे, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे, श्री. अरुण लाड, श्री. एकनाथराव खडसे, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. सचिन अहिर **वि.प.स.** कित्ता

"सन २०१६ मध्ये मुंबईतील अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय ख्यातीचे शिवस्मारकांच्या प्रकल्प कामाचे मा.पंतप्रधान यांचे हस्ते जलपूजन करण्यात आलेले असणे, त्यानंतर शिवस्मारकाच्या या प्रकल्पामुळे पर्यावरणाला धोका असल्याचे तर मत्स्यव्यवसायाला फटका बसणार असल्यामुळे पर्यावरण प्रेमी व मच्छीमार संघटना, यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यावर मा. न्यायालयाने त्याबाबत तोंडी स्थगिती दिल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे न्यायालयाच्या निर्देशानुसार, स्मारकाचे काम बंद ठेवण्यांत आले असल्याचे माहे जानेवारी, २०१९ मध्ये निदर्शनास येणे, त्या विरोधात राज्य शासनाने सदर कामावरील बंदी उठविण्याबाबत माहे फेब्रुवारी, २०१९ मध्ये केलेली विनंती मा.न्यायालयाने फेटाळली नसल्याचे सांगण्यात येणे, शिवस्मारकाच्या कामासंदर्भातील ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता, स्मारकाच्या कामास पुरेसा निधी उपलब्ध करून कामास गती देण्याच्या तसेच शासनाने शिवस्मारकाचे काम सुरू करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| **१७९.** | **९५** | **ॲड. अनिल परब वि.प.स.**<br>"वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीचा पुनर्विकासाचा प्रकल्प अद्यापी रखडला असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०२२ मध्ये निदर्शनास येणे, शासकीय वसाहतीतील रहिवाशांना मालकी हक्काच्या सदनिका देण्यासाठी भूखंड उपलब्ध करण्याच्या प्रस्तावास महाविकास आघाडी सरकारने सन २०२२ मध्ये दिलेली तत्वतः मान्यता, प्रस्तावास तत्वतः मान्यता मिळूनही अदयाप वसाहतीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प रखडलेला असणे, परिणामी स्थानिक रहिवाश्यांना जीव मुठीत घेऊन रहावे लागत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, ष वांद्रे शासकीय वसाहत ही ९६ एकर शासकीय भूखंडावर सन १९५९ ते १९७५ दरम्यान तत्कालिन विनिदेशानुसार बांधण्यात येणे, सदर वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून ४७८२ सदनिका असणे, सदरहू इमारतींचे आयुष्यमान हे केवळ ५० ते ६० वर्षाचे असून सद्यःस्थितीत इमारतींची अवस्था अत्यंत बिकट असणे, इमारतींचे काही भाग कोसळलेले, तर काही भागांचे छताचे भाग पडलेले असणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधिनी सातत्याने शासनाकडे विविध आयुधांद्वारे लक्ष वेधूनही कोणतीच कार्यवाही होत नसणे, वारंवार बैठका घेण्याचे आश्वासित करून देखील बैठका न होणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सद्यःस्थितीत वसाहतीतील निवासस्थानाची दुरवस्था पाहता व सदर इमारतीमध्ये वास्तव्य करणाऱ्या कर्मचा-यांची मानसिकता पाहता शासकीय वसाहतीचा पुनर्विकास तातडीने घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | कित्ता | |

१८०. ५४२ **श्री. एकनाथराव खडसे वि.प.स.** कित्ता

"जळगांव शहरातुन जाणाऱ्या धुळे-जळगांव-नागपुर राष्ट्रीय महामार्गावर इच्छादेवी चौकात असलेले सार्वजनिक बांधकाम विभागाचे कर्मचारी निवासस्थाने सुस्थितीत असुनही भारतीय राजमार्ग प्राधिकरण (न्हाई) ने आवश्यकता नसतांना त्यांचेकडे सन २०१५ मध्ये हस्तांतर करणे, जागेची आवश्यकता नसतांना जागा हस्तांतरण करून सुस्थितीतील कर्मचारी निवासस्थाने पाडून शासनाचे नुकसान करणे व सदर मोक्याची चौकातील जागा जळगांव शहरातील एका बांधकाम व्यवसायिकाची बिल्डिंग मुख्य रस्त्यावर यावी या हेतूने न्हाईचे अधिकारी व बांधकाम व्यावसायिकाने संगनमताने केलेले कट कारस्थान यामुळे शासनाचे झालेले कोटयावधीचे नुकसान, सदर मोकळया जागेवर बांधकाम व्यावसायिकांने केलेले अतिक्रमण, कर्मचाऱ्यांचे निवासस्थानाअभावी होणारी गैरसोय, सदर जागा तातडीने अतिक्रमण मुक्त करून दोषींवर कठोर कारवाई करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

१८१. ४५० **श्री. प्रवीण दटके,** श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. निलय नाईक **वि.प.स.** कित्ता

"सार्वजनिक वितरण प्रणाली मार्फत होणारा अन्नधान्य पुरवठा एनपीएच योजनेतील प्राधान्य गटात न मोडणाऱ्या दोन लाख ६७ हजार कुटुंबांना म्हणजेच अंदाजे ९ लाख लोकसंख्या असणाऱ्या केसरी शिधापत्रिकाधारकांना उपलब्ध होत नसणे, एन ई आर अंतर्गत कार्डधारकांना अन्नधान्य लाभांपासून वंचित ठेवण्यात आले असणे, यासह प्राधान्य कुटुंबाचे लाभार्थी व अंत्योदय योजनेत लाभार्थी संख्या शिल्लक नसल्याने प्रलंबित शिधापत्रिकाधारकांना योजनेत समाविष्ट करण्यासाठी प्रयोजन नसणे, शिधापत्रिका धारकांना योजनेत समाविष्ट केल्यानंतर प्रत्यक्ष अन्नधान्याचा लाभ मिळवण्यासाठी २ महिने प्रतीक्षा करावी लागत असणे, सदर कालावधी कमी करून शिधा पत्रिका मिळताच धान्य देण्याची कार्यवाही होण्याची आवश्यकता असणे, शिधापत्रिका धारकांचे आधार संलग्न नसणे, तसेच ऑनलाइन राशन नोंदणी कार्ड

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | आरसीएमएस सिस्टीम प्रक्रियेतील अडचणी दूर करून यंत्रणा सुस्थितीत आणणे आवश्यक असणे, आदि बाबतीत स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार निवेदनाद्वारे शासनाकडे कार्यवाहीची मागणी केलेली असणे, सदर विषयाकरिता सामान्य जनतेद्वारा उभारण्यात आलेले जन आंदोलन, सामान्य नागरिकांमधील वाढता असंतोष, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **१८२.** | **५९२** | **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे **वि.प.स.**<br>“माहे ऑक्टोबर, २०२२ पासून पालघर जिल्ह्यातील शिवभोजन चालविणाऱ्या केंद्र चालकांचे अनुदान रखडल्याने केंद्रचालक संकटात सापडले असल्याची बाब दि. ३ मार्च, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, गरिबांच्या पोटांची खळगी भरावी, यासाठी महाराष्ट्र शासन कटिबद्ध असून त्यांच्या दुपारच्या जेवणाची सोय करणारी शिवभोजन थाळी मोलाची कामगिरी बजावणे, या थाळीमुळे गरिबांना दिलासा मिळाला असून वाढत्या महागाईच्या काळात त्यांचे जीवन सुसह्य झाले असणे, या शिवभोजन थाळीत गरजू लाभार्थ्यांना १० रुपयांत वरण-भात आणि दोन चपाती हे मध्यान्ह भोजन दुपारी १२ ते ३ या कालावधीत देण्यात येणे, सद्यस्थितीत पालघर जिल्ह्यात वसई तालुक्यात सर्वाधिक सहा, तर पालघर, डहाणू, जव्हार आणि मोखाडा तालुक्यात प्रत्येकी एक शिवभोजन केंद्र सुरू असणे, अशाप्रकारे पालघर जिल्ह्यात सुरू असलेल्या दहा शिवभोजन केंद्राचा लाभ आदिवासी भागातील गोरगरिबांना होणे, गत दोन महिन्यात या दहा केंद्रांवर एकूण ७०,१५० थाळ्याचे वितरण करण्यात आले असणे, परंतु एकीकडे दिवसेंदिवस महागाई वाढत असताना दुसरीकडे या केंद्र चालकांना गत | कित्ता | |

४ महिन्यापासून अनुदान न मिळाल्याने त्यांचे आर्थिक गणित कोलमडले असणे, त्यामुळे या केंद्र चालकांत शासनाप्रती पसरलेली तीव्र नाराजीची भावना, यास्तव पालघर जिल्ह्यातील शिवभोजन चालविणाऱ्या केंद्र चालकांचे थकीत अनुदान तातडीने वितरीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

१८३. २८ **श्री. विक्रम काळे वि.प.स.** कित्ता

"बीड जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेअंतर्गत कामे करतांना मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे आढळून येणे, त्यासंदर्भात नागरिक-ग्रामस्थांकडून आलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने, लोकायुक्त तसेच कृषी विभागाचे सहसंचालकांनी तीन वेगवेगळ्या चौकश्या करण्यात येणे, त्यामध्ये सुमारे ४ कोटी ४८ लाख ३४ हजार ५५५ रपये इतक्या रक्कमेचा गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्याने ती रक्कम संबंधित शासकीय अधिकारी व कंत्राटदार यांचेकडून वसूल करण्याबबातचा गोपनिय अहवाल चौकशी अधिकारी यांनी शासनास सादर करण्यात आलेला असणे, तथापि संबंधित शासकीय अधिकारी व कंत्राटदार यांचेकडून वसुलीची कार्यवाही करण्यात टाळाटाळ होत असल्याचेही जानेवारी, २०२३ वा त्यासूमारास निदर्शनास येणे, परिणामी, शासन निधीचा गैरव्यवहार करणाऱ्यांविरुद्ध कारवाई होत नसल्यामुळे तेथील ग्रामस्थ व अन्य शासकीय अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेले संशयाचे वातावरण व शासनाप्रती चिडीची भावना, याबाबत शासनाने चौकशी करून व्याजासह वसुली करण्याची कार्यवाही करण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भुमिका."

१८४. ३१ **श्री. विक्रम काळे,** श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे **वि.प.स.** कित्ता

"राज्यातील अशासकीय अनुदानित शाळेतील दि. १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी सेवेत आलेल्या परंतु, ती शाळा किंवा वर्गतुकडी विनाअनुदान, अंशतः अनुदान किंवा टप्पा अनुदानावर असणे व दि. १ नोव्हेंबर, २००५ नंतर ती शाळा किंवा वर्गतुकडी १००% अनुदानावर येणे,

## विवरण क्रमांक २१–पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | या शिक्षकांची जुन्या पेन्शन योजनेची खाती उघडणे, त्या खात्यावर जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे वेतनातून जी.पी.एफ हप्त्याची रक्कम कपात होणे, यामधील सेवानिवृत्त झालेल्या काही शिक्षकांना जुन्या पेन्शन योजनेचा लाभ मिळणे, त्यानंतर काही शिक्षकांची तोंडी आदेशाने जी.पी.एफ कपात बंद करणे, परंतु जुन्या पेन्शनची खाते सुरू ठेवणे, दि. १ नोव्हेंबर, २००५ पासून नवीन पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेणे असे असतांना नियमानूसार दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांची शाळा किंवा वर्गतूकडी दि. १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी १००% अनुदानावर नाही म्हणून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू न करणे, हे अन्यायकारक असणे, यासाठी शिक्षक लोकप्रतिनिधींनी वेळोवेळी शासनाकडे पाठपूरावा करणे, शासनाने यासंबंधिची काढलेली दि. १० जुलै, २०२० ची अधिसूचना रद्द करणे, शासनाने यासाठी सम्यक अभ्यास समितीचे गठन करणे, त्याचा अहवाल शासनास प्राप्त होणे, परंतु तरीही आजपावेतो शासनाकडून सकारात्मक निर्णय न होणे, पेन्शन हा विषय शिक्षकांच्या जिवनाशी व कुटूंबाशी निगडीत असल्यामुळे शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **१८५.** | **४१** | **श्री. विक्रम काळे वि.प.स.** | कित्ता | |
| | | “राज्यातील २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शासकीय शाळा बंद करण्याचा निर्णय दि. १३/१०/२०२२ रोजी वा त्यासूमारास शासनाने जाहीर करणे, परिणामी राज्यातील १४ हजार ९८४ शाळा व त्यात शिक्षण घेत असलेल्या १ लाख ५० हजार विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, कमी पटसंख्येच्या नावाखाली राज्यातील | | |

वंचित व दुर्गम भागातील मुलामुलींचे शिक्षण संपुष्टात येण्याची भिती शिक्षण तज्ञांनी व्यक्त करणे, विशेषतः मुली शिक्षणापासून दुरावण्याची जास्त भिती व्यक्त करण्यात येत असणे, जिल्हा परिषदेच्या शाळेत गरीब व कष्टकरी पाल्यांचे मुले व मुली शिक्षण घेत असणे, शिक्षण घेत असल्यामुळे हे मुले-मुली शिक्षणापासून वंचित राहण्याची भिती व्यक्त होत असणे, शिक्षण हक्क कायद्यानूसार बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध करून देण्याची तरतूद असताना या शाळा बंद झाल्यास हा हक्क शिक्षणापासून गोरगरिब वंचित शेतकऱ्यांची मुले मुली शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर जाऊन या विद्यार्थी-विद्यार्थीनींना बालमजुरी, बालविवाह इत्यादी समस्या निर्माण होणार असल्यामुळे या शाळा बंद करु नयेत, अशी मागणी सर्वच स्तरातून होत असल्यामुळे या शाळा पुर्ववत सुरू ठेवण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

१८६. ६९ **श्री. विक्रम काळे,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. अमोल मिटकरी, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे, श्री. सचिन अहिर **वि.प.स.** कित्ता

"शालेय मुलां-मुलींच्या बौद्धिक, शारीरिक, भावनिक व सामाजिक विकासासाठी नियोजनपूर्वक दिले जाणारे शिक्षण म्हणजे शारीरिक शिक्षण हे विद्यार्थ्यांचे दृष्टीने महत्वाचे मानले जाणे, परंतु गेली १२ वर्षे शारीरिक शिक्षण शिक्षकांची भरतीच करण्यात आलेली नसल्यामुळे शाळांमध्ये शारीरिक शिक्षण या विषयाच्या शिक्षकांची कमतरता सातत्याने जाणवत असणे, शारीरिक शिक्षक हे फक्त खेळाडूच घडवत नसून शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना आरोग्य व शारीरिक शिक्षण आणि शिस्ती विषयक शिक्षणही देत असणे, एकीकडे ऑलिम्पिक पदकाची दिव्य स्वप्ने दाखविली जाणे तर दुसरीकडे खेळांडूचा पाया भक्कम करणाऱ्या क्रिडा शिक्षकांकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याने नव्याने भरती केली जात नसल्याचे निदर्शनास येणे, याखेरीज क्रिडा शिक्षक निर्माण करणारी बहुतांशी बीपीएड कॉलेजेसही बंद पडली असल्याचे तसेच शिवाजी

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विद्यापीठाच्या (कोल्हापूर) कार्यक्षेत्रात सध्या एकही शारीरिक शिक्षक निर्माण करणारे बीपीएड महाविद्यालय सुरू नसल्याचे निदर्शनास येणे, परिणामी शारीरिक शिक्षकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, गेल्या १२ वर्षापासून रखडलेली शारीरिक शिक्षकांची भरती प्रक्रिया राबविण्याबाबत व शारीरिक शिक्षकांच्या नेमणूका करण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची भूमिका." | | |
| १८७. | १४१ | **श्री. प्रसाद लाड वि.प.स.** | कित्ता | |
| | | "राज्यात शिक्षकांच्या सुमारे ६५ हजार जागा रिक्त असून याचा शैक्षणिक दर्जावर प्रतिकूल परिणाम होत असणे, अपुऱ्या मनुष्यबळामुळे व्यवस्थेवर ताण येत असणे, शिक्षक भरतीसाठी राज्यात परीक्षा उत्तीर्ण करूनही अनेक विद्यार्थी पदभरतीच्या प्रतीक्षेत असणे, यामुळे आधी जागांची जाहिरात काढा आणि मगच अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (टेट) परीक्षा घ्या, अशी मागणी डीटीएड, बीएड स्टुडंट्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आली असणे, मंत्री महोद्यांनी नुकतेच तीन महिन्यांत तीस हजार शिक्षकांची भरती करण्याचे अश्वासन देणे, त्याला पात्रताधारक भावी शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी 'टेट' ही परीक्षा पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध होण्याच्या आधीच घेतली जाणे, या परीक्षेसाठी विद्यार्थी रात्रंदिवस अभ्यास करतात आणि ती उत्तीर्ण होतात, परंतु यानंतर मात्र, पदांसाठी जाहिरातच काढली जात नसणे, त्यामुळे या विद्यार्थ्यांचा मोठा हिरमोड होणे, एकीकडे वय वाढत असताना पात्रता परीक्षा उत्तीर्ण होऊनही विद्यार्थ्यांच्या हाती काहीच आलेले नसते, यामधून विद्यार्थ्यांमध्ये नैराश्य वाढणे, यामुळे टेट परीक्षा आधी घेऊन टप्प्याटप्प्याने भरतीप्रक्रिया न राबविता टीईटी | | |

पात्र उमेदवारांची एकत्रित परीक्षा घ्यावी आणि केंद्रीय पद्धतीने गुणवत्तेबाबत कटऑफ लावावा, अशी मागणी भावी शिक्षकांकडून होत असणे, राज्यात पवित्र पोर्टलमार्फत २०१७ मध्ये १२ हजार १४७ पदांची शिक्षकभरती सुरू झाली मात्र, त्यानंतर ही भरती प्रक्रिया रेंगाळली, अद्याप उर्वरित सुमारे साडेचार हजार जागांवरील भरती प्रक्रिया लाल फितीत अडकलेली असणे, ऑक्टोबर, २०२२ मधील शासन निर्णयानुसार ज्या विभागात आकृतिबंध पूर्ण झाला आहे त्या विभागात शंभर टक्के, तसेच ज्या विभागाचा आकृतिबंध अपूर्ण १ आहे त्या विभागात रिक्त पदाच्या ८० टक्के जागा भरण्यासाठी वित्तविभागाची मान्यता मिळाली असणे, जिल्हा परिषद, महापालिका, नगरपरिषद आणि छावणी शाळांतील ३१ हजार ४७२ जागा आणि खासगी शिक्षण संस्थेमधील अशा एकूण शिक्षकांच्या ६५ हजार जागा रिक्त असणे, त्या तातडीने भरण्याकरिता शासानाने घ्यावयाची निर्णय व करावयाची कार्यवाही."

१८८. १५४ **श्री. अभिजित वंजारी,** श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. राजेश राठोड, श्री. जयंत आसगावकर, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** कित्ता



"केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या मॅट्रीकपुर्व व मॅट्रीक उत्तर शिष्यवृत्तीचा परतावा राज्यातील शाळा व महाविद्यालयांना ४ ते ५ वर्षे उशीरा मिळणे, तसेच राज्यशासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या इतर मागासवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमीन व अनुसूचित जाती व जमाती तसेच खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यात आर्थिकदृष्ट्या मागास योजनेचा लाभ ५ ते ६ वर्षे उशीरा मिळणे त्यामुळे राज्यातील विनाअनुदानीत शाळा व महाविद्यालये आर्थिक चक्र विस्कळीत झाले असणे, तसेच केंद्र शासनाचा ६० टक्के शिष्यवृत्तीचा हिस्सा शिक्षणशुल्काच्या प्रतिपुर्तीसाठी प्रत्यक्षात महाविद्यालयांना न देता परस्पर विद्यार्थ्यांच्या खात्यात डीबीटीमार्फत थेट जमा होत असणे, परंतु त्याची माहिती संबंधित महाविद्यालयांना न मिळणे व विद्यार्थी यांच्या खात्यात जमा झालेली शिक्षणशुल्काच्या परताव्याची रक्कम प्रत्यक्षात

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | महाविद्यालयात न भरणे, त्यामुळे संबंधित शाळा व महाविद्यालयाच्या संस्था चालकांना शिक्षक व इतर कर्मचा-यांकरिता वेतनासाठी आर्थिक तरतूद करण्यास अडचणी येणे, पर्यायाने अनेकदा पगार व इतर खर्च भागविण्याकरिता राष्ट्रीयकृत बँकाकडून ओव्हरड्राफ्ट अथवा कर्ज घेणे, तसेच दरमहिन्याला भविष्य निर्वाहाची ची रक्कम व प्रोफेशनल टॅक्सची रक्कम ७ तारेखच्या आत जमा करणे क्रमप्राप्त असल्यामुळे राज्यातील अनेक शैक्षणिक संस्था डबघाईस येणे, त्यामुळे संस्थाचालकांमध्ये पसरलेली नाराजीची व असंतोषाची भावना, याबाबत शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१८९.** | **१७५** | **श्री. किरण सरनाईक,** श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री. प्रसाद लाड, ॲड. निरंजन डावखरे, श्री. रमेशदादा पाटील, श्री. रामदास आंबटकर, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. अभिजित वंजारी, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. सुधाकर अडबाले, श्री. जयंत आसगावकर **वि.प.स.**<br>“राज्यातील शाहू, फुले, आंबेडकर अनुसूचित जाती, नवबौद्ध (१६५) निवासी अनुदानित आश्रम शाळांना नियमित वेतनश्रेणीचा व VJNT च्या धर्तीवरचा प्रस्ताव मंजूर करण्याची तसेच सदर शाळांना १०० टक्के अनुदान मंजूर करणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता व संच मान्यता सेवा सातत्य तत्काळ देण्यात यावे व विद्यार्थी परिपोषण १००% प्रमाणे देण्यात यावे याबाबतची शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत असणे, या मागण्यांबाबत तातडीने कार्यवाही करण्याची नितांत आवश्यकता याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |

१९०. २१० **डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे,** श्री. सचिन अहिर, श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.** कित्ता

"दादर नायगाव येथील प्रसिद्ध नायगाव एज्युकेशन सोसायटी या शैक्षणिक संस्थेत सात कोटी रुपयांपेक्षा अधिक निधीची अपराथापर करण्यात आल्याची बाब धर्मादाय कार्यालयाच्या सूचनेनंतर करण्यात आलेल्या लेखापरीक्षणाद्वारे उजेडात येणे, १९६३ साली स्थापना झालेल्या सदर संस्थेमार्फत विविध शाळा, कॉलेजेस चालविण्यात येत असून सन २००३ ते २०११ या काळात कोणतेही अधिकार नसताना पदाधिकारी असल्याचे भासवून संस्थेच्या कागदपत्रांचा गैरवापर करून माजी पदाधिकाऱ्यांनी सदर पैशाचा अपहार करणे, याबाबत संबंधित शाळांचे मुख्याध्यापकांसह इतर १६ जणांवर भोईवाडा पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केलेला असणे, २०११ नंतरच्या निवड झालेल्या नवीन कार्यकारिणीने लेखापरीक्षका मार्फत विशेष लेखापरीक्षण करून सदर बाब धर्मादाय आयुक्तालयाचे निदर्शनास आणल्यानंतर गुन्हे दाखल करण्याचे आदेश देण्यात येणे, परिणामी संस्थेच्या शाळा कॉलेजेसना नाहक आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असून यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये प्रचंड असंतोष असून दोर्शीवर कारवाई करण्याबाबत शासनस्तरावर तातडीने करण्यात आलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

१९१. ३४२ **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे वि.प.स.** कित्ता

"राज्यातील उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती व तंत्रज्ञान विषयावरील शिक्षकांना अनुदान मंजुरी बाबत मान्यताप्राप्त आयटी शिक्षकांना कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक प्रमाणे नियमित वेतनश्रेणी व १००% वेतन अनुदान, मा. शिक्षक संचालक यांचे जा.क्र.शिसंमा/२०२२/माहिती तंत्रज्ञान /१९९७८/टीर/७३९५ दिनांक २३ नोव्हेंबर २०२२ रोजीचे पत्र राज्यातील मान्यता प्राप्त आयटीचे एकूण १२३ शिक्षकांना प्रतिवर्षी १० कोटी ८ लाख रुपये एवढा खर्च येणार असणे, राज्यामध्ये अनुदानित कॉलेज मध्ये आयटी विषयाचे एकूण ५८५ (पूर्णवेळ ४६१ + अर्धवेळ १२४ असे एकूण ५८५) "शिक्षक काम करित आहे

## **विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | त्यापैकी आज १२३ आय टी शिक्षक यांना शिक्षण उपसंचालका यांची वैयक्तिक मान्यता असणे, सदरचे १२३ आय टी शिक्षक गेले २० ते २१ वर्षे दरमहा फक्त ५००० एवढ्या मानधनावर काम करीत असणे, शासनाने आयटी शिक्षकांना २० हजार रुपयेचा मानधनाचा प्रस्ताव काही दिवसापूर्वी ठेवला असून आयटी शिक्षकांनी तो मान्य केला नसणे, कारण जुन्या आयटी शिक्षक यांची एकूण सर्व्हिस २१ वर्ष झाली असून काहींची रिटायरमेंट जवळ आली असणे, त्यामुळे आयटी ला १००% वेतन अनुदान मिळावे व मागील विनाअनुदानची सेवा ग्राह्य धरण्यात यावी, यावर शासनाने घ्यावयाची निर्णय व करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१९२.** | **४२०** | **श्रीमती उमा खापरे,** श्री. रमेशदादा पाटील, श्री. निलय नाईक, श्री. महादेव जानकर **वि.प.स.**<br>"राज्यातील सरकारी आणि जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये २०२२- २३ या शैक्षणिक वर्षात मुलींची ९५८ स्वच्छतागृह उभारण्याचे लक्ष होते परंतु त्यापैकी ५१८ स्वच्छतागृहांची कामे अद्यापि पूर्ण झाली नसल्याने मुलींना मोठ्या प्रमाणात गैरसोयीच्या समस्यांना सामना करावा लागत असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा सुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे समग्र शिक्षा अभियानाचा बोजवारा उडालेला असणे, शाळांच्या पायाभूत सुविधा संदर्भात दरवर्षी वार्षिक कार्ययोजना हाती घेऊन ही ती वेळेत कामे करण्यात न आल्याने ही परिस्थिती दरवर्षी उत्पन्न होत असणे, त्यामुळे विद्यार्थ्यांनी पालक नाराजी व्यक्त करीत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | कित्ता | |

| | | | |
|---|---|---|---|
| १९३. | ४३५ | **श्री. सत्यजीत तांबे वि.प.स.**<br>"राज्यात शिक्षण विभागाचे अनेक प्रश्न प्रलंबित असून त्यामध्ये प्रामुख्याने गेल्या अनेक वर्षापासून शिक्षक भरती बंद असल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होणे, शिक्षण संस्थांचे वेतनेत्तर अनुदानात मागील अनेक वर्षापासून वाढ न झाल्यामुळे विद्यार्थ्यांना भौतिक सुविधांचा प्रश्न निर्माण होणे, कनिष्ठ महाविद्यालयातील पायाभूत वाढीव पदांना मान्यता देऊन अनुदान सुरू न करने, कनिष्ठ महाविद्यालयातील आय. टी. शिक्षकांचा अनुदानाचा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असणे वरील सर्व प्रश्नांबाबत मोठ्या प्रमाणावर मोर्चा आंदोलने व शासन स्तरावर पाठपुरावा होणे, यामुळे शिक्षक, संस्थाचालक व विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष लक्षात घेता शासनाने त्वरित करावयाची आवश्यक कारवाई व धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता |
| १९४. | ४८८ | **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्रीमती उमा खापरे, श्री. रमेशदादा पाटील **वि.प.स.**<br>"बारावी परीक्षेच्या पहिल्याच दिवशी दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा सावळा गोंधळ समोर येणे, इयत्ता बारावीच्या इंग्रजीच्या पेपरमधील तीन प्रश्नांमध्ये एका प्रश्नाएवजी चक्क उत्तरच देण्यात येणे, इतर दोन प्रश्नांमध्ये तपासणाऱ्याला सूचना देण्यात येणे, या प्रकारामुळे राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची नाचक्की झाली असणे, इंग्रजीच्या परीक्षेत उत्तरेच छापून आणणाऱ्या राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीच्या दुसऱ्या दिवशीच्या हिंदीच्या प्रश्नपत्रिकेतही घोळ घातला असणे, हिंदीच्या प्रश्नपत्रिकेत प्रश्न क्रमांक दोनमध्ये चार शब्दांच्या विरुद्धार्थी आणि समानार्थी शब्दांच्या क्रमवारीत घोळ घालण्यात येणे, त्यामुळे विद्यार्थ्यांत पसरलेली संभ्रमावस्था, तसेच राज्यात १७ ठिकाणी आढळून आलेले गैरप्रकार, शिवाय मंडळाने यंदा कॉपीमुक्तीच्या | कित्ता |

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | नावाखाली नियमांचा केलेला अतिरेक, त्यामुळे विद्यार्थ्यांना सहन करावा लागलेला मनस्ताप, या सर्व प्रकारची सखोल चौकशी करण्यात येवून दोषींवर कठोर कारवाई करण्याची असलेली आवश्यकता, परंतु याकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे बारावीच्या विद्यार्थी आणि पालकांत शासनाप्रती पसरलेली कमालीची नाराजीची भावना, यास्तव राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षेतील चुकांमुळे राज्यातील बारावीच्या विद्यार्थांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, याकरिता प्रश्नांचे गुण बहाल करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१९५.** | **६४७** | **श्री. सत्यजीत तांबे वि.प.स.**<br>"राज्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील प्रशासनाच्या चुकीमुळे अनेक चुकीच्या संच मान्यता झालेल्या असणे, चुकीच्या संच मान्यतेमुळे अनेक शाळांमधील पदे कमी होणे, सदर संच मान्यतेचे दुरुस्तीचे प्रस्ताव शासनाच्या मुंबई येथील एन.आय.सी. कार्यालयात आलेले असणे, सदर प्रस्ताव २-२ वर्षे एन.आय.सी कार्यालयात प्रलंबित असणे, शाळांमधील पदे कमी झल्यामुळे अनेक शिक्षकांमध्ये भीती निर्माण झालेली असणे, संच मान्यता दुरुस्त करण्याबाबत शिक्षक व शिक्षक संघटना यांच्याकडून वारंवार मागणी होणे व शासन स्तरावर पाठपुरावा होणे, यामुळे शिक्षक कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष लक्षात घेता शासनाने त्वरित करावयाची आवश्यक कार्यवाही व धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | कित्ता | |

१९६. ६७ **श्री. विक्रम काळे,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. अमोल मिटकरी, श्री. सतिश चव्हाण, श्री. अनिकेत तटकरे **वि.प.स.** — कित्ता

"तत्कालीन शासनाने सन २०१९ मध्ये महात्मा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर करून या योजनेअंतर्गत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देण्याचे जाहीर केलेले असणे, सदर योजनेअंतर्गत राज्यात नियमित कर्जफेड करणारे १४ लाख ३९ हजार इतके शेतकरी पात्र ठरले असताना, शासनाने त्यासाठी दोन टप्प्यात अनुदान वाटप केलेले असले तरी अद्याप ७ लाख १९ हजार शेतकरी अनुदान वाटपापासून वंचित राहिले असल्याचे दि. १९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आलेले असणे, त्यासंदर्भात या आर्थिक वर्षात सर्व पात्र शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाची रक्कम मिळेल असे शासनाचे अप्पर मुख्य सचिव (सहकार विभाग) यानी त्याच दरम्यान जाहीर केले असतानाही अद्याप उर्वरित ७ लाख १९ हजार अनुदान वाटपाचे प्रतिक्षेत असल्याचे निदर्शनास येणे, परिणामी संबंधित सर्व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व उदासिनतेची भावना, त्यामुळे शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान तातडीने वाटप करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

१९७. २८१ **श्री. अमोल मिटकरी,** श्री. शशिकांत शिंदे, श्री. विक्रम काळे **वि.प.स.** — कित्ता

"अकोला जिल्ह्यातील २३६७ शेतकऱ्यांचे ११२ सहकार सोसायटी व जिल्हा मध्यवर्ती बँकेने शेतकऱ्यांचे संमतीपत्र न घेता परस्पर पुनर्गठन करण्यात आल्याचे आढळून येणे, त्यामुळे नवीन कर्ज मिळण्याप्रकरणी महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, त्यानुसार संबंधित सर्व शेतकरी १३.६४ कोटी कर्जे थकीत शेतकरी लाभापासून वंचित राहिल्यामुळे थकीत कर्जास माफी मिळणेसाठी मागणी केली असल्याचे निदर्शनास येणे, सदर बाब जिल्हा उप निबंधक,

**विवरण क्रमांक २१**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | सहकारी संस्था, अकोला यांनी केलेल्या चौकशीअंती उघडकीस आल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे संबंधित ११२ सहकारी सोसायट्या तात्काळ बरखास्त करून या सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध तसेच अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक व्यवस्थापनविरुद्ध पोलिसात गुन्हे दाखल करण्याची शेतकरी वर्गाकडून तसेच काही राज्यकीय पक्ष कार्यकर्त्यांकडून करण्यात आलेली मागणी, परिणामी, पर्यायाने शासनाची व जनतेची करण्यात आलेली फसवणूक, यामुळे सदर रक्कमेची कर्जे माफ करण्यात यावीत, अशीही मागणी करण्यात येणे, त्यामुळे संबंधित सहकारी सोसायट्या बरखास्त करून त्यावर प्रशासकीय मंडळे स्थापन केल्यास, तरुणवर्गाला नोकरीची संधी मिळण्याची शक्यता लक्षात घेता, शासनाने त्याबाबत तातडीने चौकशी करून कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भुमिका." | | |
| **१९८.** | **३१८** | **ॲड. अनिल परब वि.प.स.**<br>"दि राजलक्ष्मी अर्बन को.ऑ.बँक लिमिटेड, नाशिक या बँकेच्या सन २०१५-१६ ते २०२०-२१ निवडणूक कामकाजाबाबत तत्कालीन निवडणूक निर्णय अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक २०१४) मधील तरतुदीचे उल्लंघन केल्याचे विभागीय चौकशी अधिकाऱ्याने शासनास सादर केलेल्या अहवालात नमूद असणे, सदरहू तत्कालीन निवडणूक अधिकाऱ्याने सचोटीमध्ये निःपक्षपातीपणा न राखता विशिष्ठ उमेदवार निवडून येण्यासाठी नियमबाह्य कृती करून कर्तव्यात कसूर करणे, तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ चे कलम ३ मधील तरतुदींचा भंग केलेला असल्याने ते शिस्तभंग | कित्ता | |

विषयक कारवाईस पात्र ठरणे, तसेच सदरहू व्यक्ती ही नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सरव्यवस्थापक असताना गट सचिवांच्या पगाराच्या अनुषंगाने पारित केलेल्या मूळ ठरावात केलेली शब्दरचना बदलून चुकीचा ठराव मंजूर करणे, त्याचप्रमाणे महात्मा फुले शेतकरी सन्मान योजने अंतर्गत आस्थापना व प्रशासकीय खर्चासाठी द्यावयाच्या रकमेत देखील अनियमितता केलेली असणे, तथापि सदरहू व्यक्तीविरुद्ध अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई केलेली नसणे, परिणामी बँकांचे सभासदांमध्ये सदरहू व्यक्तीविरुद्ध प्रचंड संताप व चीड असणे व शासनाविषयी राग व्यक्त होणे, या प्रकरणी शासनाने करावयाची कारवाई."

| | | | |
|---|---|---|---|
| १९९. | ३९१ | **श्रीमती उमा खापरे,** श्री. रमेशदादा पाटील, श्री. निलय नाईक, श्री. महादेव जानकर **वि.प.स.** | कित्ता |

"राज्यातील भूविकास बँकेच्या कर्जदारांना सरसकट कर्जमाफी जाहीर करून एक वर्षाचा कालावधी होऊन अद्याप शासन निर्णय निर्गमित झालेल्या नसल्याने तब्बल ३३ हजार ८९० कर्जदार शेतकऱ्यात गोंधळाचे वातावरण निर्माण झाल्याची बाब माहे फेब्रुवारी २३ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या. सुमारास निदर्शनास येणे, यामुळे तब्बल ३३ हजार ८९० कर्जदार शेतकरी मोठ्या आर्थिक समस्या येणे, भूविकास बँकेच्या चार ते पाच हजार कोटीच्या मालमत्तेचे भवितव्य अंतराळीच राहिलेले असून राज्यात भूविकास बँकेच्या ६० मालमत्ता असणे, या भूविकास बँकेच्या मालमत्तांचे मूल्यांकन सुमारे ५००० कोटीच्या जवळपास असणे, या मालमत्तांचे मूल्यांकन करून कर्जदार शेतकरी त्यांचे थकीत कर्ज माफ करून १००० कर्मचाऱ्यांची देणे देण्याची आवश्यकता असतानाही न दिल्याने शेतकरी आणी कर्मचाऱ्यांमधून नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २००. | ७५३ | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप वि.प.स.** “मुंबईतील दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्हह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेमध्ये शासकीय कर्मचारी खातेदार असून या संस्थेचा कारभार सहकार कायद्यानुसार चालत असणे, या संस्थेची पंचवार्षिक निवडणूक दि. ८ जुलै २०२२ रोजी ६ मतदार केंद्रावर पार पडली असून या निवडणूक प्रक्रियेमध्ये मतदानाच्या वेळी व मतमोजणी मध्ये प्रचंड गैरव्यवहार व नियमाची पायमल्ली झाल्याचा प्रकार उघड झाला असून या निवडणूक प्रक्रियेतील सहकार पॅनल व एकता पॅनल या दोन पॅनल पैकी एकता पॅनलला मुख्य निवडणूक अधिकारी श्री. सतीश तोटावार यांनी संपूर्णपणे एकतर्फी मदत केल्याचा प्रकार उघड होणे, यामध्ये निवडणूक केंद्रावर बेकायदेशीर व्यक्तींची नियुक्ती करणे, मतदारांना ओळखपत्राशिवाय मतदानास परवानगी देणे, मंत्रालय जिमखाना येथील मतदान केंद्रावर पेपर प्रिंटेड लिस्टचा वापर करून मतदारांची रखडपट्टी करून त्यांना मतदानापासून वंचित ठेवणे, कोकण भवन सीबीडी बेलापूर येथील मतदान केंद्रावर औरंगाबाद येथील सुमारे दीडशे बोगस मतदारांनी मतदान केल्याने सहकार पॅनलने आक्षेप घेतला असता तो आक्षेप फेटाळणे, औरंगाबाद येथे चौकशी केली असता मतदान केलेले सर्व कर्मचारी त्यांच्या कार्यालयात त्यादिवशी कामावर उपस्थित असल्याची नोंद असणे, पालघर मतदान केंद्रात एकता पॅनलच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते दुचाकीवर मतपेटी रेल्वे स्टेशन पर्यंत पोहोचविण्यात येणे, एकता पॅनलच्या कार्यकर्त्यांसोबत रेल्वेमधून मतपेटी मुंबईतील मोजणी केंद्रावर आणणे, त्यावेळी सहकार पॅनलच्या कार्यकर्त्यांना प्रवेशाला मनाई करणे, चर्चगेट स्टेशन वरून खाजगी वाहनाने मतपेटी मोजणी केंद्रात | कित्ता | |

आणणे, वास्तविक मतपेटी चारचाकी वाहनाने पोलीस संरक्षणात आणणे आवश्यक असताना जाणीवपूर्वक असा प्रकार करणे, मतमोजणी केंद्रासाठी संस्थेची स्वतःची प्रशस्त जागा सीबीडी बेलापूर येथे उपलब्ध असून सीसीटीव्ही कॅमेरे असतानाही त्या ठिकाणी मतमोजणीची परवानगी न देता सचिवालय जिमखाना येथे संस्थेचे अंदाजे एक लाख रुपये खर्च करून मतमोजणी केंद्र तयार करणे, मतमोजणी केंद्रावर सहकार पॅनलच्या उमेदवारांना प्रवेश न देता एकता पॅनलच्या उमेदवारांना राजरोसपणे वावर करण्यास परवानगी देणे, मतदानाच्या वेळी व मतमोजणीच्या वेळी सहकार पॅनलने घेतलेला आक्षेपाना विचारात न घेता मनमानीपणे कारभार करणे, मतमोजणीनंतर मतपेट्या सील करून संस्थेच्या कार्यालयात ठेवणे आवश्यक असताना निवडणूक अधिकारी यांनी घाईघाईने खाजगी वाहनात मतपेट्या सील करणे, याबाबत व्हिडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असणे, मतपेटी सील करताना उमेदवार, पोलिंग एजंट किंवा साक्षीदारांच्या सह्या न घेणे, दुसऱ्या दिवशी सहकार पॅनलच्या वैध मतपत्रिका आकाशवाणी आमदार निवासातील शौचालयाजवळ सापडणे, अशा अनेक प्रकारे निवडणूक अधिकारी श्री. सतीश तोटावार यांनी स्वतःच्या अधिकाराचा मनमानीपणे गैरवापर केला असणे, मतदानाच्या पूर्वी श्री. तोटावार यांनी सहकार पॅनलचे प्रमुख श्री. प्रकाश डांगे यांच्याकडे १० लाखाची मागणी करणे, याचे ऑडीओ रेकॉर्डिंग उपलब्ध असणे, सहकार पॅनलकडून रक्कम न मिळाल्यामुळे एकता पॅनलला एकतर्फी मदत करणे, उपरोक्त सर्व बाबींसंदर्भात सहकार पॅनलच्या उमेदवारांनी मुख्य निवडणूक अधिकारी, पुणे, जिल्हा निवडणूक अधिकारी, मुंबई शहर, विशेष निबंधक सहकारी संस्था, पुणे, संबंधित पोलिस स्टेशन यांच्याकडे लेखी निवेदन दिलेले असणे, सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी उक्त प्रकरणी चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल प्राधिकरणास दिनांक १३ ऑक्टोबर, २०२२ पर्यंत सादर करण्याबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,

## विवरण क्रमांक २१—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | सहकारी संस्था, मुंबई शहर यांना पत्राद्वारे कळविणे, एकता पॅनलचे प्रमुख भाऊसाहेब पठाण हे औरंगाबाद येथील कृषी विभागात शिपाई म्हणून कार्यरत असून त्यांनी गैरमार्गाने मोठी आर्थिक माया जमा केली असणे, त्यांच्या व काही जवळच्या व्यक्तींच्या नावे मुंबईतील फोर्ट, पुणे, नाशिक, औरंगाबाद या ठिकाणी जमिनी/घरे असणे व त्यांनी निवडणूक अधिकारी यांच्याशी आर्थिक व्यवहार केल्यामुळे एकता पॅनलला निवडणुकीमध्ये मदत मिळाल्याचे सभासदांमध्ये असलेली चर्चा, निवडणूक अधिकारी यांनी निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे न राबवता एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणे, याबाबतचे सर्व आक्षेप सभासदांनी नवीन पदाधिकारी यांच्या पहिल्या बैठकीत दि. २२ फेब्रुवारी २०२३ रोजी उपस्थित केले असता त्याबाबत कोणतीच बाब विचारात न घेता बैठकीतून राष्ट्रगीत अर्धवट थांबवून पळून जाणे, याबाबतची तक्रार संस्थेच्या सभासदांनी दिनांक २ मार्च २०२३ रोजी मा. मुख्यमंत्री, मा. उप मुख्यमंत्री, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, य पोलीस आयुक्त, मुंबई यांना करणे, श्री. पठाण यांनी सोसायटीमधून स्वतःसाठी व जवळच्या व्यक्तींकरिता साक्षीदार न घेता मोठया प्रमाणात कर्ज वाटप करणे, या सर्व प्रकारामुळे यापूर्वी चांगल्या रीतीने काम करणाऱ्या क्रेडिट सोसायटीचा वापर बिनदिक्कतपणे स्वतःच्या लोभापोटी करणाऱ्या नवीन पदाधिकारी व निवडणूक अधिकारी यांचे बाबत सर्व सभासदांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने या संपूर्ण गैरप्रकाराची चौकशी करून बेकायदेशीरपणे निवडणूक प्रक्रिया राबवून एकता पॅनलच्या बाजूने निर्णय देणाऱ्या निवडणूक अधिकारी | | |

श्री. सतिश तोटावार व त्यांना आर्थिक लाभ देणाऱ्या एकता पॅनलचे प्रमुखख भाऊसाहेब पठाण यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता तसेच यापूर्वी झालेल्या निवडणूकीमधील केलेली अनियमितता विचारात घेता दि महाराष्ट्र मंत्रालय को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेची निवडणूक पुनःश्च घेण्याबाबत व पुढील निवडणुक होईपर्यंत प्रशासकीय अधिकाऱ्याची नेमणूक करण्याबाबत करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाचे प्रतिक्रिया."

**२०१.** **२८२** **श्री. गोपिचंद पडळकर वि.प.स.** कित्ता

"गडचिरोली जिल्ह्यातील धानोरा, गडचिरोली, चामोर्शी, मूलचेरा, अहेरी, भामरागड इत्यादी तालुक्यात मोठ्या प्रमाणात झाडे कुणबी या जातीचे लोक राहत असून त्यांची जात इतर मागास प्रवर्गात मोडत असणे, परंतु झाडे कुणबी या जातीतील कुणबी हा शब्द वगळून धनगर अनु . क्र १५ वरील झाडे या पोटजातीचा आधार घेऊन स्वतःला भटक्या जमाती क या प्रवरातील असल्याचे दाखवून बोगस झाडे जातीचे जात प्रमाणपत्र प्रशासकीय कार्यालयाकडून मिळवत असणे, बोगस जात प्रमाणपत्राच्या आधारे भटक्या जमातीच्या आरक्षित जागेवर शासकीय नोकरीवर कब्जा करून बघत जातीचे पुरावे सादर करून जात वैधता प्रमाणपत्र गैरमार्गाने जात पडताळणी कार्याकडून मिळवत असणे, झाडे कुणबी हे भंडारा चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात वास्तव्यास असून कुणबी मध्ये काही पोट जातीनुसार ओळखले जातात जसे की खेळूले कुणबी, खैर कुणबी, झाडे कुणबी, असे वेगवेगळे उप जाती नुसार ओळखले जाणे परंतु जात प्रमाणपत्र देताना उप जातीचे नावाने जात प्रमाणपत्र न देता कुणबी ओबीसी म्हणून दिले जाणे, झाडे कुणबी हे धनगरांचे पोट जातीतील झाडे या नावाचा नामसदृश्याचा फायदा घेण्याचे उद्देशाने गैरमार्गाचा वापर करीत असणे, याविषयी धनगर अधिकारी कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य, शाखा गडचिरोली यांनी उप विभागीय अधिकारी गडचिरोली यांना

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | पत्राद्वारे २/१२/२०२२ रोजी ही बाब निदर्शनास आणून दिलेली असणे, परंतु अद्याप याबाबत प्रशासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, त्यामुळे सदरहू विषयाची चौकशी करून तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **२०२.** | **४०६** | **श्रीमती उमा खापरे,** श्री. रमेशदादा पाटील, श्री. निलय नाईक, श्री. महादेव जानकर **वि.प.स.** | कित्ता | |
| | | "राज्यात उस्मानाबाद तालुक्यातील तेर येथील संत गोरोबाकाका यांची समाधी मंदिराला सध्या पर्यटन स्थळाचा "ब" वर्ग दर्जा असून त्याला "अ" वर्ग दर्जा मिळावा यासाठी एक वर्षापूर्वी पर्यटन विभागाकडे प्रस्ताव सादर करूनही अद्याप हा प्रस्ताव कोणत्याही कारवाई विना पडून असल्याची बाब माहे फेब्रुवारी २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या समारं निदर्शनास येणे, तेर गावाला ऐतिहासिक वारसा लाभला असून दोन हजार वर्षाहून अधिक काळातील ऐतिहासिक वास्तू देवालय आदी इतिहासाची साक्ष देत उभे असणे, येथील संत गोरोबाकाका यांच्या समाधी मंदिरात वर्षभर भाविकांचे वर्दळ असते या मंदिरा सोबतच पुरातन वस्तू संग्रहालय व अन्य विविध देवालयाचा अभ्यास करण्यासाठी शेकडो इतिहास संशोधक तसेच दर्शनासाठी वर्षभरात १४ लाखापेक्षा अधिक तर प्रत्येक महिन्याच्या एकादशीला हजारो भाविक तेर मध्ये येत असणे, संत गोरोबाकाका यांच्या मंदिराला सध्या तीर्थक्षेत्राचा "ब" वर्ग दर्जा असून या तीर्थक्षेत्राला "अ" वर्गाचा दर्जा दिल्यास मंदिर परिसरातील विविध विकास कामे होऊन येथे येणाऱ्या इतिहास संशोधक तसेच दर्शनासाठी वर्षभरात येणाऱ्या | | |

लाखो भाविकांना सोयी सुविधा उपलब्ध करून देणे शक्य होणार असणे, त्यासाठी ग्रामपंचायतीने ठराव करून एक वर्षापूर्वीच पाठवलेला 'अ' वर्गाचा प्रस्ताव प्रलंबित असल्याने सर्वत्र नाराजी व्यक्त होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**२०३.** **२४१** **श्री. सुनिल शिंदे,** श्री. विलास पोतनीस **वि.प.स.** कित्ता

"अनेकदा धरणे, आंदोलने करूनही शासनाकडून कोणताही सकारात्मक प्रतिसाद न लाभल्याने राज्यभरातील अंगणवाडी सेविकांनी दि. २० फेब्रुवारी, २०२३ पासून बेमुदत संपाचे हत्यार उपसले असून मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले असणे, यापूर्वी, अंगणवाडी सेविकांनी राज्याच्या प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलन सुरू केले असणे, तरीदेखील शासकीय यंत्रणांनी त्यांची दखल घेतलेली नसणे, राज्यात लाखो मुले अंगणवाडीमध्ये अनौपचारिक शिक्षण आणि पोषण आहार घेत असणे, त्यासोबत स्तनदा माता, गरोदर महिला यांना देखील अंगणवाडीकडून विविध सेवा देण्यात येणे, अंगणवाडी कर्मचारी हे कुठल्याही तात्पुरता योजनेचा भाग नसून शासनाने कायद्याने निर्माण केलेली पदे असणे, त्यामुळे राज्यातील सर्व अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचारी म्हणून मान्यता देण्यासह रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत, या अंगणवाडी सेविकांच्या प्रमुख मागण्या असणे, २० ते ३० वर्षे सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार मानधन वाढ फरकासह देण्याची आणि शासकीय वेतनश्रेणी मिळावी इत्यादी मागण्याही शासनाने अद्याप मान्य केल्या नसणे, त्यामुळे राज्यातील अंगणवाडी सेविकांत शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष आणि नाराजीची भावना, यास्तव राज्यातील अंगणवाडी सेविकांच्या वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या मागण्या मान्य करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

# विवरण क्रमांक २२

## महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ अन्वये अशासकीय ठराव

**(१) आलेल्या सूचनांची संख्या** - ७९
**(२) स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या** - ७४
**(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या** - - -

| अ. क्र. | सदस्यांचे नाव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | **(मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यनुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत)—** | | |
| **१.** | **श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २५ —** | | |
| | “ शेतकऱ्यांना, शेती व्यवसायासाठी लागणारी रासायनिक खते, अवजारे, किटकनाशक यांच्या किंमतीमध्ये सतत होणारी वाढ, तसेच शेतकऱ्यांना शेतमालाचे न परवडणारे भाव विचारात घेता, उत्पादन खर्चावर आधारित असे शेतमालाचे भाव शेतकऱ्यांना मिळण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” | शुक्रवार, ०३ व १७ मार्च २०२३. | ठरावावर चर्चा झाली नाही. |
| **२.** | **डॉ. वजाहत मिर्झा, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ३७ —** | | |
| | “ राज्यातील अल्पसंख्याक समाजातील नागरिकांना शिक्षण व रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होत असल्याने हा समाज विकासापासून वंचित आहे, राज्य शासनाच्या अनेक योजना या समाजापर्यंत पोहोचत नसल्याने या समाजाला अनेक लाभ मिळत नाहीत, मौलाना आझाद आर्थिक | शुक्रवार, ०३ व १७ मार्च २०२३. | ठरावावर चर्चा झाली नाही. |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | विकास महामंडळ हे फक्त नावापुरते उरलेले आहे, या महामंडळाद्वारे एकाही ठिकाणी एकही व्यवसायिक व थेट कर्ज पूर्ण करण्यात आले नाही, मागील तीन वर्षांपासून या महामंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली नसून शासनाकडून या महामंडळास निधीही उपलब्ध करून दिला जात नाही, तसेच या समाजातील हजारो विद्यार्थ्यांना अनेक वर्षांपासून शिष्यवृत्ती देखील मिळत नाही, शाळांना योग्य अनुदान देखील मिळत नसल्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात देखील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थी मागास राहत आहेत, यामुळे या समाजातील नागरिकांच्या आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणामध्ये वाढ होऊन हा समाज विकासापासून दूरच राहिला आहे, या समाजाच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक उत्कर्षासाठी शासनाने अधिकाधिक प्रभावी उपाययोजना आखाव्यात, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ” | | |
| ३. | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २० —** | | |
| | “विदर्भात, वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुद्धा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.” | शुक्रवार, ०३ व १७ मार्च २०२३. | ठरावावर चर्चा झाली नाही. |

## विवरण क्रमांक २३

### सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन

### महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०६ अन्वये शासकीय ठराव

| अ. क्र. | मंत्री व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |

**निरंक**

## विवरण क्रमांक २४
## तारांकित व अतारांकित प्रश्नांच्या सूचनांवरील कार्यवाही

| प्रश्नांचा प्रकार | आलेल्या सूचना | जादा सूचना | कार्यवाहीत घेतलेल्या सूचना | अस्वीकृत सूचना | मागे घेतलेल्या सूचना | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | अतारांकित म्हणून स्वीकृत | सम्मिलित | स्वीकृत सूचना | तोंडी उत्तरीत झालेल्या | सदस्य अनु-पस्थितीमुळे अतारांकित | व्यपगत | सभागृहात उत्तरीत झालेल्या प्रश्नांची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) |
| तारांकित प्रश्न | १८५६ | ५७ | १७९९ | ९१ | ६ | - - | २०५ | ५२२ | ७२८ | ८४ | - - | २४७ | ११.५४% |
| अतारांकित प्रश्न | - - | - - | - - | - - | - - | - - | - - | - - | - - | - - | - - | - - | - - |

## विवरण क्रमांक -२५

## अल्प सूचना प्रश्नांवरील कार्यवाही

| आलेल्या सूचना | अस्वीकृत | मागे घेतलेल्या सूचना | सदस्य/विभागाकडे खुलाशासाठी पाठविलेले प्रश्न | सम्मिलित केलेल्या सूचना/अतारांकित स्वीकृत | स्वीकृत सूचना | उत्तरीत झालेल्या सूचना | व्यपगत झालेल्या सूचना | सदस्यां-कडून विचारण्यात न आलेल्या सूचना | उत्तर दिलेल्या सूचनांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| ७ | ५ | १ | - - | - - | १ | १ | - - | - - | 100% | - - |

## विवरण क्रमांक - २६

### तारांकित प्रश्नांची विभागनिहाय सांख्यकीय माहिती

| (1) | (2) | (3) | (4) | (5) | (6) | (7) | (8) | (9) | (10) | (11) | (12) | (13) | (14) | (15) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | शालेय शिक्षण विभाग | २२० | १३ | १ | १८ | ० | १०० | १२ | ५१ | ६ | - | ४५ | २५ | 1176% |
| (२) | [illegible] विभाग | ३६ | ० | ० | ० | ० | २२ | २ | ११ | २ | - | ९ | १ | १८.१८% |
| (३) | ऊर्जा विभाग | ४५ | ० | ० | ६ | ० | १७ | ६ | १४ | ३ | - | ११ | २ | २१.४३% |
| (४) | नगर विकास विभाग | २१८ | ७ | ० | ४ | ० | ३१ | ३६ | ८६ | ५ | - | ८१ | ५४ | ५.८१% |
| (५) | गृहनिर्माण विभाग | ३६ | १ | ० | ० | ० | १२ | ४ | १६ | १ | - | १५ | ३ | ६.२५% |
| (६) | गृह विभाग | १०८ | २ | ० | ५ | ० | २४ | १७ | ५० | ८ | - | ४२ | १० | १६.००% |
| (७) | नियोजन विभाग | १७ | ० | ० | ० | ० | १० | १ | ६ | १ | - | ५ | ० | १६.६७% |
| (८) | सहकार विभाग | २६ | ० | ० | ० | ० | ६ | २ | १८ | २ | - | १६ | ० | ११.११% |
| (९) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग. | ६८ | ९ | ० | ४ | ० | १२ | ५ | २९ | ३ | - | २६ | ९ | १०.३४% |
| (१०) | उद्योग विभाग | २२ | ० | ० | १ | ० | ५ | २ | १३ | ० | - | १३ | १ | |
| (११) | वैद्यकीय शिक्षण विभाग | ५१ | ० | ० | ० | ० | १८ | ६ | २१ | ४ | - | १७ | ६ | १९.०५% |
| (१२) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग | ७७ | ० | १ | २ | ० | १८ | ७ | ४१ | २ | - | ३९ | ८ | ४.८८% |
| (१३) | जलसंपदा विभाग | ४९ | ० | ० | १ | ० | ९ | ८ | ३० | ८ | - | २२ | १ | २६.६७% |
| (१४) | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग. | १८ | ३ | ० | १ | ० | ४ | ४ | ६ | ० | - | ६ | ० | |
| (१५) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ७७ | ४ | ० | ६ | ० | १६ | ११ | २८ | २ | - | २६ | १२ | ७.१४% |
| (१६) | सामान्य प्रशासन विभाग | ४० | ४ | १ | ४ | ० | ७ | ३ | ११ | २ | - | ९ | १० | १८.१८% |
| (१७) | परिवहन विभाग | ३७ | १ | ० | ० | ० | ९ | ६ | १६ | २ | - | १४ | ५ | १२.५०% |
| (१८) | अल्पसंख्याक विकास विभाग | ६ | १ | ० | ० | ० | ० | २ | १ | ० | - | १ | २ | |
| (१९) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | १४ | ० | ० | ० | ० | २ | १ | १० | ३ | - | ७ | १ | ३०.००% |

**विवरण क्रमांक - २६-चालू**

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (२०) | मदत व पुनर्वसन विभाग | १९ | ० | ० | १ | ० | ७ | ४ | ६ | ० | - | ६ | १ | |
| (२१) | विधी व न्याय विभाग | ८ | ० | ० | १ | ० | १ | २ | ४ | १ | - | ३ | ० | २५.००% |
| (२२) | [illegible] नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग. | २५ | २ | ० | ० | ० | ९ | १ | ८ | ० | - | ८ | ५ | |
| (२३) | वने विभाग | २९ | ० | ० | ० | ० | ४ | ४ | १९ | २ | - | १७ | २ | १०.५३% |
| (२४) | महसूल विभाग | ८२ | ० | २ | ९ | ० | २० | ११ | ३३ | ३ | - | ३० | ७ | ९.०९% |
| (२५) | कृषी विभाग | ४० | ० | ० | २ | ० | ११ | २ | २४ | ५ | - | १९ | १ | २०.८३% |
| (२६) | ग्रामविकास विभाग | ९३ | १ | ० | ५ | ० | २८ | ११ | ३२ | ३ | - | २९ | १६ | ९.३८% |
| (२७) | दुग्धविकास विभाग | ७ | ० | ० | ० | ० | ४ | १ | २ | ० | - | २ | ० | |
| (२८) | महिला व बालविकास विभाग | ४८ | १ | ० | ० | ० | २८ | १ | ११ | ० | - | ११ | ७ | |
| (२९) | क्रीडा विभाग | १२ | ० | ० | १ | ० | २ | ४ | ३ | १ | - | २ | २ | ३३.३३% |
| (३०) | पशुसंवर्धन विभाग | १५ | ० | ० | ० | ० | ५ | १ | ८ | १ | - | ७ | १ | १२.५०% |
| (३१) | सांस्कृतिक कार्य विभाग | २४ | ० | ० | २ | ० | ८ | १ | १२ | २ | - | १० | १ | १६.६७% |
| (३२) | वित्त विभाग | १४ | १ | ० | ३ | ० | ४ | १ | ५ | २ | - | ३ | ० | ४०.००% |
| (३३) | आदिवासी विकास विभाग | ४८ | ० | ० | ४ | ० | १९ | ५ | १८ | ४ | - | १४ | २ | २२.२२% |
| (३४) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | ३० | ० | १ | ० | ० | ५ | ५ | ११ | १ | - | १० | ८ | ९.०९% |
| (३५) | मराठी भाषा विभाग | १० | ३ | ० | ० | ० | १ | १ | ४ | ० | - | ४ | १ | |
| (३६) | मत्स्यविकास विभाग | ७ | ० | ० | १ | ० | ० | ४ | २ | १ | - | १ | ० | ५०.००% |
| (३७) | अन्न व औषध प्रशासन विभाग | २३ | ० | ० | ० | ० | १२ | १ | १० | १ | - | ९ | ० | १०.००% |
| (३८) | बंदरे विभाग | ४ | ० | ० | १ | ० | १ | १ | १ | ० | - | १ | ० | |
| (३९) | सामाजिक न्याय विभाग | ८३ | २ | ० | ५ | ० | २० | ७ | १८ | १ | - | १७ | ३१ | ५.५६% |
| (४०) | पणन विभाग | ६ | १ | ० | ० | ० | ० | १ | १ | ० | - | १ | ३ | |
| (४१) | पर्यटन विभाग | ८ | ० | ० | ० | ० | २ | १ | ४ | ० | - | ४ | १ | |
| (४२) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग. | १३ | १ | ० | ० | ० | ४ | ० | ७ | ० | - | ७ | १ | |
| (४३) | संसदीय कार्य विभाग | २ | ० | ० | २ | ० | ० | ० | ० | ० | - | ० | ० | |
| (४४) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | ८ | ० | ० | १ | ० | ० | ० | ६ | १ | - | ५ | १ | १६.६७% |
| (४५) | खनिकर्म विभाग | २ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | - | ० | १ | |
| (४६) | रोजगार हमी विभाग | १४ | ० | ० | ० | ० | ४ | ० | ९ | १ | - | ८ | १ | ११.११% |

## विवरण क्रमांक - २६-समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (४७) | [illegible]विभाग | ३ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | - | १ | २ | |
| (४८) | राज्य उत्पादन शुल्क विभाग | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | - | २ | ० | |
| (४९) | फलोत्पादन विभाग | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ | ० | - | ४ | ० | |
| (५०) | मृद व जलसंधारण विभाग | ७ | ० | ० | ० | ० | १ | ० | ४ | ० | - | ४ | २ | |
| (५१) | माहिती तंत्रज्ञान विभाग | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | ० | - | १ | ० | |
| | **एकूण** | **१८५६** | **५७** | **६** | **९१** | **०** | **५२२** | **२०५** | **७२८** | **८४** | **-** | **६४४** | **२४७** | **११.५४%** |

**विवरण क्रमांक २७**

**अतारांकित प्रश्नांची विभागनिहाय आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र**

| अ.क्र. | विभागाचे नाव | गत सत्रात प्रलंबित राहिलेल्यांपैकी लेखी उत्तर प्राप्त झालेल्या अतारांकित प्रश्नांची संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| (१) | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग | २ |
| (२) | अल्पसंख्यांक विकास विभाग | १ |
| (३) | आदिवासी विकास विभाग | ९ |
| (४) | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | २ |
| (५) | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | ६ |
| (६) | उद्योग विभाग | १ |
| (७) | ऊर्जा विभाग | ४ |
| (८) | कामगार विभाग | १ |
| (९) | कृषी विभाग | ६ |
| (१०) | क्रीडा विभाग | १ |
| (११) | गृह विभाग | १५ |
| (१२) | गृहनिर्माण विभाग | ३ |
| (१३) | ग्रामविकास विभाग | ९ |
| (१४) | जलसंपदा विभाग | ७ |
| (१५) | दुग्धविकास विभाग | १ |
| (१६) | नगर विकास विभाग | ५७ |
| (१७) | नियोजन विभाग | ३ |
| (१८) | परिवहन विभाग | २ |
| (१९) | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | ६ |
| (२०) | पशुसंवर्धन विभाग | ५ |

**विवरण क्रमांक २७**—चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| (२१) | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | २ |
| (२२) | फलोत्पादन विभाग | १ |
| (२३) | मत्स्यविकास विभाग | ३ |
| (२४) | मदत व पुनर्वसन विभाग | ४ |
| (२५) | मराठी भाषा विभाग | १ |
| (२६) | महसूल विभाग | २० |
| (२७) | महिला व बालविकास विभाग | २ |
| (२८) | मृद व जलसंधारण विभाग | १ |
| (२९) | रोजगार हमी विभाग | १ |
| (३०) | वने विभाग | २ |
| (३१) | वित्त विभाग | २ |
| (३२) | वैद्यकीय शिक्षण विभाग | ३ |
| (३३) | शालेय शिक्षण विभाग | ५२ |
| (३४) | सहकार विभाग | ८ |
| (३५) | सांस्कृतिक कार्य विभाग | ५ |
| (३६) | सामाजिक न्याय विभाग | १७ |
| (३७) | सामान्य प्रशासन विभाग | ४ |
| (३८) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग | १९ |
| (३९) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग | ११ |
| (४०) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) विभाग | १ |
| | **एकूण . .** | **३००** |

## विवरण क्रमांक-२८

## तारांकित प्रश्नाबाबतचा तपशील

| अनुक्रमांक (१) | तपशील (२) | संख्या (३) |
|---|---|---|
| १. | सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरिता दाखविण्यात आलेल्या दिवसांची संख्या | १७ |
| २. | सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरिता न ठेवलेल्या दिवसांची संख्या | १ |
| ३. | प्रश्नांच्या सूचना दिलेल्या सदस्यांची संख्या | ४७ |
| ४. | (अ) तोंडी उत्तरे दिली गेलेल्या प्रश्नांची संख्या | ८४ |
| | (ब) तोंडी उत्तरे दिली गेलेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या | ०१ |
| ५. | एका सदस्याकडून जास्तीत जास्त आलेल्या प्रश्नांची संख्या **श्री. विक्रम काळे,** वि.प.स. | १०० |
| ६. | एका सदस्याचे जास्तीत जास्त स्वीकृत झालेल्या प्रश्नांची संख्या **श्री. विलास पोतनीस,** वि.प.स. | ४३ |
| ७. | एकाच दिवशी जास्तीत जास्त उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या | ८ |
| ८. | एकाच दिवशी कमीत कमी उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या | १ |
| ९. | एकाच दिवशी एका मंत्री महोदयांकडून जास्तीत जास्त उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या. | ४ |
| १०. | प्रत्येक दिवसाला उत्तरे दिली गेलेल्या प्रश्नांची सरासरी संख्या | ४.९४ |

**तारांकित प्रश्नाबाबतचा तपशील खालीलप्रमाणे :**

१. सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरिता दाखविण्यात आलेल्या दिवसांची संख्या : १७

२. सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरिता न ठेवलेल्या दिवसांची संख्या : १ (सुट्ट्या सोडून)

३. प्रश्नांच्या सूचना दिलेल्या सदस्यांची संख्या : ४७

४. तोंडी उत्तरे दिली गेलेल्या प्रश्नांची संख्या : ७४

५. तोंडी उत्तरे दिली गेलेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या : १

६. एका सदस्याकडून जास्तीत जास्त आलेल्या प्रश्नांची संख्या : १०० (श्री. विक्रम काळे)

७. एका सदस्याचे जास्तीत जास्त स्वीकृत झालेल्या प्रश्नांची संख्या : ४३ (श्री. विलास पोतनीस)

८. एकाच दिवशी जास्तीत जास्त उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या : ८ (१४ मार्च, २०२३)

९. एकाच दिवशी एका मंत्री महोदयाकडून जास्तीत जास्त उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या : ४

१०. प्रत्येक दिवसाला उत्तरे दिली गेलेल्या प्रश्नांची सरासरी संख्या : ५ (अचूक सरासरी : ४.६२५)

# विवरण क्रमांक २९

## नियम २८९ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांचा तक्ता

| अ.क्र. (१) | दिनांक (२) | सदस्यांची नावे (३) | विषय (४) | निर्णय (५) |
|---|---|---|---|---|
| १. | २८ फेब्रुवारी २०२३ | **श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** | मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना देशद्रोह्यां-बरोबर चहापान टळले असे वक्तव्य केल्याबाबत. | अमान्य |
| २. | २८ फेब्रुवारी २०२३ | **श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** | राज्यातील कांदा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला हमी भाव मिळत नसल्याबाबत. | अमान्य |
| ३. | २८ फेब्रुवारी २०२३ | **ॲड. अनिल परब, वि. प. स.** | मा. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या वक्तव्याबाबत | अमान्य |
| ४. | २८ फेब्रुवारी २०२३ | **ॲड. अनिल परब, वि. प. स.** | राज्यातील कांदा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला हमी भाव मिळत नसल्याबाबत. | अमान्य |
| ५. | १ मार्च २०२३ | **श्री. शशिकांत शिंदे, व इतर, वि. प. स.** | राज्यातील कांदा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला हमी भाव मिळत नसल्याबाबत. | अमान्य |
| ६. | १ मार्च २०२३ | **श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** | मा. मुख्यमंत्र्यांच्या वक्तव्याबाबत | अमान्य |
| ७. | १ मार्च २०२३ | **श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** | राज्यात पत्रकारांवर होत असलेल्या हल्ल्यांबाबत. | अमान्य |
| ८. | २ मार्च २०२३ | **श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** | मराठा समाजाला आरक्षण देण्याकरिता भारताच्या संविधानामध्ये सुधारणा करण्याबाबत. | अमान्य |
| ९. | २ मार्च २०२३ | **श्री. शशिकांत शिंदे व इतर वि. प. स.** | राज्यातील कांदा व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला हमी भाव मिळत नसल्याबाबत. | अमान्य |
| १०. | २ मार्च २०२३ | **श्री. अशोक जगताप व इतर वि. प. स.** | मुंबई महानगरपालिकेत होत असलेला मनमानी कारभाराबाबत. | अमान्य |
| ११. | ३ मार्च २०२३ | **श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** | मराठवाडा मुक्ती संग्राम अमृत महोत्सवी वर्ष साजरा करण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत. | अमान्य |

**विवरण क्रमांक २९—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १२. | ८ मार्च २०२३ | **श्री. सतेज पाटील व इतर वि. प. स.** | राज्यात अनेक जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसान भरपाईसाठी विशेष पॅकेज जाहिर करण्याबाबत. | अमान्य |
| १३. | ८ मार्च २०२३ | **श्री. एकनाथराव खडसे व इतर वि. प. स.** | दि. ७ मार्च, २०२३ रोजी राज्यात वादळी वाऱ्यासह झालेला अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे अनेक भागातील रब्बी हंगामात काढणीला आलेल्या गहू, हरभरा, ज्वारी, कांदा इत्यादी पिकांचे झालेले कोट्यवधी रुपयांचे नुकसान. | अमान्य |
| १४. | ८ मार्च २०२३ | **श्री. शशिकांत शिंदे, वि. प. स.** | दि. ७ मार्च, २०२३ रोजी राज्यात वादळी वाऱ्यासह झालेला अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे अनेक भागातील रब्बी हंगामात काढणीला आलेल्या गहू, हरभरा, ज्वारी, कांदा इत्यादी पिकांचे झालेले कोट्यवधी रुपयांचे नुकसान. | अमान्य |
| १५. | ८ मार्च २०२३ | **श्री. अंबादास दानवे, वि. प. स.** | राज्यात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत. | अमान्य |
